# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— १७/१/२००८

**दि. १७/१/२००८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती**

११

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरुवार दिनांक १७/१/२००८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री पारवानी राम (चार्ली) फुंदुमल | सभापती |
| २ | श्री लुंड गोविंदराम डोलुमल | सदस्य |
| ३ | श्री इदनानी जीवन (राजु) चंद्रभान | ——"—— |
| ४ | श्री जाधव सुरेश मधुकर | ——"—— |
| ५ | श्री गायकवाड दिलीप दशरथ | ——"—— |
| ६ | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल | ——"—— |
| ७ | श्रीमती रिजवानी सुजाता रमेश | ——"—— |
| ८ | श्रीमती उदासी इंदिरा जमनादास | ——"—— |
| ९ | श्रीमती रावत निलम प्रेमसिंग | ——"—— |
| १० | श्री जग्यासी किशोर | ——"—— |
| ११ | श्री दवणे नरेंद्र (रवीभाऊ) | ——"—— |
| १२ | श्री वानखेडे राजेश देवेंद्र | ——"—— |
| १३ | श्री सुपाळे विजय खंडु | ——"—— |
| १४ | श्रीमती निकम लता शांताराम | ——"—— |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य अनुपस्थित होते.

१. श्री ठाकुर नरेंद्र (कुमारी) केवलराम, २. श्री बठिजा संजय रामचंद्र

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. समीर उन्हाळे, आयुक्त
२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३. श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त
४. श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
५. श्री. मिलींद सावंत, उप—आयुक्त
६. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
८. श्री. बी. सुंदरेश्वरन, शहर अभियंता, सार्व.बांध. विभाग
९. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१०. श्री. सेल्वन, प्र.कार्यकारी अभियंता, पा.पु.
११. श्री.आर. बी. शिर्के प्र. कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.विभाग
१२. श्री. विसपुते, उप अभियंता
१३. श्री. अभिजित महामुलकर, प्रोग्रामर, ना.सु.के.

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव

सांयकाळी ४.३५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

महापालिका सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :– मागील सभेचे दिनांक १०/१२/२००७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

सदस्य श्री. सुरेश जाधव :–कचरा वाहतुक ठेकेदार मेसर्स ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलींग यांच्या कामातील कमतरतांबाबतचा चौकशी समितीचा अहवाल आठ दिवसामध्ये स्थायी समिती सभेपुढे आणला जाईल असें आपण जे सांगितले होते त्याचे काय झाले? तो अदयापपर्यंत का आणला नाही?

सभापती, श्री. राम पारवानी :–कचरा वाहतुक ठेकेदार मेसर्स ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलींग यांच्या कामकाजातील कमतरतांबाबतचा चौकशी समितीचा अहवाल स्थायी समिती सभेपूढे आणण्यात आला होता परंतु त्यावेळी काही सदस्यांकडुन असे सांगण्यात आले की सदरच्या अहवालाचे मराठी भाषेत भाषांतर करुन मराठी भाषेतील अहवाल पुढील स्थायी समिती सभेत आणला जावा.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–सभापती महोदय, मराठी, हिंदी भाषेत अहवाल दिला किंवा दिला नाही ते सोडुन दया. आठ दिवसामध्ये आपण स्थायी समितीची सभा बोलावणार होतात. आपण या ठेकेदाराचे एवढे संरक्षण का करत आहात ते मला समजत नाही. आज सुध्दा तो नियमितपणे कचरा उचलत नाही. त्याच्यावर कारवाई करुन दंडाची रक्कम वसुल केली जावी. त्याच्याबाबतीत अधिका–याच्या समितीचा जो अहवाल आलेला आहे तो अतिशय चांगला आहे. आता आपण याबाबतीत किती दिवसामध्ये सभा बोलवणार आहात? दोन महिन्यामध्ये तीन महिन्यांमध्ये? किती दिवसामध्ये?

सदस्य श्री. सुरेश जाधव :–या प्रस्तावाबाबत कधी सभा बोलाविली जाईल त्याची तारीख आजच निश्‍चित केली जावी.

सभापती, श्री. राम पारवानी :–हा प्रस्ताव पुढील सभेत आणला जाईल.

सदस्य श्री. गोविंदराम लुंड:– हे प्रकरण आठ दिवसासाठी आयुक्त साहेबांवर सोपविण्यात आले होते. त्यांनी याबाबतीत निर्णय घ्यावा असे सुचविण्यात आले होते.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–माझ्या प्रभागामध्ये ४ महिन्यापासुन नळाला गढुळ पाणी येत आहे. याबाबत वर्तमानपत्रामध्ये सुध्दा बातम्या येत आहेत.

महापालिका सचिव :–त्याबाबतचा एक प्रस्ताव आजच्या सभेत आलेला आहे.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–सर्व कामांमध्ये या कामाचा प्रस्ताव नको आहे. या कामाचा स्वतंत्रपणे प्रस्ताव आणला जावा.

महापालिका सचिव :–आयत्यावेळच्या विषयान्वये या कामाचा स्वतंत्र प्रस्ताव सभेपुढे आणण्यात आलेला आहे.

काही सदस्य :–पास–पास......

<u>सभापती, श्री. राम पारवानी :—</u>मागील सभेचे दिनांक १०/१२/२००७ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक १०/१२/२००७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. सुरेश जाधव

अनुमोदकाचे नांव : श्री. दिलीप गायकवाड

<u>स्थायी समिती ठराव क्र. :—</u> १२२ क      <u>दिनांक : १७/१/२००८</u>

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक १०/१२/२००७ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ५० पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

<u>एकमताने</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

.<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. २ :—** श्री. डी.आर.पाटील यांच्या अतिक्रमण विभागात विशेष कार्य अधिकारी या पदावरील नेमणुकीस मुदतवाढ देणे.

---

<u>काही सदस्य:—</u>हा विषय आजच्या सभेच्या कार्यसुचीवरून वगळण्यांत यावा.

<u>सभापती, श्री. राम पारवानी :—</u>सदरचा विषय आजच्या सभेच्या कार्यसुचीवरून वगळण्या कामी सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. २ :—** श्री. डी.आर.पाटील यांच्या अतिक्रमण विभागात विशेष कार्य अधिकारी या पदावरील नेमणुकीस मुदतवाढ देणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. डि.आर.पाटिल, विशेष कार्य अधिकारी यांची जा.क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/टे—३/३५/०७, दिनांक १८/६/२००७ रोजीच्या आदेशान्वये ०६ महिन्यांसाठी नियुक्ती करण्यात आली होती.

उपरोक्त आदेशान्वये श्री. डि.आर.पाटिल यांची महापालिका आस्थापनेवरील विशेष कार्य अधिकारी या पदावरील नियुक्ती दिनांक १८/१२/२००७ रोजी संपृष्टात येत आहे. उल्हासनगर शहरातील अनधिकृत बांधकाम विषयक मा. उच्च न्यायालयात सध्या केस सुरु आहे. याविषयी मा. उच्च न्यायालयाने महापालिकेस काही स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यास अनुसरुन अनधिकृत इमारती संबंधीत विकासक, जमिन मालक व वास्तुविशारद यांचेविरुध्द गुन्हे दाखल करण्याचे काम त्यांचेवर सोपविलेले आहे. सदर कामाची पुर्तता करण्यासाठी श्री. डि. आर.पाटील यांचे सेवेची महापालिकेस आवश्यक असलेली निकड लक्षात घेता त्यांना मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

तरी श्री. डि.आर.पाटील यांना विशेष कार्य अधिकारी या पदावरील नियुक्तीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये ०६ महिन्यांची मुदतवाढ देणेबाबतचा गोषवारा मंजुरीसाठी मा. स्थायी समितीपुढे प्रस्तावित करीत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १२२ ड                                        दिनांकः— १७/१/२००८

सुचकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

अनुमोदकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

ही स्थायी समिती श्री. डी.आर.पाटील यांच्या अतिक्रमण विभागात विशेष कार्य अधिकारी या पदावरील नेमणुकीस मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव सविस्तर माहिती अभावी आजच्या सभेच्या कामकाजातुन वगळण्यांस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ३ :— मुख्य लेखा परिक्षकाकडुन आलेला माहे एप्रिल ते ऑक्टोंबर २००७ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल विचारात घेवुन योग्य आदेश देणे.

---

सभापती, श्री. राम पारवानीः—मुख्य लेखा परिक्षकांच्या अहवालात २५—२६ आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. ते एक—एक आक्षेप आपण ऐकुन घेतले तर बरे होईल. व श्री. नाकाडी साहेबांना विनंती आहे की, विभाग निहाय आक्षेप वाचुन दाखवावेत.

श्री. सु.कु. नाकाडी(मुख्य लेखा परिक्षक):—या आक्षेपांची पुर्तता करण्यासाठी प्रत्येक विभागास वेळ निर्धारीत करुन दयायची आहे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—कोण कोणत्या विभागाचे आक्षेप आहेत?

श्री. सु.कु. नाकाडी(मुख्य लेखा परिक्षक):—ब—याचशा विभागांचे आक्षेप आहेत.

सदस्य श्री. किशोर जग्यासीः—प्रत्येक आठवडयास त्यांनी स्थायी समितीला अहवाल सादर करायचा असतांना दिड वर्षाचा अहवाल ते आता कसे देत आहेत?

श्री. सु.कु. नाकाडी(मुख्य लेखा परिक्षक):—कर विभागाची वसुली जेमतेम २५ टक्के एवढी आहे. जी ८०—९० टक्के असावयास पाहिजे होती.

सदस्य श्री. किशोर जग्यासीः—कर विभागामध्ये ब—याचशा अनियमितता आहेत त्या दुर करण्यासाठी त्या विभागामध्ये एक विशेष लेखा परिक्षक नेमला पाहिजे.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे ):— कर विभागासाठी एक उप—आयुक्त आहेच.

श्री. सु.कु. नाकाडी (मुख्य लेखा परिक्षक):– स्टॉकिंग चार्जेसबाबत एक आपेक्ष आहे. महासभा ठराव क्र. १३, दिनांक २८/६/९५ नुसार प्रत्येक दोन महिन्यांनी स्टॉकिंग चार्जेस वसुल करायचे होते. परंतु ते प्रत्येक दोन महिन्यांनी वसुल न करता फक्त एकदाच दोन महिन्याचे स्टॉकिंग चार्जेस वसुल केले आहेत.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–स्टॉकिंग चार्जेस वसुलीची जबाबदारी कुणाची आहे?

श्री. सु.कु. नाकाडी(मुख्य लेखा परिक्षक):–नगररचना विभागाची आहे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–मग वसुली का होत नाही?

श्री. सु.कु. नाकाडी (मुख्य लेखा परिक्षक):–काही प्रकरणामध्ये कमी–जास्त रक्कम भरली जाते. कमी रक्कम भरणे हे जसे चुकीचे आहे तसे जास्त रक्कमेचा भरणा करणे हे सुध्दा चुकीचे आहे. ज्या कर्मचा–यांनी वसुलीची रक्कम कमी भरली आहे अशा कर्मचा–यांच्या पगारातुन सदरची रक्कम वसुल केली पाहिजे. तसेच अतिक्रमण विभागामध्ये संबंधीत लिपिकाने २०० रुपयाची पावती काढुन त्यातील फक्त ५० रुपयाचा भरणा केला म्हणजेच दिडशे रुपयाचा कमी भरणा केला आहे. त्याचबरोबर अतिक्रमण विभागाने दंड आकारणी करतांना ५०–१००–१५०–२००–२५० असा आकडा दिलेला आहे. दंडाची रक्कम नेमकी किती आहे हे समजुन येत नाही. त्यामध्ये एक सारखेपणा नाही. तसेच पाणी पुरवठा विभागातील लिपिकाने पावत्यांवर सहया न करता पाणीपट्टी ग्राहकांना पावत्या निर्गमित केल्या आहेत. या बाबत संबंधीतांकडुन खुलासा मागितला आहे. त्याचबरोबर पाणी पट्टी बिलाची रक्कम उशिरा भरलेली आहे. अग्नीशमन विभागामध्ये काही भंगार सामान पडुन आहे त्या साहित्याची विल्हेवाट लावण्याकामी दरपत्रके किंवा निविदा मागविल्या पाहिजेत. त्याचबरोबर मालमत्ता विभागाने काही स्थावर मालमत्तांची नोंद केलेली नाही. महापालिकेच्या सर्व मालमत्तांची नोंद करुन मालमत्ता पुस्तक अदयावत करण्यात यावे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–आपणाकडे कॅटीनची सोय नाही. कॅटीनची काही व्यवस्था होवु शकते काय?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):– दोन वेगवेगळया व्यक्तींना कॅटीन चालविण्यासाठी मंजुरी दिलेली आहे. तसेच एक चांगली कॅटीन असावी ही आपली सूचना अतिशय चांगली आहे.

सदस्य श्री. जीवन इदनानी:–आपल्या मुख्यालयाच्या इमारतीमागे स्विमिंग पुल शेजारी कॅटीन आहे. तेथे जाण्या येण्यासाठी मुख्यालयाच्या इमारतीचे मागील गेट चालु केले जावे.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–कॅटीन चालविण्यासाठी महिला बचत गटांना दिली पाहिजे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–त्यामुळे त्यांना चांगला व्यवसायही मिळु शकेल.

श्री. सु.कु. नाकाडी (मुख्य लेखा परिक्षक):–शिक्षण मंडळाच्या इमारतीचे भाडे आले नाही. महापालिका शाळांपैकी १९ शाळांच्या इमारतींचे भाडे रुपये १,५३,३३,५१२/– शासनाकडून महानगरपालिकेस अदयाप प्राप्त झाले नाही. हे भाडे मिळविण्यासाठी शिक्षण मंडळाने पाठ पुरावा करावा असे त्यांना कळविण्यात आलेले आहे. कॅम्प नं. १,२,३ व ५ मध्ये असलेल्या भाजी मार्केटमधील गाळयांचे भाडे वसुली बाकी आहे. सदर वसुलीबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली याबाबत मालमत्ता विभागाकडुन खुलासा मागविलेला आहे.

सदस्य श्री. राजेश वानखेडे:–कोणत्याही परिस्थितीत ही रक्कम वसुल करुन घेण्यात यावी.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–तरण तलाव इमारतीच्या तळमजल्यावरील काही भिंतींचे निष्कासन करून तेथे अंतर्गत रचनेत बदल करण्याचे काम चालु आहे अंतर्गत बदल करण्यासाठी त्या ठेकेदाराने आयुक्त साहेब आपणा कडून परवानगी घेतली आहे काय?बिना परवानगी बांधकाम करण्याची कुणाची हिम्मंत होता कामा नये.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–त्यांना परवानगी दिली आहे.

श्री. सु.कु. नाकाडी (मुख्य लेखा परिक्षक):—आरव्ही पावती पुस्तकांचे लेखा परिक्षण केले असता असे निदर्शनास आले आहे की, आरव्हीच्या पावत्यांमध्ये कमी रक्कमेचा भरणा केला आहे. तसेच श्रीमती रोमा हिंगोरानी वसुली लिपिक यांनी घरपट्टीची रक्कम ८६५/— स्विकारुन महापालिका कोषागारात ८५५/—रुपयाचा भरणा केलेला आहे म्हणजेच १० रुपये कमी भरणा केला आहे. तसेच ट्रेड लायन्सची ३६/— रुपयाची पावती काढण्यात आली आहे परंतु ही रक्कम कोषागारात भरणा केल्याचे दिसुन येत नाही. कर विभागातील एक लिपिक श्रीमती राणी कुर्सेजा यांनी मालमत्ता कराची वसुली करुन रुपये ३००/— चा कमी भरणा केला आहे. या रक्कमेवर १८ टक्के व्याज आकारुन ही रक्कम ताबडतोब कोषागारात जमा करणेस कर विभागास कळविण्यांत आलेले आहे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—तर मग संबंधीतांवर गुन्हा दाखल करा.

श्री. सु.कु. नाकाडी (मुख्य लेखा परिक्षक):—सदरची कारवाई संबंधीत विभागाने केली पाहिजे.

सदस्य श्री. सुरेश जाधव:—याबाबत प्रत्येक विभागास तुम्ही सूचना दिल्या आहेत काय?

श्री. सु.कु. नाकाडी (मुख्य लेखा परिक्षक):—होय.

सदस्य श्री. सुरेश जाधव:—त्यानंतरही त्या विभागाने काही कार्यवाही केली नाही काय?

श्री. सु.कु. नाकाडी (मुख्य लेखा परिक्षक):—नाही, म्हणुनच तर स्थायी समितीपुढे हा अहवाल आणला आहे. याचबरोबर पाणी पुरवठा विभागाच्या एका लिपीकाने पाणी पट्टी पोटी ग्राहकाकडुन बिलाची रक्कम स्विकारतांना विलंब शुल्क म्हणुन १८ टक्के व्याजाची रक्कम वसुल करायची होती ती त्याने केली नाही त्यामुळे महानगरपालिकेचे रुपये ४८००/— नुकसान झाले आहे. सदरची रक्कम पाणी ग्राहकाकडुन वसुल करुन महापालिका कोषागारात भरणा करण्याकामी पाणी पट्टी विभागास कळविण्यात आले आहे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—आपण आपल्या अहवालामध्ये उत्पन्न आणि खर्चाच्या बाबींचे जे तक्ते दिले आहे ते मराठी भाषेत दिले पाहिजेत.

सदस्य श्री. जीवन इदनानी:—मुख्य लेखा परिक्षकांनी आपल्या अहवालामध्ये जे आक्षेप नोंदविले आहेत त्यांचे अनुपालन करण्यासाठी संबंधीत विभागांना काही कालावधी दिला पाहिजे ना? हा कालावधी किती दिवसाचा दयायचा? एक महिन्याचा? १५ दिवसाचा? किती दयायचा?

सदस्य श्री. राजेश वानखेडे:—८ दिवसाचा कालावधी दिला जावा.

सदस्य श्री. सुरेश जाधव / श्री. दिलीप गायकवाड:—नाही, नाही एक महिन्याचा दया.

सदस्य श्री. गोविंदराम लुंड:—मालमत्ता विभागामध्ये कर्मचा—यांची संख्या फारच कमी आहे. त्या विभागास काही कर्मचारी देणे आवश्यक आहे.

सदस्या श्रीमती सुरेश जाधव :—मुख्य लेखा परिक्षकांनी नोंदविलेल्या आक्षेपांचे संबंधीत विभागाने अनुपालन केले नाही किंवा काही कार्यवाही केली नाही तर त्यांच्यावर काय कारवाई होवू शकते?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—नक्की कारवाई होवु शकते. शिक्षा होवु शकते.

श्री. सु.कु. नाकाडी (मुख्य लेखा परिक्षक):—पाणी बिलापोटी ग्राहकांकडुन स्विकारलेले धनादेश महापालिकेच्या बँकेतील खात्यामध्ये जमा केले असता ते न वटता परत आले आहेत. वास्तविक पाहता धनादेश न वटता परत आल्यानंतर संबंधीत वसुली लिपिकाने सदर धनादेशाची दंडनिय दराने रोखीने त्वरीत वसुली करणे आवश्यक होते परंतु तसे करण्यात आलेले नाही.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—चेक वटला नाही तर संबंधीतावर फौजदारी गुन्हा दाखल होवु शकतो ना? संबंधीतावर फौजदारी गुन्हा दाखल केला जावा.

**सदस्य श्री. जीवन इदनानी:—**ज्यांचे चेक न वटता परत आले असतील त्यांच्याकडुन सदरची रक्कम वसुल करण्यासाठी जप्ती काढली जावी.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—**म्हणुनच तर एक महिन्याची मुदत दिली आहे.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—**त्याचबरोबर मागील तीन वर्षापासुन पाणी पट्टीची वसुली अतिशय कमी होत आहे. पाणी पट्टीची वसुली वाढविण्याकामी कार्यवाही केली जावी. व आक्षेपांचे अनुपालन करण्यासाठी एक महिन्याचा जो आपण कालावधी देत आहोत या कालावधीत अनुपालनाची कार्यवाही झाली नाही तर संबंधीतावर कडक कारवाई करण्यात आली पाहिजे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. राम पारवानी :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३ :—** मुख्य लेखा परिक्षकाकडुन आलेला माहे एप्रिल ते ऑक्टोंबर २००७ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल विचारात घेवुन योग्य आदेश देणे.

**प्रस्तावना**

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे एप्रिल २००७ चा जमा खर्चाचा अहवाल.

वित्तीय वर्ष २००७—२००८ च्या “अ” व “क” अर्थसंकल्पात अंदाजित केलेले उत्पन्न खलीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अपेक्षित जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | ८५,४७,६०,००० |
| “क” | ५९,०१,९३,००० |
| एकूण | ५५,६३,५९,००० |

तसेच अपेक्षित जमेमध्ये खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अपेक्षित जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | ४१,२३,७१,००० |
| ३ | शासकीय अनुदान | १,२१,६०,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | ४२,८०,६१,००० |
| ५ | एकुण | ८५,२५,९२,००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | ५,७६,१६,००० |
| ७ | एकुण :— | ९१,०२,०८,००० |

वित्तीय वर्ष २००७—२००८ च्या अर्थसंकल्पात महसूल जमा रक्कम रुपये ४१,२३,७१,०००/— अपेक्षित धरलेली आहे. माहे एप्रिल २००७ पर्यंत समप्रमाणात रुपये ११,८०,३४,०००/— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रु. ७,६०,८९,०००/—(एकूण महसूल जमेच्या ६४.४६ टक्के ) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे एप्रिल २००७ पर्यत अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष | अंदाजित | माहे एप्रिल २००७ | प्रत्यक्ष जमा |
|---|---|---|---|

| अर्थ संकल्प “अ” | | | २००७ पर्यंत अपेक्षित | (रु१०००/—पुर्णांकांत) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | जकात | २६,४२,००,००० | ६,६०,५०,००० | ६,२१,६५,००० |
| २ | मालमत्ता कर | ४,६९,००,००० | १,१७,२५,००० | ६२,५४,००० |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | ५,३९,६०,००० | १,३४,९०,००० | ५,१३,००० |
| ४ | मार्केट उत्पन्न | — | — | — |
| ५ | रुग्णालय फी | ४०,००० | १०,००० | ३,००० |
| ६ | परवाना व इतर फी | १,८५,२०,००० | ४६,३०,००० | १०,९४,००० |
| ७ | संकीर्ण | ५८,५३,००० | १४,६३,००० | १५,२६,००० |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | १,२०,००,००० | ३०,००,००० | १६,००० |
| | एकूण—अ | ४०,१४,७३,००० | १०,०३,६८,००० | ७,१५,७१,००० |
| | अर्थसंकल्प “क” | | | |
| १ | पाणी बिल वसुली | २,५०,००,००० | ६२,,५०,००० | २५,१२,००० |
| २ | मालमत्ता कर | ३,३५,००,००० | ८३,७५,००० | १९,५४,००० |
| ३ | परवाना/इतर फी | १,१६,००,००० | २९,००,००० | ५२,००० |
| ४ | संकीर्ण | ५,६४,००० | १,४१,००० | — |
| | एकुण “क” | ७,०६,६४,००० | १,७६,६६,००० | ४५,१८,००० |
| | एकुण “अ”व “क” | ४७,२१,३७,००० | ११,८०,३४,००० | ७,६०,८९,००० |

‘अ’ व ‘क’ अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ५५,६३,५९,०००/— (प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित केलेले आहे. प्रत्यक्षात माहे एप्रिल २००७ मध्ये रु. १३,७८,७२,६०९/—प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे. उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पनाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही.

**खर्च—**

माहे एप्रिल २००७ या कालावधीमध्ये रु. ८,४६,३४,८०२/— खर्च लेखांकित झालेला आहे.

खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते तसेच लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान झालेले आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदी या अधिन आहे.

माहे एप्रिल २००७ ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहे.

**निवृत्ती वेतन प्रकरणे—** माहे एप्रिल २००७ मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या /निधन पावलेल्या कर्मचा—यांची १० निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे मे, जून, जुलै २००७ चा जमा खर्चाचा अहवाल.

वित्तीय वर्ष २००७—२००८ च्या “अ” व “क” अर्थसंकल्पात अंदाजित केलेले उत्पन्न खलीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अपेक्षित जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | ८५,४७,६०,००० |

| | |
|---|---|
| "क" | ७,१३,६३,००० |
| एकूण | ५५,६३,५९,००० |

तसेच अपेक्षित जमेमध्ये खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अपेक्षित जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | ४१,२३,७१,००० |
| ३ | शासकीय अनुदान | १,२१,६०,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | ४२,८०,६१,००० |
| ५ | एकुण | ८५,२५,९२,००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | ५,७६,१६,००० |
| ७ | एकुण :— | ९१,०२,०८,००० |

वित्तीय वर्ष २००७—२००८ च्या अर्थसंकल्पात महसूल जमा रक्कम रुपये ४१,२३,७१,०००/— अपेक्षित धरलेली आहे. माहे मे, जून, जुलै २००७ पर्यंत समप्रमाणात रुपये ३५,४१,०३,०००/— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रु. २५,२१,०६,०००/—(एकूण महसूल जमेच्या ७१.१९ टक्के ) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे मे, जून, जुलै २००७ पर्यत अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष अर्थ संकल्प "अ" | | अंदाजित | माहे जून २००७ २००७ पर्यत अपेक्षित | प्रत्यक्ष जमा (रु१०००/—पुर्णांकांत) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | जकात | २६,४२,००,००० | १९,८१,५०,००० | २०,२०,३५,००० |
| २ | मालमत्ता कर | ४,६९,००,००० | ३,५१,७५,००० | २,१९,४४,००० |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | ५,३९,६०,००० | ४,०४,७०,००० | २४,७८,००० |
| ४ | मार्केट उत्पन्न | — | — | — |
| ५ | रुग्णालय फी | ४०,००० | ३०,००० | १०,००० |
| ६ | परवाना व इतर फी | १,८५,२०,००० | १,३८,९०,००० | ४४,५३,००० |
| ७ | संकीर्ण | ५८,५३,००० | ४३,९०,००० | २४,१३,००० |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | १,२०,००,००० | ९०,००,००० | १८,००० |
| | एकूण—अ | ४०,१४,७३,००० | ३०,११,०५,००० | २३,३३,५१,००० |
| | अर्थसंकल्प "क" | | | |
| १ | पाणी बिल वसुली | २,५०,००,००० | १,८७,५०,००० | १,०७,५६,००० |
| २ | मालमत्ता कर | ३,३५,००,००० | २,५१,२५,००० | ७७,६५,००० |
| ३ | परवाना/इतर फी | १,१६,००,००० | ८७,००,००० | २,०१,००० |
| ४ | संकीर्ण | ५,६४,००० | ४,२३,००० | ३३,००० |
| | एकुण "क" | ७,०६,६४,००० | ५,२९,९८,००० | १,८७,५५,००० |
| | एकुण "अ"व "क" | ४७,२१,३७,००० | ३५,४१,०३,००० | २५,२१,०६,००० |

'अ' व 'क' अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ५५,६३,५९,०००/— (प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित केलेले आहे. प्रत्यक्षात माहे मे, जून, जुलै २००७ मध्ये रु. ३७,४५,३१,८०२/—प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे. उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पनाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही.

**खर्च—**

माहे मे, जून, जुलै २००७ या कालावधीमध्ये रु. ३१,५८,३३,२३०/— खर्च लेखांकित झालेला आहे.

खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते तसेच लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान झालेले आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदी या अधिन आहे.

माहे मे, जून, जुलै २००७ ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहे.

**निवृत्ती वेतन प्रकरणे—** माहे जून २००७ मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या /निधन पावलेल्या कर्मचा—यांची ०४ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निर्दशनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम १०६(१) अ) च्या तरतुदीप्रमाणे:—

## लेखा विभाग

**आक्षेप क्रमांक १**

विषय :— भविष्य निर्वाह निधी लेखे पूर्ण करण्याबाबत.

भविष्य निर्वाह निधी लेखे तपासले असता असे आढळून आले की, वर्षा अखेर (३१/३/०६) तयार करावयाचे, एकत्रित वार्षिक भविष्य निर्वाह निधी लेखे मागील दोन वर्षापासून पूर्ण केलेले दिसत नाही. सदर बाब वार्षिक जमा—खर्च ताळमेळ बाबतीत योग्य वाटत नाही. तरी सदर दोन वर्षापासूनचे भविष्य निर्वाह निधी वार्षिक लेखे त्वरीत तयार करून तसा अहवाल लेखा परिक्षण विभागास कळविणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा. क्र.उमपा/लेपवि/लेखा/५२/०७ दिनांक ०८/०६/२००७ अन्वये मुख्य लेखा अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

**आक्षेप क्रमांक २**

विषय :— सन २००६—२००७ च्या भविष्य निर्वाह निधी रक्कम ताळमेळबाबत.

भविष्य निर्वाह निधी लेखा तपासले असता असे आढळून आले की, ३१/३/०७ रोजी भविष्य निर्वाह निधीची एकुण रक्कम रूपये ११,१०,१५,४६४/— इतकी आढळून येते. रोख वही (कॅश बुक) वरून सदर रक्कम ९,६५,०६,२९८/— इतकी आहे. म्हणजेच भविष्य निर्वाह निधी लेख्यामध्ये १,४५,०९,१८६/— कमी आढळून येते, तरी सदर रक्कमेचे ताळमेळ जुळण्यासाठी महापालिकेकडून रूपये १,४५,०९,१८६/— भविष्य निर्वाह निधीमध्ये भरणा करणे आवश्यक आहे. तरी या बाबत कार्यवाही होवून तसे लेखा परिक्षण विभागास कळविणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/लेखा/५३/०७ दिनांक ०८/०६/२००७ अन्वये मुख्यलेखा अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

## सार्वजनिक बांधकाम विभाग

**आक्षेप क्रमांक १**

विषय :— शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान, त्या विविध योजनेअंर्तगत खर्च झाल्याबाबतचा अहवाल सादर करणे.

सन २००५—२००६ या वित्तीय वर्षात शासनाकडून येणारे अनुदान विविध योजनेअंर्तगत येणारे अनुदान एकुण रूपये २,७२,,७२,६७७/— प्राप्त झालेले आहेत. सदर रक्कम विविध योजनेनुसार, २००५—२००६ या वित्तीय वर्षात विविध लेखा शिर्षाखाली किती रक्कम खर्च झाली? याबाबत लेखा परिक्षण विभागास कळविणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/सां.बां./५४/०७ दिनांक ०८/०६/२००७ अन्वये कार्यकारी अभियंता(सा.बां.),उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

## कर विभाग

आक्षेप क्रमांक १

विषय :— सन २००५—२००६ या वित्तीय वर्षातील कर वसुलीबाबत.

सन २००५—२००६ या वित्तीय वर्षामध्ये आपल्या विभागास कर वसुलीचे किती उद्‌दीष्टे होते? व त्या प्रमाणात किती कर वसुल झाला याबाबत अद्यावत आकडेवारीसह माहिती लेखा परिक्षण शाखेस कळविणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/कर/१४०/०७ दिनांक ०८/०६/२००७ अन्वये उप—आयुक्त (कर विभाग), उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

## पाणी पुरवठा विभाग

आक्षेप क्रमांक १

विषय :— सन २००५—२००६ या वित्तीय वर्षातील पाणीपट्‌टी कर वसुलीबाबत.

सन २००५—२००६ या वित्तीय वर्षामध्ये आपल्या विभागास पाणीपट्‌टी वसुलीचे किती उद्‌दीष्टे होते? व त्या प्रमाणात किती वसुली झाली, त्याबाबत आकडेवारीसह माहिती उपलब्ध करून देण्याबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/पा.पु./१८६/०७ दिनांक ०८/०६/२००७ अन्वये उप—आयुक्त (कर विभाग), उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

## नगररचना विभाग

आक्षेप क्रमांक १

विषय :— बांधकाम परवानगी देतांना स्टेकिंग चार्जस रूपये १,२५,५७,६३०/—वसूलीबाबत.

नगररचना विभागाचे सन २००२—२००३ चे लेखा परिक्षण चालू असून, लेखा परिक्षणामध्ये असे आढळून आले की, नगररचना विभाग ने बांधकाम परवानगी देतांना महासभा ठराव क्र. १३ दिनांक २८/०६/९५ नुसार खालीलदराने स्टेकिंग चार्जस बांधकाम धारकाकडून वसूल करावयाचे आहेत.

| अ.क्र. | भूखंडाचे क्षेत्रफळ | प्रत्येक दोन महिन्यासाठी आकारावयाचे दर |
|---|---|---|
| १) | १०० चौ.मि. पर्यंत | ३०००/— |
| २) | १०१ ते २०० चौ.मि. पर्यंत | ४०००/— |
| ३) | २०१ ते ३०० चौ.मि. पर्यंत | ५०००/— |
| ४) | ३०१ ते ४०० चौ.मि. पर्यंत | ६०००/— |
| ५) | ४०१ ते ५०० चौ.मि. पर्यंत | ७०००/— |
| ६) | ५०० चौ.मि. पेक्षा जास्त | १००००/— |

वरील दराने स्टॅकिंग चार्जेस आकारणी करावयाची असतानाही सोबतच्या तक्त्यामध्ये दर्शविलेल्या प्रकरणात स्टॅकिंग चार्जस प्रत्येक दोन महिन्यानी वसूल न करता फक्त एकदाच दोन महिन्याचे स्टॅकिंग चार्जेस वसूल केले आहेत. स्टॅकिंग चार्जेस बांधकाम परवाना मिळाल्याच्या दिनांकापासून बांधकाम पुर्णतेचा दाखल्याच्या दिनांकापर्यंत वसूल करावयाचा आहे. तरी स्टॅकिंग चार्जेस पूर्ण कालावधीचे का वसूल केले नाहीत. याबाबतच्या खुलाशासह वसूल न केलेली स्टॅकिंग चार्जेसची रक्कम रूपये १,२५,५७,६३०/—(रूपये एक कोटी पंचवीस लाख सत्तावन्न हजार सहाशे तीस फक्त) संबंधितांकडून वसूल करून महापालिकेच्या कोषागारात भरणा करावी. तसेच ज्या प्रकरणामध्ये ३१/०३/२००६ नंतरही ज्यांच्या बांधकामाचा पूर्णत्वाचा दाखला मिळालेला नाही त्या कालावधीपर्यंत सदर स्टॅकिंग चार्जेसची रक्कम वसूल करण्यात बाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र. उमपा/लेपवि/नगररचना/१०/०७ दिनांक २८/०६/२००७ अन्वये नगररचनाकार, उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे ऑगस्ट २००७ चा जमा खर्चाचा अहवाल.

वित्तीय वर्ष २००७–२००८ च्या “अ” व “क” अर्थसंकल्पात अंदाजित केलेले उत्पन्न खालीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अपेक्षित जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | ३३४,३३,२८,००० |
| “क” | ५९,०१,९३,००० |
| एकूण | ३९३,३५,२१,००० |

तसेच अपेक्षित जमेमध्ये खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अपेक्षित जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | १८३,५३,४६,००० |
| ३ | शासकीय अनुदान | १७१,८७,००,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | २१,९७,५०,००० |
| ५ | एकुण | ३७७,३७,९६,००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | ५,७६,१६,००० |
| ७ | एकुण :– | ३८३,१४,१२,००० |

वित्तीय वर्ष २००७–२००८ च्या अर्थसंकल्पात महसूल जमा रक्कम रुपये १८३,५३,४६,०००/– अपेक्षित धरलेली आहे. माहे ऑगस्ट २००७ पर्यंत समप्रमाणात रुपये ७६,४७,२७,०००/– महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रु. ४५,३५,८९,०००/–(एकूण महसूल जमेच्या ५९.३१ टक्के ) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे ऑगस्ट २००७ पर्यत अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष अर्थ संकल्प “अ” | | अंदाजित | माहे ऑगस्ट २००७ पर्यत अपेक्षित | प्रत्यक्ष जमा (रु१०००/–पुर्णांकांत) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | जकात | ८३,७३,०१,००० | ३४,८८,७५,००० | ३४,४४,३५,००० | ९८.७२ |
| २ | मालमत्ता कर | ३३,५०,००,००० | १३,९५,८३,००० | ४,७६,५६,००० | ३४.१४ |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | ३,१२,००,००० | १,३०,००,००० | ३२,४१,००० | २४.९३ |
| ४ | मार्केट उत्पन्न | — | — | — | — |
| ५ | रुग्णालय फी | ११५,००० | ४८,००० | १९,००० | ३९.५८ |
| ६ | परवाना व इतर फी | ६,३८,८५,००० | २,६६,१९,००० | १,५६,२७,००० | ५८.७० |
| ७ | संकीर्ण | १९२,१०,००० | ८०,०४,००० | ४६,६५,००० | ५८.२८ |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | ४९,५०,००० | २०,६३,००० | ७,१७,००० | ३४.७५ |
| | एकूण–अ | १२९,१६,६१,००० | ५३,८१,९२,००० | ४१,६३,६०,००० | ७७.३६ |
| | अर्थसंकल्प “क” | | | | |
| १ | पाणी बिल वसुली | ४५,५०,००,००० | १८,९५,८३,००० | २,०८,०१,००० | १०.९७ |
| २ | मालमत्ता कर | ८,७५,००,००० | ३,६४,५८,००० | १,६१,०८,००० | ४४.१८ |
| ३ | परवाना/इतर फी | ११,२५,००० | ४,६९,००० | २,८२,००० | ६०.१२ |
| ४ | संकीर्ण | ६०,००० | २५,००० | ३८,००० | १५२.०० |
| | एकुण “क” | ५४,३६,८५,००० | २२,६५,३५,००० | ३,७२,२९,००० | १६.४३ |
| | एकुण “अ”व “क” | १८३,५३,४६,००० | ७६,४७,२७,००० | ४५,३५,८९,००० | ५९.३१ |

'अ' व 'क' अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु ३,९३,३६,२१,०००/– (प्रारंभिक शिल्लकेसह) अपेद्यित केलेले आहे. प्रत्यक्षात माहे ऑगस्ट २००७ मध्ये रु. ५९,४९,३९,३४७/–प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे. उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पनाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही.

खर्च–

माहे ऑगस्ट २००७ या कालावधीमध्ये रु ५,१०,८६,८१९/– खर्च लेखांकित झालेला आहे.
खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते तसेच लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान झालेले आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका–याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदी या अधिन आहे.
माहे ऑगस्ट २००७ ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहे.

**निवृत्ती वेतन प्रकरणे–** माहे ऑगस्ट २००७ मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या /निधन पावलेल्या कर्मचा–यांची ११ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निर्देशनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम १०६(१) अ) च्या तरतुदीप्रमाणे:–

## कर विभाग

### आक्षेप क्रमांक १

विषय :–मालमत्ता कर पावत्यांच्या चलनामध्ये कमी भरणा केल्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये सन २००६–०७ या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कर विभागाचे लेखा परिक्षण केले असता मालमत्ता कराच्या रोख रक्कम चलनामध्ये कमी पैसे भरणा केल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची रक्कम व्याजासह संबंधिताकडून वसूल करून पूर्तता अहवाल सादर करावा.
कमी भरणा केल्याच्या नोंदी खालीलप्रमाणे आहेत

१) श्री. रमेश साधिजा, वसुली लिपिक यांचे पुस्तक क्रमांक ६०९ पावती क्रमांक ६०८१६ या पावतीची एकूण रक्कम रूपये ८४२/–(रूपये आठशे बेचाळीस फक्त) पैकी रूपये ८३४/–(रूपये आठशे चौतीस फक्त) म्हणजेच रूपये ८/–(रूपये आठ फक्त) चा कमी भरणा केला आहे.
२) श्री. ओमप्रकाश गुरनानी, वसुली लिपिक यांचे पुस्तक क्रमांक ५०१ पावती क्रमांक ५००४६ ते ५००४९ या चार पावत्यांच्या एकत्र चलनामध्ये रूपये १०६७५/–(रूपये दहा हजार सहाशे पंच्याहत्तर फक्त) ऐवजी रूपये १०६६७/–(रूपये दहा हजार सहाशे सदुसष्ट फक्त) चा भरणा केला आहे. म्हणजेच ८/–(रूपये आठ फक्त) रूपयेचा कमी भरणा केला आहे. दिनांक १७/११/०६ चे चलन.

३) श्री. ओमप्रकाश गुरनानी, वसुली लिपिक यांचे पुस्तक क्रमांक ५४१ पावती क्रमांक ५४०५०ते५४०६२ या पावत्यांच्या एकत्र चलनाची रक्कम रूपये ५७३९१/–(रूपये सत्तावन्न हजार तीनशे ऐक्याण्णव फक्त) त्याऐवजी रक्कम रूपये ५७३२८/–(रूपये सत्तावन्न हजार तीनशे अठ्ठावीस फक्त) चा भरणा केला आहे. म्हणजेच रूपये ६३/–(रूपये त्रसेष्ट फक्त) चा कमी भरणा केला आहे. दि. २०/२/०७ चे चलन.

सदरची रक्कम संबंधितांकडून वसूल करून महापालिका कोषागारात भरणा करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/कर/१४३/०७ दिनांक २१/०८/२००७ अन्वये, उप– आयुक्त (कर विभाग), उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

### आक्षेप क्रमांक २

विषय :–रोख रक्कम चलनामध्ये ६००/–रूपये चा जास्त भरणा केल्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये सन २००६—०७ या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कर विभागाचे लेखा परिक्षण केले असता असे निदर्शनास आले की, वसुली लिपिक श्री. दयाराम टी. ढोबाळे यांचे पावती पुस्तक क्रमांक ४७१ पावती क्रमांक ४७०७६ ते ४७०८५ अनुक्रमे सदर नऊ पावत्यांच्या एकत्र चलनामध्ये रक्कम रूपये २७५४४/—(रूपये सत्तावीस हजार पाचशे चव्वेचाळीस फक्त) ऐवजी रक्कम रूपये २८१४४/—(रूपये अठ्ठावीस हजार एकशे चव्वेचाळीस फक्त) चा भरणा केला आहे. म्हणजेच रूपये ६००/—(रूपये सहाशे फक्त) चा जास्त भरणा केला आहे.

सदर दिनांक २६/१०/०६ च्या रोख रक्कम चलनामध्ये ६००/—(रूपये सहाशे फक्त) चा जास्त भरणा कसा केला? याचा खुलासा करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/कर/१४४/०७ दिनांक २१/०८/२००७ अन्वये, उप— आयुक्त (कर विभाग), उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

## अतिक्रमण विभाग

### आक्षेप क्रमांक १

विषय:—कोषागारात रूपये १५०/—कमी भरणा केल्याबाबत.

अतिक्रमण विभागाचे सन २००५—०६ चे लेखा परिक्षण करीत असतांना असे आढळून आले की, श्री. भिकन अहिरे, यांनी पावती क्रमांक ०४३६११ दिनांक १४/९/२००५ द्वारे श्री. ईश्वर देवनाथ यांच्या नावे रूपये २००/— ची पावती काढण्यात आली. परंतु महापालिकेच्या कोषागरात रूपये २००/—(रूपये दोनशे फक्त) चा भरणा न करता फक्त रूपये ५०/—(रूपये पन्नास फक्त) चा भरणा केलेला आहे. तरी श्री. भिकन अहिरे यांच्याकडून कमी भरणा केलेली रक्कम रूपये १५०/—(रूपये एकशे पन्नास फक्त) १८: व्याजासह त्यांच्या लेखी खुलाश्याने महापालिकेच्या कोषागारात जमा करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र. उमपा/लेपवि/अतिक्रमण/८६/०७ दिनांक १३/०८/२००७ अन्वये, उप— आयुक्त (अतिक्रमण विभाग), उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

### आक्षेप क्रमांक २

विषय:—अतिक्रमण विभागाने आकारलेल्या दंडाबाबत.

अतिक्रमण विभागाचे सन २००४—०५ चे लेखा परिक्षण करीत असतांना असे आढळून आले की, दंड आकारतांना तो अनुक्रमे रूपये ५०, १००, १५०, २००, २५०, ३००, ५०० असा आकारण्यात आलेला आहे. तरी कोणत्या बाबींवर किती दंड आकारला याचा उलगडा होत नाही. तसेच दंड आकारणे बाबतचा आदेश अथवा ठरावाची प्रत लेखा परिक्षण करतेवेळी सादर करणेत आली नाही. तसेच हातगाडीवर दंड आकारतांना तो रूपये ५०, १००, १५०, २००, २५०, असा आकारण्यात आलेला आहे. तरी हातगाडीवर नेमका दंड किती हे समजू शकत नाही. जर निश्चित दर असेत तर एवढी तफावत कशी काय दिसून येते.

याबाबत लेखी खुलासा अतिक्रमण विभागाने करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र. उमपा/लेपवि/अतिक्रमण/८८/०७ दिनांक १३/०८/२००७ अन्वये, उप— आयुक्त (अतिक्रमण विभाग), उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

## पाणी पुरवठा विभाग

### आक्षेप क्रमांक १

विषय :—पाणीपट्टी बिलापोटी स्विकारलेल्या सन २००६—०७ च्या रक्कमेच्या पावत्यांवर स्वाक्षरी न करता पावत्या निर्गमित केल्याबाबत.

पावतीद्वारे महापालिकेच्या महसूलाच्या स्विकारण्यात येणा—या रक्कमेबाबत संबंधित लिपिकांनी पावतीलिहुन त्यावर स्वाक्षरी केल्यानंतर पावती निर्गमित करणे आवश्यक आहे. तथापि संबंधित लिपिकांनी सदर (सन

२००६–०७) च्या पावत्यावर स्वाक्षरी न करता संबंधित पाणीपट्टी ग्राहकांना पैसे भरणा केलेबाबत पावत्या दिल्या आहेत. ही अत्यंत गंभीर बाब आहे. तरी ज्या ज्या लिपिकांनी सदर पावत्या निर्गमित केल्या आहेत त्यांनी त्यांच्या स्वाक्ष–या संबंधित पावतीवर घेऊन अभिलेख अद्यावत ठेवणेस व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखा परिक्षण विभागास देण्याबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/पा.पु./१९२/०७ दिनांक ०८/०८/२००७ अन्वये, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभग, व उप–अभियंता पाणी पुरवठा विभाग, (देयक) उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

### आक्षेप क्रमांक २

विषय :–<u>पाणीपुरवठा विभागाचे लेखा परिक्षण करीत असतांना पावती पुस्तकात आढळलेल्या काही त्रुटी</u>

१) वरिष्ठ अधिका–यांकडून पावतीपुस्तक प्रमाणित करण्यात येत नाही

२) MAC-12**(Daily collection Register)** वर महानगरपालिकेचे राऊंड सिल व पृष्ठ क्र. देण्यात आले नाही.

३) Daily collection Register **हे नियमित** बनविण्यात येत नाही, तसेच त्यावर रोखपालाची स्वाक्षरी घेतली जात नाही असे दिसून आले.

४) वरिष्ठांकडून पावती पुस्तकाची तपासणी होत नाही.

५) Daily collection Register हे वर्ष अखेर (३१ मार्च) रोजी वसुली लिपिकाकडून बंद करण्यात येत नाही.

६) बिलाची रक्कम व व्याजाची रक्कम पावती पुस्तकात वेगळी दर्शविण्यात येत नाही.

७) Ledger Register **तपासले** असता ते दि. २०/१२/१९९४ ते मार्च २००० पर्यंत बनविण्यात आले आहे. परंतु त्या पुढील रजिस्टर बनविण्याचे आढळून आले नाही.

८) Revenue Stamp Register MAC-113 हे बनविण्यात आले नाही.

वरील त्रुटी टाळण्यासंबंधी संबंधितांना सक्त सूचना देऊन व केलेल्या कार्यवहीचा अहवाल लेखा परिक्षणास देण्याबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/पा.पु./१९४/०७ दिनांक १८/०८/२००७ अन्वये, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभग, व उप–अभियंता पाणी पुरवठा विभाग, (देयक) उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

### आक्षेप क्रमांक ३

विषय :–<u>पाणीपट्टी बिलापोटी स्विकारलेल्या सन २००६–०७ या रक्कमेच्या पावत्यांवर स्वाक्षरी न करता पावत्या निर्गमित केल्याबाबत.</u>

पावतीद्वारे महापालिकेच्या महसूलाच्या स्विकारण्यात येणा–या रक्कमेबाबत संबंधित लिपिकांनी पावती लिहुन त्यावर स्वाक्षरी केल्यानंतर पावती निर्गमित करणे आवश्यक आहे. तथापि सदर (सन २००६–०७) च्या पावत्यावर स्वाक्षरी न करता पाणीपट्टी ग्राहकांना पैसे भरणा केलेबाबत पावत्या दिल्या आहेत. ही अत्यंत गंभीर
बाब आहे. तरी ज्या ज्या लिपिकांनी सदर पावत्या निर्गमित केल्या आहेत त्यांनी त्यांच्या स्वाक्ष–या संबंधित पावतीवर घेऊन अभिलेख अद्यावत ठेवणेस व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखा परिक्षण विभागास देण्याबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/पा.पु./१९५/०७ दिनांक १८/०८/२००७ अन्वये, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभग, व उप–अभियंता पाणी पुरवठा विभाग, (देयक) उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

### आक्षेप क्रमांक ४

विषय :–<u>पाणीपट्टी बिलाची रक्कम विलंबाने भरल्याने व्याजाची कमी भरलेली रक्कम रूपये २९,१७९/– वसूल करणेबाबत</u>.

पाणी पुरवठा विभाग उल्हासनगर–५ कार्यालयाचे सन २००६–२००७ चे लेखा परिक्षण करतांना असे निर्दशनास आले की, पाणीपट्टी बिल ग्राहकांनी पाणीपट्टी बिलाची रक्कम विलंबाने भरल्यामुळे त्यांच्याकडून द. सा.द.शे १८% व्याज दराने वसूल करावयाची संपूर्ण कालावधीची व्याजाची रक्कम संबंधित लिपिकांनी वसूल केल्याचे दिसून येत नाही. संबंधित ग्राहकांनी पाणी बिलाची रक्कम भरण्यास विलंब लावल्याने विलंबाच्या कालावधीनुसार व्याजाची रक्कम पुन्हा परिगणना केल्याप्रमाणे रकाना क्र. ११ मध्ये वसूल करावयाची व्याजाची रक्कम **रूपये २९,१७९/– (रूपये एकोणतीस हजार एकशे एकोणऐंशी मात्र)** इतकी प्रलंबित असल्याचे आढळते. त्यामुळे सदर रक्कमेचे महापालिकेचे नुकसान झाल्याचे सिध्द होते. यासंर्दभात कमी व्याजाची रक्कम वसूली करण्यास जबाबदार असलेल्या पाणीपट्टी वसूली लिपिकाकडून खुलासा घ्यावा. व याबाबतची योग्य ती शहानिशा करून थकित व्याजाची रक्कम **रूपये २९,१७९/– (रूपये एकोणतीस हजार एकशे एकोणऐंशी मात्र)** संबंधित ग्राहकांकडून वसूल करून महापालिका कोषागारात जमा करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र. उमपा/लेपवि/पा.पु./१९३/०७ दिनांक ०८/०८/२००७ अन्वये, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभग, व उप–अभियंता पाणी पुरवठा विभाग, (देयक) उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

## आक्षेप क्रमांक ५

विषय :–<u>पाणीपट्टी बिलाची थकित रक्कम रूपये २८,८०४/– वसूल करणेबाबत.</u>

सन २००५–२००६ या वित्तीय वर्षाचे पाणी पुरवठा विभाग उल्हासनगर–५ चे लेखा परिक्षण करतांना असे निर्दशनास आले की, माहे मार्च २००० नंतर पाणीपट्टी बिलाच्या रकमेचा समावेश घरपट्टीच्या बिलामध्ये झाल्यामुळे पाणीपट्टी बिलाच्या माहे मार्च २००० पर्यंतच्या संपूर्ण रकमा संबंधित ग्राहकांकडून वसूल करणे आवश्यक होते. तथापि संपूर्ण वसूली झाल्याचे दिसून येत नाही. माहे मार्च २००० अखेर पाणीपट्टी बिलापोटी काही रकमा वसूल केल्यानंतर संगणकामध्ये ग्राहकाच्या नावे अजून एकूण रक्कम रू.२८,८०४/– बाकी असल्याचे दिसून येते. त्यामुळे नियमानुसार थकित रकमेवर १८% दंडनिय व्याज आकारून संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक आहे.

यासंदर्भात असे निर्दशनास येते की, संबंधित पाणीपट्टी बिल वसूली लिपिकांनी पाणीपट्टी ग्राहकाकडून पाणी बिलाच्या रक्कमा बाकी असतांना पावत्यांमध्ये थकित रकमा न दाखविता क्लिअर पावत्या कशा देण्यात आल्या. तसेच संगणकामध्ये ग्राहकाचे नावे रक्कमा थकित असतांना त्या घरपट्टी बिलामध्ये थकित रकमा म्हणून का दाखविल्या नाहीत व वसूल केल्या नाहीत. याबाबतचा संबंधितांकडून खुलासा घेण्यात येणेबाबत व थकित रकमा त्वरीत वसूल करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/पा.पु./१९६/०७ दिनांक २४/०८/२००७ अन्वये, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभग, व उप–अभियंता पाणी पुरवठा विभाग, (देयक) उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

## आक्षेप क्रमांक ६

विषय :– <u>पाणीपट्टी बिलाचे रूपये ३,०८,०३३/–चे धनादेश न वटल्यामुळे रोखीने वसूल करणेबाबत.</u>

पाणीपुरवठा विभाग, उल्हासनगर–५ या कार्यालयाचे सन २००६–०७ या वित्तीय वर्षाचे पाणीपट्टीच्या जमा रक्कमांचे लेखा परिक्षण केले असता असे आढळून आले की, सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील संबंधित ग्राहकाकडून स्विकारलेले धनादेश महापालिकेच्या बॅकेतील खात्यामध्ये जमा केले असता, ते न वटता परत आले आहेत.

वास्तविक पहाता धनादेश न वटता परत आल्यानंतर संबंधित वसूली लिपिकाने सदर धनादेशाची दंडनिय दराने रोखीने त्वरीत वसूली करणे आवश्यक होते. तथापि त्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्याने पाणीपट्टी बिलाची रक्कम **रूपये ३,०८,०३३/–(रूपये तीन लाख आठ हजार तेहतीस फक्त)** प्रलंबित असल्याचे दिसून येते. तरी सदर थकीत रक्कम तातडीने वसूल करून महापालिका कोषागारात जमा करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/पा.पु./१९९/०७ दिनांक २७/०८/२००७ अन्वये, कार्यकारी अभियंता,

पाणी पुरवठा विभग, व उप–अभियंता पाणी पुरवठा विभाग, (देयक) उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

## आक्षेप क्रमांक ७

विषय :– <u>पाणीपट्टी बिलाचे रूपये ७८,१९६/–चे धनादेश न वटल्यामुळे रोखीने वसूल करणेबाबत.</u>

पाणीपुरवठा विभाग, उल्हासनगर–५ या कार्यालयाचे सन २००६–०७ या वित्तीय वर्षाचे पाणीपट्टीच्या जमा रक्कमांचे लेखा परिक्षण केले असता असे आढळून आले की, ग्राहकाकडून स्विकारलेले धनादेश महापालिकेच्या बॅंकेतील खात्यामध्ये जमा केले असता, ते न वटता परत आले आहेत.

वास्तविक पहाता धनादेश न वटता परत आल्यानंतर संबंधित वसूली लिपिकाने सदर धनादेशाची दंडनिय दराने रोखीने त्वरीत वसूली करणे आवश्यक होते. तथापि त्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्याने पाणीपट्टी बिलाची रक्कम **रूपये ७८,१९६/–(रूपये अठ्ठयात्तर हजार एकशे शहयाण्णव फक्त)** प्रलंबित असल्याचे दिसून येते. तरी सदर थकीत रक्कम तातडीने वसूल करून महापालिका कोषागारात जमा करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/पा.पु./२००/०७ दिनांक २७/०८/२००७ अन्वये, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभग, व उप–अभियंता पाणी पुरवठा विभाग, (देयक) उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे सप्टेंबर २००७ चा जमा खर्चाचा अहवाल.

वित्तीय वर्ष २००७–२००८ च्या “अ” व “क” अर्थसंकल्पात अंदाजित केलेले उत्पन्न खलीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अपेक्षित जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | ३३४,३३,२८,००० |
| “क” | ५९,०१,९३,००० |
| एकूण | ३९३,३५,२१,००० |

तसेच अपेक्षित जमेमध्ये खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अपेक्षित जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | १८३,५३,४६,००० |
| ३ | शासकीय अनुदान | १७१,८७,००,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | २१,९७,५०,००० |
| ५ | एकुण | ३७७,३७,९६,००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | ५,७६,१६,००० |
| ७ | एकुण :– | ३८३,१४,१२,००० |

वित्तीय वर्ष २००७–२००८ च्या अर्थसंकल्पात महसूल जमा रक्कम रुपये १८३,५३,४६,०००/– अपेक्षित धरलेली आहे. माहे सप्टेंबर २००७ पर्यंत समप्रमाणात रुपये ९१,७६,७३,०००/– महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रु. ५५,७७,८२,०००/–(एकूण महसूल जमेच्या६०.७८टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे सप्टेंबर २००७ पर्यत अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष<br>अर्थ संकल्प “अ” | | अंदाजित | माहे सप्टेंबर २००७<br>२००७ पर्यत<br>अपेक्षित | प्रत्यक्ष जमा<br>(रु१०००/–पुर्णांकांत) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | जकात | ८३,७३,०१,००० | ४१,८६,५१,००० | ४१,२२,९८,००० | ९८.४८ |
| २ | मालमत्ता कर | ३३,५०,००,००० | १६,७५,००,००० | ५,९८,६८,००० | ३५.७४ |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | ३,१२,००,००० | १,५६,००,००० | ३८,६७,००० | २४.७८ |
| ४ | मार्केट उत्पन्न | — | — | — | — |
| ५ | रुग्णालय फी | ११५,००० | ५८,००० | २२,००० | ३७.९३ |
| ६ | परवाना व इतर फी | ६,३८,८५,००० | ३,१९,४२,००० | ३००,१३,००० | १९.९७ |
| ७ | संकीर्ण | १,९२,१०,००० | ९६,०५,००० | ५१,१२,००० | ५३.२२ |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | ४९,५०,००० | २४,७५,००० | ७,१७,००० | २८.९६ |
| | एकूण—अ | १२९,१६,६१,००० | ६४,५८,३१,००० | ५१,१८,९७,००० | ७९.२६ |
| | अर्थसंकल्प “क” | | | | |
| १ | पाणी बिल वसुली | ४५,५०,००,००० | २२,७५,००,००० | २,५०,८३,००० | ११.०२ |
| २ | मालमत्ता कर | ८,७५,००,००० | ४,३७,५०,००० | २,०४,४८,००० | ४६.७३ |
| ३ | परवाना/इतर फी | ११,२५,००० | ५,६३,००० | ३,१६,००० | ५६.१२ |
| ४ | संकीर्ण | ६०,००० | ३०,००० | ३८,००० | १२६.६६ |
| | एकुण “क” | ५४,३६,८५,००० | २७,१८,४२,००० | ४५,८८,५०,००० | १६.८७ |
| | एकुण “अ”व “क” | १८३,५३,४६,००० | ९१,७६,७३,००० | ५५,७७,८२,००० | ६०.७८ |

‘अ’ व ‘क’ अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ३,९३,३६,२१,०००/— (प्रारंभिक शिल्लकेसह) अपेद्वित केलेले आहे. प्रत्यक्षात माहे सप्टेंबर २००७ मध्ये रु. ७०,३४,२८,६५६/—प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे. उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पनाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही.

**खर्च—**

माहे सप्टेंबर २००७ या कालावधीमध्ये रु. ६०,०२,८२,४७२/— खर्च लेखांकित झालेला आहे.

खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते तसेच लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान झालेले आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदी या अधिन आहे.

माहे सप्टेंबर २००७ ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहे.

**निवृत्ती वेतन प्रकरणे—** माहे सप्टेंबर २००७ मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या /निधन पावलेल्या कर्मचा—यांची ०७ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निर्दशनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम १०६(१) अ) च्या तरतुदीप्रमाणे:—

## अग्निशमन विभाग

आक्षेप क्रमांक १

विषय :— अग्निशमन विभागातील भंगार साहित्याची विल्हेवाट लावणेबाबत.

अग्निशमन विभागाने दिनांक १९/१२/२००१ रोजी भंगार साहित्याची विक्री केली आहे. त्यानंतर जमा झालेले भंगार साहित्याची विल्हेवाट दरपत्रके अथवा निविदा मागवून केली असल्यास तसा लेखी खुलासा करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/अग्निशमन/०१/०७ दिनांक १३/०९/२००७ अन्वये, अग्निशमन अधिकारी उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

## मालमत्ता विभाग

आक्षेप क्रमांक १

विषय :— मालमत्ता विभागातील स्थावर मालमत्तेची नोंदवही अपुर्ण असल्याबाबत.

मालमत्ता विभागाची स्थावर मालमत्तेची तपासली असतांना असे आढळून आले की, महापालिकेचे तरणतलाव, कोंडवाडा, गेस्ट हाऊस, गॅरेज, नॅचर क्यूअर सेंटर, सॅनिटरी स्टोअर्स, अग्निशमन स्थानक, कॅंटीन, स्वच्छता निरीक्षक कार्यालये, महानगरपालिकेचे मार्केट यांची नोंदणी केलेली असून त्यात इमारतीचे स्वरूप, त्यांचे मुल्यांकन, जोतेक्षेत्र (Plinth area) इत्यादी रकाने भरण्यात आले नाहीत. त्यामुळे सदर नोंदवही अपुर्णावस्थेत दिसून येत आहे.

तसेच महानगरपालिकेचे सार्वजनिक आरोग्य खात्याचे सफाई मुकादम व कामगारासाठी हजेरी शेड विविध ठिकाणी असून सदर हजेरी शेडची नोंद स्थावर मालमत्ता नोंदवहीत घेतलेली नाही.

तरी स्थावर मालमत्ता नोंदवही अपुर्णावस्थेबाबत व हजेरी शेडची नोंद न केल्याबाबत योग्य तो लेखी खुलासा करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/मालमत्ता/१३/०७ दिनांक १३/०९/२००७ अन्वये, उप— आयुक्त (मालमत्ता विभाग), उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

आक्षेप क्रमांक २

विषय :— मालमत्ता विभागाने सन २००५—०६ तसेच २००६—०७ या दोन वर्षात महापालिकेच्या गाळयांची भाडेपट्टी वसूली न केल्याबाबत.

मालमत्ता विभागाचे सन २००५—०६ तसेच २००६—०७ या दोन वर्षाचे लेखा परिक्षण करीत असतांना असे आढळून आले की, सन २००५—०६ तसेच २००६—०७ या दोन वर्षात महापालिकेच्या भाजी मार्केटच्या गाळयांचे भाडे वसूली निरंक आहे. महापालिकेचे भाजी मार्केट उल्हासनगर १,२,३ व ५ मध्ये एकूण किती गाळे आहेत. त्यांची एकूण किती वसूली बाकी आहे. वसूली कां होऊ शकली नाही. सदर वसुलीबाबत कोणती कार्यवाही करणेत आली याबाबत मालमत्ता विभागाने लेखी खुलासा करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/मालमत्ता/१४/०७ दिनांक १३/०९/२००७ अन्वये, उप— आयुक्त (मालमत्ता विभाग), उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

आक्षेप क्रमांक ३

विषय :—महापालिकेच्या मालकीच्या शाळांकडून दिनांक २१/१०/१९९६ पासून भाडे वसूल न केल्याबाबत.

महापालिकेच्या मालकीच्या शाळा या दिनांक २१/१०/१९९६ पासून मासिक भाडे तत्वावर शिक्षण मंडळास देण्यात आल्या आहेत. सदर महापालिका शाळांपैकी १९ शाळांच्या इमारतीचे भाडे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांच्याकडून निश्चित करून सदर भाडयाची रक्कम **रूपये १,५३,३३,५१२/— (रूपये एक कोटी त्रेपन्न लाख तेहतीस हजार पाचशे बारा फक्त)** ची मागणी मा. शिक्षण उप—संचालक नाशिक विभाग यांच्याकडे मालमत्ता विभागाने क्र.उमपा/मालमत्ता/१८१/०३ दिनांक ०४/८/२००३ अन्वये मागणी

केलेली होती. सदर पत्राच्या अनुषंगाने शिक्षण उप–संचालक यांच्या ३/९/२००३ च्या पत्रानुसार भाडेबाबत शिक्षण मंडळ व महानगरपालिका ठरावाची मागणी केलेली होती. त्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ यांनी ठराव क्रमांक ६२ दिनांक २१/१०/२००३ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाकडे असणा–या एकूण २५ प्राथमिक शाळांच्या इमारतीचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांच्याकडून निश्चित करून घेवून शासनाच्या शिक्षण विभागाकडे मान्यतेसाठी पारीत केलेला आहे. तसेच सदर ठरावास महासभा ठराव क्रमांक १०९ दिनांक २०/११/२००३ अन्वये शासनाकडे शाळांचे इमारतीचे भाडे मिळणेबाबत मान्यता दिली आहे.

परंतु सदर २०/११/२००३ च्या ठरवानंतर शाळांच्या इमारतीचे भाडे वसूलीबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली. दिनांक २१/१०/१९९६ पासून ते २०/८/२००७ पर्यंत २५ शाळांची एकूण भाडयाची रक्कम किती आहे. सदर भाडयाची रक्कम वसूल करण्यात दिरंगाई का? याबाबत योग्य तो लेखी खुलासा करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/मालमत्ता/१५/०७ दिनांक १३/०९/२००७ अन्वये, उप–आयुक्त (मालमत्ता विभाग), उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

## कर विभाग

### आक्षेप क्रमांक १

विषय :– सन २००७–०८ या आर्थिक वर्षातील **R.V.** च्या रक्कमाबाबत.

उपरोक्त विषयान्वये कर विभागाचे लेखा परिक्षण केले असता, सन २००७–२००८ या आर्थिक वर्षात R.V. पावती पुस्तकांचे लेखा परिक्षण केले असता असे निदर्शनास आले की, R.V. च्या काही पावत्यांमध्ये कमी रक्कमांचा भरणा केला आहे.

सदरच्या रकमा संबंधिताकडून वसुल करून महानगरपालिका कोषागारात भरणा करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/कर/१४६/०७ दिनांक ०४/०९/२००७ अन्वये, उप–आयुक्त (कर विभाग), उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

### आक्षेप क्रमांक २

विषय :– श्रीमती रोमा हिंगोरानी काऊंटर वसुली लिपिक(सी.एफ्.सी) घरपट्टीच्या रकमेचा कमी भरणा केलेली रक्कम रू. १०/– वसुल करणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये कर विभागाचे लेखा परिक्षण केले असता, सन २००६–०७ या आर्थिक वर्षात असे निदर्शनास आले की, श्रीमती रोमा हिंगोरानी, वसुली लिपिक यांनी दि. १५/३/०७ ग्राहक क्र.२७/२८०२ पावती क्र. ७८७०१ अन्वये घरपट्टीची रक्कम रूपये ८६५/–(रूपये आठशे पासष्ट फक्त) संबंधिताकडून स्वीकारलेली आहे. तथापि महानगरपालिका कोषागारात भरणा करताना रक्कम रूपये ८५५/–(रूपये आठशे पच्चावन्न फक्त) इतक्या रकमेचा भरणा केला आहे. म्हणजेच रूपये १०/–(रूपये दहा फक्त) चा कमी भरणा केला आहे.

तरी संबंधिताकडून वरील रक्कम वसुल करून महापालिकेच्या कोषागारात जमा करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/कर/१४८/०७ दिनांक ०४/०९/२००७ अन्वये, उप–आयुक्त (कर विभाग), उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

### आक्षेप क्रमांक ३

विषय :– सन २००७–०८ या आर्थिक वर्षातील **Trade Licence** ची कमी रक्कम भरणा केलेबाबत.

उपरोक्त विषयान्वये कर विभागाचे लेखा परिक्षण केले असता, सन २००७–०८ या आर्थिक वर्षात Trade Licence ची पावती क्र. ५४४४५ दिनांक २५/६/२००७ या तारखेची रक्कम रूपये ३६/–(रूपये छत्तीस फक्त) कॅश रक्कम नोंदवहीत नोंद नसल्याचे निदर्शनास आले आहे.

तरी सदर रक्कम संबंधिताकडून वसूल करून महानगरपालिका कोषागारात भरणा करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/कर/१४९/०७ दिनांक ०४/०९/२००७ अन्वये, उप–आयुक्त (कर

विभाग), उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

### आक्षेप क्रमांक ४

विषय :–मालमत्ता कराच्या पावत्यांमध्ये कमी पैसे भरणा केल्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये सन २००६–०७ या आर्थिक वर्षाचे कर विभागाचे लेखा परिक्षण केले असता श्रीम. राणी खुर्सेजा, वसुली लिपिक, नागरी सुविधा केंद्र यांनी पावती क्रमांक ९९०००८१८११ दिनांक २९/०३/०७ चे द्वारे रूपये ४२५०/–(रूपये चार हजार दोनशे पन्नास फक्त) वसूल केले आहेत. परंतु त्यांनी रूपये ४१५०/–(रूपये चार हजार एकशे पन्नास फक्त) चा भरणा केला आहे. म्हणजेच रूपये १००/–(रूपये शंभर फक्त) चा कमी भरणा केला आहे. व पावती क्रमांक ९९०००८४१३० दिनांक १०/४/०७ चे द्वारे रूपये ४७१८/–(रूपये चार हजार सातशे अठरा फक्त) वसूल केले आहेत. परंतु त्यांनी रूपये ४५१८/–(रूपये चार हजार पाचशे अठरा फक्त) चा भरणा केला आहे. म्हणजेच रूपये २००/–(रूपये दोनशे फक्त) चा कमी भरणा केला आहे.

तरी संबंधित वसुली लिपिकाकडून कमी वसुल केलेल्या पावतीची रक्कम रूपये ३००/–(रूपये तीनशे फक्त) १८% व्याज आकारून ताबडतोब वसूल करून महापालिका कोषागारात जमा करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/कर/१५०/०७ दिनांक १३/०९/२००७ अन्वये, उप–आयुक्त (कर विभाग), उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

### आक्षेप क्रमांक ५

विषय :– सन २००६–२००७ या आर्थिक वर्षातील **R.V.** च्या कॅशबुकमध्ये कमी भरणा केल्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये कर विभागाचे लेखा परिक्षण केले असता, सन २००६–०७ या आर्थिक वर्षात R.V. पावती पुस्तकांचे व कॅश नोंद वहयांचे लेखा परिक्षण केले असता असे निदर्शनास आले की, R.V. कॅश नोंदवहीमध्ये कमी भरणा केला आहे.
तरी कमी भरणा केलेल्या रक्कम संबंधितांकडून वसूल करून महानगरपालिका कोषागारात भरणा करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/कर/१५१/०७ दिनांक २८/०९/२००७ अन्वये, उप– आयुक्त (कर विभाग), उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

## पाणी पुरवठा विभाग

### आक्षेप क्रमांक १

विषय :–पाणीपट्टी बिलाची रक्कम विलंबाने भरल्याने व्याजाची कमी भरलेली रक्कम रूपये ४००८/–वसूल करणेबाबत.

पाणीपुरवठा विभाग उल्हासनगर–५ कार्यालयाचे सन २००६–०७ चे लेखा परिक्षण करतांना असे निदर्शनास आले की, पाणीपट्टी बिल ग्राहकांनी पाणीपट्टी बिलाची रक्कम विलंबाने भरल्यामुळे त्यांच्याकडून १८% व्याज दराने वसूल करावयाची संपूर्ण कालावधीची व्याजाची रक्कम संबंधित लिपिकांनी वसूल केल्याचे दिसून येत नाही. सोबत जोडलेल्या विवरणपत्रावरून असे निदर्शनास येते की, संबंधित ग्राहकांनी पाणी बिलाची रक्कम भरण्यास विलंब लावल्याने विलंबाच्या कालावधीनुसार व्याजाची रक्कम पुन्हा परिगणना केल्याप्रमाणे रकाना क्र. ११ मध्ये वसूल करावयाची व्याजाची रक्कम रूपये ४००८/–(रूपये चार हजार आठ मात्र) इतकी प्रलंबित असल्याचे आढळते. त्यामुळे सदर रक्कमेचे महापालिकेचे नुकसान झाल्याचे सिध्द होते. यासंदर्भात कमी व्याजाची रक्कम वसूली करण्यास जबाबदार असलेल्या पाणीपट्टी वसूली लिपिकांकडून खुलासा घ्यावा. व त्याबाबतची यांग्य ती शहानिशा करून थकित व्याजाची रक्कम रूपये ४००८/–(रूपये चार हजार आठ मात्र) संबंधित ग्राहकांकडून वसूल करून महापालिका कोषागारात जमा करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र. उमपा/लेपवि/पा.पु./२०२/०७ दिनांक १३/०९/२००७ अन्वये, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, व

उप–अभियंता पाणी पुरवठा विभाग, (देयक) उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे आक्टोंबर २००७ चा जमा खर्चाचा अहवाल.

वित्तीय वर्ष २००७–२००८ च्या "अ" व "क" अर्थसंकल्पात अंदाजित केलेले उत्पन्न खालीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अपेक्षित जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| "अ" | ३३४,३३,२८,००० |
| "क" | ५९,०१,९३,००० |
| एकूण | ३९३,३५,२१,००० |

तसेच अपेक्षित जमेमध्ये खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अपेक्षित जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | १८३,५३,४६,००० |
| ३ | शासकीय अनुदान | १७१,८७,००,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | २१,९७,५०,००० |
| ५ | एकुण | ३७७,३७,९६,००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | ५,७६,१६,००० |
| ७ | एकुण :– | ३८३,१४,१२,००० |

वित्तीय वर्ष २००७–२००८ च्या अर्थसंकल्पात महसूल जमा रक्कम रुपये १८३,५३,४६,०००/– अपेक्षित धरलेली आहे. माहे ऑक्टोंबर २००७ पर्यत समप्रमाणात रुपये ९१,७६,७३,०००/– महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रु. ५५,७७,८२,०००/–(एकूण महसूल जमेच्या ६०.७८ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे ऑक्टोंबर २००७ पर्यत अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष<br>अर्थ संकल्प "अ" | | अंदाजित | माहे ऑक्टोंबर<br>२००७ पर्यत अपेक्षित | प्रत्यक्ष जमा<br>(रु१०००/–पुर्णाकांत) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ज्कात | ८३,७३,०१,००० | ४८,८४,२६,००० | ४९,७३,७१,००० |
| २ | मालमत्ता कर | ३३,५०,००,००० | १९,५४,१७,००० | ७,४०,८२,००० |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | ३,१२,००,००० | १,८२,००,००० | ४६,५७,००० |
| ४ | मार्केट उत्पन्न | — | — | — |
| ५ | रुग्णालय फी | १,१५,००० | ६७,००० | २६,००० |
| ६ | परवाना व इतर फी | ६,३८,८५,००० | ३,७२,६६,००० | ३३,७०,०५,००० |
| ७ | संकीर्ण | १,९२,१०,००० | १,१२,०६,००० | ७१,८१,००० |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | ४९,५०,००० | २८,८७,००० | १५,७८,००० |
| | एकूण–अ | १२९,१६,६१,००० | ७५,३४,६९,००० | ६१,८६,०१,००० |
| | अर्थसंकल्प "क" | | | |
| १ | पाणी बिल वसुली | ४५,५०,००,००० | २६,५४,१७,००० | ३,०४,२४,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | मालमत्ता कर | ८,७५,००,००० | ५,१०,४१,००० | २,४८,९२,००० |
| ३ | परवाना/इतर फी | ११,२५,००० | ६,५६,००० | ३,६१,००० |
| ४ | संकीर्ण | ६०,००० | ३५,००० | ३८,००० |
| | एकुण “क” | ५४,३६,८५,००० | ३१,७१,४९,००० | ५,५७,१५,००० |
| | एकुण “अ”व “क” | १८३,५३,४६,००० | १०७,०६,१८,००० | ६७,४३,१६,००० |

‘अ’ व ‘क’ अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ३,९३,३६,२१,०००/— (प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित केलेले आहे. प्रत्यक्षात माहे आक्टोंबर २००७ मध्ये रु. ७०,३४,२८,६५६/—प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे. उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पनाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही.

**खर्च—**

माहे आक्टोंबर २००७ या कालावधीमध्ये रु. ६०,०२,८२,४७२/— खर्च लेखांकित झालेला आहे. खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते तसेच लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान झालेले आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदी या अधिन आहे.

माहे आक्टोंबर २००७ ची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहे.

**निवृत्ती वेतन प्रकरणे—** माहे आक्टोंबर २००७ मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या /निधन पावलेल्या कर्मचा—यांची ०३ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.
लेखा परिक्षणामध्ये निर्दशनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम १०६(१) अ) च्या तरतुदीप्रमाणे:—

## भांडार विभाग

### आक्षेप क्रमांक १

विषय :—पाणीपट्टी वसुलीबाबत.

पाणी पुरवठा विभागाच्या पाणीपट्टी वसुली बाबत पाणी पुरवठा विभागाची पाणीपट्टी ही गेल्या तीन वर्षापासून अतिअल्प प्रमाणात वसूल झाली आहे. पाणीपट्टी वसुली गेल्या तीन वर्षापासुन अतिअल्प झाल्याने, त्याचा परिणाम महापालिकेच्या विकासावर होत आहे व आर्थिक दुषपरिणाम जाणवतो, त्यामुळे महापालिकेवर आर्थिक डबघाई ओढवण्याची शक्यता नाकारता येत नाही. महापालिकेच्या उत्पन्नाच्या प्रमुख स्त्रोतापैकी पाणीपट्टी वसुली हा एक महत्वाचा उत्पन्नाचे भाग आहे.

तरी मागील तीन वर्षापासून पाणीपट्टी वसुली एवढया कमी प्रमाणात का झाली? ती वाढवण्याचे आपण काय उपाय योजना केली? हया बाबत स्वयंस्पष्टत खुलासा करावा व यापुढे वसुलीचे एकूण उद्‌दीष्टे चालु वर्षात पुर्ण करावे. अन्यथा, या सर्व बाबतीत आपल्या विभागातील अधिकारी, कर्मचारी यांना जबाबदार धरण्यांत येईल, याची नोंद घेणेबाबत तसेच कार्यवाही करणेबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन जा.क्र.उमपा/लेपवि/पा.पु. /१९०/०७ दिनांक २०/०७/२००७ अन्वये, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभग, व उप—अभियंता पाणी पुरवठा विभाग, (देयक) उल्हासनगर महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. तथापि अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झालेले नाही.

**स्थायी समिती ठराव क्र. १२३** **दिनांक:— १७/१/२००८**

सुचकाचे नाव :— श्री सुरेश जाधव

अनुमोदकाचे नाव :— श्री दिलीप गायकवाड

ही स्थायी समिती माहे एप्रिल ते ऑक्टोंबर, २००७ या कालावधीतील महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेवून महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या प्रयोजनार्थ योग्य त्या उपाययोजना करण्याचे आणि मुख्य लेखा परिक्षकांच्या अहवालात नोंदविलेल्या विधी अग्राहय प्रकरणी प्रशासनास पुढील प्रमाणे निर्देत देत आहे.

| अ.क्र. | विभाग | तपशिल | निर्देश |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १. | लेखा विभाग | भविष्य निर्वाह निधी लेखे पुर्ण करणे बाबत. | सन २००४—२००५, २००५—२००६ वर्षाचे भविष्य निर्वाह निधी लेखे पुर्ण करुन त्याचा अहवाल लेखा परिक्षण विभागास ३० दिवसाच्या आत सादर करावा. |
| २. | लेखा विभाग | सन २००६—०७ च्या भविष्य निर्वाह निधीच्या ताळमेळाबाबत. | भविष्य निर्वाह निधीची एकुण रक्कम रूपये ११,१०,१५,४६४/— इतकी आढळून येते. रोख वही (कॅश बुक) वरून सदर रक्कम ९,६५,०६,२९८/— इतकी आहे. म्हणजेच भविष्य निर्वाह निधी लेख्यामध्ये १,४५,०९,१८६/— कमी आढळून येते, त्यामुळे भविष्य निर्वाह निधीचा ताळमेळ करुन तसा अहवाल लेखा परिक्षण विभागास ३० दिवसाचे आत सादर करावा. |
| ३ | सार्वजनिक बांधकाम विभाग | शासनाकडुन प्राप्त झालेले अनुदान ज्या विविध योजने अंतर्गत खर्च झाला त्याबाबतचा अहवाल सादर करणे. | शहर अभियंत्यांनी सदरहु अहवाल ३० दिवसाचे आत लेखा परिक्षण विभागास सादर करावा. |
| ४ | कर विभाग | सन २००५—०६ चा वित्तीय वर्षातील कर वसुली बाबत. | सदरहु वर्षामध्ये कर विभागात कर वसुलीचे किती उदिष्ट होते व त्या प्रमाणात किती कर वसुल झाला याबाबत अद्यावत आकडेवारीसह माहिती ३० दिवसाचे आत लेखा परिक्षण विभागाकडे सादर करावी. |
| ५ | पाणी पुरवठा विभाग | सन २००५—०६ या वित्तीय वर्षातील पाणीपट्टी वसुली बाबत. | सदरहु वर्षामध्ये पाणी पुरवठा विभागात पाणीपट्टी वसुलीचे किती उदिष्ट होते? व त्या प्रमाणात किती पाणीपट्टी वसुली झाली याबाबत अद्यावत आकडेवारीसह माहिती ३० दिवसाचे आत लेखा परिक्षण विभागाकडे सादर करावी. |
| ६ | नगररचनाकार विभाग | बांधकाम परवानगी देतांना स्टॉकिंग चार्जेस रुपये १,२५,५७,६३०/— वसुली बाबत. | वसुल न केलेली स्टॉकिंग चार्जेसची रक्कम रुपये १,२५,५७,६३०/—संबंधीत परवानगी धारकांकडुन वसुल करुन महापालिकेच्या कोषागारात भरणा करणे तसेच ज्या प्रकरणामध्ये ३१/३/२००६ नंतरही ज्याच्या बांधकामाचा पुर्णत्वाचा दाखला दिला नाही त्या कालावधीपर्यंत स्टॉकिंग चार्जेस वसुल करुन तसा अहवाल लेखा परिक्षण विभागास ३० दिवसाचे आत सादर करावा. |
| ७ | कर विभाग | मालमत्ता कराच्या पावत्यामध्ये कमी भरणा केल्याबाबत. | कमी भरणा केलेली रक्कम संबंधीत कर्मचा—यांकडुन ३० दिवसाच्या आत भरणा करुन तसा अहवाल लेखा परिक्षण विभागास सादर करावा. |
| ८ | कर विभाग | रोख रक्कम चलनामध्ये ६०० रु. जास्त भरणा केल्याबाबत. | श्री. दयाराम टी.ढोबाळे यांचे पावती पुस्तक क्र. ४७१ पावती क्र. ४७०७६ ते ४७०८५ द्वारे रु. ६०० जास्त भरणा कसा केला याचा खुलासा घेवुन त्या रक्कमेचा त्यांना परतावा करावा. |
| ९ | अतिक्रमण विभाग | कोषागारात रुपये १५०/— कमी भरणा केल्याबाबत. | श्री. ईश्वर देवनाथ यांच्या नावे रुपये २००/— ची पावती काढण्यात आली. परंतु महानगरपालिकेच्या कोषागाराने रुपये २००/— चा भरणा न करता फक्त रुपये ५०/— चा भरणा केला आहे. तरी श्री. भिकन अहिरे यांच्याकडुन कमी भरणा केलेली रक्कम रु. १५०/— व्याजासह वसुल करणे. |
| १० | अतिक्रमण विभाग | अतिक्रमण विभागाने आकारलेल्या दंडाबाबत | हातगाडयांवर दंड आकारतांना तो रु. ५०, १००, १५०, २००, २५० असा आकारण्यांत आला आहे. तरी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | हातगाडयांवर नेमका दंड किती आहे हे समजुन येत नाही. जर निश्चित दंड असेल तर एवढी तफावत कशी येते याबाबतचा खुलासा अतिक्रमण विभागाने एक महिन्याच्या आत लेखा परिक्षण विभागास सादर करणे. |
| ११ | पाणी पुरवठा विभाग | पाणी पट्टी विभागाने स्विकारलेल्या सन २००६–०७ च्या रक्कमेच्या पावत्यांवर स्वाक्षरी न करता पावत्या निर्गमित केल्याबाबत | संबंधित लिपिकाने संबंधीत पावत्यांवर स्वाक्षरी न करता पैसे भरणा केल्याबद्दल संबंधीत पाणी पट्टी ग्राहकांना पावत्या दिल्या आहेत. ही अत्यंत गंभीर बाब आहे. संबंधीत पावती अभिलेख ३० दिवसाचे आत अद्यावत करण्यास निर्देश देत आहे. |
| १२ | पाणी पुरवठा | पाणी पुरवठा विभागाचे पावत्यांमध्ये काही त्रुटी | १. वरिष्ठ अधिका–यांकडुन पावती पुस्तक प्रमाणीत करण्यांत येत नाही.<br>२. डेली कलेक्शन रजिस्टरवर महानगरपालिकेचे राउंड सील व पृष्ठ क्रमांक देण्यांत आले नाहीत.<br>३. डेली कलेक्शन रजिस्टर हे नियमित बनविण्यात येत नाही. तसेच त्यावर रोखपालाची स्वाक्षरी घेतली जात नाही.<br>४. डेली कलेक्शन रजिस्टरमध्ये वर्ष अखेर (३१ मार्च रोजी) लिपिकाकडुन बंद करण्यात येत नाही.<br>५. बिलाची रक्कम व व्याजाची रक्कम पावती पुस्तकात वेगळी दर्शविण्यांत येत नाही.<br>६. लेजर रजिस्टर ३१ मार्च २००० नंतर बनविण्यांस आले नाही.<br>७. रेव्हन्यु स्टॅम्प रजिस्टर हे बनविण्यात आले नाही.<br>याबाबतीत कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व उप अभियंता पाणी पुरवठा यांनी ३० दिवसाचे आत आयुक्तांकडे खुलासा सादर करावा व आयुक्तांनी संबंधीतांवर योग्य ती कारवाई करावी. |
| १३ | पाणी पुरवठा | पाणी पट्टीची रक्कम विलंबाने भरल्याने व्याजाची कमी भरलेली रक्कम रुपये २९,१७९/– वसुल करणे. | कमी व्याजाची रक्कम वुसल करण्यास जबाबदार असलेल्या लिपिकाकडुन खुलासा घ्यावा व या बाबत योग्य ती शहानिशा करुन थकित व्याजाची रक्कम रु. २९,,१७९/– महापालिका कोषागारात ३० दिवसाचे आत जमा करुन तसा अहवाल लेखा परिक्षण विभागास सादर करावा. |
| १४ | पाणी पुरवठा | पाणी बिलाची थकित रक्कम २८,८०४/– वसुल करणे बाबत. | संबंधीत पाणी पट्टी बिल वसुली लिपिकांनी पाणीपट्टी ग्राहकांकडुन पाणी बिलाच्या रक्कमां बाकी असतांना पावत्यामध्ये थकित रक्कम न दाखविता बिल पावत्या कश्या देण्यात आल्या. तसेच संगणकामध्ये ग्राहकाचे नावे थकित रक्कम दर्शविलेली असतांना घरपट्टी बिलामध्ये थकित रक्कम का दाखविण्यांत आली नाही व वसुल केली नाही याबाबत संबंधीतांकडुन खुलासा घेणे व थकीत रक्कम रुपये २८,८०४/– दंडनिय व्याजासह वसुल करुन महापालिका कोषागारात ३० दिवसाचे आत भरणा करुन तसा अहवाल लेखा परिक्षण विभागास सादर करावा. |
| १५ | पाणी पुरवठा | पाणी पट्टी बिलाचे रुपये ३,०८,०३३/– चा धनादेश न वटल्याने रोखीने वसुल करणे बाबत. तसेच पाणी पट्टी बिलाचे रुपये | सदरहु पाणी पट्टी बिलाची रक्कम रोखीने वसुल करणे किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रमाणे १२८ अंतर्गत कारवाई करुन ३० दिवसाचे आत अहवाल सादर करावा. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ७८,१९६/– चा धनादेश न वटल्याने रोखीने वसुल करणे बाबत. | |
| १६ | अग्निशमन विभाग | अग्निशमन विभागातील भंगार साहित्याची विल्हेवाट लावणे. | दर पत्रके अथवा निविदा मागवुन जमा झालेल्या भंगार साहित्याची ३० दिवसाच्या आत विल्हेवाट लावुन तसा अहवाल लेखा परिक्षण विभागास सादर करावा. |
| १७ | मालमत्ता विभाग | मालमत्ता विभागातील स्थावर मालमत्तेची नोंदवही अपुर्ण असल्यास बाबत. | महापालिकेचे तरणतलाव कोंडवाडा गेस्ट हाऊस गॅरेज नॅचरल क्युअर सेन्टर, सॅनिटरी स्टोअर, अग्निशमन स्थानक कॅन्टीन, स्वच्छता निरिक्षक कार्यालय महानगरपालिकेची मार्केट यांची नोंदणी केलेली असून त्यात इमारतीचे स्वरुप त्यांचे मुल्यांकन जोत्याचे क्षेत्र इत्यादी रकाने भरण्यांत आले नाहीत. तसेच महानगरपालिकेच्या इतर स्थावर मालमत्तेची नोंदवहित नोंद नाही. सदरहु नोंदवही ३० दिवसाच्या आत अदयावत करुन लेखा परिक्षण विभागास अहवाल सादर करावा. |
| १८ | मालमत्ता विभाग | महापालिकेच्या गाळयाची भाडेपट्टी वसुल न केल्याबद्दल | कॅम्प नं. १,२,३ व ५ मधील भाजी मार्केटमध्ये किती गाळे आहेत. त्यांची एकुण किती वसुली बाकी आहेत. वसुली का होवु शकली नाही. सदर वसुलीबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली याबाबत मालमत्ता विभागाने लेखी खुलासा ३० दिवसाच्या आत तसा अहवाल लेखा परिक्षण विभागास सादर करावा अन्यथा संबंधीत विरुध्द कारवाई करण्यांत येईल. |
| १९ | मालमत्ता विभाग | महापालिकेच्या मालकीचे शाळांकडुन ३१/१०/१९९६ पासुन भाडे वसुल न केल्याबाबत. | १९ शाळांच्या इमारतीचे भाडयाची रक्कम रुपये १,५३,३३,५१२/– ची मागणी शिक्षण उप संचालक नाशिक विभाग यांचेकडे करुन या मागणीचा पाठपुरावा करुन वेळोवेळी आढावा घेवुन तसा अहवाल ३० दिवसाचे आत लेखा परिक्षण विभागास सादर करावा. |
| २० | कर विभाग | सन २००७–०८ या आर्थिक वर्षातील कर योग्य मुल्याच्या रक्कमांबाबत | सन २००७–०८ या आर्थिक वर्षात कर योग्य मुल्य पावती पुस्तकांचे काही पावत्यांचे कमी रक्कमेचा भरणा केला आहे. त्यांचे कारण काय आहे? याबाबत खुलासा संबंधीत उपआयुक्तांनी ३० दिवसाचे आत लेखा परिक्षण विभागास पाठवावा. |
| २१ | कर विभाग | श्रीमती रोमा हिंगोरानी काऊन्टर वसुली लिपिक ना.सु.के. घरपट्टी रक्कमेचा कमी भरणा केलेली रक्कम रु. १०/– वसुल करणे बाबत. | सदरची रक्कम संबंधीत लिपिकाकडुन वसुल करुन एक महिन्याच्या आत अहवाल लेखा परिक्षण विभागास सादर करावा. |
| २२ | कर विभाग | सन २००७–०८ या आर्थिक वर्षातील ट्रेड लायसन्स ची कमी रक्कम भरणा केल्याबाबत | संबंधित कर्मचा–यांकडुन ट्रेड लायसन्स ची पावती क्र. ५४४४५ दिनांक २५/६/२००७ या तारखेची रक्कम रुपये ३६/– कॅश बुक नोंदवहीत नोंद नसल्याने सदरहु रक्कम वसुल करण्यांत यावी. |
| २३ | कर विभाग | मालमत्ता कराच्या पावत्यांमध्ये कमी रक्कमेचा भरणा केल्याबद्दल | श्रीमती राणी खुर्सेजा वसुली लिपिक ना.सु.के. यांनी पावती पुस्तक क्र. ९९०००८१८११ दिनांक २९/३/२००७ व पावती क्र. ९९०००८४१३० दिनांक १०/४/०७ द्वारे वसुल केलेल्या रक्कमेपक्षा रुपये ३००/– कमी भरणा केल्याने त्यांच्याकडुन मुळ रक्कमेवर १८ टक्के व्याज वसुल करुन महानगरपालिका कोषागारात जमा करुन तसा अहवाल एक महिन्याच्या आत अहवाल लेखा परिक्षण विभागास सादर करावा. |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | कर विभाग | २००६–०७ या आर्थिक वर्षातील करयोग्य मुल्याच्या कॅशबुकमध्ये कमी भरणा केल्याबाबत. | कर योग्य मुल्याचे पावती पुस्तकाचे कॅश नोंदवहीमध्ये कमी भरणा केला आहे त्याचे कारणाबाबतीत कर विभागाने ३० दिवसाच्या आत लेखा परिक्षण विभागास अहवाल सादर करावा. |
| २५ | पाणी पुरवठा विभाग | पाणीपट्टी वसुली बाबत. | मागील ३ वर्षापासुन पाणीपट्टीची वसुली अति अल्प प्रमाणात झालेली आहे. ती एवढया कमी प्रमाणात का झाली? ती वाढविण्याकामी पाणी पुरवठा विभागाकडुन काय उपाययोजना केली याबाबतचा खुलासा ३० दिवसाच्या आत लेखा परिक्षण विभागास अहवाल सादर करावा. |

उपरोक्त निर्देशानुसार संबंधीत विभागाच्या अधिका–याकडुन एक महिन्याच्या मुदतीत अहवाल प्राप्त झाला किंवा नाही याबाबतीत मुख्य लेखा परिक्षकांनी स्थायी समितीस एकत्रित अहवाल सादर केल्यानंतर त्यावर पुढील कार्यवाहीसाठी आदेश निर्गमित केले जातील.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४** :– प्र. क्र. ५९ मधील बॅ.क्र. १६७९ गुरुसंगत दरबारच्या बाजुला, उल्हासनगर–४ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे.

---

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–स्थायी समितीने ४–५ सार्वजनिक शौचालय तोडण्यास यापुर्वी मंजुरी दिलेली आहे. तेथे नविन शौचालय बांधले आहे किंवा नाही याबाबत आयुक्तांनी पहाणी करावी. कारण की, सार्वजनिक शौचालय तोडल्यानंतर ब–याचवेळा तेथे अतिक्रमण करुन अनाधिकृत बांधकाम केले जाते. जी सार्वजनिक शौचालय तोडण्यात आलेली आहेत त्यातील काही ठिकाणी समाजमंदिर बांधण्यात येणार असल्याबाबतचे फलक लावण्यात आलेले आहेत. काही ठिकाणी तसे फलक लावण्यात आलेले नाहीत.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–सार्वजनिक शौचालय बांधण्याबाबत एमएमआरडीएच्या माध्यमातुन ३५० सार्वजनिक शौचालय बांधण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे. पुढच्या सभेत तो आपल्यापुढे मंजुरीसाठी येईल. तत्पुर्वी सार्वजनिक शौचालय निष्कासित केलेल्या जागेवर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेतली जाईल.

सदस्य श्री. जीवन इदनानी:–सार्वजनिक शौचालयांची आता फारसी आवश्यकता नाही कारण की आता प्रत्येकाच्या घरामध्ये शौचालय आहे. जेथे सार्वजनिक शौचालयाची अत्यंत आवश्यकता असेल तेथे एमएमआरडीएच्या माध्यमातुन सार्वजनिक शौचालय बांधण्याचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजुरीस आणला जावा.

सभापती, श्री. राम पारवानी :–सार्वजनिक शौचालय निष्कासित केलेल्या जागेवर अतिक्रमण होणार नाही याची जबाबदारी संबंधीत प्रभागाच्या नगरसेवकावर सोपविण्यात यावी.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–या अगोदर ब–याच सार्वजनिक शौचालयांच्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे. आता सुध्दा चालु आहे. माझ्या मनात जी एक शंका होती ती मी सभागृहासमोर मांडली आहे. त्यावर काय करायचे ते आयुक्त साहेब पाहतील.

**सदस्य श्री. जीवन इदनानी:—**जी सार्वजनिक शौचालय निष्कासित केली जातात त्यांची नोंद ठेवली जावी.

**सभापती, श्री. राम पारवानी :—** निष्कासित केलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या जागेवर सीसी पॅसेज तयार करण्याची जोपर्यंत कार्यवाही होत नाही तोपर्यंत सार्वजनिक शौचालय तोडता कामा नये.

**महापालिका सचिव:—**आपण ही जी अट आता सांगितली आहे ती अगोदरपासुनच ठरावामध्ये अंतर्भुत केली जात आहे. सार्वजनिक शौचालय निष्कासीत करण्याचा जो ठराव तयार केला जातो त्यामध्ये सदरची शौचालये तो पर्यंत निष्कासित करु नयेत जोपर्यंत त्याठिकाणी विकास कामे सुरु होत नाहीत. असे लिहिले जाते

**सदस्य श्री. सुरेश जाधव :—**जर शौचालयाचे छप्पर पडले तर?

**सभापती, श्री. राम पारवानी :—**निष्कासीत केलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या जागेवर सीसी पॅसेज तयार केला जाईल.

**सदस्य श्री. सुरेश जाधव:—**शौचालय निष्कासित करण्यासाठी व नविन सार्वजनिक शौचालय बांधण्यासाठी निधी उपलब्ध आहे काय?

**सदस्या श्रीमती लता निकम:—**मी एक पत्र दिले होते त्यानुसारचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे आला नाही. त्यावेळेस असे सांगण्यात आले होते की याबाबतचा प्रस्ताव पुढील सभेस घेतला जाईल. माझ्या प्रभागातील एक सुध्दा काम अदयाप झाले नाही. इतर सदस्यांच्या प्रभागात दोन—दोन, तीन—तीन कामे झाली आहेत.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—**आपल्या प्रभागातील ते काम करुन देतो.

**सदस्या श्रीमती लता निकम:—**साहेब, या कामाबाबत या अगोदरच पत्र दिले आहे. हे काम लवकरात लवकर करुन दया.

**काही सदस्य :—** पास, पास......

**सभापती, श्री. राम पारवानी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४ :—** प्र. क्र. ५९ मधील बॅ.क्र. १६७९ गुरुसंगत दरबारच्या बाजुला, उल्हासनगर—४ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

श्रीमती ज्योती रमेश चैनानी, मा. नगरसेविका उल्हासनगर महानगरपालिका यांनी दिनांक ९/५/२००७ च्या पत्रान्वये प्र.क्र. ५९ बॅक्र. १६७९ गुरुसंगत दरबारच्या बाजुला उल्हासनगर—४ येथिल निकामी व वापरात नसलेले शौचालय निष्कासन करुन त्याजागी सीसी पॅसेज बनविणेबाबत विनंती केलेली आहे.

सदर शौचालयाबाबतचा अहवाल/पंचनामा स्वच्छता निरिक्षक व मुख्य स्वच्छता निरिक्षक यांचेकडुन प्राप्त झालेला असून सदर शोचालय वापरात नसल्याचे तसेच सदर जुने झाल्याने मोडकळीस आल्याने पुर्णपणे निष्कासित करुन सदर जागी सीसी पॅसेज बनविणेबाबत अहवाल मालमत्ता विभागात प्राप्त झालेला आहे.

उक्त बाबी विचारात घेता प्र.क्र. ५९ बॅक्र. १६७९ गुरुसंगत दरबारच्या बाजुला उल्हासनगर—४ येथिल निकामी व वापरात नसलेले शौचालय निष्कासन करुन त्याजागी सीसी पॅसेज बनविणेबाबत मा. स्थायी समितीची मंजुरी मिळणेसाठी स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १२४ दिनांकः— १७/१/२००८

सुचकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर जग्यासी

हो स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे प्र. क्र. ५९ मधील बॅ.क्र. १६७९ गुरुसंगत दरबारच्या बाजुला, उल्हासनगर—४ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयाच्या निष्कासनास व जागेवरील परिस्थिती पहाता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करणेस मान्यता देत आहे.

परंतु—

सदरची शौचालये तो पर्यंत निष्कासित करु नयेत जोपर्यंत त्याठिकाणी विकास कामे सुरु होत नाहीत.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५** :—व्ही.टी.सी. मैदानाच्या वापरासाठी ठाणे जिल्हा क्रिकेट असोसिएशन यांनी महापालिकेकडे भरणा केलेल्या रक्कम रुपये ६,०००/— चा त्यांना परतावा करणेस मंजुरी देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ५** :— व्ही.टी.सी. मैदानाच्या वापरासाठी ठाणे जिल्हा क्रिकेट असोसिएशन यांनी महापालिकेकडे भरणा केलेल्या रक्कम रुपये ६,०००/— चा त्यांना परतावा करणेस मंजुरी देणे.

## प्रस्तावना

श्री. प्रशांत राठोड, सेक्रेटरी, ठाणे जिल्हा क्रिकेट असोशिएशन यांनी उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीचे व्हि.टी.सी. मैदान उल्हासनगर शहरातील मुलांना क्रिकेट खेळण्याकरीता दिनांक २४/१/२००३ रोजी रक्कम रुपये ५५००+ रु. ५०० अनामत रक्कम असे एकत्रित रक्कम रुपये ६०००/— भरणा महानगरपालिकेत करण्यात आलेला होता.

परंतु ठाणे जिल्हा क्रिकेट असोशिएशन यांनी सदर मैदान कोणत्याही प्रकारे वापर करण्यात आलेला असुन याबाबत करारनामा करण्यात आलेला नाही असे संस्थेने दिलेल्या अर्जात नमुद करण्यात आलेले आहे.

सदर संस्थेला महासभा ठराव क्र. ६५, दिनांक २६/१२/२००२ अन्वये ११ महिन्यांसाठी प्रतिदिन रुपये ५००/— भाडे आकारणी करुन मान्यता देण्यात आलेली आहे. तथापी सदर प्रकरणाची संचिका तपासणी केली असता करारनामा आढळुन आलेला नाही.

ठाणे जिल्हा क्रिकेट असोशिएशन यांनी केलेल्या अर्जानुसार भरणा केलेली रक्कम रुपये ६०००/— ही ३ वर्षांपुर्वीची असल्याने स्थायी समितीच्या मंजुरीसाठी ठेवणे आवश्यक आहे असा अभिप्राय मुख्य लेखा परिक्षक यांनी सादर केलेला आहे.

तरी ठाणे जिल्हा क्रिकेट असोशिएशन यांनी भरणा केलेली रक्कम रुपये ६०००/— परतावा करणेकामी मा. स्थायी समिती पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १२५ दिनांकः— १७/१/२००८

सुचकाचे नाव :— श्री. सुरेश जाधव

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे व्ही.टी.सी. मैदानाच्या वापरासाठी ठाणे जिल्हा क्रिकेट असोसिएशन यांनी महापालिकेकडे भरणा केलेल्या रक्कम रुपये ६,०००/— चा त्यांना परतावा करणेस मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ६** :— बॅ. क्र. १७२०/११, सेक्शन ३३, गांधी रोड, उल्हासनगर—५ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ६** :— बॅ. क्र. १७२०/११, सेक्शन ३३, गांधी रोड, उल्हासनगर—५ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे.

प्रस्तावना

श्री. भारत आर. राजवानी (गंगोत्री), मा. नगरसेवक उल्हासनगर महानगरपालिका यांनी बॅ.क्र. १७२०/११, सेक्शन ३३, गांधी रोड, उल्हासनगर—५ या ठिकाणी असलेले १० सिटचे शौचालय निष्कासीत करणेबाबत विनंती केलेली आहे.

सदर शौचालयाबाबतचा अहवाल/पंचनामा स्वच्छता निरिक्षक श्री. हिबारे व मुख्य स्वच्छता निरिक्षक यांचेकडुन प्राप्त झालेला असून बॅ. नं. १७२०/११, सेक्शन ३३, गांधी रोड, उल्हासनगर–५ या ठिकाणी १० सिटचे शौचालय असुन ते मोडकळीस स्थितीत आहे. दरवाजे व सेप्टीक टॅक पुर्णपणे तुटलेले आढळुन आले आहे. त्याठिकाणी रहिवासी शौचालयाचा वापर करीत नाही. सर्वांच्या घरी आपपाले स्वत:चे शौचालय असुन सदर शौचालय तोडण्यास तेथिल रहिवाशी व मा. नगरसेवक यांनी हरकत नाही असे कळविले आहे. बॅ.नं. १७२०/११ च्या पाठीमागे नवीन शौचालय बांधण्यात आलेले आहे. त्याचा वापर तेथिल रहिवाशी करतात. त्यामुळे सदरचे शौचालय निष्कासित करुन त्याठिकाणी सीसी पॅसेज बनविण्यात यावे.
उक्त बाबी विचारात घेता बॅ.क्र. १७२०/११, सेक्शन ३३, गांधी रोड, उल्हासनगर–५ येथिल शौचालय निष्कासित करुन सदर ठिकाणी सीसी पॅसेज बनविणेकरीता मंजुरी मिळणेसाठी मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १२६ दिनांक:– १७/१/२००८

सुचकाचे नाव :– श्री. नरेंद्र दवणे

अनुमोदकाचे नाव :– श्री. विजय सुपाळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे बॅ. क्र. १७२०/११, सेक्शन ३३, गांधी रोड, उल्हासनगर–५ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे निष्कासनास व जागेवरील परिस्थिती पहाता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करणेस मान्यता देत आहे.

परंतु–

सदरची शौचालये तो पर्यंत निष्कासित करु नयेत जोपर्यंत त्याठिकाणी विकास कामे सुरु होत नाहीत.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. ७ :– उल्हासनगर महानगरपालिकेकरीता मेसर्स फोर्स मोटर्स पुणे यांचेकडुन शासकिय दराने रुग्णवाहिका व शववाहिनी ही वाहने खरेदी करण्यास व त्यांचे अधिकृत विक्रेत्याकडुन त्यामध्ये फिटींग बसविणेकामी प्रशासनास त्यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

---

काही सदस्य :–पास–पास……

सभापती, श्री. राम पारवानी :–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ७ :—** उल्हासनगर महानगरपालिकेकरीता मेसर्स फोर्स मोटर्स पुणे यांचेकडुन शासकिय दराने रुग्णवाहिका व शववाहिनी ही वाहने खरेदी करण्यास व त्यांचे अधिकृत विक्रेत्याकडुन त्यामध्ये फिटींग बसविणेकामी प्रशासनास त्यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेकडे एक रुग्णवाहिका कार्यरत असुन ती जुनी झाल्यामुळे वारंवार नादुरुस्त होत असते. तसेच शववाहिनी अतिशय जुनी झाल्यामुळे भंगारात विकण्यात येत आहे. त्यामुळे सर्वसामान्य व गरजु नागरीकांना हॉस्पीटल मध्ये रुग्ण नेण्यास व बाहेरुन आणण्यास अडचणी येतात. म्हणुन सर्वसामान्य रुग्णाच्या सोयीसाठी एक रुग्णवाहिका व एक शववाहिनी खरेदी करण्याचे प्रस्तावित होते. त्यानुसार सन २००६—०७ च्या महापौर निधीमुधन एक कार्डीक रुग्णवाहिका व एक शववाहिनी खरेदी करण्याच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीने मार्च २००७ मध्ये मंजुरी दिली होती. त्याप्रमाणे तीन वेळा निविदा मागविण्यात आल्या मात्र कोणत्याही निविदाधारकांकडुन प्रतिसाद मिळाला नाही.

म्हणुन निविदा रुग्णवाहिका खरेदी करण्यासाठी टेम्पो ट्रॅव्हलर वाहन उत्पादक कंपनी मे. फोर्स मोटर्स, पुणे यांचेकडुन दर मागविण्यात आले असता, शासकिय (DGSD) दरानुसार रुपये ६,५२,२९८/— व त्यामधील जी.आय. साईड पॅनल, ॲल्युमिनीयम फ्लोअरिंग, ए.सी. सिस्टम, स्ट्रेचर, वेलिंग हॉर्न, फर्स्ट ऐड बॉक्स वगैरे फिटींग साठी रुपये २,७८,५३२/— असा एकुण रुपये ९,३०,८३३/— (जकात वगळुन) एवढा अंदाजित खर्च अपेक्षित आहे. तसेच नविन शववाहिनी खरेदी करण्यासाठी शासकिय (DGSD) दरानुसार रुपये ६,५२,२९८/— व त्यामधील अल्युमिनियम आईसबॉक्स, जी.आय.साईड पॅनल, ॲल्युमिनीयम फ्लोअरींग, स्ट्रेचर, वेलिंग हॉर्न वगैरे फिटींगसाठी रुपये १,४२,९९२/— असा एकुण ७,९५,२९०/— (जकात वगळुन) एवढा अंदाजित खर्च होणार आहे. दोन्ही वाहनांसाठी एकुण १७,२६,१२३/— एवढा खर्च होणार आहे.

तरी टेम्पो ट्रॅव्हलर वाहन उत्पादक कंपनी मे. फोर्स मोटर्स, पुणे यांचेकडुन शासकिय (DGSD) दराने रुग्णवाहिका व शववाहिनी ही वाहने खरेदी करण्यास व अधिकृत वितरक यांचेकडुन त्यामधील फिटींग बसविणे व अत्यावश्यक कामासाठीच्या खर्चास मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) अंतर्गत मा. स्थायी समितीची प्रशासकिय व वित्तीय मंजुरी मिळणेसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १२७ दिनांकः— १७/१/२००८

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. गोविंदराम लुंड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे उल्हासनगर महानगरपालिकेकरीता मेसर्स फोर्स मोटर्स पुणे यांचेकडुन शासकिय दराने रुग्णवाहिका व शववाहिनी ही वाहने खरेदी करण्यास व त्यांचे अधिकृत विक्रेत्याकडुन त्यामध्ये फिटींग बसविणेकामी प्रशासनास त्यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :—** सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ४३ विविध कामाच्या मंजुरीची माहिती नोंद करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

<u>सभापती, श्री. राम पारवानी :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ८ :—** सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत ४३ विविध कामाच्या मंजुरीची माहिती नोंद करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या निधीतून मा. नगरसेवक यांनी कामे करणेसाठी विनंती केलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे ठिकाण | प्राकलनीय किंमत | करारनामा दिनांक | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर—१ प्रभाग क्र. २१ मधील बॅ नं २२४, २२५, २२७ मोरंदोमल अपार्अमेंट जवळ सी सी पायवाट व नाली बांधणे (नगरसेवक निधी | १९९९००/— | २३/११/२००७ | मे आदर्श म का सोसा |
| २ | उल्हासनगर—२ प्रभाग क्र.३६ मधील बॅ.नं. २८६,५७६,५७८,६२८ बॅ.क्र.६०१,६११ ते ६१४,५७१ शाळा क्र.२४ जवळ सि.सि. पायवाटा नाली बांधणे बाबत. (नगरसेवक निधी) | १९९७०० | २३/११/२००७ | मे ओमसाईबाबा म का सोसा |
| ३ | १) प्रभाग समिती क्र. २ मध्ये फॉलवरलाईन ते नेहरू चौक, शिवाजी चौक ते नेहरू चौक, शास्त्री चौक ते जयहिंद शाळा, रूहानी संतसंग ते पंजाबी कॉलनी, पंजाबी कॉलनी ते मुकणे यांचे घर, ओटी—३ कितीर्ई सोसायाटी ते नेनुमल सोसायटी मधील रस्त्यात टेलीफोन विभागाने खोदलेल्या खंदकाचे पुनर्पुठाकन करणे. (महापालिका निधी | ९९७३८५/— | २३/११/२००७ | मे जय भारत कन्स्ट्रक्शन उल्हासनगर—३ |
| ४ | उल्हासनगर— प्रभाग क्र.२४ मधील गार्डन क्र.४४४ समोरुन ते अनमोल पॅलेस पर्यंत नाली बांधणे. (महापालिका निधी) | ५९३८०० | ३/१२/२००७ | मे गिता म का सोसा |
| ५ | उल्हासनगर—४ येथे प्र क्र. ४८ मधील संजय पवार यांच्या घरापासून चौधरी यांच्या घराजवळ शीवनगरमध्ये सी सी रस्ता व नाली बनविणे. (नगरसेवक निधी | १९९९००/— | ३/१२/२००७ | मे चंदा म का सोसा |
| ६ | उल्हासनगर—२ वार्ड क्र. ३४ येथील सोना मार्के, कामगार होस्पीटल, आशाराम अपार्टमेंट येथे प्रवेशद्वार बनविणे (महापौर निधी | २०००००/— | ३/१२/२००७ | मे बाजाली कृपा म का सोसा. |
| ७ | उल्हासनगर—१ प्रभाग क्र. २१ मधील बॅ नं १८९, २२१, २४५, २५५ आदर्श पंचायत हॉल जवळ सी सी पायवाटा आणि नाल्या बांधणे. (नगरसेवक निधी | १९९९५०/— | ३/१२/२००७ | मे आदर्श म का सोसा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | उल्हासनगर–१ प्रभाग क्र. २१ मधील बॅ नं १८१, १८२, २१४ पाण्याच्या टाकीजवळ जयहिंद कॉलनी येथे सी सी पायवाटा व नाली बांधणे. (नगरसेवक निधी | ९९९००/– | ३/१२/२००७ | मे आदर्श म का सोसा |
| ९ | उल्हासनगर–२ प्रभाग क्र.३६ मधील बॅरेक क्र.२९३,५७०,६१९,६२५ बॅ.क्र.५८१ कैलाश पर्वत अपार्टमेंट, तिवारी यान शॉप येथे सि.सि.पायवाटा व नाली बांधणे बाबत. (महापालिका निधी) | १९९७०० | ३/१२/२००७ | मे ओमसाईबाबा म का सोसा |
| १० | उल्हासनगर–५ येथील प्रभाग क्र ७४ मधील बॅ नं २०८६, २१०० जवळ सी सी पायवाटा व नाला बांधणे. (नगरसेवक निधी | १०००००/– | ३/१२/२००७ | मे पितांबर म का सोसा |
| ११ | उल्हासनगर–४ येथील येथील प्रभाग क्र. ६४ मधील गणेशनगर येथील श्री रामजीत श्री सारंगधर दाभाडे, श्री जेस्वाल यांच्या घराजवळील आणि विविध ठिकाणच्या सी सी पायवाटा आणि नाल्या बांधणे. (नगरसेवक निधी | १४९९००/– | ३/१२/२००७ | मे समाधान म.का. सोसा. |
| १२ | उल्हासनगर–४ येथील प्रभाग क्र. ६४ मधील गणेशनगर येथील श्री राजेश पिलको श्री बलसाने, श्रीमती विद्या गुप्ता, आणि विविध ठिकाणी सी सी पायवाटा आणि नाली बांधणे (नगरसेवक निधी | १४९९००/– | ३/१२/२००७ | मे समाधान म.का. सोसा. |
| १३ | उल्हासनगर–२ वार्ड क्र. २३ येथील नाना नानी उद्यान व इंदिरागांधी उद्यान जवळ सतीभवन येथे नाली, स्लॅप मातीचे (लाल) काम करणे बाबत. (नगरसेवक निधी | १५००००/– | ३/१२/२००७ | मे सुर्य ज्योत म का सोसा |
| १४ | उल्हासनगर–३ वार्ड क्र. ३० येथील नारायणदास जग्याशी मार्गावर पदपथ बनविणे. (महापालिका निधी | ४४१२००/– | ३/१२/२००७ | मे शुभलक्ष्मी म का सोसा. |
| १५ | उल्हासनगर–४ प्रभाग क्र.५९ मधील बॅ.नं. १६७७–७८ रमेश चेनानी निवास समोर सि.सि.एम–२५० ने रस्ता व नाली बनविणे. (महापौर निधी) | ३००००० | ६/१२/२००७ | मे शुभलक्ष्मी म का सोसा |
| १६ | उल्हासनगर–३ उल्हासनगर महानगरपालिकेतील नागरी सुविधा केंद्रामध्ये फर्निचर , कपाट, टेबल, खुर्ची पाटीशियन पेस्ट कंट्रोल इत्यादी कामे करणे. (महापालिका निधी | २९९४००/– | ६/१२/२००७ | मे वडार म का सोसा. |
| १७ | उल्हासनगर–१ प्रभाग क्र. १७ मध्ये बॅ नं ५२, ५४, ७६ महान कॉटेलजवळ सी सी पायवाट व नाली बांधणे (महापालिका निधी | १९९९५०/– | ६/१२/२००७ | मे शिवानी म का सोसा. |
| १८ | उल्हासनगर– प्रभाग क्र.५६ मधील सत्यम अपार्टमेंट, अय्यप्पा मंदीर परिसर येथे सी. सी.पॅसेज व नाली बनविणे. (नगरसेवक निधी) | १९९९०० | ७/१२/२००७ | मे चंदा म का सोसा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९ | उल्हासनगर–१ प्रभाग क्र.४ मधील रेणूभांडारी, कंडोर सदर, मोहीत निवास कोकाटेसदन, चंद्रपाल टेलर ते चौहानचे घर माता मंदीर ते दत्तवाडी शिवाजीनगर येथे पायवाटा व नाली बांधणे. (नगरसेवक निधी) | १९९७०० | ७/१२/२००७ | मे वनीदेवी म का सोसा |
| २० | उल्हासनगर–१ प्रभाग क्र.४ मधील भिमनगर जवळ, बॅ.क्र.१ व २ माता मंदीराजवळ शौचालयाची दुरुस्ती करणे. (गलिच्छ वस्ती निधी) | ९९२०० | ७/१२/२००७ | मे वनीदेवी म का सोसा |
| २१ | उल्हासनगर–२ वार्ड नं. ६ (आझाद नगर) मधील पांध्या यांच्या हॉटेल शेजारील पाय–या व चंद्रकांत मिश्रा यांच्या घराच्या मागे पायवाटा व नाल्या बनविणे. (नगरसेवक निघी | १०००००/– | ११/१२/२००७ | मे समाधान म.का. सोसा. |
| २२ | उल्हासनगर–३ वार्ड क्र. ६ येथील गरीबनगर येथे महानगरपालिकेच्या शौचालयाच्या बाजूस वाचनालय बनविणे. (महापालिका निधी | १०००००/– | ११/१२/२००७ | मे माजी सैनिक म का सोसा. |
| २३ | उल्हासनगर–५ येथील प्रभाग क्र. २३ मधील निजधाम आश्रमपासून ब्लॉक क्र. ८३२ पर्यतच्या रस्त्याचे बीएम एसी ने डांबरीकरणे करणे. (नगरसेवक निधी | २०००००/– | १३/१२/२००७ | मे महालक्ष्मी म. का. सोसा. |
| २४ | उल्हासनगर–५ येथील प्रभाग क्र १३ मधील सरस्वती अपार्ट. पासून शिवाजीच्या पुतळयाच्या मार्गे निजधाम आश्रमपर्यत जाणा–या रस्त्याचे बिएम एसी ने डांबरीकरणे करणे. (महापालिका निधी | ४३८३००/– | १३/१२/२००७ | मे महालक्ष्मी म. का. सोसा. |
| २५ | उल्हासनगर–५ प्रभाग क्र.७५ मधील महानगरपालिकेचे शौचालय ते नरेंद्र यांच्या घरापासून ते हिल लाईन पोलिस स्टेशन, मुकेश सोईन तेजी यांचे घर ते अंकल गॅरेज पर्यंत सी.सी.पॅसेज व नाली बांधणे. (नगरसेवक निधी) | १००००० | १४/१२/२००७ | मे दत्त म का सोसा |
| २६ | उल्हासनगर–४ येथील बॅ.नं. १२९२ ब्राम्हणे यांच्या घराजवळ, पद्मा निवास, पिंपळाच्या झाडाजवळ सिमेंट पायवाटा नाल्या व पेव्हरब्लॉकचे काम करणेबाबत. (नगरसेवक निधी) | १४९७०० | १४/१२/२००७ | मे दत्त म का सोसा |
| २७ | उल्हासनगर–२ वार्ड क्र. ५ येथील भय्यासाहेब आंबेडकर नगर येथील सरोद यांच्या घारापासून सातपुते शिवा यांच्या घरापर्यत रस्त्याची सुधारणा करणे. ) महापालिका निधी | ४९९५४०/– | १७/१२/२००७ | मे श्री जयशंकर म का सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २८ | उल्हासनगर वार्ड क्र. ५ यथील भय्यासाहेब आंबेडकर नगर येथील शिवसंना ऑफिस ते इस्माईल यांच्या घरापर्यत रस्त्याची सुधारणा करणे. (महापालिका निधी | ४९५३५५/— | १७/१२/२००७ | मे श्री जयशंकर म का सोसा. |
| २९ | उल्हासनगर—३ प्रभाग क्र३१ मधील बॅ.नं. १०५१ जवळ सि.सि.एम—२५० रस्ता व नाली बनविणे. (नगरसेवक निधी) | २००००० | १८/१२/२००७ | मे श्रीसिध्दनाथ म का सोसा |
| ३० | उल्हासनगर—३ प्रभाग क्र३१ मधील बॅ.नं. १४०१,१००४ जवळ सि.सि.एम—२५०, पायवाटा व नाली बनविणे. (नगरसेवक निधी) | २००००० | १८/१२/२००७ | मे श्रीसिध्दनाथ म का सोसा |
| ३१ | उल्हासनगर—४ येथील प्रभाग क्र. ५६ मधील श्री अंबासे यांच्या घरापासून श्री पाटील रेशन दुकानापर्यतचा नाला बांधणे (महापालिका निधी | ९९६०००/— | १९/१२/२००७ | मे चंदा म का सोसा |
| ३२ | उल्हासनगर—४ प्रभाग क्र.६२ मधील दत्तगुरु सोसायटीमध्ये विविध ठिकाणी सि. सि.पायवाटा आणि नाल्या बांधणे. (नगरसेवक निधी) | ९९९०० | १९/१२/२००७ | मे चंदा म का सोसा |
| ३३ | उल्हासनगर—१ प्रभाग क्र. १७ मधील बॅरेक क्र. ६३, ६४ बॅ नं ६४—६५ येथे सी सी पायवाटा , नाली बांधणे. (नगरसेवक निधी | १९९९००/— | १९/१२/२००७ | मे शिवानी म का सोसा. |
| ३४ | उल्हासनगर—१ प्रभाग क्र. ५ मधील गुलशनगर येथील सलीमभाई घर ते अलमभाई निवास, राजबीर बेकरी तकदी ट्रान्सपोर्ट, मोहम्मद बेकरीजवळ सी सी व नाली बांधणे (नगरसेवक निधी | ९९८००/— | १९/१२/२००७ | मे शिवानी म का सोसा. |
| ३५ | उल्हासनगर—४ येथील प्रभाग क्र. ६५ मधील ब्लॉक नं ३२७ नितनवरे यांच्या घरापासून मुखबधीर विद्यालयर्प्यतचा रस्ता डांबरी करणे. (नगरसेवक निधी | १९८५००/— | १९/१२/२००७ | मे गिता म का सोसा |
| ३६ | उल्हासनगर—१ प्रभाग क्र. ०५ मधील बॅ नं १९,२० आणि २१ जवळ शौचालयाची दुरूस्ती करणे. (महापालिका निधी | ७१२००/— | १९/१२/२००७ | मे शिवानी म का सोसा. |
| ३७ | उल्हासनगर—५ येथील प्रभाग क्र. १३ मधील जयबाबा लॉन पासून साईपुजा अपार्टमेंट पर्यतचा रस्ता बनविणे. (महापालिका निधी | ४७५८००/— | १९/१२/२००७ | मे जनता म का सोसा |
| ३८ | उल्हासनगर—५ प्रभाग क्र.१३ मधील हिरापूरी चौकापासून स्वामी शांतीप्रकाश योगाआश्रम पर्यंतच्या रस्त्यावरील खड्डे बी.एम.ए.सी.ने भरणे. (महापालिका निधी) | २५००५० | १९/१२/२००७ | मे जगन्नाथ म का सोसा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३९ | उल्हासनगर–५ प्रभाग क्र.१३ मधील शिवाजी पुतळयापासून गांधीरोड मुख्य रस्त्यापर्यंत आणि शिव कॉर्नर अपार्टमेंट पासून ब्लॉक क्र.८३१ पर्यंतच्या रस्त्याचे बी.एम.ए.सी.ने डांबरीकरण करणे. (नगरसेवक निधी) | १०००३० | १९/१२/२००७ | मे शिवलिंग म का सोसा |
| ४० | उल्हासनगर–४ येथील प्रभाग क्र. १४ मधील सुभाष टेकडी परिसरातील शिवशक्ती अपार्टमकेंट पासून लाला जाधव यांच्या घरापर्यतचा रस्ता सी सी एम २५० ने बांधणे. (महापालिका निधी | २७९५००/– | १९/१२/२००७ | मे चंदा म का सोसा |
| ४१ | उल्हासनगर–४ येथील प्रभाग क्र. १४ मधील सुभाष टेकडी परिसरातील ब्लॉक क्र. ए ४७१ पासून विलास माने यांचे घरापर्यतचा रस्ता सी सी एम २५० ने बांधणे (महापालिका निधी | २९९५००/– | १९/१२/२००७ | मे चंदा म का सोसा |
| ४२ | उल्हासनगर–४ प्रभाग क्र.१४ मधील सुभाष टेकडी परिसरातील विलास माने यांच्या घरापासून श्री सुधीर यांच्या घरापर्यंतचा रस्ता सी.सी.एम–२५० ने बांधणे.(महापालिका निधी) | २९९५०० | १९/१२/२००७ | मे चंदा म का सोसा |
| ४३ | उल्हासनगर–४ प्रभाग क्र.५१ मध्ये जिजामाता उद्यानाची संरक्षण भिंत बांधणे. (महापालिका निधी) | ३२९४०० | २०/१२/२००७ | मे आदर्श म का सोसा |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप– निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप–निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १२८ <u>दिनांकः– १७/१/२००८</u>

सुचकाचे नाव :– श्री. सुरेश जाधव

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती सुजाता रिजवानी

ही स्थायी समिती प्रस्तावनेत सुचविलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गतचे ४३ विविध कामाच्या मंजुरीची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :– विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. ९ :–विद्युत विभागांतर्गत ३ विविध कामाच्या संविदेची माहिती नोंद करणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. राम पारवानी :–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ९ :–** विद्युत विभागांतर्गत ३ विविध कामाच्या संविदेची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका विद्युत विभागाचे कामास दिलेल्या मंजुरीची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामांचे नाव | मंजुर निविदा रक्कम | कराराचा दिनांक | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | वित्तीय वर्ष ०७–०८ करीता मार्ग प्रकाशासाठी शहरात बसविलेल्या दिवाबत्तीचे खांब दुरुस्ती करणे. | ९,९६,५००/– | ०८.०८.०७ | मे. शुभलक्ष्मी मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर, जि. ठाणे |
| २ | प्रभाग क्र. ४४ मध्ये वर्ष ०७–०८ च्या नगरसेवक निधितून रस्त्यावर विद्युत व्यवस्था करणे | ५०,०००/– | २६.११.०७ | मे. मारुरती मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. कल्याण, जि.ठाणे |
| ३ | प्रभाग क्र. ४७ मध्ये वर्ष ०७–०८ च्या नगरसेवक निधितून रस्त्यावर विद्युत व्यवस्था करणे. | १,००,०००/– | २६.११.०७ | मे. मारुरती मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. कल्याण, जि.ठाणे |

तरी सदरची माहिती स्थायी समिती अवलोकनार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १२९ दिनांक:– १७/१/२००८

सुचकाचे नाव :– श्री. राजेश वानखेडे

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती जयश्री सुर्वे

ही स्थायी समिती प्रस्तावनेत सुचविलेल्या विद्युत विभागांतर्गतचे ३ विविध कामाच्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १० :—** शहरातील अनाधिकृत बांधकामांवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवणे कामी व नागरीकांच्या दैनंदिन तक्रारी विहित कालावधीत निर्णयीत काढणे करीता कॉलसेंटर सेवा उभारणे कामी प्रशासनास मे. केअरटेल इन्फोटेक लि. मुंबई या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

---

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—काय आहे माहिती दया. कोण माहिती देणार? याबाबत किती खर्च येणार आहे?

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता, विद्युत):—जेव्हा आपण टीव्ही, फ्रीज असे सामान खरेदी करतो आणि त्यांच्या गुणवत्तेबाबत जेव्हा एखादी तक्रार निर्माण होते अशा वेळेस कॉल सेंटरच्या माध्यमातुन कंपनीकडे तक्रार नोंदविली जाते व तिची कंपनीकडुन सोडवणुक केली जाते. अनाधिकृत बांधकामासंदर्भातील तक्रारी स्विकारण्यासाठी आपल्या महापालिकेत कॉल सेन्टर सेवा सुरू करण्यासाठी जो खर्च येणार आहे तो सहा महिन्यासाठी साधारणत: सात लाख रुपयापर्यंत आहे. अनाधिकृत बांधकामासंदर्भात कुणाची काही तक्रार असेल तर ती कॉल सेंटरमध्ये आल्यानंतर ती संबंधीत विभागाकडे पाठविली जाईल आणि त्यानंतर तीचे निवारण केले जाईल. व्यवसायीक प्रशिक्षण दिलेले लोक कॉल सेंटरमध्ये असतील आणि तीन पाळयांमध्ये २४ तास सेवा पुरविली जाईल. पहिल्या पाळीमध्ये तीन कर्मचारी असतील, दुस—या पाळीमध्ये दोन व तिस—या पाळीमध्ये दोन असे कर्मचारी कार्यरत राहतील.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—आपणाकडे या अगोदर ज्या तक्रारी येत आहेत त्यांच्यावरच काही कार्यवाही होत नाही. ही सेवा चालु केल्यानंतर काय होईल?

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता, विद्युत):—प्रायोगिक तत्वावर_ सहा महिन्यासाठी आपण ही सेवा चालु करत आहोत.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:— लेखी तक्रार केल्यानंतर त्यावर काही कार्यवाही केली जात नाही तर कॉल सेंटर उघडुन त्याचा फायदा काय?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—उच्च न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिका क्र. १०५ च्या अनुषंगाने शहरातील अनाधिकृत बांधकामांवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिका कसे प्रयत्न करत आहे आणि शहरातील अनाधिकृत बांधकामे आता कशी नियंत्रणाखाली आहेत अशा प्रकारचे शासनास न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करावयाचे असल्याने त्यासाठी ही कॉलसेंटरची सुविधा चालु करत आहोत.सुरूवातीस सहा महिन्यासाठी प्रायोगिक तत्वावर ही सेवा चालु कराची आहे.

सदस्य श्री. गोविंदराम लुंड हे सभागृहातुन बाहेर गेले.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १० :—** शहरातील अनाधिकृत बांधकामांवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवणे कामी व नागरीकांच्या दैनंदिन तक्रारी विहित कालावधीत निर्णयीत काढणे करीता कॉलसेंटर सेवा उभारणे कामी प्रशासनास मे.

केअरटेल इन्फोटेक लि. मुंबई या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

प्रस्तावना

स्थानिक स्वराज्य संस्थेत नागरीकांच्या दैनंदिन जिवनाशी संबंधीत विविध सेवा पुरविण्यात येतात व तक्रारी यांचे निराकरण करण्यात येते. जनतेचा महापालिकेशी संवाद हा अधिक सुकर व्हावा यासाठी कॉल सेंटर द्वारे तक्रारी स्विकारणे व नागरीकांना आवश्यक माहिती उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. याद्वारे अनधिकृत बांधकामांच्या तक्रारीवर देखिल अधिक प्रभावीपणे व तात्काळ कार्यवाही करणे शक्य होईल. याकरीता कॉलसेंटर सेवा उपलब्ध करुन घेणेबाबत दिनांक ३०/१०/२००७ अन्वये निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आलेली होती. यानुसार एकुण तीन निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या. तथापि निविदाकारांच्या निविदेमधील लिफाफा क्र. १ मधील कागदपत्रांची Eligibility Criteria नुसार छाननी केली असता केवळ मे. केअरटेल इन्फोटेक लि. मुंबई–४०० ०५६ हे निविदाकार Eligibility Criteria पुर्ण करत असल्याचे निदर्शनास आले. केवळ एकच निविदाकार Qialify होत असल्यामुळे सर्व निविदाकारांचे लिफाफा क्र. २ हे उघडण्यात आलेले नाहीत. यानंतर दिनांक १५/११/२००७ रोजी दुस–यांदा फेरनिविदा मागविण्यात आल्या. मात्र सदर कामी फेरनिविदा मागवून देखिल केवळ एकच निविदा प्राप्त झाली.

केवळ एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे दिनांक १०/१२/२००७ रोजी तिस–यांदा फेरनिविदा मागविण्यात आल्या. तथापि, याकामी तिसरी फेरनिविदा मागवून देखिल केवळ एकच एजन्सी मे. केअरटेल इन्फोटेक लि. मुंबई–४०० ०५६ यांची निविदा प्राप्त झाली. सदर निविदा उघडण्यात आलेली असुन त्यांनी सादर केलेले दर हे खालीलप्रमाणे आहेत.

| **Time of the day** | **10AM-6PM** | **6PM-2AM** | **2AM-10AM** | **Cost(RS.)Per Day** |
|---|---|---|---|---|
| Seats Required | 3 Nos. | 2 Nos. | 2 Nos. | X = a*3+(b+c)*2 |
| Cost/Seat in Rs. | A= 534.00 | B= 454.00 | C=454.00 | 3418.00 |
| Service Tax | @ 12.36 % | | | |
| | Inbound & Outbound charges (telecom) would be charge on actual | | | |
| | E-Mails would be charge @Paisa 25 per mail | | | |

उपरोक्त मे. केअरटेल इन्फोटेक लि. मुंबई – ४०० ०५६ यांनी सादर केलेल्या दराच्या वाजवीपणाबाबत चौकशी केली असता सदर कंपनीनी Telecommunication Consultants Indial Ltd., New Delhi तसेच NOIDS New okhla Industrial Development Authority, Noida यांचेसाठी देवू केलेले दर मागविण्यात आले असून ते खालीलप्रमाणे आहेत.

तुलनात्मक तक्ता

| Shift | Time for umc | Ratesoffered for Umc | Time for TCI New Delhi/Noida | Rate for Telecommunication Consutants India Ltd., New Delhi (किसान कॉल सेंटर) | Rate for NOIDA New okhla Industrial Development Authority, Noida |
|---|---|---|---|---|---|
| Shift 1 | 10AM-6PM | 534-00 + 12-36% = 600-00 | 9-30AM-6PM | 525-00 + 12-36% = 591-00 | -- |
| Shift 2 | 6PM-2AM | 454-00 + 12-36% = 510-11 | 6PM-2AM | 494-13 + 12-36% = 555-20 | 650-00 + 12-36% = 730-34 |
| Shift 3 | 2AM-10AM | 454-00 + 12-36% = 510-11 | 2PM-10PM (No night Shift) | 414-83 + 12-36% = 466-11 | -- |

दराबाबत मे. केअरटेल इन्फोटेक लि. मुंबई यांचेशी वाटाघाटी केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे अंतिम दर प्राप्त झालेले आहेत.

| **Time of the day** | **10AM-6PM** | **6PM-2AM** | **2AM-10AM** | **Cost(RS.)Per Day** |
|---|---|---|---|---|
| Seats Required | 3 Nos. | 2 Nos. | 2 Nos. | X = a*3+(b+c)*2 |
| Cost/Seat in Rs. | A= 530.00 | B= 450.00 | C=450.00 | 3406.00 |
| Service Tax | @ 12.36 % | | | |
| | Inbound & Outbound charges (telecom) would be charge on actual | | | |
| | E-Mails would be charge @Paisa 20 per mail | | | |

सदरचा खर्च हा अंदाजपत्रकिय लेखाशिर्ष Part-1 A3 (xi) Computerization यामध्ये पुरेशी तरतुद असल्याकारणाने भागविता येईल. सबब अनधिकृत बांधकामांवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवणे कामी व नागरिकांच्या दैनंदिन तक्रारी विहित कालावधीत निकाली काढणे याकरीता प्रथमत: सहा महिन्याच्याकालावधीसाठी कॉलसेंटर सेवा उपलब्ध करुन घेणे तसेच सदर सेवा पुढील सहा महिन्याच्या कालावधीसाठी चालु ठेवणेकरीता मे. केअरटेल इन्फोटेक लि. मुंबई यांच्या दराला मान्यता देवून लागणा–या खर्चास मंजुरी व त्यांचेशी संविदा करणेबाबत मा. स्थायी समिती पटलावर मान्यतेसाठी सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १३० दिनांक:– १७/१/२००८

सुचकाचे नाव :– श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार शहरातील अनाधिकृत बांधकामांवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवणे कामी व नागरीकांच्या दैनंदिन तक्रारी विहित कालावधीत निर्णयीत काढणे करीता कॉलसेंटर सेवा उभारणे कामी प्रशासनास मे. केअरटेल इन्फोटेक लि. मुंबई या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ११** :– जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाअंतर्गत शहरात पाणी पुरवठा योजनेच्या कामाची अंदाजपत्रके (आराखडे) तयार करणे कामी प्रशासनास मे. युनिटी कंन्सटंन्ट प्रा.लि. पुणे या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

सदस्य श्री. गोविंदराम लुंड यांनी पुन: सभागृहात प्रवेश केला.

सभापती, श्री. राम पारवानी :–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ११** :– जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाअंतर्गत शहरात पाणी पुरवठा योजनेच्या कामाची अंदाजपत्रके (आराखडे) तयार करणे कामी प्रशासनास मे. युनिटी कंन्सटंन्ट प्रा.लि. पुणे या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील विविध नागरी सुविधांचा विकास आराखडा ( C. D. P.) तयार करण्यात आला असुन तो मुंबई महानगर विकास प्राधिकरणामार्फत शासनाकडे मंजुरी करीता सादर करण्यात आला आहे. या

आराखडयात शहरातील पाणी पुरवठा, मलनि:सारण, खेमाणी नाला वळविणे, वालधुनी नाला सुशोभिकरण करणे, घनकचरा निवारण, झोपडपटटी निर्मूलन, रस्ते बाधंणे, नाले बाधंणे इत्यादी कामांचा समावेश करण्यात आला आहे.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानअंतर्गत तयार करण्यात आल्याचे शहरी भागाचा विकास आराखडयात पाणी पुरवठा अंतर्गत खालील कामांचा समावेश करण्यात आला आहे.

१) स्वत:चा पाणी पुरवठयाचा स्त्रोत विकसीत करणे

मुख्य जलवाहिन्या टाकणे. व जलकुंभ बाधंणे — रु. १३३.२४ कोटी

२) शहरात वितरण व्यवस्था टाकणे — रु. २५.०० कोटी

३) मिटरींग पध्दतीचा पाणी पटटी वसुली साठी

अवलंब करणे. — रु. ३७.५० कोटी

---

एकुण रु. १९५.७४ कोटी

---

वरील प्रस्तावीत कामा पैकी महानगरपालिकेमार्फत शहरातील वितरण व्यवस्थेच्या कामाचे रु. २४.३९ कोटी रक्कमेचे अंदाजपत्रके व आराखडे मुंबई महानगर विकास प्राधिकरणामार्फत महाराष्ट्र शासनाकडे दिनांक ०२/०८/२००७ रोजी सादर करण्यात आले.

सदर महानगरपालिकेमार्फत तयार करण्यात आलेला ( D. P. R ) मे. किर्लोस्कर कंन्सटट यांनी सन. १९९५ मध्ये केलेल्या सर्वेक्षणावर व त्यांनी सुचविलेल्या संकल्पनावर आधारीत होता. परंतु त्या नंतरच्या गेल्या १० वर्षाच्या कालावधीत शहरातील लोकसंखेत वाढ झालेली असल्यामुळे पाणी पुरवठयाच्या कामा बरोबर वितरण व्यवस्थेच्या कामाचेही सुधारीत आराखडे ( Design )व अंदाजपत्रके ( D. P. R ) तयार करणे गरजेचे आहे.

त्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा या कामाचा ( D. P. R ) च्या निविदा मागविण्यात आल्या होत्या परंतु पाणी पुरवठयाच्या कामाच्या पहिल्या मागणीत दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे फेर निविदा मागविण्यात आल्या, दुस–यादा मागणीत एकही निविदा प्राप्त झालेली नसल्यामुळे पुन्हा तिस–यादा सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या.

तिस–यांदा मागवीण्यात आलेल्या निविदा पैकी पाणी पुरवठयाच्या कामाच्या दोन निविदा खालील निविदा धारकांकडुन प्राप्त झाल्या असुन

१) मे. युनिटी कंन्सल्टंट पुणे. २) मे. मोनार्च सर्व्हेयर कन्सल्टंट पुणे.

निवेदेनुसार लिफाफा क्र १ उघडण्यात आला लिफाफा क्र. १ अंतर्गत असलेल्या कागदपत्राची निविदेतील पृष्ट क्र. ४, ५ व पृष्ट २० वरील अटी नुसार छांननी करण्यात आली असुन त्यानुसार निविदा धारकांनी सादर केलेल्या कागदपत्रानुसार खालील प्रमाणे निविदा धारकांना गुण प्राप्त झाले.

अ) मे. युनिटी कंन्सल्टंट प्रा. लि. पुणे. — ८०.५० :

ब) मे. मोनार्च सर्व्हेयर कन्सल्टंट पुणे — ७९.०० :

सदर निविदेतील अटी व शर्ती नुसार, अभिकर्त्यास लिफाफा क्र. १ मधील कागद पत्रानुसार कमीत कमी ७५.०० % गुण मिळणे गरजेचे आहे. त्या अनुषंघाने दोन्ही निविदा धारक तांत्रिक प्रस्तावा मध्ये ( ज्मबीपबंस च्तवचवेंस ) मध्ये पात्र ठरले.

निविदा धारकांना त्यांच्या पात्रतेबाबत शहर अभियंता यांचे कार्यलयीन पत्र क्र. २१९३ व २१९१ दि. १०/१२/२००७ अन्वये कळविण्यात आले. सदर दोन्ही निविदा धारक तात्रिक प्रस्तावास पात्र ठरल्यामुळे त्यांना शहर अभियंता कार्यालयाचे पत्र क्र. २१९२ दि .१०/१२/२००७ नुसार दि. ११/१२/२००७ रोजी लिफाफा क्रमांक २ ( Finencid Bid ) उघडणेचे वळेस हजर राहण्याचे कळविण्यात आले. या अनुषंगाने दि. ११/१२/०७ रोजी सदर कामाच्या निविदा, निविदा समितीचे सदस्य, शहर अभियंता, मुख्य लेखा अधिकारी, मुख्यलेखा परिक्षक, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) व निविदा धारकांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत उघडण्यात आले. त्यामध्ये निविदा धारकांनी खालील प्रमाणे दर सादर करण्यात आले.

अ) मे. युनिटी कंन्सल्टंट प्रा. लि. पुणे. — रु. ८७,५०,०००/—

ब) मे. मोर्नार्च सर्व्हेयर कन्सल्टंट पुणे — रु. १,०७,७५,०००/—

निविदेतील लिफाफा क्रमांक २ मधील मुल्याकनाच्या अटी नुसार व दिलेल्या सुत्रानुसार निविदांचे मुल्याकन केले असता निविदा धारकांना खालील प्रमाणे गुण प्राप्त झाले.

अ) मे. युनिटी कंन्सल्टंट प्रा. लि. पुणे. – ८८.३० :

ब) मे. मोनार्च सर्व्हेयर कन्सल्टंट पुणे – ७०.८८ :

सदर निविदेतील अटी व शर्ती नुसार मे. युनिटी कंन्सल्टंट प्रा. लि. पुणे यांना जास्त गुण प्राप्त झालेले असल्यामुळे त्यांनी निविदा न्यनत्तम असल्याचे दिसुन आले. सदर निविदा धारकाच्या मे. युनिटी कंन्सटंन प्रा. लि. पुणे यांची निविदा जरी न्यनत्तम असली तरी त्यांनी सादर केलेला दर जास्त वाटत असल्यामुळे त्यांना दिनांक १७/१२/०७. रोजी चर्चेसाठी बोलविण्यात आले.

दिनांक १७/१२/०७ रोजी मा. आयुक्त सो. यांचे सोबत झालेल्या चर्चेत सदर कामाच्या निविदा जास्त दराच्या असल्यामुळे त्यांना पुन्हा वाटाघटी साठी बोलविण्याचे ठरले. त्या अनुषंगाने दि. ०३/०१/२००८ रोजी मे. युनिटी कंन्सटंन प्रा. लि. पुणे यांचे प्रतिनिधी वाटाघाटी साठी आले असता त्यांनी पाणी पुरवठयाच्या ( D. P. R ) चे काम त्यांचे पत्र क्र. यु.एल.पि.एल./ यु.एम.सी/सी ५/एल ५ दि. ०३/०१/२००८ अन्वये रु. ७८,६५,२००/– रक्कमेत करण्याची तयारी दर्शविली आहे.

सदर पाणी पुरवठा योजनेच्या कामाचे ( D. P. R ) तयार करणे गरजेचे असल्यामुळे व निविदा धारकाने, वाटाघटी अंती सादर केलेले दर रु. ७८,६५,२००/– वाजवी वाटत असल्यामुळे पाणी पुरवठयाच्या कामाच्या ( D. P. R ) बनविण्याचे निविदा मंजुरीसाठी मा. स्थायी समितीकडे मंजुरी करीता सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १३१ दिनांक:– १७/१/२००८

सुचकाचे नाव :– श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाअंतर्गत शहरात पाणी पुरवठा योजनेच्या कामाची अंदाजपत्रके आराखडे (DPR) तयार करणे कामी प्रशासनास मे. युनिटी कंन्सटंन्ट प्रा.लि. पुणे या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १२** :– सन २००७–०८ या आर्थिक वर्षात पाणी पुरवठा विभागातील कामाकरीता अर्थसंकल्पीय अंदाजात अनुदान वाढ करणे.

---

महापालिका सचिव :–कोणत्या लेखा शिर्षातुन किती रक्कम या कामांसाठी समायोजित करता येईल याबाबतचे विवरणपत्र देणे आवश्यक आहे.

सदस्य श्री. जीवन इदनानी:–काही दिवसापुर्वीच्या स्थायी समिती सभेमध्ये जलवाहिनी टाकण्याकामीच्या प्रस्तावावर चर्चा करत असतांना जलवाहिनी टाकण्यासाठी निविदा मागविली जावी असे म्हणण्यात आले होते. जिल्हा दरसुचीच्या दरानुसार जलवाहिनी टाकण्याचे काम कुणी घेत नाही. कारण की पाईपांचे दर मोठया प्रमाणावर वाढले आहेत त्यामुळे ठेकेदारास हे काम घेणे परवडत नाही. यासाठी जलवाहिनी टाकण्याकामी निविदा काढली जावी ती का काढली जात नाही त्यामध्ये काय अडचण आहे? स्थायी समितीमध्ये आम्ही प्रस्ताव पारीत केला

असतांना त्या कामासाठी निविदा तर मागविली पाहिजे ना? निविदा मंजुर झाल्यानंतरच त्यास कार्यआदेश दिला जातो. ठेकेदारास यामध्ये जर काही लाभ होणार नसेल तर कुणीही ठेकेदार जलवाहिनी टाकण्याचे काम घेण्यास पुढे येणार नाही. यासाठी प्रत्येक प्रभाग समिती निहाय वेगवेगळी निविदा काढली जावी.

सदस्य श्री. राजेश वानखेडे:—स्थायी समितीपुढे हा जो प्रस्ताव आला आहे तो अतिशय कमी रक्कमेचा असल्यामुळे तो पारीत केला जावा हा प्रस्ताव अतिशय कमी रक्कमेचा असल्यामुळे याबाबत निविदा मागविण्याची आवश्यकता काय आहे? मात्र यानंतर येणा—या प्रस्तावाबाबत निविदा मागविली जावी.

सदस्य श्री. राजु इदनानी:—या प्रस्तावाची रक्कम अतिशय कमी असल्यामुळे हा प्रस्ताव पारीत केला जावा. तसेच पाणी पुरवठा विभागातील सर्व कामांसाठी २५—५० लाख रुपये खर्च असलेल्या कामांची एकच निविदा मागविली जावी. नाहीतर २५—२५ लाख रुपये खर्चाच्या प्रभाग समिती निहाय ४ वेगवेगळया निविदा मागविल्या जाव्यात.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—पाणी पुरवठा विभागासाठी ''क'' अर्थसंकल्पामध्ये तरतुद केलेली सर्व रक्कम संपलेली आहे त्यामुळे या विभागा अंतर्गत करावयाच्या कामांसाठी ''अ'' अर्थसंकल्पामधुन निधी समायोजित करावा लागेल. यासाठी कोणत्या कामांना अग्रक्रम दयायचे हे आपणांस ठरवावे लागेल.

सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे:—माझ्या प्रभागात मागील १५ दिवसापासुन पाणी अतिशय कमी दाबाने येत आहे. फक्त तीस ते चाळीस मिनिटे पाणी येत आहे.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—सर्वत्र २० टक्के पाणी कपात करण्यात आलेली आहे. त्यामुळे पाणी पुरवठा कमी दाबाने होत आहे.

सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे:—माझ्या प्रभागात कमी दाबाने पाणी येत आहे याबाबत आमच्या जिल्हा प्रमुखांकडुन तुम्हांला फोन आला होता ना? मग तुम्ही काय उपाययोजना केलीत?

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—यांच्या आजुबाजुच्या प्रभागामध्ये दोन—तीन तास पाणी येते.

श्री. सेलवन(शाखा अभियंता, पाणी पुरवठा):—इतर विभागामध्ये दोन तास पाणी येते.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—२० टक्के पाणी कपात सर्वत्र झाली आहे. श्री. सेलवन, पाणी पुरवठा किती होत आहे ते सांगा. १०१ ते १०५ दशलक्ष लिटर पाणी येत आहे. पाणी पुरवठा विभागाचे जे कर्मचारी आहेत त्यांना पाठवुन सभोवतालच्या प्रभागामध्ये किती पाणी येत आहे याचा सर्व्हे करुन अहवाल सादर करण्यास सांगा. सध्या तर २० टक्के पाणी कपात केल्यानंतर ही स्थिती आहे. पुढे एप्रिल, मे महिन्यामध्ये यापेक्षाही जास्त पाणी कपात होऊ शकते त्यावेळची स्थिती काय असेल?

सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे:—जिजामाता उदयानाजवळील जलकुंभ भरण्यासाठी आपण आदेश दिले होते त्याचे काय झाले?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—श्री.सेलवन, याबाबतचा प्रस्ताव किती दिवसात सादर कराल? आज १७ तारीख आहे. ८ दिवसामध्ये किंवा पुढच्या सभेत हा विषय घ्या. हा प्रस्ताव ३० जानेवारीपर्यंत पाणी पुरवठा व जलनिसारण समितीपुढे आणुन त्यावर चर्चा करा.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—नळाला पाणी येत नसल्यामुळे प्रभागातील महिला नगरसेवकांच्या घरी येवुन शिव्या देवुन जातात.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—पाण्याबाबतीत त्यांनी फार हाल भोगले आहेत.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—आयुक्त साहेब, श्री. सेलवन साहेबांना याबाबतीत आदेश देवुन हा प्रश्न लवकरात लवकर सोडवा.

<u>सभापती, श्री. राम पारवानी :—</u>सार्वजनिक बांधकाम विभागातील कामांसाठी ज्या प्रकारे निधी समायोजित करण्यात आला आहे त्याप्रमाणे याकामांसाठी सुध्दा निधी समायोजित केला जावा.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>'क' अर्थसंकल्पीय तरतुद संपलेली आहे. 'अ' अर्थसंकल्पीय तरतुदीतील कुठल्या कामांना प्राधान्य दयायचे हे स्थायी समितीने ठरवावे त्याप्रमाणे तो निधी 'क' अर्थसंकल्पामध्ये समायोजित केला जाईल. मात्र याबाबतीत तुम्ही निर्णय घ्या.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:—</u>'अ' अर्थसंकल्पीय तरतुदीमधुन काही रक्कम आता समायोजित करुन देत असतील तर त्यासाठी या सभेचे कामकाज १५ मिनिटासाठी स्थगित करण्यास आम्ही तयार आहोत.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—</u>ही कामे आणली कोणी?

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>तुम्हीच आणली. तुम्हां नगरसेवकांचीच पत्रे आहेत. 'अ' अर्थसंकल्पामधुन कोणत्या लेखाशिर्षातुन किती निधी समायोजीत करायचा ते तुम्ही ठरवा.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे:—</u>उदयाने विकसित करण्यासाठी जो निधी ठेवलेला आहे तो निधी पाणी पुरवठयाच्या कामांसाठी 'क' अर्थसंकल्पामध्ये वळविला जावा.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—</u>पाणी पुरवठा करणे ही अत्यावश्यक बाब आहे. त्यासाठी काहीतरी उपाययोजना केली पाहिजे. उदयानांसाठी आपण ४०—४५ लाख रुपयांची जी तरतुद केली आहे तर मग पाणी पुरवठयासाठी का नाही करत?

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:—</u>उदयान विकसित करण्यास जो निधी वापरण्यात आला आहे तो उप—महापौर निधी आहे.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—</u> ३६ लाखाचा निधी त्या व्यतिरिक्त त्या कामासाठी दिलेला आहे. सिमेंट कॉंक्रिटचे चांगले रस्ते असतांना त्यावर पेवर ब्लॉक बसविण्यासाठी ४०—४४ लाख रुपये खर्च केले जातात व पाणी पुरवठयाच्या कामासाठी पैसे नाहीत. काय करणार?

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:—</u>पाणी पुरवठयासाठी अर्थसंकल्पीय अनुदान समायोजित करायचे असल्यास ते कसे करावे याबाबतीत लेखा विभागास विचारणा केली जावी.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>सीसी पॅसेज, गटारी अशी कमी दर्जाची कामे बंद करुन त्या तीन कोटीच्या निधीतुन एक कोटीची रक्कम पाणी पुरवठयासाठी समायोजित करुन घेता येईल.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—</u>पाणी पुरवठयासाठी अर्थसंकल्पामध्ये या वर्षी जी तरतुद करण्यात आली ती अतिशय कमी होती पुढील अर्थसंकल्पामध्ये या कामासाठी वाढीव रक्कमेची तरतुद केली पाहिजे.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>यावेळेस तरतुद वाढवुन घेवु परंतु आता कोणत्या कामांना प्राधान्य दयायचे ते आपण ठरवा. सीसी पॅसेज, गटारीयासाठी जी ३.५० कोटी रुपयांची तरतुद आहे. त्यातुन एक कोटी रुपये या कामासाठी समायोजित केले जातील.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>पाणी पुरवठयाकामी रक्कम समायोजित करण्यासाठी येत्या दोन दिवसामध्ये लेखा विभागाच्या अधिका—यांबरोबर एक बैठक घेवुन तसेच आयुक्तांशी चर्चा करुन, एक दिवसाची नोटिस देवुन स्थायी समितीची विशेष सभा बोलवा किंवा याबाबतीत जर आताच निर्णय घ्यायचा असेल तर आता निर्णय घ्या.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>पाणी पुरवठयाच्या कामांना प्राधान्य दया.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—</u>पाणी पुरवठयाच्या कामांना प्राधान्य दया ते अत्यावश्यक काम आहे.

**सभापती, श्री. राम पारवानी :—**सार्वजनिक बांधकाम विभागाचे ३.५० कोटी रुपये खर्चाची जी कामे मंजुर केली आहेत त्यातील एक कोटीचा निधी पाणी पुरवठयासाठी समायोजित केला जावा. सीसी पॅसेज, गटार यासाठी जो निधी आहे त्यातील काही निधी पाणी पुरवठयासाठी समायोजित केला जावा.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—**श्री. सेलवन, सार्वजनिक बांधकाम विभागासाठी तरतुद केलेल्या निधीतुन काही निधी पाणी पुरवठयासाठी समायोजित करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करा.

**महापालिका सचिव :—**याबाबतीत महासभेची मंजुरी घ्यावी लागेल.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. राम पारवानी :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १२ :—** सन २००७—०८ या आर्थिक वर्षात पाणी पुरवठा विभागातील कामाकरीता अर्थसंकल्पीय अंदाजात अनुदान वाढ करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत निवडणूक असल्याने चार महिन्याचे अर्थसंकल्प मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेले हाते. सदर अर्थसंकल्पात शहरातील कॅम्प न. १ ते ५ या भागात नविन जलवाहिन्या टाकण्याच्या कामा करीता रु. २३.०० लक्ष ची तरतुद करण्यात आली होती.

सदर रु. २३.०० लक्षच्या कामांना मंजुरी प्राप्त झालेली होती. काही महत्वाची कामे निधी अभावी मंजुरी करीता सादर करण्यात आली नव्हती. परंतु त्या नंतर सदरची कामे सन. २००७ —०८ च्या प्रस्तावीत अर्थसंकल्पाच्या तरतुदीस अधीन राहुन मंजुरीस पाठविण्यात आली होती. तत्कालीन मा. आयुक्त सो. यांनी सदर प्रस्तावास मंजुरी दिली होती. सन. २००७ —०८ च्या उर्वरित संपुर्ण वर्षा करीता पाणी पुरवठा विभागासाठी नविन जलवाहिनी टाकण्या करीता एकुन रु. ७५.०० लक्ष तरतुद करण्यात आली आहे. या पैकी सुमारे ५०.०० लक्ष मागील वर्षा मधील मंजुर झालेल्या कामा करीता तरतुद करण्यात आली आहे. ( liability ) आहे. म्हणजेच एकुण चालु वर्षा करीता नविन जलवाहिनी टाकण्या करीता एकुन २५.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच सन. २००७ —०८ च्या प्रस्तावीत अर्थसंकल्पाच्या मंजुर झालेल्या कामाचा समावेशही नविन अंदाज पत्रकात करण्यात आलेला नाही.

उल्हासनगर महानगपालिका क्षेत्रातील कॅम्प १ ते ५ या भागात नव्याने निरनिराळया ठिकाणी जलवाहिनी टाकणे आवश्यक आहे. तसेच संबधीत नगरसेवक यांची मागणी आहे. या अनुषंगानक उप अभियंता उत्तर/व दक्षिण विभाग यांनी निरनिराळया ठिकाणी जलवाहिन्या टाकण्याचे प्रस्ताव विभागाकडे सादर केलेले आहे. सदर सादर केलेल्या कामातील आवश्यक असलेल्या कामांची यादी तयार केली असुन सोबत जोडत आहे.

सद्यस्थितीत आवश्यक असलेली कॅम्प नं. १ ते ५ मधील एकुण कामे ५३ इतकी व रक्कम ११७.७७ लक्ष आहे. सदर या कामासाठी पाणी पुरवठा विभागांतर्गत निधी उपलब्ध नसल्यामुळे या कामासाठी महापालिकेच्या अ निधी शिर्ष मधुन उपलब्ध करुन मिळणेसाठी प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १३२ **दिनांक:—** १७/१/२००८

सुचकाचे नाव :— श्री. किशोर जग्यासी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुरेश जाधव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन २००७—०८ च्या अर्थसंकल्पीय अ मधील अन्य लेखा शिर्षातील अनुदानामधुन पाणी पुरवठा विभागातील कामाकरीता विविध लेखाशिर्षात रुपये १.१७ कोटी अनुदान वाढविणे प्रयोजनार्थ सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजात फेरफार करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १३** :— सन २००७—०८ च्या अर्थसंकल्पमधील अन्य लेखा शिर्षातील अनुदानामधुन सार्वजनिक खात्यातील विविध लेखाशिर्षात अनुदान वाढविणे प्रयोजनार्थ अर्थसंकल्पीय अंदाजात फेरफार करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १३** :—सन २००७—०८ च्या अर्थसंकल्पमधील अन्य लेखा शिर्षातील अनुदानामधुन सार्वजनिक खात्यातील विविध लेखाशिर्षात अनुदान वाढविणे प्रयोजनार्थ अर्थसंकल्पीय अंदाजात फेरफार करणे.

-

**प्रस्तावना**

सार्वजनिक बांधकाम विभागात विविध महापालिका सदस्यांचे मागणीनुसार नागरी सुविधांच्या कामांचे प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागातील सन २००७—०८ च्या अर्थसंकल्पातील तरतूदीनुसार तयार करण्यात आले आहेत. परंतू त्यानंतर आलेल्या कामांच्या प्रस्तावांकरीता अर्थसंकल्पिय तरतूद उपलब्ध नसल्यामुळे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातील अन्य शिल्लकीतील लेखाशिर्षातील तरतूदीचे फेरफार करुन तयार करण्यात आले आहेत. अशा प्रस्तावित व मंजूर कामांची लेखाशिर्षनिहाय व यादीप्रमाणे कोणत्या लेखाशिर्षात वाढ व घट झालेली याचा तक्ताही सोबत जोडला आहे. त्यानुसार अपेक्षित लेखाशिर्षानिहाय तरतूदीतील वाढीकरीता रु. ३१७.१४ लक्ष इतकी वाढीकरीता सार्वजनिक बांधकाम खात्यांतर्गत लेखाशिर्षातील तरतूदीमधून करणे शक्य नाही. ही तरतूद महानगरपालिकेच्या अन्य लेखाशिर्षातील तरतूदीमधून सार्वजनिक बांधकाम खात्यातील विविध लेखाशिर्षात होणेकरीता स्थायी समितीकडून शिफारस प्राप्त होवून महासभेची मान्यता मिळणेकरीता प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १३३ दिनांकः— १७/१/२००८

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन २००७—०८ च्या अर्थसंकल्पामधील अन्य लेखा शिर्षातील अनुदानामधुन सार्वजनिक खात्यातील विविध लेखाशिर्षात रुपये २.०० कोटी अनुदान वाढविणे प्रयोजनार्थ सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजात फेरफार करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १४ :—** उल्हासनगर—१ येथिल चार्ली वेफर्स ते सेंच्युरी रेयॉन मटेरीयल गेट पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे कामी मेसर्स जयभारत कन्स्ट्रक्शन यांचेशी संविदेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १४ :—** उल्हासनगर—१ येथिल चार्ली वेफर्स ते सेंच्युरी रेयॉन मटेरीयल गेट पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे कामी मेसर्स जयभारत कन्स्ट्रक्शन यांचेशी संविदेस मान्यता देणे.

प्रस्तावना

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नांव | उल्हासनगर—१ येथिल चार्ली वेफर्स ते सेंच्युरी रेयॉन मटेरीयल गेट पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे |
| २ | प्राकलनाची किंमत | २८,२८,९००/— |
| ३ | तांत्रिक मंजुरी देणा—या अधिका—याचे पदनाम | शहर अभियंता |
| ४ | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांकः | क्र. ७२८ दि. ३१/३/२००३ |
| ५ | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | क्र. १७ दिनांक १२/५/२००३ |
| ६ | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. २ दिनांक २५/५/२००७ |
| ८ | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | ३ |
| ९ | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |

| | | |
|---|---|---|
| १० | निविदा उघडल्याचा दिनांक | दिनांक १९/०६/२००७ |
| ११ | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता | |
| अनु | निविदाधारकाचे नांव | |
| १ | मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन | ५२.५२ टक्के जास्त |
| २ | मे. आर.के.चंदनानी | ५७.७७ टक्के जास्त |
| ३ | मे. शैलेश कन्स्ट्रक्शन | ६०.९५ टक्के जास्त |
| १२ | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | दि. १६/०७/०७ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. शहर अभियंता यांचेकडे मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन यांना वाटाघाटीकरिता बोलविण्यात आले होते. मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन यांनी त्यांचे पुर्वीचे ५२.५२ टक्के जास्त दरामध्ये ७.५० टक्के सवलत दिल्यानंतर (Rebet) आता वाटाघाटीनंतर सदर निविदेच्या अंतिम दर प्राकलनीय दरापेक्षा ४२.०२ टक्के जास्त होत आहे. व हा दर चालू दरसूचीवरील (२००६–०७) प्राकलनिय किंमती १.६८ टक्क्ने जास्त होत आहे. |
| १७ | लेखा शिर्षाचे नांव | सी–४(iii) पी–२ रस्तें प्रवास व पुल इत्यादी सुधारणे व नवीन बांधणे. |

उक्त नमूद केल्याप्रमाणे मे जयभारत कंन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटी अंती प्राकलनिय दरापेक्षा ४२.०२ टक्केने जास्त असलेली निविदा वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सदर कामाच्या रुपये २८,२८,९००/– एवढया प्राकलनीय किंमतीच्या ४५.०२ जास्त दरामुळे होणारा अतिरिक्त खर्च रु. १४.०० लक्ष एवढया खर्चाची तरतूद उपरोक्त नमुद लेखाशिर्षांतर्गत शिल्लक नसल्याने मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी टी–५ वर पुनर्विनियोजन (Reappropriation) चा प्रस्ताव ठेवणेबाबत सुचविले आहे. व त्यास मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिली आहे.

सबब, निविदाधारक मे जयभारत कंन्स्ट्रक्शन यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी व सदर कामासाठी होणा–या अतिरिक्त खर्चास लेखाशिर्षात तरतूद शिल्लक नसल्याने अशी तरतूद उपलब्ध होणेसाठी लेखाशिर्षांतर्गत फेरफार (Reappropriation) करणेसाठी मान्यता मिळणेस स्थायी समितीच्या पटलावर प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकरीता तसेच निविदेस मंजूरी मिळणेकरीता प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** १३४ दिनांक:– १७/१/२००८

सुचकाचे नाव :– श्री. दिलीप गायकवाड

अनुमोदकाचे नाव :– श्री. किशोर जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर–१ येथिल चार्ली वेफर्स ते सेंच्युरी रेयॉन मटेरीयल गेट पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे कामी मेसर्स जयभारत कन्स्ट्रक्शन या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १५ :—** श्री. दत्तु हरी मोरे या अपंग व्यक्तीस उल्हासनगर—२ येथिल म.
न.पा. शाळा क्र. २४ जवळील विदयुत पोल शेजारील
महापालिकेच्या जागेवर एस.टी.डी./पी.सी.ओ. बुथ
चालविण्याकामी जागा वापर परवाना देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. १५ :—** श्री. दत्तु हरी मोरे या अपंग व्यक्तीस उल्हासनगर—२ येथिल म.
न.पा. शाळा क्र. २४ जवळील विदयुत पोल शेजारील
महापालिकेच्या जागेवर एस.टी.डी./पी.सी.ओ. बुथ
चालविण्याकामी जागा वापर परवाना देणे.

प्रस्तावना

एस.टी.डी./पी.सी.ओ. बुथ करीता श्री. दत्तु हरी मोरे राहणार आंबेडकर नगर, सेक्शन, उल्हासनगर—२ यांनी उल्हासनगर महानगरपालिका शाळा क्र. २४ येथिल विद्युत पोलच्या जवळ, उल्हासनगर—२ या ठिकाणी मागणी केलेली आहे. सदर प्रकरण मालमत्ता विभागाकडे प्रलंबित ६८ अर्जांपैकी एक आहे.

महानगरपालिका महासभा ठराव क्र. १६, दिनांक २०/५/२००७ अन्वये अपंग व्यक्तींना एस.टी.डी./पी. सी. ओ. बुथ चालविणे प्रयोजनार्थ जागा उपलब्ध करुन देणेकामी भाडेपट्टयाची रक्कम, जागा निश्चितीचे निकष, भाडे पट्टयाचा कालावधी, अर्जदाराचे पात्रतेचे निकष जागा वितरणांची कार्यपध्दती व जागा वापरासंबंधीच्या अटी व शर्तीस मान्यता देण्यात आलेली आहे.

वरील ठरावाच्या अनुषंगाने श्री. दत्तु हरी मोरे यांनी मागणी केलेप्रमाणे एस.टी.डी./पी.सी.ओ. बुथकरीता उल्हासनगर महानगरपालिका शाळा क्र. २४ येथिल विद्युत पोलच्या जवळ, उल्हासनगर—२ या ठिकाणी अनामत रक्कम रुपये १८००/— तसेच प्रतिमाह रक्कम रुपये १५०/— याप्रमाणे आगाऊ महिन्याचे भाडे असे एकत्रित २२५०/— चा भरणा करुन घेवुन मान्यता देणेबाबत मंजुरी मिळणेसाठी मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १३५ — दिनांक:— १७/१/२००८

सुचकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार श्री. दत्तु हरी मोरे या अपंग व्यक्तीस उल्हासनगर—२ येथिल म.न.पा. शाळा क्र. २४ जवळील विदयुत पोल शेजारील महापालिकेच्या जागेवर एस.टी.डी./पी.सी.ओ. बुथ चालविण्याकामी जागा वापर परवाना देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १६ :–** श्री. किशोर दिलीप सातपुते या अपंग व्यक्तीस उल्हासनगर–२ येथिल मेन रोड, बालकनजी बारी, खेमानी रोड येथिल महापालिकेच्या जागेवर एस.टी.डी./पी.सी.ओ. बुथ चालविणेकामी जागा वापर परवाना देणे.

---

सदस्य श्री. जीवन इदनानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. राम पारवानी :–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १६ :–** श्री. किशोर दिलीप सातपुते या अपंग व्यक्तीस उल्हासनगर–२ येथिल मेन रोड, बालकनजी बारी, खेमानी रोड येथिल महापालिकेच्या जागेवर एस.टी.डी./पी.सी.ओ. बुथ चालविणेकामी जागा वापर परवाना देणे.

**प्रस्तावना**

एस.टी.डी./पी.सी.ओ. बुथ करीता श्री. किशोर दिलीप सातपुते राहणार बालकनजी बारी, खेमानी रोड, महात्मा गांधी नगर, उल्हासनगर–२ यांनी बालकनजी बारी, खेमानी रोड मधील मेन रोड समोरील मोकळी जागा (फुटपाथ) या ठिकाणी मागणी केलेली आहे.

महानगरपालिका महासभा ठराव क्र. १६, दिनांक २०/५/२००७ अन्वये अपंग व्यक्तींना एस. टी.डी./पी.सी. ओ. बुथ चालविणे प्रयोजनार्थ जागा उपलब्ध करुन देणेकामी भाडेपट्टयाची रक्कम, जागा निश्चितीचे निकष, भाडे पट्टयाचा कालावधी, अर्जदाराचे पात्रतेचे निकष जागा वितरणांची कार्यपध्दती व जागा वापरासंबंधीच्या अटी व शर्तीस मान्यता देण्यात आलेली आहे.

वरील ठरावाच्या अनुषंगाने श्री. किशोर दिलीप सातपुते यांनी मागणी केलेप्रमाणे एस.टी.डी./पी. सी.ओ. बुथकरीता बालकनजी बारी, खेमानी रोड मधील मेन रोड समोरील मोकळी जागा (फुटपाथ) या ठिकाणी अनामत रक्कम रुपये १८००/– तसेच प्रतिमाह रक्कम रुपये १५०/– याप्रमाणे आगाऊ महिन्याचे भाडे असे एकत्रित २२५०/– चा भरणा करुन घेवुन मान्यता देणेबाबत मंजुरी मिळणेसाठी मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १३६ **दिनांक:–** १७/१/२००८

सुचकाचे नाव :– श्री. गोविंदराम लुंड

अनुमोदकाचे नाव :– श्री. जीवन इदनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार श्री. किशोर दिलीप सातपुते या अपंग व्यक्तीस उल्हासनगर–२ येथिल मेन रोड, बालकनजी बारी, खेमानी रोड येथिल महापालिकेच्या जागेवर एस.टी.डी./पी.सी. ओ. बुथ चालविणेकामी जागा वापर परवाना देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. १७ :– आरोग्य विभागासाठी लागणारी किटकनाशके, जंतुनाशके, अळीनाशके, डासनाशके पुरविण्याकामी बाबनिहाय लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. राम पारवानी :–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

विषय क्र. १७ :– आरोग्य विभागासाठी लागणारी किटकनाशके, जंतुनाशके, अळीनाशके, डासनाशके पुरविण्याकामी बाबनिहाय लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

सार्वजनिक आरोग्य विभागास उल्हासनगर शहराच्या स्वच्छता, साफसफाईचे कामासाठी व नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने किटकनाशक/जंतुनाशक/ अळीनाशक/डासनाशक औषधे दरवर्षी खरेदी करणे आवश्यक असते त्यानुसार मा. स्थायी समिती ठराव क्र. ५२ दि. ७/९/०७ अन्वये वित्तीय मान्यता घेऊन सदर औषधे खरेदीची निविदा सुचना १) दै. वार्ताहार, २) दै. उल्हास विकास या दैनिक वृत्तपत्रात दि. १३/९/२००७ रोजी प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या होत्या.

त्यानुसार प्राप्त संबंधीत न्युनतम दराच्या निविदाकारांशी वाटाघाटी अंती सादर केलेल्या किटकनाशक / जंतुनाशक/अळीनाशक/डासनाशक औषध दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | किटकनाशक/ जंतुनाशक, अळीनाशक, डासनाशक औषधाचे नाव | आवश्यक परिमाण | निविदा सादर करणा–याचे निविदाधारकाचे नाव व त्यांचे प्राप्त दर | | | वाटाघाटी अंती सादर केलेल दर | पुन्हा वाटाघाटी केल्यानंतरचे प्राप्त दर | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे. रमेश ॲग्रो–केम कार्पोरेशन | मे. रविराज केमिकल | मे. सुमति इंटरप्राईझेस | | | |
| १ | काळे फिनाईल ग्रेड–१ (२५ लि. प्लास्टीक कॅनमध्ये) आय एस आय मार्क. | ५००० लिटर | ७९ | ४८ | ४५ | ४३ | ४२ | २,१०,००० |
| २ | रॅट कॉन, आय.एस.आय प्रमाणित | ३०००पॅकेट (१००ग्रॅ.) | ३९.९० | ४५ | ४७ | ३९ | ३८ | १,१४,००० |
| ३ | सोलफॅक ०५० ई.डब्ल्यु, डासनाशक, मे. बायर क्रॉप सायन्स लि. | १०० लिटर | १९३० | २३०० | २३५० | १९०० | १८९६ | १,८९,६०० |
| ४ | हार्बोसोल पावडर, दुर्गंधीनाशक, | ३००० किलो | ११० | १०६ | १०५ | ९९.५ | ९७ | २,११,००० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ब्लीचींग पावडर ३३: क्लोरीन आय.एस.आय प्रमाणित | ८००० किलो | २५ | २४ | २६ | २३.७५ | २३.५० | १,८८,००० |
| ६ | सफाया मोनोक्लोरोफिनोल पावडर, इन्डीकेम कंपनी,जंतुनाशक, दुर्गंधीनाशक | ३००० किलो | ४१ | ४५ | ४६ | ४०.५० | ४० | १,२०,००० |
| ७ | हायजीन, डॅब मॅन्युफॅक्चरर, दुर्गंधीनाशक, शौचालयांसाठी | २००० लिटर | १६७ | १६२ | १६५ | १५३ | १४६ | २,९२,००० |
| ८ | हायटेक, डॅब मॅन्युफॅक्चरर, शौचालयांसाठी | २००० लिटर | १२१ | ११५ | १०८ | ९८ | ९५ | १,९०,००० |
| ९ | विनाश ५०:५० जंतुनाशक | १००० लिटर | १५८ | १३७ | १४५ | ९९ | ९८ | ९८,००० |
| १० | डॅपनिका ५०—५०, अळीनाशक (हर्बल), हाफकीन इन्स्टीटयुट मान्यताप्राप्त. | १००० लिटर | ९६८ | ८५० | ९५५ | ७१४ | ६९८ | ६,९८,००० |
| ११ | निमटेक्स हर्बल, लार्व्हीसाईड, नॅशनल पेस्टीसाईड अॅन्ड केमिकल्स, हाफकीन इन्स्टीटयुट मान्यताप्राप्त. | १००० लिटर | ६४८ | ७०० | ७२५ | ६४५ | ६४५ | ६,४५,००० |
| १२ | फ्लायटेक्स (माशांसाठी),नॅशनल पेस्टटीसाईड अॅन्ड केमिकल्स, | १००० लिटर | ५२९ | ६०० | ६२५ | ५२५ | ४९८.५० | ४,९८,५०० |
| १३ | ऑलीनेक्स, डिओड्रंड | २००० लिटर | १७२ | १६५ | १६२ | १५३ | १४० | २,८०,००० |
| १४ | ओझोन डिलक्स वडया, कार्यालयांसाठी दुर्गंधीनाशक/सुगंधीत | ३०० पॅकेट ७५ग्रॅ. | ३९ | ४५ | ४६ | ३८ | ३५.५० | १०,६५० |
| | | | | | | | | ३८,२४,७५० |

वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे सन २००६—०७ साली प्राप्त झालेल्या दरानुसार तुलनात्मकदृष्टया योग्य वाटतात. तसेच बाजारात चौकशी केली असता प्राप्त दर योग्य आहेत. उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार अ.क्र. २,३,६,११,१२,१४ या करीता रमेश अॅग्राकेम, भिवंडी यांनी सर्वात कमी दर सादर केले आहेत. तसेच अ.क्र. ५,७,९,१० या करीता मे. रविराज केमीकल, डोंबिवली यांनी सर्वात कमी दर सादर केले आहेत, तर अ.क्र. १,४,८,१३ याकरीता मे. सुमति इंटरप्राईझेस, मुंबई यांनी सर्वात न्युनतम दर सादर केलेले आहेत. तरी वरील नमुद जंतूनाशके खरेदीकरीता रू ३८,२४,७५०/— (अडोतिस लाख चोविस हजार सातशे पन्नास मात्र.) खर्च होणार आहे.

तरी वरील नमुद किटकनाशक/जंतुनाशक/ अळीनाशक/डासनाशक खरेदीकरीता होणा—या रू ३८,२४,७५०/— (अडोतीस लाख चोविस हजार सातशे पन्नास मात्र.) खर्चास मा. स्थायी समितीची वित्तीय व प्रशासकीय मान्यता मिळणे, तसेच सदर न्युनतम दर सादर करणा—या निविदाकारांचे दर स्विकृत होऊन त्यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता देण्याची शिफारस आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १३७ दिनांकः– १७/१/२००८

सुचकाचे नाव :– श्रीमती निलम रावत

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती सुजाता रिजवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे आरोग्य विभागासाठी लागणारी किटकनाशके, जंतुनाशके, अळीनाशके, डासनाशके पुरविण्याकामी बाबनिहाय लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सदस्य श्री. जीवन इदनानी यांनी पुनः सभागृहात प्रवेश केला.

महापालिका सचिव :– प्रशासनाकडुन आयत्या वेळचे एक विषय आलेला आहे आपणातील बहुसंख्य सदस्यांची संमती असेल तर तो आजच्या सभेच्या कामकाजात सामावून घ्यावा.

सभापती, श्री. राम पारवानीः– आयत्या वेळचा विषय सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समावून घेण्यात येत आहे.

महापालिका सचिव :–विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १८** :– अर्थसंकल्पीय अनुदानात विनिर्दीष्ट केलेल्या एका लेखा शिर्षातुन दुस–या लेखा शिर्षात अनुदान समायोजनेस अधिन राहुन लालचक्की चौक, उल्हासनगर–४ येथिल ३०० मी.मी. व्यासाच्या जलवाहिनीवरुन लाल चक्की चौक ते श्याम अपार्टमेंट पर्यंत १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याकामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. राम पारवानी :–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १८** :— अर्थसंकल्पीय अनुदानात विनिर्दीष्ट केलेल्या एका लेखा शिर्षातुन दुस—या लेखा शिर्षात अनुदान समायोजनेस अधिन राहुन लालचक्की चौक, उल्हासनगर—४ येथिल ३०० मी.मी. व्यासाच्या जलवाहिनीवरुन लाल चक्की चौक ते श्याम अपार्टमेंट पर्यंत १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याकामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर पाणी पुरवठा योजना देखभाल व दुरुस्ती उल्हासनगर कॅम्प नं. ४ लाल चक्की चौक येथिल ३५० मि.मि. व्यासाच्या जलवाहिनी वरुन लाल चक्की चौक ते श्याम अपार्टमेंट समोर पर्यंत १०० मि.मि. व्यासाची जलवाहिनी टाकणे कामाकरीता रुपये १,९७,८९६/— अंदाजपत्रकाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे.

उल्हासनगर कॅम्प नं. ४ भागातील लालचक्की चौक ते स्टेशन रोडच्या भागात अस्तीत्वातील सीआय जलवाहिनीमधुन पाणी पुरवठा करण्यात येतो. सदरची जलवाहिनी सुमारे ५ ते ६ फुट खोलवर कॉंक्रिट रोडच्या खाली आहे या जलवाहिनी ठिकाणी खोद काम करुन नळ जोडण्याची तपासण्णी करण्यात आली. नंतर जोडण्याचे नुतनीकरण करण्यात आले तथापी अदयाप घाण पाण्याची तक्रार पुर्णपणे बंद झालेली नाही सदरची जलवाहिनी खोलवर व कॉंक्रिट रोडच्या खाली असल्यामुळे जलवाहिनी व गळत्या शोधता येत नाही. सदर जलवाहिनी वरील गळत्या व घाण पाण्याच्या तक्रारी मुळे लाल चक्की चौक ते स्टेशन रोडच्या भागात कमी दाबाबने पाणी पुरवठा होतो. सदर कामाची प्राकलनीय किंमत रुपये १,९७,८९६/— एवढी होत आहे हे काम पाणी पुरवठा शिर्षकात निधी शिल्लक नाही. त्यामुळे सदरची रक्कम इतर निधी मधुन वळविण्यासाठी खालीलप्रमाणे तरतुद करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | पाणी पुरवठा भाग २ (बी) (१) मध्ये एकुण तरतुदी<br>(पाणी पुरवठा साहित्य व पावर पंप खरेदी व बसविणे) | रु. ७५,००,०००/— |
| २) | या कामाकरीता शिल्लक असलेली तरतुद | रु. १४,३६३/— |
| ३) | या कामाकरीता पंपींग मशिनरी निगा व दुरुस्ती भाग १ (सी) (बी) १२ या लेखा शिर्षातील रुपये एकुण ११०५००० पैकी एकुण शिल्लक असलेली तरतुद | रु. ७,६३,१८३/— |
| ४) | लेखा शिर्षा भाग १ (सी) (बी) १२ मधुन लेखा शिर्ष भाग २ बी १ पाणी पुरवठामध्ये वळवायची तरतुद रुपये | रु. १,९७,८९६/— |
| ५) | लेखा शिर्षा भाग (२) बी (१) मध्ये उपलब्ध होणारी तरतुद | रु. २,१२,५३२/— |
| | या कामानंतर शिल्लक राहणारी तरतुद | रु. १४,६३६/— |

तरी सदर प्रस्ताव खास बाब म्हणुन मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १३८ दिनांक:— १७/१/२००८

सुचकाचे नाव :— श्री. सुरेश जाधव

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे अर्थसंकल्पीय अनुदानात विनिर्दीष्ट केलेल्या एका लेखा शिर्षातुन दुस—या लेखा शिर्षात अनुदान समायोजनेस अधिन राहुन लालचक्की चौक, उल्हासनगर—४ येथिल ३०० मी.मी. व्यासाच्या जलवाहिनीवरुन लाल चक्की चौक ते श्याम अपार्टमेंट पर्यंत १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याकामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्या श्रीमती लता निकमः-**आयुक्त साहेब, मी एक पत्र देते हे काम फक्त एक दिड लाखाचे आहे. पास करुन दया. शौचालयाचे छप्पर पडायला आले आहे. त्यास बाबुंचा आधार लावुन नागरीक त्या शौचालयाचा वापर करत आहेत. ते छप्पर पडले तर एखादा व्यक्ती मृत्युमुखी पडेल. त्यासाठी पुढच्या सभेत हा विषय आला पाहिजे.

सायंकाळी ५.१५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. राम पारवानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— ८/२/२००८

दि. ८/२/२००८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

१२

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक ८/२/२००८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री पारवानी राम (चार्ली) फुंदुमल | सभापती |
| २ | श्री लुंड गोविंदराम डोलुमल | सदस्य |
| ३ | श्री जाधव सुरेश मधुकर | ——''—— |
| ४ | श्री ठाकुर नरेंद्र (कुमारी) केवलराम | ——''—— |
| ५ | श्री गायकवाड दिलीप दशरथ | ——''—— |
| ६ | श्रीमती रिजवानी सुजाता रमेश | ——''—— |
| ७ | श्रीमती उदासी इंदिरा जमनादास | ——''—— |
| ८ | श्रीमती रावत निलम प्रेमसिंग | ——''—— |
| ९ | श्री दवणे नरेंद्र (रवीभाऊ) | ——''—— |
| १० | श्री वानखेडे राजेश देवेंद्र | ——''—— |
| ११ | श्री सुपाळे विजय खंडु | ——''—— |
| १२ | श्रीमती निकम लता शांताराम | ——''—— |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री इदनानी जीवन (राजु) चंद्रभान, २. श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल, ३. श्री बठिजा संजय रामचंद्र, ४. श्री जग्यासी किशोर

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१४. श्री. समीर उन्हाळे, आयुक्त
१५. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
१६. श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त
१७. श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
१८. श्री. मिलींद सावंत, उप—आयुक्त
१९. श्री. हरेश इदनानी, उप—मुख्य लेखा अधिकारी
२०. श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
२१. श्री. बी. सुंदरेश्वरन, शहर अभियंता, सार्व.बांध. विभाग
२२. श्री. बबीश गंगारामानी उप अभियंता, विदयुत
२३. श्री. एस.टी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
२४. श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव

सायंकाळी ४.३० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————
—

⇨ **विषय क्र. १ :—** करांचे दर प्रस्तावित करणे व सन २००८—०९ साठी अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे.

———————————————————————————————————————————

**यावेळी आयुक्तांनी सन २००७—२००८ चा सुधारीत अर्थसंकल्प व सन २००८—२००९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजासाठी उत्पन्न व खर्चाचे अंदाज व करांचे दराबाबतचा प्रस्ताव स्थायी समिती सभापती यांना सादर केला.**

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>सन्मानिय स्थायी समिती सभापती, श्री .राम पारवानीजी, सर्व सन्मानिय सदस्य व सहकारी मित्रानो उल्हासनगर महानगरपालिकेचा सन २००७—२००८ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २००८—२००९ साठी उत्पन्न व खर्चाचे अंदाज आपल्या समोर मांडण्याची मला दुस—यांदा संधी प्राप्त झाली आहे. उल्हासनगर महानगरपालिकेचा कार्यभार स्विकारल्यानंतर शहरातील मुलभूत सेवांची समस्या , कर्मचा—यांच्या समस्या त्याच प्रमाणे महापालिकेच्या वित्तीय परिस्थितीचा आढावा घेवून तीन्ही समस्यांबाबत आपण सर्व मान्यवर व सहकारी अधिका—यांशी चर्चा करुन त्यांचे निवारण करणेबाबत नियोजन केल , त्यामध्ये प्रथम ब—याच वर्षापासून खालावलेल्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा करणे व उत्पन्नाच्या स्त्रोतामध्ये वाढ करणेसाठी प्रस्ताव आपल्या समोर सादर केले, त्यापैकी काही प्रस्तावांना आपल्याकडून मंजूरी मिळाली, त्याबद्दल धन्यवाद. वाढलेल्या उत्पन्नाचा परिणाम या वर्षापासून हळुहळू आपल्या निदर्शनास येईल. सदर उतपन्न लक्षात घेवून ज्या कामांची वर्ष २००७—२००८ मध्ये सुरुवात करणेत आली आहे त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे

१) महापालिका कामकाजात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी खाजगी सहभागातून नागरी सुविधा केंद्र , तक्रार नोंदीसाठी कॉल सेंटर व .महापालिकेच्या देयकाचा भरणा करणे सोयीचे व्हावे यासाठी शहरातील प्रमुख ठिकाणी आधुनिक संगणक यंत्रणेची स्थापना करण्यात येत आहे .

२) प्रशासकीय गुणवत्ता केंद्राची स्थापना :— मालमत्ता विभागातील संगणकीकरण पुर्ण करण्यात आले. महापालिका कर्मचा—यांना स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत अपेक्षित मुलभूत सेवांसंबंधी क्षेत्रात प्रशिक्षण देण्याची सुरुवात करण्यात आली ,जेणेकरुन नागरिकांना उच्च दर्जाची सेवा प्राप्त होइल. आजपर्यंत २८ बाबींवर ५०० पेक्षा जास्त कर्मचा—यांना प्रशिक्षण देण्यात आले ,शिवाय कर्मचा—यांना प्रोत्साहीत करणेसाठी त्यांच्या विविध भत्यांसंबंधी प्रलंबीत असलेल्या मागण्या मंजूर करण्यात आल्या आहेत.

३) शहराच्या सौदर्यीकरणात वाढ होणेसाठी तसेच महिला, मुले व वयस्क व्यक्ती यांच्या मनोरंजन व स्वास्थ्यासाठी वर्ष २००७—२००८ च्या अंदाजपत्रकात करण्यात आलेली २ कोटी रुपयांची तरतूद पुर्णपणे वापर करुन काही उदयानाचे सुशोभिकरण करणेचे बीज पेरले आहे व सदरचे बीज अनेक वृक्षांच्या स्वरुपात आपल्या कार्यकालात दिसून येईल .कॅम्प नं. ४ मधील लाललोई व जिजामाता उदयान या दोन उदयानाचे सुशोभिकरण करणेची सुरुवात करण्यात आलेली आहे.

४) उल्हासनगर शहरातील वाहतूक सुरळीत होणेसाठी पावसाळयापुर्वी सर्व रस्त्यांचे डागडुंजीकरण करण्यात आले . काही रस्त्यांचे सिमेंट कॉक्रीटीकरण व काही रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहे . सिरु चौक ते सोनी ड्रेसेस पर्यंतचा रस्ता हा पेवर ब्लॉक या आधुनिक पध्दतीने करणे आणि इएसआयएस हॉस्पिटल ते हनुमान मंदिर पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण या दोन्ही कामांचा शुभारंभ आपल्या हस्ते काही दिवसापुर्वी करण्यात आला आहे. वाहतूक व्यवस्थेसाठी मुख्य रस्त्यांवर वाहतूक नियंत्रणासाठी झेब्रापेंटीग करण्यात आली आहे तसेच वाहतूकीस अडथळा होवू नये म्हणून कृष्णमंडळ समोरील रस्त्यांवर भाजी विक्रेत्यांसाठी भाजी मार्केटचे नुतनीकरण करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे.

५) वर्ष २००७—२००८ चे मुख्य वैशिष्टे हे की लागोपाठ तीस—या वर्षी महाराष्ट्र उर्जा विकास प्राधिकरण **(MEDA)** मार्फत उर्जा विकास व व्यवस्थापन या विषयावरील स्पर्धेत पारितोषिक प्राप्त झाले आहे , याचे श्रेय विदयूत विभागाच्या अथक परिश्रमास जाते . डॉल्फीन क्लब ते साईबाबा मंदिर शांतीनगर पर्यंतच्या नविन रस्त्यावर विद्यूत रोषनाईचे काम पुर्ण करणत आले आहे.

६)  उल्हासनगर शहर वासियांसाठी रास्त दरात परिवहन सुरु करणेसाठी निविदा मागवून त्यावर पुढील कार्यवाही होणेसाठी शासनाकडून मंजूरी मिळण्याची विनंती करणेत आली आहे , परंतु डडत क्षेत्रात एकच परिवहन उपक्रम राबविण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्यामूळे उल्हासनगर महानगरपालिकेचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबीत आहे

७)  सार्वजनिक बांधकाम विभागामधून महापालिका निधीतून एकूण ४४२ विकास कामांना मंजूरी देण्यात आली लोकप्रतिनिधीमार्फत त्यांचे प्रभागात जास्त करुन सुचविण्यात आलेली कामे म्हणजे सीसी पायवाटा दुरुस्ती व नवीन नळ जोडण्या . या दोन्ही कामांवर गेली १० ते १५ वर्षापासून सतत खर्च होत आहे. वास्तविक पहाता, अशा प्रकारच्या कामांना गौण स्थान देवून मोठया स्वरुपाची कामे हाती घेणे आवश्यक आहे. या वर्षात सन्मानिय नगरसेवक यांच्या सहयोगाने चार वर्षीय विकास आराखडा तयार करुन जास्तीत जास्त गरजा भागविण्याचा प्रयत्न करता येणार आहे

८)  वर्ष २००७—२००८ मध्ये अदांजपत्रकातील तरतूद संपल्यानंतर मोठया प्रमाणवार अंतिरिक्त अनुदान उपलब्ध करुन देणेसाठी प्रस्ताव प्राप्त झाले आहेत अशा प्रकारे सर्व विकास कामांचे प्रस्ताव उत्पन्नाचा आढावा न घेता मंजूर केल्यास त्याचा महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीवर विपरीत परिणाम होईल व अंदाजपत्रक अर्थहीन होईल.

९)  **बाबींनिहाय** अंदाजपत्रकाची शहानिशा केल्यास खालील बांबींवर महापालिकेचे प्रयत्न कमी पडू लागले अहे.

<u>उत्पन्नाच्या बाबी</u> :

१)  वाहनतट भाडे .
२)  फेरीवाले लायसन्स फी .
३)  मार्केट भाडे.
४)  अनाधिकृत नळ जोडण्या अधिकृत करणे.

<u>खर्चाच्या बाबी</u> :

१)  राष्ट्रीय युवा धोरण अंमलबजावणी.
२)  पर्यावरण संनियंत्रन
३)  कुटूंब नियोजन कार्यक्रम.
४)  मानसिक रुग्ण व कुष्ठरोगी कल्याण कार्यक्रम.
५)  जे.एन.एन.यु.आर.एम. योजना

या वर्षात जरी उपरोक्त बाबींवर महापालिकेचे प्रयत्न अपूरे पडू लागले तरी येणा—या वित्तीय वर्षात आपल्या सहयोगाने कार्यान्वीत करणेस गती दिली जाईल .

१०)  वर्ष २००७—२००८ मध्ये JNNURM योजने अंतर्गत १७९ कोटी रुपये अपेक्षित होते परंतु सदर योजनेच्या पहिल्या टप्पास राज्य शासनाकडून नुकतीच मान्यता प्राप्त झाली असून अंतिम मंजूरीसाठी सदर प्रस्ताव केंद्रशासनाकडे पाठविला आहे तसेच या कामांना गती देण्यासाठी कार्यगटाची स्थापना करण्यात आली आहे, त्यामूळे सदरची तरतूद वर्ष २००७—२००८ मध्ये वर्ग करणेत आली आहे .

**११)**  JNNURM योजनेच्या मंजूरीस झालेला विलंब व मालमत्ता कर आणि पाणी पुरवठा स्त्रोतापोटी निश्चित करणेत आलेले अमर्यादित उद्दीष्ट साध्य न झाल्यामूळे वर्ष २००७—००८ चे अंदाजपत्रक पुढील प्रमाणे सुधारित करणेत आले आहे.

उत्पन्न : १४६.८० कोटी
खर्च : १४६.८९ कोटी
अखेरची शिल्लक : ९ लाख

<u>वर्ष २००८—२००९</u> :

१२)  **उल्हासनगर** महानगरपलिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत , त्याची वार्षिक मागणी व थकबाकी, मागील वर्षाचे उत्पन्न, महानगरपालिकेस पार पाडावयाचे बांधील व ऐच्छीक कर्तेव्य तसेच विविध बांबींसाठी विहित करण्यात आलेले शासकीय धोरण या सर्व बाबींचा आढावा घेवून वर्ष २००८—२००९ करिता उत्पन्न व खर्चाचे अंदाज पुढील प्रमाणे तयार करण्यात आले आहेत .

| अ.क्र. | लेखा शीर्ष | उत्पन्न |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | जकात | ९४.९१ कोटी |
| २ | मालमत्ता कर | २७.०० कोटी |
| ३ | पाणी पट्टी | ११.०० कोटी |
| ४ | अनुदाने | ४.६० कोटी |
| ५ | इतर | १७.२७ कोटी |
| ७ | एकूण अंदाज (**JNNURM** शिवाय) | १५४.७८ कोटी |
| ८ | **JNNURM** योजना | १७१.९८ कोटी |
| ९ | एकूण अंदाज (**JNNURM** सह) | ३२६.७६ कोटी |

<u>जमा बाजूची वैशिष्टे</u> :
१३) शासनाने जकातीचे खाजगीकरण करण्याच्या धोरणात्मक निर्णय घेतल्यानंतर तातडीने निर्णयाची अंमलबजावणी करण्या—या महानगरपालिकांपैकी उल्हासनगर महानगरपालिका ही एक आहे. वर्ष १९९८ मध्ये उत्पन्न २५ कोटी होते ते खाजगीकरणेमूळे वर्ष २००७ मध्ये ८३ कोटी पर्यंत पोचले व , वर्ष २००८—२००९ मध्ये ९४.७१ कोटी अपेक्षित धरण्यात आले आहे .

<u>मालमत्ता कर</u> : वर्ष २००६—२००७ मध्ये मालमत्ता करापोटी १६.२१ कोटी वसूल झाले होते . चालू वर्षात ही वसूली २५ कोटी पर्येत करुन महापालिकेच्या आस्थापनेनंतर प्रथमच वसुलीचा उच्चांक करण्याचा मानस आहे. तसेच ही गती चालू ठेवून वर्ष २००८—२००९ मध्ये कमीत कमी २७ कोटी करण्याचे योजले आहे .

<u>पाणी पुरवठा</u> : प्रत्यक्ष खरेदीपेक्षा फारच कमी दराने शहरवासियांना पाणी पुरवठा होत असल्याने पाणीपट्टीची वार्षिक मागणी कमी आहे त्यामूळे चालू वित्तीय वर्षात ९ कोटी व वर्ष २००८—२००९ मध्ये ११ कोटी पर्यंत होईल अशी अपेक्षा आहे .

<u>अनुदाने</u> : तत्कालीन नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर झाल्यानंतर कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेस पहिल्या ५ वर्षापर्यंत अनुदान प्राप्त होते ,परंतु महागाई भत्ता इ. असे मोठे अनुदान बंद करण्यात आले आहे . सध्या महानगरपालिकेस फक्त रस्ता व करमणूक कर अनुदान मिळत आहे . महापालिकेस आमदार , खासदार व दलित वस्ती सुधारणा अनुदान मिळते, परंतु ते विशिष्ट कामासाठी असते. वर्ष २००८—२००९ करिता ४.६० कोटी अनुदान अपेक्षित आहे.

<u>खाजगी सहभाग</u> :
विकास आराखडयाप्रमाणे विविध स्वारुपाच्या बाबींची अंमलबजावणी करणेकरिता काही भुखंड महापालिकेस शासनाकडून हस्तांतरण करण्यात आले आहे, त्यातून काही भुखंडावर खाजगी सहभागाने म्हणजे बांधा, वापरा व हस्तांतरित करा या पध्दतीने प्रकल्प राबविणेसाठी नमुना निविदा ( **Model Document** ) तयार करण्यात आल्या असून सदर प्रकल्पांसाठी लवकरच निविदा मागविण्यात येतील . यामूळे बांधील स्वरुपाचे कार्य पार पाडणेसाठी महापालिकेस दरमहा ठराविक उत्पन्न प्राप्त होइल .

<u>खर्चाची वैशिष्टे</u> :

१४) **प्राथमिक शिक्षण** : उल्हासनगर महापालिका शिक्षण मंडळाच्या २८ शाळांमध्ये अंदाजे ११ हजार प्राथमिक शिक्षण घेत आहेत. मंडळाचे कार्यालयीन कामकाज , शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यासाठी महापालिका हिश्यापोटी ७.५० कोटी रुपयांची तरतूद करणेत आली आहे दृ

<u>महिला व बालकल्याण</u> :— महिला व बालकल्याण योजने अंतर्गत विविध व्यवसायाचे प्रशिक्षण उदा. दारिद्रय रेषेखाली गरीब, गरजु व विधवा महिलानां शिवणयंत्र वाटप करणे, दारिद्रय रेषेखालील महिलानां विविध प्रकारचे प्रशिक्षण देणे, विधवा महिलांचे पुर्नविवाह करिता अनुदान देणे, बाल कामगार प्रथा निर्मुलन, जनजागृती सप्ताह

साजरा करणे, निराधार /अनाथ १ ते १० वर्षाच्या आतील मुला मुलींना दत्तक घेतलेल्या पालकांना अनुदान देणे, उल्हासनगर शहरातील बालसुधार गृहांना इन्व्हर्टर देणे, दारिद्रय रेषेखालील महिला व मुलींना बालवाडीचे प्रशिक्षण देणे या सर्व बाबींसाठी अंदाजपत्रकात ३५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे .

मागासवर्गीय व इतरांसाठी राहणा–या कल्याणकारी योजना :–

दुर्बल घटक वसाहतीत लोंकांचा दर्जा उंचाविणेसाठी सदर वस्त्यांमध्ये विविध प्रकारच्या सेवा सुविधा पुरविणेसाठी २०३ लाख रुपयांची तरतूद केली आहे. तसेच अपंग व्यक्तीचे कल्याणकारी योजनांसाठी रुपये २० लाखाची तरतूद केली आहे.

**मानसिक रुग्ण** व कृष्टरोगी यांच्या कल्याणकारी योजनांसाठी ५ लाख रुपयांची तरतूद केली आहे.

उद्यान सुशोभिकरण :––

उल्हासनगर शहरातील उद्यानाचे नुतनीकरण व सुशोभिकरण यासाठी १.२५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे .

१५) **नगरसेवक निधी** : नगरसेवकांना त्यांच्या प्रभागात इच्छेनूसार सुधारणा करणेसाठी नगरसेवक निधीत वाढ करणेचे नगरसेवक वारंवार इच्छा व्यक्त करीत होते. त्यानुसार वर्ष २००८–२००९ मध्ये नगरसेवक निधीपोटी प्रत्येकी रुपये ५ लाख प्रत्येक नगरसेवक उपलब्ध करुन देण्यात आले आहेत . शिवाय 'अ' अंदाजपत्रकात प्रभाग क्षेत्रात विकासकार्य करणेसाठी ३ लाख व ''क'' अंदाजपत्रकात २ लाख असे एकूण १० लाख निधी उपलब्ध करण्यात आला . नगरसेवक सदर निधीचा महत्वपूर्ण कामासाठी सदुपयोग करतील अशी अपेक्षा आहे .

रस्ते विकास : पावसाळयापूर्वी रस्त्यांची डागडुंजी करणेसाठी खर्चापोटी अंदाजपत्रकात रुपये १ कोटी रुपयांची तरतूद करणेत आली आहे . नविन रस्ते बनविणे साठी १ कोटी तसेच विकास आराखडयातील रस्ते व इतर आरक्षणाची अंमलबजावणी करणेसाठी १ कोटीची तरतूद करणेत आली आहे . शहरातील अनाधिकृत विकास कामे नियमाधिन केल्यामूळे अंदाजे ५ कोटी वसूल झाले आहेत व ५ कोटी वर्ष २००८–२००९ मध्ये प्राप्त होतील, अशी अपेक्षा आहे. सदर रक्कमेतून हिराघाट , उल्हासनगर –३ ते मठ मंदिर उल्हासनगर ५ पर्यंतच्या या मुख्य रस्त्यांचे सिमेंट कॉक्रीटीकरणेचे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

१६) सर्व सदस्यांच्या निदर्शनास आणण्यासाठी विशेष बाब म्हणजे उल्हासनगर शहरात मुंबई महानगर प्रदेश अभियान ( **NIRMAL MMR**) योजनेअंतर्गत शहरातील विविध ठिकाणी शौचालयात अंदाजे २४०० जागा (**Seats**) बांधणेसाठी एमएमआरडीए मार्फत अंदाजे ३६ कोटी अनुदान प्राप्त होईल . सदर कामासाठी मेसर्स स्पार्क, मेसर्स युवक प्रतिष्ठान व मेसर्स जनसेवा मजदूर कामगार अशा तीन संस्थाची नियुक्ती करण्यात आली आहे.

एम.एम.आर.डी.ए तर्फे व्यक्तीगत शौचालये बांधणेसाठी योजना जाहीर करण्यात आली असून सदर योजनेस प्रत्येक लाभार्थीस ४५००/– मंजूर करण्यात येतील. सदर कामासाठी लवकरात लवकर सर्वेक्षण सुरु करण्यात येईल .

खर्चाचा सारांश :

| अ.क्र. | लेखा शीर्ष | खर्च |
|---|---|---|
| १ | पगार भत्ते व इतर प्रशासकीय खर्च | ४१.८० कोटी |
| २ | म. औ. वि. मं. मं. | ६२.१५ कोटी |
| ३ | कर्ज परतफेड | ३३.६९ कोटी |
| ४ | दिवाबत्ती बीले | ३.२५ कोटी |
| ५ | सार्वजनिक आरोग्य | ७.३६ **कोटी** |
| ६ | शिक्षण मंडळ | ७.४९ **कोटी** |
| ७ | शासकीय व इतर देणी | १२.०९ **कोटी** |

| | | |
|---|---|---|
| ८ | दिवाबत्ती खाते | २.०९ कोटी |
| ९ | उदयाने | २.५२ कोटी |
| १० | विपरित परिस्थिती व्यवस्थापन व अग्निशमन | ०.८७ कोटी |
| ११ | डिस्पेन्सरी व आरोग्य विशयी कार्यक्रम | १.४८ कोटी |
| १२ | पाणी पुरवठा | ७.८८ कोटी |
| १३ | भुयारी गटार | २.१६ कोटी |
| १४ | ड्रेनेज विभाग (जल निस:सारण) | २.३६ कोटी |
| १५ | बांधकाम | ३९.६७ कोटी |
| १६ | प्रभाग समिती | ५.२४ कोटी |
| १७ | परिवहन सेवा | ०.१० कोटी |
| १७ | इतर | ५.६५ कोटी |
| १८ | **एकूण** | **२३७.८५ कोटी** |
| | जे. .एन.एन. यु. आर. एम. योजना | १७८.७९ कोटी |
| | **एकूण** | **४१६.६४ कोटी** |

एकुण अंदाजित उत्पन्न : ३२६.७६ कोटी

एकुण अंदाजित खर्च : ४१६.६४ कोटी

फरक : ८९.८८ कोटी

१७) पगार, भत्ते, प्रशासकीय खर्च व मुलभूत सेवा या सर्व बाबीवर दैनंदीन वाढ अपिरिहार्य आहे व त्यासाठी विविध करांच्या दरात नियतकालीन वाढ होणे आवश्यक आहे, ही वस्तुस्थिती लक्षात घेवून आपण मागील वर्षी जकात व पाणीपट्टीच्या दरात अंशत: वाढ मंजुर केली होती ही बाब कौतुकास्पद आहे. परतु महापालिकेवर एम. आय.डी.सी, एम.जे.पी व पुरवठादार/ठेकेदार यांची कोटी रूपयांची देणी तसेच JNNURM योजने अंतर्गत कर्जाची उभारणी व महापालिका अंशदान याकरीता अजुनही मोठया प्रमाणावर निधीची आवश्यकता आहे त्यामुळे दरवाढीचा प्रस्ताव पुढील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

जकात : रुपये : २.६५ कोटी

मालमत्ता कर : रुपये : ५१.५० कोटी

पाणी पुरवठा : रुपये : ३४.११ कोटी

पाणी टॅकर वाहतूक खर्च : रुपये : १.३७ कोटी

अग्निशमन सेवा शुल्क : रुपये : ०.०१ कोटी

**विविध करांच्या दरात मंजूर करण्यात आलेल्या वाढीपोटी जे उत्पन्न प्राप्त होईल ते पुर्णपणे 'शहर स्वच्छ व सुदर' बनविणेसाठी आपल्या सहकार्याने वापरण्यात येईल .**

"स्वावलंबन व काटकसर" या धोरणानुसार वस्तुनिष्ठ अंदाजपत्रक सर्व सन्माननिय सदस्य बनवतील अशी अपेक्षा बाळगून मी माझे निवेदन संपवितो. आणि करांचे दर प्रस्तावित करण्यासाठी पुढीलप्रमाणे विवरण सादर करतो.

विषय :– महानगरपालिकेच्या सन २००७–२००८ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २००८–२००९ चे मुळ अंदाजपत्रक.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या तरतुदीप्रमाणे प्रत्येक वर्षी उत्पन्न व खर्च यांचे अंदाज आयुक्तांनी तयार करावयाचे आहेत. सदर अंदाजात अधिनियमाचे कलम ६३, ६४, ६५, ६६ व इतर कलमान्वये महानगरपालिकेस पार पाडावयाची कार्य व कर्तव्ये तसेच प्राथमिक शिक्षण निधीत दयावयाच्या अनुदानाची रक्कम अशा बाबींसंबंधी कराव्या लागणा–या खर्चाची तरतूद करणे आवश्यक आहे . तसेच पुढील वर्षात या अधिनियमाच्या तरतुदीन्वये जे कर लादणे आवश्यक असेल अशा कराधानासंबंधीच्या प्रस्तावांचे विवरण पत्र व कराधाना पासून मिळणा–या जमा रक्कमांचे अदांज ही सादर करणे आवश्यक आहे .

वरील सर्व बाबी लक्षात घेता, प्रत्येक बाबी अंतर्गत अपेक्षित उत्पन्न व अपेक्षित खर्च यांचे वर्गीकरणासहित अंदाजपत्रक तयार करण्याच्या प्रयोजनासाठी सादर करण्यांत येत आहेत.

सन २००७–२००८ चे सुधारीत अंदाज व सन २००८–२००९ चे मूळ अंदाजपत्रकासंबधी तपशील पुढील प्रमाणे.

## सन २००७ – २००८ चे सुधारीत अंदाजपत्रक :–

सन २००७–२००८ साठी एकूण रुपये **३९३.३६ कोटी** चे मुळ अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले होते . मागील ८ महिन्याचे प्रत्यक्ष उत्पन्न लक्षात घेता, २००७–२००८ वर्षासाठी खालीलप्रमाणे सुधारीत अंदाज तयार करण्यात आले आहे .

(आकडे हजारात)

| | | | |
|---|---|---|---|
| अ अंदाजपत्रकीय उत्पन्न | : रुपये. | १३३,७५,४८/– | |
| क अंदाजपत्रकीय उत्पन्न | : रुपये | १३,१३,२३/– | १४६,८८,७१/– |

———————————————————————————

| | | | |
|---|---|---|---|
| अ अंदाजपत्रकीय खर्च | : रुपये. | १००,४९,३६ /– | |
| क अंदाजपत्रकीय खर्च | : रुपये. | ४६,३०,०३/– | १४६,७९,३९/– |

———————————————————————————

मालमता कर व पाणी पट्टीच्या करापोटी अधिक वसुली होईल असे गृहित धरुन स्थायी समितीने अंदाज तयार केले होते तथापी त्यानुसार वसुली झालेली नाही.

## सन २००८–२००९ चे मूळ अंदाजपत्रक :–

| | | | |
|---|---|---|---|
| अ अंदाजपत्रकीय उत्पन्न | : रुपये. | ३०६,५२,४९/– | |
| ब अंदाजपत्रकीय उत्पन्न | : रुपये. | १,००/– | |
| क अंदाजपत्रकीय उत्पन्न | : रुपये | २०,२२,९३/– | ३२६,७६,४२/– |

———————————————————————————

| | | | |
|---|---|---|---|
| अ अंदाजपत्रकीय खर्च | : रुपये. | २८९,५४,७७/– | |
| ब अंदाजपत्रकीय खर्च | : रुपये. | १०००/– | |
| क अंदाजपत्रकीय खर्च | : रुपये | १२६,९९,४९/– | ४१६,६४,२७/– |

———————————————————————————

आर्थिक वर्ष २००७ –२००८ चे अपेक्षित उत्पन्न व खर्च लक्षात घेता, रहाणारी तुट **रुपये ८९.८८ कोटी** मालमत्ता कर, पाणी पट्टी, जकात, टॅंकर भाडे व इतर फी मध्ये वाढ करुन ती भरुन काढणे आवश्यक आहे .

मालमत्ता कर, पाणी पट्टी, जकात, अग्निशमन फी, टॅंकर भाडे व इतर फी यासंबधीच्या दरात वाढ करणेबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव तयार करण्यात आला आहे .

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ नुसार पुढील आर्थिक वर्षाकरिता करांचे दर निश्चित करणे व अधिनियमाचे कलम ९६ नुसार स्थायी समितीने अर्थ संकल्पीय अंदाज तयार करणेसाठी कलम ९५ नुसार उत्पन्न व खर्चाचे अंदाज तयार करण्यात आले असून मा. स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी सादर करण्यांत येत आहेत.

विषयः—<u>सन् २००८ — २००९ या आर्थिक वर्षाकरिता मालमत्ता करांचे दर निश्चित करणेबाबत.</u>

सन् २००८ — २००९ या आर्थिक वर्षाकरिता मालमत्ता करांचे दर निश्चित करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ मधील तरतुदीनुसार स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेवून महापालिकेने करांचे दर पुढील सरकारी वर्षासाठी प्रकरण ११ मधील विहित केलेल्या मर्यादेस व शर्तीस अधीन राहून निश्चित करणे आवश्यक आहे .

मालमत्ता कर शहरातील सर्व इमारती व जमिनीवर त्यांच्या वार्षिक करयोग्य मुल्यानुसार आकारण्यात येतो. मालमत्ता करामध्ये ज्या करांचा समावेश होतो व ते कोणत्या दराने निश्चित करण्यात यावेत .त्याचा तपशिल कलम १२९ मध्ये नमुद केला आहे.

सन् १९९८—१९९९ ते २००६—२००७ या वर्षातील शासकीय करांसह महापालिका करांची झालेली वसुली खाली दर्शविल्याप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | करांची झालेली एकूण वसुली (आकडे कोटीत) |
|---|---|---|
| १ | १९९८—९९ | ७.९९ |
| २ | १९९९—२००० | २०.२५ |
| ३ | २०००—२००१ | ८.५७ |
| ४ | २००१—२००२ | ११.०७ |
| ५ | २००२—२००३ | १८.९६ |
| ६ | २००३—२००४ | १९.०५ |
| ७ | २००४—२००५ | १५.७७ |
| ८ | २००५—२००६ | १६.२१ |
| ९ | २००६—२००७ | १७.८३ |

**मालमत्ता करात समाविष्ट असलेले कर, सदर करांचे प्रचलित दर व प्रस्तावीत दर याचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे .**

१) <u>पाणी पटटी :—</u>

दिनांक ३१/३/२००३ पर्यंत शहरातील सर्व मिळकतींना पाणी पट्टी आकारणी नियतकालीक दराने केली जात होती . त्यानंतर वित्तीय वर्ष २००३—२००४ मध्ये वाणिज्य वापर होत असलेल्या कोणत्याही जागांना पाणी पुरवठा केंद्रातून पाणी पुरवठा होत नसेल तर त्यास पाणी पट्टी बसविण्यात येणार नाही, असा निर्णय महासभा ठराव क्र: १०१ दिनांक २०/२/२००३ अन्वये घेण्यात आल्याने महापालिकेस त्यामूळे अंदाजे रुपये २.०० कोटीची मागणी कमी झाली. महासभा ठराव पारीत झाल्याच्या १५ दिवसाच्या अवधीनंतर एम.आय.डी.सी. ने पुर्वीचे ५७५०/—प्रति एम.एल. दरामध्ये वाढ करुन त्याऐवजी ७०००/— प्रति एम.एल. दराने वाढ केल्याने महापालिकेवर ५ कोटीचा अतिरिक्त आर्थिक भार प्रतिवर्ष पडत आहे . सदरची तुट अल्पश: प्रमाणात भरुन काढण्यासाठी शहरातील अनिवासी / वाणिज्य वापर असलेल्या ज्या मिळकतींना नळ जोडणी नाही किंवा महानगरपालिका जलव्यवस्था केंद्रातून थेट पाणी पुरवठा केला जात नाही अशा मिळकत धारकाकडून कर योग्य मुल्याच्या १०: दराने पाणी पट्टी आकारणे प्रस्तावित आहे. सदर वाढ मंजूर केल्यास वार्षिक मागणी मध्ये रुपये २.०० कोटीची भर पडेल.

२) <u>पाणी पुरवठा लाभ कर :—</u>

अधिनियमाचे कलम १३०(२)मधील तरतुदीनुसार पाणी पुरवठा लाभ कर महापालिका क्षेत्रात स्थित सर्व जागांच्या बाबतीत आकारण्यात येतो. सद्या या कराचा दर करयोग्य मुल्याच्या ३ : आहे. उल्हासनगर शहराच्या उंच सखल भागात समान तत्वावर पाणी वितरण करण्यासाठी मे. किर्लोस्कर कन्सलटंन्टशी मार्फत

१८ कोटीची योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत आहे. व त्यासाठी महानगरपालिकेने खालील प्रमाणे कर्ज उभारणी केली आहे

| अ. क्र. | वित्तीय संस्थेचे नांव | कर्ज रक्कम | व्याजदर प्रतिवर्ष | परतफेडीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (खुल्या बाजारातून कर्ज) | ७ कोटी | १४.५५ : | १० वर्षे |
| २ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (खुल्या बाजारातून कर्ज) | १.५ कोटी | १५.३५ : | १० वर्षे |
| ३ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (भारतीय आर्युविमा महामंडळ) | १.१० कोटी | १३.०० : | २५ वर्षे |
| ४ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (भारतीय आर्युविमा महामंडळ) | ४.०९ कोटी | ११.५० : | २५ वर्षे |

पहिल्या टप्प्याच्या कर्जाची परतफेड रुपये २ कोटी सध्या करावी लागत आहे परंतु वरील योजनेची सुधारीत किंमत २५ कोटी रुपये झाली असुन अतिरिक्त कर्ज उभारावे लागेल व त्याच्यासाठी सुध्दा परतफेड करावी लागेल तसेच सदर योजनेच्या दुस—या टप्प्याचे काम हाती घ्यावे लागणार आहे. अशा सर्व योजना यशस्वी करण्यासाठी महापालिकेस मोठया प्रमाणात कर्ज उभारणी करावी लागणार आहे. या सर्व बाबींचा विचार करता या कराच्या दरामध्ये वाढ करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे सर्व मिळकतीवर करयोग्य मुल्याचा १० टक्के दराने कर लावण्याचे प्रस्तावीत आहे. सदर दर वाढीमुळे महसुली उत्पन्नात ३.५० कोटी वाढअपेक्षित आहे .

३) मलप्रवाह करः—

मलप्रवाह कर किंवा साफसफाई कर कोणत्या जागांवर बसवावयाचा याचा तपशिल अधिनियमाचे कलम १३१ मध्ये देण्यात आलेले आहे. सद्या करयोग्य मुल्याच्या ५ : दराने हा कर आकारला जातो. यामध्ये ५ : दरवाढ प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर दर वाढीमुळे महसुली उत्पन्नात २.५० कोटी वाढ अपेक्षित आहे .

४) मलप्रवाह सुविधा लाभ करः—

सद्या या कराचा दर करयोग्य मुल्याच्या १ : आहे. महापालिकेने वर्ष १९८०—८६ दरम्यान शहरातील भुयारी गटार योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत अंदाजे ११ कोटी रुपयांची कर्ज उभारणी केली होती. व त्यापोटी सध्या महापालिकेस प्रति वर्ष रुपये १ कोटी कर्ज परत फेड करावी लागत आहे. सदर कर्जातून महापालिकेने मुख्य मलप्रवाह वाहिन्या टाकण्याचे काम पुर्ण केले आहे. परंतु सदर योजना पुर्णपणे कार्यान्वीत करण्यासाठी शहरातील प्रत्येक घराच्या मलप्रवाह वाहिन्या मुख्य मलप्रवाह वाहिन्यास जोडणे आवश्यक आहे. महापालिकेने भुयारी योजने अंतर्गत घेतलेल्या कर्जाची परतफेड व भांडवली खर्च तसेच सुधारित योजना करणेसाठी लागणा—या निधीचा विचार करता सध्याचे महापालिकेचे उत्पन्न कमी वाटत आहे. त्यामुळे सदर करात वाढ करून तो १० टक्के करावा असे प्रस्तावित असुन त्यापोटी ४.५० कोटी उत्पन्न होईल.

५) सामान्य करः—

अधिनियमाचे कलम १२९ (क) मधील तरतुदीनुसार महापालिका क्षेत्रातील मिळकतींच्या करयोग्य मुल्याच्या १२ : पेक्षा कमी नसतील या दराने सामान्य कर आकारण्यात येतो. सद्या करयोग्य मुल्याच्या २६ : दराने सामान्य कर आकारणी केला जातो. यात ७२ : दर वाढ प्रस्तावित आहे. सदर दर वाढीमुळे महसुली उत्पन्नात ३६.०० कोटी वाढ अपेक्षित आहे.

५ अ) अग्निशमन करः— **(Fire Tax)**

शहरातील आग विझविण्यासाठी व आगीपासून जिवित व मालमत्ता यांचे संरक्षण करण्यासाठी योग्य त्या यंत्रसामुग्रीसह सुसज्ज असे अग्निशमन पथक तयार ठेवणे अशा बाबीसाठी तरतुद करणे महापालिकेस बंधनकारक आहे महानगरपालिकने अग्निशमन सेवेवर वर्ष निहाय केलेल्या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

(रुपये हजारात)

| २०००—०१ | २००१—०२ | २००२—०३ | २००३—०४ | २००४—२००५ | २००५—२००६ | २००६—२००७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ३०७४ | ३३०८ | ४४८३ | ४३४५ | ६२४० | ५९३८ | ६५९३ |

अग्निशमन दलाच्या ताफयात नवीन वाहने समाविष्ट करणेसाठी रक्कम रुपये २५ लाखाची तरतूद अंदाजपत्रकात करण्यात आलेली आहे. अशी सर्व कर्तव्ये पार पाडण्यासाठी करयोग्य मुल्याच्या कमीत कमी १/८ टक्के इतकी आणि जास्तीत जास्त २ टक्के इतके मुल्य सामान्य करात समाविष्ट करण्याचे अनुज्ञेय आहे. वरील कार्य व कर्तव्य पार पाडण्यासाठी सर्व प्रकारच्या मालमत्तांवर अग्निशमन कर २ टक्के दराने आकारण्याचे प्रस्तावीत आहे. व त्यामुळे महापालिकेस १०० लाख रुपये मिळतील.

<u>रस्ता कर</u> :—

अधिनियमाचे कलम १४८ (क) मधील तरतूदीनुसार महापालिका क्षेत्रातील इमारती व जमीनीवर कर योग्य मुल्याच्या १०: हून अधिक होणार नाही या दराने रस्ता कर बसविता येतो. सद्या सदर कर करयोग्य मुल्याचे ६ : आकारला जातो. महानगरपालिकेने एकात्मिक रस्ते विकास टप्पा कमांक १ अंतर्गत मुख्य रस्त्यांचा विकास कार्यक्रम हाती घेतलेला होता. सदर विकास कार्यक्रमांअंतर्गत अंदाजे ४२ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून त्यासाठी रुपये १६.५ कोटी कर्ज मुंबई महानगर विकास प्राधिकरण मार्फत घेतलेले आहे. सदर कर्जाच्या सहव्याज परतफेडीसाठी रुपये २ कोटी २८ लक्ष प्रतिवर्ष भरावे लागत आहे. व ते सतत १० वर्षे भरावे लागणार आहे. शिवाय रस्ते विकास कार्यक्रम टप्पा कमांक २ अंतर्गत काही नवीन रस्त्याचे विकास कार्य महानगरपालिकेने हाती घेण्याचे योजले आहे. महानगरपालिका क्षेत्रात नविन रस्त्यांची बांधणी करणे व अस्तित्वातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती साठी लागणा—या निधीची तीव्र टंचाई भासत आहे. व ती अल्पशाः प्रमाणात दुर करण्यासाठी रस्ता करामध्ये दर वाढ प्रस्तावित करण्यात येत असून तो कर योग्य मुल्याच्या १० : दराने आकारण्यात यावा असे प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यामुळे महापालिकेस २.०० कोटी उत्पन्न प्राप्त होणार आहे .

अधिनियमातील तरतुदी विचारात घेवून सव करांच्या कमाल व किमान मर्यादा व प्रचलित दर व प्रस्तावित दर **परिशिष्ट 'अ'** मध्ये नमुद केले आहेत, कृपया त्याचे अवलोकन व्हावे .

केंद्र शासन व राज्य शासनाच्या सहकार्याने जवाहरलाल नेहरु शहरी भागाचा विकास कार्यक्रम या योजनेत भाग घेण्यासाठी महानगरपालिकेस मोठया प्रमाणावर कर्जाची उभारणी व स्वतःची गुतंवणुक करावी लागेल त्यामुळे विविध प्रकारच्या दरामध्ये वाढ करणे अनिवार्य आहे.

सबब, सन् २००८—२००९ या आर्थिक वर्षासाठी कराचे दर निश्चित करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये स्थायी समितीपुढे ठेवणेसाठी

## परिशिष्ट

## सन २००८ — २००९ या सालासाठी मालमत्ता कर व इतर करांचे प्रस्तावित केलेले दर

| अ. क्र. | करांचे नाव | कायद्यातील तरतुदी | किमान दर (:) | कमाल दर (:) | सन २००७ — ०८ चे प्रचलित दर (:) | सन २००८ — ०९ साठी प्रस्तावित दर करयोग्य मुल्यावर (:) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १२९ (अ) | पाणी पट्टी | | — | — | — | १० | दर वाढ प्रस्तावित (फक्त अनिवासी / |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | वाणिज्य मिळकतीसाठी ज्यांना नळ जोडणी नाही.) |
| १२९ (अअ), १३० (२) | पाणी पुरवठा लाभ कर | | — | — | ३ | १० | दर वाढ प्रस्तावित |
| १२९ (ब), १३१ | मल प्रवाह कर/साफसफाई कर | | | | ५ | १० | दर वाढ प्रस्तावित |
| १२९ (बब), १३१ | मलप्रवाह सुविधा लाभकर | | | | १ | १० | दर वाढ प्रस्तावित |
| १२९ (क), १३२ | सामान्य कर | | १२ | — | २६ | ९८ | दर वाढ प्रस्तावित |
| १२९ क | अग्निशमन कर | | १/८ | २ | — | २ | दर वाढ प्रस्तावित |
| १४८ (क) | रस्ता कर | | — | १० | ६ | १० | दर वाढ प्रस्तावित |

विषयः—सन् २००८ — २००९ या आर्थिक वर्षाकरिता जकात दर निश्चित करणेबाबत.

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत आयात होणा—या जकात पात्र मालावर उल्हासनगर महानगरापालिका जकात नियम १९९६ मधील तरतुदीनुसार जकात आकारणी करण्यात येते. महानगरपालिकेच्या एकुण उत्पन्नात जकात या स्त्रोतापासून होणा—या उत्पन्ना सिहांचा वाटा आहे. महानगरपालिकेस पार पाडावी लागणारी कार्य व कर्तव्यासाठी आवश्यक खर्चात वाढ लक्षात घेता नियमित कालावधीत वाढ करणे आवश्यक आहे. तरी जकात पात्र मालाच्या खालील गटाच्या दरात वाढ करणे प्रस्तावित आहे.

(रु. लाखात)

| वस्तु गट क्र. | वस्तुचे नांव | किमान दर (%) | कमाल दर (%) | प्रचलित दर (:) | प्रस्तावित दर (:) | अंदाजीत वार्षिक वाढीव उत्पन्न | अभिकर्त्याच्या कालावधीतील वाढीव उत्पन्न (१/४/०८ ते १८/१/०९ ) (२९३ दिवस) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५३ क | लेसस, टेप्स, लकडी व धातूच्या रिंगण ...इ. | ०.५० | ४.०० | ३.५० | ४.०० | ९४ | ७६ |
| ७७ | अलोद धातू म्हणजेच पितळ, तांबे टिन ..इ. | ०.५० | ४.०० | २.५० | ४.०० | १७१ | १३७ |

दिनांक १८.१.२००८ पासून १ वर्षाच्या कालावधीसाठी जकात वसुलीकरिता खाजगी अभिकर्ताची नेमणूक करण्यात आली आहे. उपरोक्त प्रस्तावित दराच्या वाढीमुळे होणा–या वाढीव उत्पन्न जकात अभिकर्त्याककडून कराराच्या उर्वरीत कालावधीसाठी वसुल करण्याचे प्रस्तावित आहे.

सबब उपरोक्त वस्तुच्या जकात दरात वाढ मजुंरीचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर ठेवणेसाठी प्रस्तावीत करीत आहे.

विषय :– <u>वित्तीय वर्ष सन २००८–०९ साठी पाणी पट्टीचे दर निश्चित करणे बाबत.</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ (२०) नुसार महापालिका हद्दीतील नागरिकांना पुरेसा व स्वच्छ पाणी पुरवठा करणे हे महापालिकेचे आदय कर्तव्य आहे. दि २०.१२.९४ रोजी पाणी पुरवठा योजना उल्हासनगर महानगरपालिकेस शासनाकडून हस्तांतरीत करण्यात आली होती. त्या दिवसापासून महानगरपालिका सदरची सेवा अर्थसहाय्य देऊन **( Subsidised Rates**) सर्वांना पुरवित आहे.

शहरातील नागरिकांना पाणी पुरविण्यासाठी महापालिकेचा स्वत:चा कोणताही स्त्रोत नसल्याने एम. आय.डी.सी.कडून आजतागायत पाणी खरेदी करीत असून एम.आय.डी.सी. सदर पाणी खरेदी दरात सतत वाढ करीत आहे.

दि ३१.३.०३ पर्यत शहरातील सर्व मिळकतींना पाणी पट्टी आकारणी नियतकालीक दराने केली जात होती. त्यानंतर वित्तीय वर्ष २००३–०४ मध्ये वाणिज्य वापर होत असलेल्या कोणत्याही जागांना पाणी पुरवठा केंद्रातून पाणी पुरवठा होत नसेल तर त्यास पाणी पट्टी बसविण्यात येणार नाही. असा निर्णय महासभेत दि २०.२.०३ अन्वये घेण्यात आला त्यामूळे अंदाजे रुपये २.०० कोटीची मागणी कमी झाली. महासभा ठराव पारीत झाल्याच्या १५ दिवसांच्या अवधीनंतर एम.आय.डी.सी.ने पूर्वीचे ५७५०/– प्रति एम.एल. दरामध्ये वाढ करून त्याऐवजी ७०००/– प्रति एम.एल. दराने वाढ केल्याने महापालिकेवर ५ कोटींचा अतिरिक्त आर्थिक भार पडला आहे.

परिणामी महापालिकेची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे व पाणी पुरवठा सेवांसाठी देण्यात येणा–या अनुदानामुळे शहरातील विकास कामांवर खर्च करणेसाठी निधी उपलब्ध होवू शकत नाही.

वित्तीय वर्ष २००६–०७ मध्ये पाणी पुरवठा खर्चावर प्रत्यक्ष झालेला उत्पन्न व खर्चाचा तपशील पुढील प्रमाणे –

| (जमा | रक्कम | खर्च | रक्कम |
|---|---|---|---|
| पाणी पट्टी | ७३१४३ | एम.आय.डी.सी. | २७४५९१ |
| पाणी पुरवठा सुविधा लाभ कर | ८०३९ | पगार | ३१७७६ |
| नळजोडणी फी | १५ | भत्ते | १४४८ |
| संकीर्ण | ६१३ | प्रशासकिय खर्च | ३९७ |
| एकूण जमा रक्कम | ८१८१० | टॅंकर भाडे | ८३७१ |
| <u>अर्थसहाय्य</u> | <u>२७१३४९</u> | | |
| | | पाणी पुरवठा साहित्य खर्च | १८५५३ |
| | | कुपनलिका खर्च | १६८७ |
| | | इमारत दुरूस्ती व निगा | २४२ |
| | | विद्युत व दुरध्वनी बीले | १२२९० |
| | | बुस्टर पंपिंग मशीनरी खर्च | १४८७ |
| | | संकीर्ण | २३१७ |
| एकुण | ३५३१५९ | एकूण खर्च | ३५३१५९ |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३० व १३४ मध्ये पाणी पट्टी व पाणी पुरवठा लाभ कर आकारणी बाबतच्या तरतुदी नमूद केल्या आहेत. त्यात पाणी पट्टी आकारणीसाठी खालील पर्याय उपलब्ध आहेत.

१) नळजोडणी धारकाच्या मिळकतीचे करयोग्य मुल्य लक्षात घेऊन करयोग्य मुल्ल्याच्या टककेवारीने पाणी पटटी व पाणी पुरवठा लाभ कर या नावाने अतिरिक्त पाणी पट्टी आकारणी करणे.

२) नळ जोडणीचा आकार व ज्या प्रयोजनासाठी पाणी वापरण्यात येते त्यावरून दर निर्धारित करणे.

३) पाणी मोजणी करून ज्या प्रयोजनासाठी पाणी वापरण्यात येते त्यासाठी वेगवेगळे दर निर्धारित करून आकारणी करणे.

४) ठराविक काळासाठी नळ जोडणीधारकाबरोबर दराबाबत तडजोड करणे.

**सद्या महानगरपालिका शहरातील ग्राहकांना इमारतीच्या बांधकामाच्या प्रकारानुसार पाणी दर आकारणी करीत असून हे दर खालीलप्रमाणे आहेत.**

| अ क्र | बांधकामाचा प्रकार | दर |
|---|---|---|
| अ | आर. सी. सी.व टिअर गर्डर बांधकाम इमारती | १५० प्रतिमहा |
| ब | पत्र्याचे छत व विट बांधकाम | ७५ प्रतिमहा |
| क | झोपडपट्टी घरपट्टी धारक, लफाटा किंवा पत्र्यांचे छत असलेले झोपडे, मातीचे झोपडे | ६० प्रतिमहा |

पाणी पुरवठा सेवांवरील वाढत जाणारा खर्च लक्षात घेता, पाणीपट्टी दरात वाढ करणे क्रमप्राप्त आहे. अधिनियमाचे कलम १३४(१)(ब) मधील तरतुदी लक्षात घेऊन सन् २००८–२००९ या आर्थिक वर्षासाठी निवासी मिळकतीवर आकारावयाच्या पाणी पट्टी कराचे दर खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

१ . <u>बांधकामाच्या स्वरुपाप्रमाणे :</u>

| अ क्र | *बांधकामाचे स्वरुप* | सन २००७–२००८ चे प्रचलीत दर | उत्पन्न | | | सन् २००८–२००९ साठी प्रस्तावित दर | उत्पन्न | | | वाढ | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सदनीका | दर | रक्कम | | सदनीका | दर | रक्कम | | |
| १ | आर सी सी व टीअर गर्डर बांधकाम. | रु. १५० प्रतिमहा रु. १८०० प्रतिवर्ष | ४११४१ | १८०० | ७४०५३८०० | रु. ४५० प्रतिमहा रु. ५४०० प्रतिवर्ष | ४११४१ | ५४०० | २२२१६१४०० | १४८१०७६०० | दरवाढ प्रस्तावित |
| २ | पत्र्याचे छत व विट बांधकाम | रु. ७५ प्रतिमहा रु.९०० प्रतिवर्ष | ६१८४३ | ९०० | ५५६५८७०० | रु. ३०० प्रतिमहा रु. ३६०० प्रतिवर्ष | ६१८४३ | ३६०० | २२२६३४८०० | १६६९७६१०० | दरवाढ प्रस्तावित |
| ३ | झोपडपट्टीधारक (लफाटा किंवा पत्र्याचे किंवा मातीचे झोपडे) | रु. ६० प्रतिमहा रु. ७२० प्रतिवर्ष | १४१०६ | ७२० | १०१५६३२० | रु. २०० प्रतिमहा रु. २४०० प्रतिवर्ष | १४१०६ | २४०० | ३३८५४४०० | २३६९८०८० | दरवाढ प्रस्तावित |
| | <u>एकुण उत्पन्न</u> :– | | | | १३९८६८८२० | <u>एकुण उत्पन्न</u> :– | | | ४७८६५०६०० | ३३८७८१७८० | |

*सदराची वाढ मान्य केल्यास महापालिकेस <u>३३.८७ कोटी</u> अतिरिक्त उत्पन्न मिळेल.*

२ . मीटरव्दारे पाणी पुरवठा :

जे नळ जोडणी धारक मिटरद्वारे मोजणी करून पाणी पुरविण्याची मागणी करतील, अशा निवासी / अनिवासी नळजोडणीसाठी पुढील प्रमाणे दर प्रस्तावीत करण्यात येत आहे .

| अ क्र | वापराचा प्रकार | दर प्रति १००० लिटर | |
|---|---|---|---|
| | | प्रचलित दर (रूपये) | प्रस्तावित दर (रूपये) |
| १ | निवासी | १२/— | १५/— |
| २ | अ निवासी अ) वाणिज्य | २६/— | ३०/— |
| | ब) औद्योगिक | २६/— | ३०/— |
| | क) सार्वजनिक संस्था | १५/— | १८/— |

अ) मिटर चालू स्थितीत प्रति महा किमान आकारणी

| | | वाणिज्य | | घरगुती | | विशेष | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | व्यास (मी.मी) | प्रचलित दर | प्रस्तावित दर | प्रचलित दर | प्रस्तावित दर | प्रचलित दर | प्रस्तावीत दर |
| १ | १५ | ४६८ | ५४० | १६२ | २०४ | २०३ | २४३ |
| २ | २० | ८६१ | ९९४ | ३०० | ३७२ | ३७५ | ४४७ |
| ३ | २५ | १२४८ | १४४० | ४३२ | ५४० | ५४० | ६४८ |
| ४ | ३२ | १८७२ | २१६० | ६४८ | ८१० | ८१० | ९७२ |
| ५ | ४० | ३२७६ | ३७८० | ११४० | १४१७ | १४२५ | १७०१ |
| ६ | ५० | ४१७३ | ४७७४ | १४४० | १७९० | १८०० | २१४८ |
| ७ | ६५ | ५०७३ | ५८५४ | १८०० | २१९५ | २१९० | २६३४ |

ब) मिटर नादुरूस्त स्थितीत किमान आकारणी—

| | | वाणिज्य | | घरगुती | | विशेष | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क | व्यास (मी.मी.) | प्रचलित दर | प्रस्तावित दर | प्रचलित दर | प्रस्तावीत दर | प्रचलित दर | प्रस्तावीत दर |
| १ | १५ | ७०२ | ८१० | २१६ | २७० | ३१५ | ३७५ |
| २ | २० | १३०० | १५०० | ३६० | ४४५ | ५७८ | ६९३ |
| ३ | २५ | १८७२ | २१६० | ५७६ | ७२० | ८४० | १००८ |
| ४ | ३२ | ३३८० | ३९१४ | १०४४ | १३०५ | १५३० | १८२९ |
| ५ | ४० | ४९४० | ५६६६ | १५१२ | ३७८० | २२४० | २६४९ |
| ६ | ५० | ६०५८ | ७००० | २१६० | २६५७ | २४७५ | ३००० |
| ७ | ६५ | ६७६० | ७८२५ | २३४० | २९२७ | ३०४८ | ३६५७ |

स्पष्टीकरण:

अ) वाणिज्य वापर :— यामध्ये सर्व प्रकारची दुकाने, गोडाऊन, वेअर हाऊस, पेट्रोल पंप, सॉ मिल, ट्रान्सपोर्ट ऑफिस, रूग्णालये, दवाखाने, उपहार गृहे, विश्रामगृहे, परमिट रूम, बिअर बार, सिनेमागृहे, मंगल कार्यालये, तबेले, जलतरण तलाव, केस कर्तानालये, गॅरेजेस (धुण्याची सुविधा नसलेले), यंत्रमाग (पॉवर लुम्स) व ज्या उद्योगांमध्ये प्रक्रिया करण्यासाठी प्रत्यक्षात पाण्याचा वापर करण्यात येत नाही असे उद्योग व धंदे, इमारतीचे बांधकामासाठी वापरण्यात येणारे पाणी इत्यादींचा समावेश असेल.

**ब) औद्योगिक वापर:—** ज्या उद्योगामध्ये प्रक्रिया करण्यासाठी प्रामुख्याने पाण्याचा वापर होतो असे सर्व उद्योग, केमिकल कंपन्या, सर्विस स्टेशन्स, सर्विस स्टेशनसह वाहन दुरूस्ती केंद्र (गॅरेज), बर्फ कारखाने, टाईल्स व मार्बल कारखाने लॉड्रीज, धोबीघाट (कपडे धुण्याचे ठिकाण), विट—भट्टया, नर्सरी, इत्यादींचा समावेश असेल.

**क) सार्वजनिक संस्था:—** यामध्ये नोंदीकृत शाळा महाविद्यालये, धर्म शाळा, धर्मादाय संस्था चालवित असलेले रूग्णालये इत्यादींचा समावेश असेल. नळजोडणीचे मीटर नादुरूस्त असल्यास किंवा बंद असल्यास मिटर असलेल्या लगतच्या तीन महिन्यातील पाण्याचा सरासरी वापर लक्षात घेवून वरील प्रमाणे आकारणी करण्यात येईल.

सध्यास्थितीत वाणिज्य वापर होत असलेल्या जागांसाठी ज्यामध्ये नळ जोडणी आहे अशा मिळकत धारंकाना वरील प्रमाणे आकारणी करण्यांत येते अशा मिळकत धारकांना अंदाजित ४ एम एल प्रति दिवस पाणी पुरवठा होत आहे. त्यामुळे उपरोक्त दर मान्य केल्यास **रुपये <u>२३ लाख</u>** उत्पन्नांत वाढ होण्याची शक्यता आहे . व मीटरव्दारे होणा—या पाणी पुरवठा सेवापासुन अंदाजे एकुण **<u>३.२०</u> कोटी** एवढे उत्पन्न मिळेल.
तरी उपरोक्त १ व २ प्रमाणे पाणी पुरवठा दर वाढ मान्य केल्यास पाणी पुरवठा सेवेपासुनची एकुण वार्षिक मागणी अंदाजित **रुपये <u>५१.०६ कोटी</u>** अपेक्षित होईल.

पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्यासाठी शासन परिपत्रक क्रमांक D.O. No./PRE-1033/2277/PE-1, दिनांक २६ जुलै २००१ अन्वये सर्व महानगरपालिकेस देण्यात आलेल्या सुचनेनुसार सर्व नगरपालिका / महानगरपालिकेने पाणी पुरवठा सेवा **"नफा ना तोटा"**या तत्वावर पुरविणे आवश्यक आहे. अन्यथा महापालिकेस अनुज्ञेय असलेली अनुदाने बंद करण्यांत येतील असे सूचित केले आहे.
तसेच भारतीय लेखा तथा लेखा परिक्षण विभाग (सीएजी) महाराष्ट्र यांचे मार्फत वित्तीय वर्ष १९९७—९८ ते सन २००१—२००२ या कालावधीचे लेखा परिक्षण करतांना सदर लेखा परिक्षणात पाणी पुरवठा योजना **"नफा ना तोटा"** या तत्वावर न चालविता वर्षानुवर्षे मोठया प्रमाणावर तोटा सहन केल्याबाबत आक्षेप घेतले आहेत. सदर आक्षेपांची गांभीर्यपुर्वक दखल घेणे आवश्यक आहे . वरील सर्व कराच्या दरात वाढ करणेचा प्रस्ताव मागील वित्तीय वर्ष सन २००३—२००४, २००४ —२००५, २००५—२००६ , २००६ — २००७ व २००७ — २००८ मध्ये सादर करण्यात आला होता. परंतु सदर प्रस्ताव महासभेने अल्पश: प्रमाणात मंजूर केल्यामूळे महापालिकेच्या आर्थिक स्थितीवर विपरित परिणाम होत आहे .
**पाणी पुरवठा योजना उल्हासनगर महानगरपालिकेस शासनाकडून हस्तांतरित करण्यात आल्यानंतर सदर सेवेवरिल देण्यात आलेल्या अर्थसहाय (Subsidy) चा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.**

<u>पाणी पुरवठा सेवा पुरविणेसाठी अर्थसहाय्य बाबतचा तपशिल.</u>

**(vr)**

| उत्पन्न | १९९७—९८ | १९९८—९९ | १९९९—०० | २०००—०१ | २००१—०२ | २००२—०३ | २००३—०४ | २००४—०५ | २००५—०६ | २००६—०७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाणी बिले वसुली | २२९३३ | ६११२२ | ९७१४० | ६००६० | १०२५१३ | १३४६८३ | ११५६०० | ८४१७७ | ७४५१८ | ७३१४३ |
| पाणी पुरवठा लाभ कर | ४९२ | ११०१ | २६५६ | १४५८ | १८७३ | ३३६८ | ३५०२ | २९८५ | ६३२३ | ८०३९ |
| नळ जोडणी फी | ४० | ६१ | ७० | ४१ | ४ | ३६ | १२१ | ४८ | २२ | १५ |
| प्लंबर लायसन्स फी | १४ | २८ | २८ | १४ | १५ | .. | .. | १४ | १४ | ४७ |
| निविदा फूार्म | ८४ | ६६ | २७ | ३९ | ९७ | ५५ | २८५ | १२४ | २१ | १२ |
| अुनदान | ३४२ | .. | .. | .. | .. | .. | ५९१८ | २६४१ | .. | .. |
| इतर | | | | | | | | | ९५१ | ५५४ |
| एकुण उत्पन्न | २३९०५ | ६२३७८ | ९९९२१ | ६१६१२ | १०४५०२ | १३८१४२ | १२५४२६ | ८९९८९ | ८१८४९ | ८१८१० |
| खर्च :— | | | | | | | | | | |
| एम.आय.डी.सी | ६२०८७ | ८५०२७ | २१५७७८ | १९१०७१ | २१५२४६ | २४२८०० | ३०६०००० | २४७५२७ | १७००००  | २७४५९१ |
| एम.आय.डी.सी. थकबाकी | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | ३४००० | ८५०० | .. |
| एम.डब्ल्यु.एस.बी. थकबाकी. | .. | ११५४६ | .. | .. | .. | १२२०० | ० | .. | .. | .. |
| पगार | १२६०० | १४०३७ | १८१९२ | २१५०६ | २३३४८ | २४७९४ | २६०४५ | २७३६५ | २९३१८ | ३१७७६ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भत्ते | १३२१ | १८७२ | १४७०७ | ९४९ | ४९१ | १७२७ | ३७७ | १४५३ | १३३६ | १४४८ |
| प्रशासकीय खर्च | २२ | १०४ | १३३ | २६६ | ४३० | ४५२ | १५४ | ३१५ | १३७७ | ३९७ |
| टॅंकर खर्च | .. | १०५५ | ५०२८ | ५४९२ | ८३७६ | १२३३६ | १२७२५ | ५८७२ | ७७९५ | ८३७१ |
| पाणी पुरवठा वितरण व्यवस्था | ५१०६ | ८८७४ | ९७२० | ६८६४ | ३३३१ | ७८४५ | ११४१६ | ६१५४ | ९३२३८ | १८५५३ |
| बोअरवेल/जेटपंप खर्च | १२०२ | १६३२ | ४०० | २६२ | ४८१ | ८०४ | ९६० | २२२१ | १४८९ | १६८७ |
| इमारती निगा व दुरुस्ती | १०३७ | ९६३ | ४५५ | १७५८ | १२६२ | ४४६ | ११३० | ८७७ | ३५७ | २४२ |
| विदयुत व दुरध्वनी खर्च | ५११४ | ४३९६ | ६३६० | ५९७१ | ७८५६ | ६८६६ | ८१७१ | ११०२३ | १०५८३ | १२२९० |
| बुस्टर पंपिंग स्टेशन खर्च | .. | २३९५ | १३७९ | १८७३ | ७४८ | २६४३ | २३६६ | १७४२ | २१३६ | १४८७ |
| संगणकीय खर्च | ३०० | ८९ | २६५ | २६५ | ३ | ४७ | ० | ११५ | ३२४ | ४२ |
| संकीर्ण | ११३६ | ४७१ | ४९९ | ९५२ | ५२९ | २८३ | ३५६ | ५७२२ | ६७८७ | २२७५ |
| एकुण खर्च | ८९९२५ | १३२४६१ | २५९६७९ | २३७२२० | २६२१०१ | ३१३२४३ | ३६७०० | ३४४३८६ | २५३२४० | ३५३१५९ |
| अर्थसहाय्य | ६६०२० | ७००८३ | १५९७५८ | १७५६०८ | १५७५९९ | १७५१०१ | २४४२७४ | २५४३९७ | १७१३९१ | २७१३४९ |

अर्थसहाय देवून सतत सुरु असलेली उपरोक्त सेवेवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. शिवाय केंद्र शासन व राज्य शासनाच्या सहकार्यने जवाहरालाल नेहरु शहरी भागाचा विकास कार्यक्रम या योजनेत भाग घेण्यासाठी महानगरपालिकेस मोठया प्रमाणावर कर्जाची उभारणी व स्वत:ची गुतंवणुक करावी लागेल त्यामुळे विविध प्रकारच्या दरामध्ये वाढ करणे अनिवार्य आहे.

सबब, वित्तीय वर्ष २००८—२००९ साठी प्रस्तावित दरास मान्यता मिळणेसाठी स्थायी समिती पुढे ठेवणेसाठी प्रस्तावीत करीत आहे .

विषय : वित्तीय वर्ष २००८—०९ मध्ये महानगरपालिकेतर्फे टॅंकरव्दारे पाणी पुरवठा करणेसाठी दर आकारणी करणे बाबत.

उल्हासनगर शहरातील असलेली पाणी वितरण व्यवस्था अत्यंत जूनी, अपु—या क्षमतेची व मोडकळीस आलेली आहे. शहराला पाणी पुरवठयाचा स्वत:चा स्त्रोत नसल्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाणी विकत घेवून वितरीत केले जाते. म.औ.वि.मं. कडून होणा—या पाणी पुरवठयात वारंवार व्यत्यय निर्माण होत असतो. शहरात पुरेशा क्षमतेच्या साठवण टाक्या नसल्यामुळे अनेक भागांना बूस्टर पंपाच्या मदतीने पाणी पुरवठा करावा लागतो. विद्युत पुरवठा खंडीत झाल्यानंतर पाणी पुरवठयावर परिणाम होतो. वरील कारणांमुळे निर्माण होणा—या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी टॅंकरद्वारे पाणी पुरवठा करणे अपरिहार्य आहे. महानगरपालिकेतर्फे काही वर्षापासून टंचाई सदृश्य परिस्थिती हाताळण्यासाठी टॅंकरव्दारे विनाशुल्क पाणी पुरवठा केला जात आहे. सध्य परिस्थितीत टॅंकरसाठी प्रतिखेप रु. २५४/— एवढा खर्च महापालिका करत आहे. विनाशुल्क टॅंकर पुरविल्यामुळे सतत मागणी वाढत आहे.

उल्हासनगर वगळता इतर महानगरपालिका / नगरपालिका टॅंकर सेवा सशुल्क पुरवित आहेत. टॅंकरने पाणी पुरवठा सेवा विना शुल्क असल्याने महानगरपालिकेवर वाढणारा आर्थिक बोजा मोठा असुन या सेवेसाठी शेजारी असणा—या महानगरपालिका / नगरपालिका प्रमाणे येथेही वाहतुक खर्च आकारणी केल्यास मोठया प्रमाणात असलेला आर्थिक बोजा महानगरपालिकेवर पडणार नाही आणि वाहतुक खर्च आकारणी झाल्यास टॅंकर खर्चही कमी होईल.

महानगरपालिकेने या कामासाठी गेल्या वर्षातील केलेला खर्च पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र | वर्ष | खर्च |
|---|---|---|
| १ | १९९८—१९९९ | रु. ११ लाख |
| २ | १९९९—२००० | रु. ५० लाख |
| ३ | २०००—२००१ | रु. ५५ लाख |
| ४ | २००१—२००२ | रु. ८४ लाख |
| ५ | २००२—२००३ | रु. १२३ लाख |
| ६ | २००३—२००४ | रु १२८ लाख |
| ७ | २००४—२००५ | रु. ५९ लाख |

| | | |
|---|---|---|
| ८ | २००५–२००६ | रु. ७८ लाख |
| ९ | २००६–२००७ | रु. ८४ लाख |

उपरोक्त परिस्थिती पहाता, या कामाचा खर्च दरवर्षी सारखा वाढत आहे . शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशाप्रमाणे पाणी पुरवठा ना नफा ना तोट या तत्वावर चालविणे आवश्यक आहे.

उल्हासनगर महानगरपालिकने पाणी पुरवठा योजना क्र २ मंजुर करतांना ठराव क्रमांक १५ दिनांक १९/७/२००२ अन्वये योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्याची हमी दिलेली होती. शिवाय महानगरपलिकेने दिनांक २०/६/२००३ रोजीच्या महासभेत पाणी पुरवठा सेवेवर श्वेतपत्रिका सादर केलेली होती. त्यास ठराव क्रमांक २४ दिनांक २०/६/२००३ अन्वये मंजुरी मिळालेली असुन त्यात टॅकरद्वारे केल्या जाणा–या पाणी पुरवठयावर शुल्क आकारणी प्रस्तावाचा समावेश आहे.

दिनांक २०/६/२००३ रोजीच्या महासभेत मंजूर केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने प्रशासनातर्फे टॅकरव्दारे केल्या जाणा–या पाणी पुरवठयास शुल्क आकारणे संबंधी खालील प्रमाणे प्रस्ताव पुन्हा सादर करण्यांत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| अ | ७००० लिटर क्षमतेचा टॅकर पाणी व वाहतुक खर्चासह | रु. २५०/–प्रति खेप |
| ब | १०००० लिटर क्षमतेचा टॅकर पाणी वा वाहतुक खर्चासह | रु. ३००/– प्रति खेप |
| क | ७००० लिटर क्षमतेचा टॅकर भरुन देणे दणे वाहतुक खर्च वगळता | रु. ७०/– प्रति खेप |
| ड | १०००० लिटर क्षमतेचा टॅकर भरुन देणे वाहतुक खर्च वगळता | रु. १००/– प्रति टॅकर |

सदरच्या प्रस्तावास महासभा ठराव क्र. ६७ दि. १८.२.०४ अन्वये मंजुरी देण्यात आली होती. सदर ठरावानुसार टॅकरद्वारे केल्या जाणा–या पाणी पुरवठयात दि. १/४/०५ ते दि. ८/४/०५ पर्यंत शुल्क आकारणी करण्यात आली होती. परंतू विशेष महासभा ठराव क्र. ९४ दि. ८/४/०५ अन्वये दि. ३०/६/०५ पर्यंत टंचाई ग्रस्त भागांत टॅकरने करण्यांत येत असलेल्या पाणी पुरवठयावर वाहतुक खर्चाची आकारणी न करता मोफत पाणी पुरवठा करण्यास मान्यत देण्यात आली होती.

त्यानंतर विशेष महासभा ठराव क्र. २२ दि. २२/६/०५ अन्वये पुर्वीचा विशेष महासभा ठराव क्र. ९४ दि. ८/४/०५ अन्वये खालीलप्रमाणे अंशत: बदल करण्यात आलेला आहे.

जोपर्यंत प्रशासन संपूर्ण शहरात नळाद्वारे समान व पुरेशा दाबाने पाणी पुरवठा करीत नाही तोपर्यंत टंचाई ग्रस्त भागात टॅकरने करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठयावर वाहतुक खर्चाची आकारणी न करता मोफत पाणी पुरवठा करण्यात मान्यता देत आहेत.

या ठरावाद्वारे ज्या सुधारणा करण्यात आल्या आहेत त्यापुर्वीचा महासभा ठराव क्र. ६७ दि. १८/२/०५ चा भाग मानण्यात येतील.

तरी वित्तिय वर्ष २००८ – ०९ करिता टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणे करिता दर आकारणी करणे बाबतचा प्रस्ताव खालीलप्रमाणे .

| | | |
|---|---|---|
| अ | ७००० लिटर क्षमतेचा टॅकर पाणी व वाहतुक खर्चासह | रु. २७५/– प्रति खेप |
| ब | १०००० लिटर क्षमतेचा टॅकर पाणी वा वाहतुक खर्चासह | रु. ३९५/– प्रति खेप |
| क | ७००० लिटर क्षमतेचा टॅकर भरुन देणे दणे वाहतुक खर्च वगळता | रु. ७०/– प्रति खेप |
| ड | १०००० लिटर क्षमतेचा टॅकर भरुन देणे वाहतुक खर्च वगळता | रु. १००/– प्रति टॅकर |

सबब दर आकारणीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी पटलावर ठेवण्यात येत आहे.

## विषय :– वर्ष २००८–२००९ साठी अग्निशमन सेवा कर व इतर दर निश्चित करणेबाबत

### १) अग्निशमन कर :–

शहरातील आग विझवण्यासाठी व आगी पासुन जिवीत व मालमत्ताचे सरंक्षण करणेसाठी योग्य त्या यंत्रसामुग्रीसह सुसज्ज असे अग्निशमन केंद्र तयार ठेवणे हे महानगरपालिकेचे आद्य कर्तव्य आहे. सदर कर्तव्य पार पाडण्यासाठी करयोग्य मुल्याच्या कमीत कमी १/८ टक्के इतकी व जास्तीत जास्त २ टक्के इतके मुल्य सामान्य करात वाढ करण्याचे प्रयोजन आहे. महानगरपालिकने वित्तीय वर्ष २००७–२००८ साठी करांचे दर निश्चित करतांना अग्निशमन कर २ टक्के दराने आकारण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतु सदर प्रस्ताव महासभेने नामंजुर केला .

वित्तीय वर्ष २००८–२००९ मध्ये अग्निशमन करापोटी २ टक्के आकारणी प्रस्तावित असुन सदर वाढ मालमत्ता करातील दर वाढ करण्याच्या प्रस्तावात समाविष्ठ करण्यात आली आहे.

### अग्निशमन सेवा पुरविण्याचे दर :–

महानगरपालिका हद्‌दीमध्ये तसेच महापालिका हददीबाहेर आगीची सुचना प्राप्त झाल्यानंतर आग विझवण्याची सेवा बजावण्यात येते. सदर सेवा पुरविण्याकामी उल्हासनगर महानगरपालिके तर्फे तत्कालीन नगरपालिका अस्तित्वात असतांना प्रशासकीय ठराव क्र. ६३९ दिनांक ४/६/१९७७ अन्वये खालील प्रमाणे दर आकारणी करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | महापालिका हद्‌दीत निवासी वापरासाठी | : विनामुल्य |
| २) | महापालिका हद्‌दीत अनिवासी वापरासाठी | : रु. ३००/— |
| ३) | महापालिका हद्‌दीबाहरे निवासी वापर | : विनामुल्य |
| ४) | महानगरपालिका हद्‌दीबाहेर अनिवासी वापरासाठी | : रु. ४००/— |

वरील दर वाढ पुढील प्रमाणे करण्याचे प्रस्तावित आहे.

उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित केलेली अग्निशमन करापोटीची वाढ २ टक्के मान्य झाल्यास महापालिका हद्‌दीत निवासी व अनिवासी मालमत्ता धारकांना सदर सेवा विनामुल्य पुरविण्यात येईल अन्यथा खालील प्रमाणे प्रस्ताव मान्य करणेस प्रस्तावित आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | महानगरपालिका हद्‌दीतील निवासी वापर धारकांना | : विनामुल्य |
| २) | महानगरपालिका हद्‌दीतील अनिवासी वापर धारकांना | : रु. ५०० |
| | पुढील प्रत्येक फेरीसाठी | : रु. २५० |
| ३) | महानगरपालिका हद्‌दी बाहरे निवासी वापर | : विनामुल्य |
| ४) | महानगरपालिका हददीबाहेर अनिवासी वापर | : रु १५००/— |
| | पुढील प्रत्येक फेरीसाठी | : रु. २५० |

तरी सदरचा प्रस्ताव पुन्हा स्थायी समिती पुढे ठेवणेसाठी प्रस्तावित करीत आहे.

## वित्तीय वर्ष २००८—२००९ मध्ये विविध करामधील प्रस्तावित दर वाढ व त्यापासून मिळणा—या अपेक्षित उत्पन्नाचा तपशिल दर्शविणारे विवरण पत्र

(आकडे लाखात)

| अक्र | कराचे नाव | सद्याचे प्रचलित दर (%) | प्रस्तावित वाढीव दर (%) | अंदाजित उत्पन्न | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मालमत्ता कर | | | | |
| | अ) सामान्य कर | २६ | ९८ | ३६०० | |
| | ब) मलप्रवाह सविधा लाभ कर | १ | १० | ४५० | |
| | क) पाणी पुरवठा लाभकर | ३ | १० | ३५० | |
| | ड) मलप्रवाह कर | ५ | १० | २५० | |
| | ठ) पथकर | ६ | १० | २०० | |
| | ई) पाणी पट्टी कर | — | १० | २०० | फक्त अनिवासी / वाणिज्य मिळकती साठी ज्यांना नळ जोडणी नाही |
| | फ) अग्निशमन कर | — | २ | १०० | |
| २ | पाणी पुरवठा दर | | | | |
| | अ) आर सी सी व टियर गर्डर बांधकाम | रु. १५० प्रति महा | रु .४५० प्रति महा | ३३८८ | |
| | ब) पाण्याचे छत व विट बांधकाम | रु. ७५ प्रति महा | रु. ३०० प्रति महा | | |
| | क) लफाटा किंवा पाण्याचे किंवा मातीचे बांधकाम | रु. ६० प्रति महा | रु. २०० प्रति महा | | |
| | मिटर प्रमाणे पाणी दर | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ट) निवासी वापर | रु. १२ प्रति १००० लि | रु १५ प्र .१००० .लिटर. | २३ | |
| | ब) वाणिज्य वापर | रु. २६ प्रति १००० लि. | रु. ३० प्र .१००० .लिटर. | | |
| | क) औद्योगिक वापर | रु. २६ प्रति १००० लि. | रु. ३० प्र .१००० .लिटर. | | |
| | सार्वजनीक / धर्मादाय संस्था वापरासाठी | रु. १५ प्रति १००० लि | रु.१८ प्र .१००० .लिटर. | | |
| | **टॅंकर भाडे** | — | रु. २७५ ( ७००० लिटर क्षमता टॅंकर ) | १३७ | |
| | | | रु. ३९५ (१०००० लिटर क्षमता टॅंकर ) | | |
| ३ | अग्निशमन विभागा मार्फत देण्यांत येणारे सेवा शुल्क | प्रस्तावत नमुद | प्रस्तावत नमुद | १ | |
| ४ | जकात | प्रस्तावत नमुद | प्रस्तावत नमुद | २६५ | |
| एकुण :— | | | | ८९६४ | |

**विषय :—** <u>उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाचे सन २००७—२००८ चे सुधारित व २००८ — २००९ चे मूळ अंदाजपत्रक</u> .

प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील पार पाडावयाची कार्ये व कर्तव्ये लक्षात घेता, उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळातर्फे शिक्षण मंडळ ठराव क्रमांक ०३ दिनांक ३/०९/२००७ अन्वये वर्ष २००८—२००९ साठी खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : १४,३४,००,०००/—**
**अंदाजपत्रकीय खर्च रुपये : १४,३४,००,०००/—**

उपरोक्त दर्शविलेल्या एकूण अंदाजात रुपये ६,४३,९०,०००/— शासकीय अनुदान व रक्कम रु. ७,९०,१०,०००/— महापालिकेकडून महापालिका वर्गणी म्हणून अपेक्षित करण्यात आले आहे. परंतु मागील तीन वर्षात शिक्षण मंडळाच्या अंदाजपत्रकातील उत्पन्न व खर्चाच्या प्रत्येक लेखा शिर्षात प्रत्यक्ष झालेला उत्पन्न व खर्चाचा आढावा घेण्यात आला असून त्याची विस्तुत तपशिल दर्शविणारा तक्ता सोबत जोडला आहे. तदुनुषंगाने शिक्षण मंडळाचे वर्ष २००८ — ०९ चे अंदाज पुढील प्रमाणे सुधारित करण्याचे प्रस्तावित आहे.

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : १४,१८,२९,१३५/—**
**अंदाजपत्रकीय खर्च रुपये : १३,५८,९०,०००/—**
**अखेरची शिल्लक रुपये : ५९,३९,१३५/—**

**उपरोक्त खर्चापोटी महापालिकेच्या हिस्सा म्हणून रुपये ७,३४,४५,०००/— ची तरतुद करण्यात आलेली आहे , व शासकिय अनुदान म्हणून रक्कम रु.६,२४,४५,०००/— अपेक्षित धरण्यात आली आहे.**

सबब शिक्षण मंडळाचे सन २००८—२००९ चे अंदाजपत्रक स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्तावीत करीत आहे.

<u>सन २००७ — ०८ चे सुधारित अंदाज</u>

शिक्षण मंडळाचे वर्ष २००७ — ०८ करिता मुळ अंदाजपत्रकीय तरतुद, जमा व खर्चाच्या प्रत्येक लेखा शिर्षात प्रत्यक्ष झालेले उत्पन्न व खर्च (तक्ता सोबत) तसेच महापालिकेची वित्तिय परिस्थिती लक्षात घेता शिक्षण मंडळाचे वर्ष २००७ — ०८ चे अंदाजपत्रक पुढील प्रमाणे सुधारित करण्याचे प्रस्तावित आहे. .

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : १२,८६,९६,१३५/—
अंदाजपत्रकीय खर्च रुपये : १२,४२,५७,०००/—
अखेरची शिल्लक रुपये : ४४,३९,१३५/—

उपरोक्त अंदाजापोटी रक्कम रु. ५,९०,२७,०००/— महापालिका हिस्सा म्हणून मंजूर करणेस प्रस्तावीत करीत आहे

सभापती, श्री. राम पारवानी:—प्रशासनाच्या वतीने आयुक्त साहेबांनी सन २००७—२००८ चा सुधारीत अर्थसंकल्प व सन २००८—०९ च्या अर्थसंकल्पासाठी उत्पन्न व खर्चाचे अंदाज तसेच करांचे दराबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीस सादर केलेला आहे. यावर सर्व पक्षांच्या गटनेत्याशी विचार विनिमय करुन मंगळवार दिनांक १२/२/२००८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता पुन्हा बैठक बोलवली जाईल.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—यासाठी आपली एक बैठक आयोजित करावी लागेल.

सभापती, श्री. राम पारवानी:—त्यासाठी उदया १२.०० वाजता गटनेत्यांची बैठक घेवु त्या बैठकीस कुण्या सदस्यास यायचे असेल तर तो येवु शकेल.

सांयकाळी ५.१५ वाजंता सभा मंगळवार दिनांक १२/२/२००८ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित केल्याचे सभापती श्री. राम पारवानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— १२/२/२००८

**दि. १२/२/२००८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त**

**१२— अ**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक ८/२/२००८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली होती परंतु सदरची सभा स्थगित केल्याने सदरची सभा मंगळवार दिनांक १२/२/२००८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री पारवानी राम (चार्ली) फुंदुमल | सभापती |
| २ | श्री लुंड गोविंदराम डोलुमल | सदस्य |
| ३ | श्री इदनानी जीवन (राजु) चंद्रभान | ——''—— |
| ४ | श्री जाधव सुरेश मधुकर | ——''—— |
| ५ | श्री ठाकुर नरेंद्र (कुमारी) केवलराम | ——''—— |
| ६ | श्री गायकवाड दिलीप दशरथ | ——''—— |
| ७ | श्रीमती रिजवानी सुजाता रमेश | ——''—— |
| ८ | श्रीमती उदासी इंदिरा जमनादास | ——''—— |
| ९ | श्रीमती रावत निलम प्रेमसिंग | ——''—— |
| १० | श्री जग्यासी किशोर | ——''—— |
| ११ | श्री वानखेडे राजेश देवेंद्र | ——''—— |
| १२ | श्री सुपाळे विजय खंडु | ——''—— |
| १३ | श्रीमती निकम लता शांताराम | ——''—— |
| १४ | श्री बठिजा संजय रामचंद्र | ——''—— |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल, २. श्री दवणे नरेंद्र (रवीभाऊ)

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. समीर उन्हाळे, आयुक्त
२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३. श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त
४. श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
५. श्री. मिलींद सावंत, उप—आयुक्त
६. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
८. श्री. बबीश गंगारामानी उप अभियंता, विदयुत
९. श्री. एस.टी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१०.श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा.
११.डॉ. राजा रिजवानी, वैद्यकीय अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव

सांयकाळी ५.०५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

महापालिका सचिव :—सभेची सुरुवात केली जात आहे.

सभापती, श्री. राम पारवानी :—आम्ही आपसामध्ये चर्चा करुन जो निर्णय घेतला आहे त्यानुसार नगरसेवक निधी जो ५ लाख होता तो वाढवुन आता १५ लाख केला आहे. त्यामध्ये सत्ताधारी पक्ष किंवा विरोधी पक्ष असा कोणताही फरक ठेवलेला नाही.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—सर्वसाधारण निधीमध्ये काही रक्कमेची तरतुद केली आहे अथवा नाही?

सभापती, श्री. राम पारवानी :—५३ रस्त्यांची कामे प्रस्तावित केली आहेत. ती टप्प्याटप्प्याने पुर्ण केली जातील. त्याचबरोबर ज्या कुणाच्या घरात शौचालय नसेल त्यास एमएमआरडीएचे निर्मल योजने अंतर्गत साडेचार हजार रुपये तसेच महापालिककेच्यावतीने अडीच हजार असे एकुण सात हजार रुपयांचे अनुदान दिले जाईल. याचबरोबर निर्वाचीत व नामनिर्देशित अशा सर्व ८१ नगरसेवकांना लॅपटॉप दिला जाईल. लॅपटॉप वरुन सर्व सदस्यांना सभा सूचना व इतिवृत्त पुरविले जाईल. त्यामुळे सभा सूचना व इतिवृत्त वाटपाचे सचिव कार्यालयाचे काम काही अंशी कमी होईल.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—लॅपटॉप हाताळणीचे प्रशिक्षण दिले जाईल काय? जे सदस्य अशिक्षित आहेत त्यांचे काय?

सभापती, श्री. राम पारवानी :—काही जकातपात्र वस्तुंच्या जकात दरामध्ये वाढ केल्यामुळे शहरातील व्यापा—यांमध्ये नाराजी पसरली होती त्यामुळे याबाबतीत विचार करण्यासाठी व्यापा—यांच्या प्रतिनिधींबरोबर एक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत विचार विनिमय करुन काही जकात पात्र वस्तुंच्या जकात दरामध्ये वाढ केली आहे तर काही वस्तुंचा जकात दर कमी केला आहे. व्यापारी प्रतिनिधींच्या सहमतीने हा निर्णय घेण्यात आलेला आहे. याचबरोबर मालमत्ता कर आणि पाणीपट्टीच्या दरात कोणतीही वाढ केलेली नाही.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—पाण्याचे टॅकर कधीपर्यंत निशुल्क पुरविणार? पाणी टॅकरवर सुध्दा काहीतरी दर आकारण्यात यावा.

सभापती, श्री. राम पारवानी :—उदयाने विकसित करण्यासाठी दरवर्षी आपण अर्थसंकल्पामध्ये काही निधीची तरतुद करत असतो परंतु नंतर हा निधी दुस—याच कामासाठी वळविला जातो. यासाठी शहरातील प्रमुख व मोठया उदयानांचे विकासासाठी पाच—पाच लाख रुपयांची तरतुद ठेवण्यात येत आहे. त्याचबरोबर ७६ क्रमांकाचा जो प्रभाग आहे (जून्या अंबरनाथचा) त्याप्रभागांत कोणत्याही नागरी सुविधा अदयापपर्यंत पुरविण्यात आलेल्या नाहीत. तो विभाग अंबरनाथ नगरपालिका क्षेत्रामध्ये आहे असे सांगितले जात होते परंतु सदरचा विभाग हा उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात आहे असे अंबरनाथ नगरपालिकेकडुन सांगितले जात असल्याने या दोन्ही पालिकांच्या भुमिकांमुळे या विभागात कोणत्याही नागरी सुविधा उपलब्ध नाहीत. तहसिलदार, उपविभागीय अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार हा विभाग उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रांतर्गत येत असून तशी त्यांनी मार्कींग ही करुन दिली आहे. तेथे रस्ते व विदयुत इत्यादी नागरी सुविधां पुरविण्यासाठी ५० लाखाची विशेष तरतुद ठेवण्यात येत आहे.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—उदयाने विकसित करण्यासाठी तरतुद केली आहे, सपना गार्डन मधुन एक रस्ता गेला असल्याने हे उदयान दोन भागात विभागले आहे. एका भागात जॉगींग पार्क व उदयान आहे. तर दुस—या भागात चिल्ड्रन पार्क आहे. ते विकसित करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये जी तरतुद केली आहे ती कमी असल्याने दुप्पट केली जावी.

सदस्य श्री. जीवन इदनानी:—७६ क्रमांकाचा तो विभाग अंबरनाथ नगरपालिका क्षेत्राचा आहे. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्राचा नाही. असे सांगितले जात होते. आता तहसिलदारांनी सिमें बाबतची मार्किंग करुन दिलेली आहे. त्याठिकाणी रस्ते वगैरे कोणत्याही नागरी सुविधा नाहीत त्यासाठी या अर्थसंकल्पामध्ये एक विशेष तरतुद ठेवली जावी.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—त्या ठिकाणी मी स्वत: जावुन पाहिले आहे. काहीही काम झालेले नाही. यासाठी या अर्थसंकल्पामध्ये २५ ते ५० लाखाची तरतुद करण्यात यावी.

सदस्य श्री. राजेश वानखेडे:—पाणी टॅकर भाडे कामी किती रक्कम आकारणार आहात?

सदस्य श्री. गोविंदराम लुंड:—मागील ४ दिवसापासुन मी पाणी टॅकरची मागणी करत आहे. परंतु अदयापही मला पाणी टॅकर मिळालेला नाही. ज्या ठिकाणी नळाला पाणी येत नाही त्याठिकाणी नविन पाईप लाइन टाकुन दिली जावी. तसेच पाणी टॅकर पुरविण्यासाठी सव्वाशे रुपय शुल्क आकारले जावे.

सभापती, श्री. राम पारवानी :—शहरास टॅकरमुक्त करावयाचे आहे त्यासाठी काही नविन जलवाहिन्या टाकायच्या आहेत त्याचबरोबर ज्या जुन्या जलवाहिन्या आहेत त्या बदली करावयाच्या आहेत हे काम झाल्यानंतर पुरेश्या दाबाने पाणी पुरवठा होवु शकेल. व शहर टॅकरमुक्त होईल.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—श्री. गणेश मुर्ती विर्सजनासाठी गणेशघाट व नवरात्र उत्सवात दुर्गा देवी मुर्तीच्या विर्सजनासाठी दुर्गाघाट अशी व्यवस्था नसल्याने व अर्थसंकल्पात याकामी तरतुद न ठेवल्याने ऐनवेळी बराचसा खर्च होतो यासाठी या वर्षापासुन अर्थसंकल्पामध्ये चार ते पाच लाखाची तरतुद ठेवली जावी. अशा या कामांसाठी आपण निधीची तरतुद करत नाहीत मात्र इतर कामांसाठी आपण निधीची तरतुद ठेवत असतो.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—पाणी पुरवठयासाठी आपणांस यावर्षी निधी वाढवावा लागेल. कारण की मागील वर्षी यासाठी तरतुद केलेला निधी संपल्यामुळे पाणी पुरवठयासाठी यावर्षी निधी वाढवावा लागेल असे मागील स्थायी समितीच्या सभेत मा. आयुक्त साहेबांनी सांगितले आहे. त्यानुसार पाणी पुरवठयासाठी या वर्षी अधिकाधिक रक्कम ठेवली जावी.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—नैसर्गीक आपत्तीच्या वेळी नागरीकांना आर्थिक मदत करण्यासाठी या अर्थसंकल्पात काही तरतुद केली आहे किंवा नाही? मध्यंतरी नैसर्गीक आपत्तीच्या घटना घडल्यामुळे आपत्तीग्रस्तांना मदत करण्यासाठी अर्थसंकल्पात पुरेशी तरतुद नसल्यामुळे फक्त ५०—५० हजार रुपये आर्थिक मदत देण्यात आलेली आहे. या ५० हजारामध्ये आपत्तीग्रस्त आपले घरदार कसे चालवु शकतील? नैसर्गीक आपत्तीसाठी जास्तीत जास्त रक्कमेची तरतुद करण्यात यावी.

सदस्य श्री. जीवन इदनानी:— नैसर्गीक आपत्तीग्रस्त कुटुंबियांना महापौर, उपमहापौर निधीतुन आर्थिक मदत देण्यात यावी असा आम्ही विचार केला आहे. जसे की, मुख्यमंत्री निधी, उपमुख्यमंत्री निधी असतो त्या निधीतुन आपत्तग्रस्तांना मदत केली जाते. त्याप्रमाणे उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील आपत्तग्रस्तांना महापौर, उप—महापौर निधीतुन आर्थिक मदत देता यावी.

सभापती, श्री. राम पारवानी :—नैसर्गीक आपत्तीच्या प्रसंगी आयुक्त साहेब शहरात असले पाहिजेत. यासाठी आयुक्तांना राहण्यासाठी व मा. महापौरांना राहण्यासाठी महापालिकेच्यावतीने बंगले बांधण्यात यावेत. त्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद ठेवली जावी.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—जे लोक बेघर होतात त्यांना मदत करण्यासाठी अर्थसंकल्पात पुरेश्या रक्कमेची तरतुद ठेवली पाहिजे.

सभापती, श्री. राम पारवानी :—आपत्तग्रस्तांना मदत करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये पुरेश्या रक्कमेची तरतुद ठेवली आहे. स्थायी समितीने तयार केलेला अर्थसंकल्प उपमुख्य लेखा अधिकारी श्री. हरेश इदनानी हे आपणांस वाचुन दाखवतील.

श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):—प्रशासनाच्या वतीने मा. आयुक्तांनी स्थायी समितीस सादर केलेल्या उत्पन्न व खर्चाच्या अंदाजावर स्थायी समिती सदस्यांनी सखोल अभ्यास करुन लेखा शिर्षांमधील तरतुदीमध्ये वाढ किंवा घट करण्यासाठी जे बदल सुचविले आहेत ते मी वाचुन दाखवितो...........

१) पाणी टॅंकर भाडे :—

पाणी टॅंकर भाडयाची प्रस्तावीत आकारणी मान्य करण्यास शिफारस करीत नाही.

२) मालमत्ता कर :—

मालमत्ता करात प्रस्तावीत आकारणी मान्य करण्यास शिफारस करीत नाही.

३) पाणी पट्टी दर :—

**पाणी पट्टी दरात** प्रस्तावीत आकारणी मान्य करण्यास शिफारस करीत नाही.

४) अग्निशमन सेवा शुल्क :—

**अग्निशमन सेवा शुल्क दरात** प्रस्तावीत आकारणी मान्य करण्यास शिफारस करीत नाही.

४) जकात दर :—

शहरात आयात होणा—या जकात पात्र मालाच्या खालील गटात शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहून फेरबदर करण्यास शिफारस करीत आहे

(रुपये ०००)

| वस्तु गट क्र. | वस्तुचे नांव | किमान दर (%) | कमाल दर (%) | प्रचलित दर (%) | प्रशासना मार्फत प्रस्तावित दर (%) | स्थायी समितीने शिफारस केलेले दर | वार्षिक वाढ / घट | अभिकर्त्याच्या कालावधीत वाढ किंवा घट (१/४/०८ ते १८/१/०९) २९३ दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५३ क | लेसस, टेप्स, लकडी व धातूच्या रिंगण ...इ. | ०.५० | ४.०० | ३.५० | ४.०० | ३.०३ | —८८७४.०० | —७१२३.५१ |
| ७१ | लोखंड व पोलाद | ०.५० | ४.०० | ४.०० | ४.०० | ३.६२ | —३८६१.७५ | —३०९९.९८ |
| ४० ब | स्र्व प्रकारचे रसायने, सोडियम सल्फेट ... इ. | ०.५० | ४.०० | ४.०० | ४.०० | ३.७२ | —१९३३.१२ | —१५५१.७९ |
| ७७ | अलोद धातू म्हणजेच पितळ, तांबे टिन इ.... | ०.५० | ४.०० | २.५० | ४.०० | २.०२ | —५४६०.६७ | —४३८३.५० |
| ३० ब | कोल कोक | ०.५० | ४.०० | २.१० | २.१० | ४.०० | +५७४७.०५ | +४६१३.३८ |
| ३८ ब | क्रुड ऑयल | ०.५० | ४.०० | २.०० | २.०० | ४.०० | +७९६७.०० | +६३९५.४२ |
| ४० अ | इन ॲडेबल फॅट | ०.५० | ४.०० | १.७५ | १.७५ | ४.०० | +१५७८.८६ | +१२६७.४१ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४८ | पेन्टस व डिसटंबर | ०.५० | ४.०० | ३.५० | ३.५० | ४ ०० | +७१३.७१ | +५७२.९३ |
| ४९ | ग्लास चायनावेअर | ०.५० | ४.०० | २.५० | २.५० | ४.०० | +१४३९.०० | +११५५.१४ |
| ५१ | टिंबर | ०.५० | ४.०० | ३.५० | ३.५० | ४.०० | +२८९.१४ | +२३२.११ |
| ७० ब | रबर | ०.५० | ४.०० | २.५० | २.५० | ४.०० | +२०४०.६० | +१६३८.०७ |
| ७८ | डाईस व प्रिटिंग | ०.५० | ४.०० | १.७५ | १.७५ | २.५० | +३८०.१४ | +३०५.१६ |
| | एकूण | | | | | | +२५.९६ | +२०.८४ |

**दिनांक** १८ जानेवारी २००८ पासून १ वर्षाच्या कालावधीसाठी जकात वसुलीकरिता खाजगी अभिकर्त्याची नेमणूक करण्यात आली आहे. फेरबदलामूळे होणारे वाढीव उत्पन्न जकात अभिकर्त्याककडून कराराच्या उर्वरीत कालावधीसाठी वसुल करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

**नगर** विकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक एमएमए–१०९४/सीआर३/९४/नवि–३२ दिनांक २३ मार्च, १९९४ नुसार जकात अभिकर्त्याची नेमणूकीची शेवटची तारीख ३१ मार्च असणे आवश्यक आहे . त्यानुषंगाने दिनांक १८/१/२००९ रोजी संपुष्ठात येणारा जकात अभिकर्त्याचा कराराचा कालावधी ३१ मार्च २००९ पर्यंत वाढविणेस शिफारस करण्यात येत आहे . सदर कालावधी वाढीमूळे फरकाची रक्कम जकात अभिकर्त्याकडून वसूल करण्यात यावी व आवश्यक तो पुरक करार जकात अभिकर्त्याबरोबर करण्यात यावा .

**शिक्षण मंडळाचे सन २००७ – ०८ चे सुधारित व २००८ – ०९ चे मुळ अंदाजपत्रक.**

ही स्थायी समिती शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रक पुढीलप्रमाणे मंजुर करण्यास शिफारस करीत आहे.

सन २००७ – ०८ चे सुधारित अंदाज

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये** : १२८६९६१३५/–

**अंदाजपत्रकीय खर्च रुपये** : १२४२५७०००/–

**अखेरची शिल्लक** : ४४३९१३५/–

**उपरोक्त** अंदाजापोटी रक्कम रु. ५९०२७०००/– महापालिका हिस्सा म्हणून मंजूर करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

सन २००८ – ०९ चे मुळ अंदाजपत्रक. :

**मागील ३ वर्षात शिक्षण मंडळाच्या अंदाजपत्रकातील उत्पन्न व खर्चाच्या प्रत्येक लेखा शिर्षात प्रत्यक्ष झालेला उत्पन्न व खर्चाचा आढावा घेवून** वर्ष २००८ –०९ चे अंदाज पुढीलप्रमाणे सुधारित करण्याचे प्रस्तावित आहे.

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये** : १४,१८,२९,१३५/–

**अंदाजपत्रकीय खर्च रुपये** : १३,५८,९०,०००/–

**अखेरची शिल्लक** : ५९,३९,१३५/–

**उपरोक्त** अंदाजात रक्कम रुपये ७३४४५०००/– महानगरपालिकेकडून अनुदान व शासकिय अनुदान म्हणून रक्कम रु. ६२४४५०००/– मंजुर करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

महानगरपालिकेचे सन २००७ – ०८ चे सुधारित अंदाजपत्रक :

आयुक्तांनी २००७–२००८ करिता पुढीलप्रमाणे उत्पन्न व खर्चाचे जे सुधारीत अंदाज सादर केले आहे ते मंजुर करण्यास शिफारस करी आहे.

(आकडे हजारात)

| पान क्रमांक | उत्पन्न आयुक्तांचे अंदाज | | १४६८८७१ | खर्च आयुक्तांचे अंदाज | | १४६७९३९ | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३६ | निर्मल एमएमआर योजनेअंतर्गत अनुदान | + | १०००० | निर्मल एमएमआर योजने अंतर्गत | + | १०००० | ४८ |
| एकूण | | | १४७८८७१ | | | १४७७९३९ | |
| अखेरची शिल्लक | | | | | | ९ | |

उत्पन्न : १४७.८८ कोटी

खर्च : १४७.७९ कोटी

अखेरची शिल्लक : ९ लाख

<u>महानगरपालिकेचे सन २००८ – २००९ चे मुळ अंदाजपत्रक :</u>

आयुक्तांनी २००८–२००९ करिता उत्पन्न व खर्चाचे जे अंदाज सादर केले आहेत त्यात पुढील प्रमाणे फेरफार करुन अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यात येत आहे. (आकडे हजारात)

| पान क्र | उत्पन्न ( आयुक्तांचे अंदाज) | | ३२६७६४२ | खर्च ( आयुक्तांचे अंदाज) | | ४१६६४२६ | पान क्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | सर्व साधारण कर | + | १२८८०० | शिखण कर परतावा | + | ४२००० | ३१ |
| २ | महापालिका शिक्षण कर | + | २५२०० | रोजगार हमी कर परतावा | + | ५६०० | ३१ |
| २ | वृक्ष कर | + | २८०० | वेतन राखीव निधी | + | २००० | १३ |
| २ | पथ कर | + | ३०८०० | भविष्य निर्वाह निधी अंशदान | + | १३२८ | १३ |
| ३ | विकास अधिभार शुल्क | + | २२५०० | नगरसेवक निधीतून विकास कार्य | + | ३८००० | २८ |
| ६ | शिक्षण करावरील सुट | + | ८४० | नवीन रस्ते बनविणे | + | ३५००० | २७ |
| ६ | रोजगार हमी करावरील सुट | + | ११२ | प्र.क्र. ७६ मधिल रस्ते व इ. सुविधा | + | २५०० | २७ |
| ९ | शिक्षण कर | + | ४२००० | उद्याने सौंदर्यीकरण | - | २५०० | १९ |
| ९ | रोजगार हमी कर | + | ५६०० | गोल मै. ,सपना,दशहरा,रोटरी,उमपा मु. उद्याने सो. | + | २५०० | १९ |
| ७ | महापालिका मालमत्ता विनियोग | + | ४०००० | पुतळे बनविणे | + | १००० | २७ |
| | | | | एमआयडीसी पाणी पुरवठा देयके | - | २०२५०९ | ४१ |
| | | | | एमआयडीसी थकबाकी देयके | - | ८५००० | ४१ |
| | | | | निर्मल एमएमआर योजनेतर्गत नवीन | + | ३५०००० | ४८ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शौचालये बनविणे . | | | |
| ४ | रस्ते खोदाई फी | + | ७५०० | निर्मल एमएमआर मनपा अंशदान | + | १००० | ४८ |
| ३४ | पाणी पुरवठा वसुली (कर) | + | १९५००० | नगरसेवकांना मानधन सभा व इतर भत्ते | + | ५००० | २४ |
| ३४ | पाणी पुरवठा वसुली (पा.पु.) | + | २००००० | श्रीगणेश विसर्जन घाट बनविणे | + | १००० | २७ |
| ३४ | पाणी पुरवठा लाभ कर | + | १४००० | | | | |
| ३४ | मल प्रवाह सुविधा लाभकर | + | ५६०० | | | | |
| ३४ | मलप्रवाह कर | + | २५२०० | | | | |
| ३६ | निर्मल एमएमआर योजनेअंतर्गत अनुदान | + | ३५०००० | | | | |
| | | | | | | | |
| | एकूण | | ४३६३५९४ | | + | ४३६३३४५ | |
| | अखेरची शिल्लक | | | | + | २.४९ | |

सदस्य श्री. गोविंदराम लुंड:—२००३ मध्ये समिती सभापती म्हणून ज्यांची निवड झाली होती त्यांना वाहनभत्ता देणे बंद झाले होते. त्यांना वाहनभत्ता देण्याकामी या अर्थसंकल्पामध्ये तरतुद ठेवली जावी. श्री. दिलीप गायकवाडजी, टॅकरद्वारे करण्यात येणा—या पाणी पुरवठयासाठी १२५ रुपये शुल्क आकारले जावे किंवा नाही?

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—पाणी टॅकरसाठी शुल्क आकारले जावे. शुल्क आकारल्यामुळे टॅकरमागणीची संख्या कमी होईल. महापालिका टॅकरमुक्त झाली पाहिजे. टॅकरवाले येथुनच पाणी घेवुन पुरवितात आणि त्यावर पैसे कमावतात.

सदस्य श्री. जीवन इदनानी:—महापालिका टॅकरमुक्त झाली पाहिजे. टॅकरमुक्त महाराष्ट्र अशी शिवसेना—भाजपा युतीच्या काळात घोषणा करण्यात आली होती. आता तर महायुती सत्तेवर आहे. शहर टॅकरमुक्त झालेच पाहिजे.ज्या ठिकाणी नळाला पुरेश्या दाबाने पाणी येत नाही किंवा जेथे पाण्याची समस्या आहे त्याठिकाणी काहीतरी पाणी पुरवठयाची सोय केली पाहिजे. यासाठी यावर गंभीरतेने विचार केला पाहिजे टॅकरवर नंतरसुध्दा आपण शुल्क आकारु शकतो. परंतु पाणी पुरवठयाच्या कामास अग्रक्रम दिला पाहिजे. वाहनभत्त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

सदस्य श्री. गोविंदराम लुंड:—पाणी पुरवठयाच्या कामांना अग्रक्रम दिलाच पाहिजे परंतु जेथे टॅकरद्वारे पाणी पुरविले जाते तेथे प्रति टॅकर २०० रुपये शुल्क आकारले जावे असे मी मागील वेळेस म्हटले होते. आता मी असे म्हणतो की, पाणी टॅकरसाठी किमान सव्वाशे रुपये तरी शुल्क आकारले जावे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—पाणी टॅकरसाठी शुल्क आकारले पाहिजे. आमच्या एका सदस्याने वर्तमानपत्रात त्याचबरोबर केबलवर सुध्दा बातमी दिली आहे की, टॅकरमध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झाला आहे. त्यास आपण काय उत्तर देणार?

सदस्य श्री. जीवन इदनानी:—त्यास उत्तर दिले जाईल. आपल्या वरिष्ठांना सांगुन त्यास समजावले जाईल. विचार विर्मश केला जाईल व असे न करण्याबाबतीत त्यांना सांगितले जाईल.

सदस्य श्री. संजय बठिजा:—आपणाकडे एका विभागामध्ये १२—१२ तास पाणी येते माझ्या विभागात काही ठिकाणी फक्त २ तास पाणी येते. काही ठिकाणी समांतर नळजोडण्या घेतल्या आहेत. एकाच ठिकाणाहुन आनंदनगर कॅम्प नं. ३, खेमाणी याठिकाणी पाणी पुरवठा केला जातो त्यामुळे काही ठिकाणी दोन तास सुध्दा पाणी येत नाही. यासाठी नविन जलवाहिनी टाकली तर ही समस्या दुर होवु शकेल.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—**श्री. सेल्वन, जलवाहिनी टाकण्याकामीच्या प्रस्तावाबाबत सन्माननिय सदस्य श्री. संजय बठिजा यांना माहिती दिली जावी.

**श्री. सेलवन (उप अभियंता, पाणी पुरवठा):—**नविन जलवाहिनी टाकण्यासाठी तसेच जुन्या जलवाहिन्या काढुन त्याठिकाणी नविन जलवाहिन्या टाकण्यासाठी १ कोटी ४० लाख रुपयांची तरतुद करण्यात आलेली आहे. या तरतुदीमधुन आपल्या प्रभागात जलवाहिनी टाकण्याचे ४० लाख खर्चाचे जे काम आहे ते केले जाईल.

**सभापती, श्री. राम पारवानी :—**श्री. सेल्वन साहेब, जलवाहिनी टाकण्यासाठी आपण जे प्रस्ताव तयार केले आहेत त्यामध्ये आणखी एक प्रस्ताव समाविष्ट करा. श्री. किशोर जग्यासी यांच्याही प्रभागात पाणी येत नाही. तेथे जलवाहिनी टाकण्याकामीचा प्रस्ताव तयार करावा.

**सदस्य श्री. जीवन इदनानी:—**पाणी पुरवठयाच्या कामांना अग्रक्रम दिला जावा.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—**पाणी टॅंकरवर शुल्क आकारण्याकामी विचार विनिमय करण्यासाठी ८—१० दिवसात स्वतंत्र बैठक बोलाविली जावी.

**सदस्य श्री. राजेश वानखेडे:—**प्रभाग क्र. ७६ मध्ये नागरी सुविधांसाठी २५ लाखांची तरतुद करण्या कामी सांगण्यात आले होते त्याचे काय झाले?

**श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी) :—**त्यासाठी तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच श्री. गणेश विर्सजनासाठी गणेश घाट तयार करण्याकामी १० लाखाची तरतुद ठेवण्यात आली आहे.

**महापालिका सचिव :—**हा प्रस्ताव पास समजायचा काय? सर्वसंमतीने पास? कुणाला काही हरकत?

**सभापती, श्री. राम पारवानी :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. १ :—** करांचे दर प्रस्तावित करणे व सन २००८—०९ साठी अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे.

**प्रस्तावना**

**सन** २००७—२००८ या वर्षा करिता अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे उत्पन्न रू. ३९३.३६ कोटी आणि खर्च रू. ३९३.२० कोटी अपेक्षित होता. अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे उत्पन्न न झाल्याने खर्चात कपात करणे आवश्यक असून सदर वर्षात उत्पन्नाचा खर्चाशी मेळ बसविण्यासाठी आयुक्तांनी सन २००७—२००८ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात येणे प्रमाणे सुधारणा प्रस्तुत केलेली आहे.

**उत्पन्न : १४६.८८ कोटी**

**खर्च : १४६.८६ कोटी**

**मुंबई** प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या तरतुदी प्रमाणे आयुक्तांनी सन २००८—२००९ करिता उत्पन्न व खर्च यांचे अंदाज तयार केले असून ते खालील प्रमाणे आहे.

**उत्पन्न : ३२६.७६ कोटी**

**खर्च : ४१६.६४ कोटी**

**वित्तीय** वर्ष २००८ —२००९ चे अपेक्षित उत्पन्न व खर्च लक्षात घेता रहाणारी तुट रू. ८९.८८ **कोटी,** जकात, मालमत्ता कर, पाणी पट्टी, टॅंकर भाडे व इतर फी च्या दरामध्ये वाढ करणेचा स्वतंत्र प्रस्ताव आयुक्तांनी पुस्तीकेच्या स्वरुपात स्थायी समितीपुढे सादर केला आहे.

**शिक्षण मंडळाचे सन २००८ — ०९ चे मुळ अंदाजपत्रक. :**

**मुंबई** प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील पार पाडावयाची कार्य व कर्तव्य लक्षात घेता उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळातर्फे ठराव: ३ दिनांक ३.९.२००७ अन्वये खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| **अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये** | : १४३४०००००/— |
| **अंदाजपत्रकीय खर्च रुपये** | : १४३४०००००/— |

उपरोक्त दर्शविलेल्या एकुण अंदाजात रुपये ६४३९००००/— शासकीय अनुदान अपेक्षित असुन उर्वरित रक्कम रुपये ७९०१००००/— महानगरपालिकेकडून महापालिका अनुदान म्हणून अदा करावयाची असल्याने ती ही तरतुद करण्यात आली होती. परंतु मागील ३ वर्षात शिक्षण मंडळाच्या अंदाजपत्रकातील उत्पन्न व खर्चाच्या प्रत्येक लेखा शिर्षात प्रत्यक्ष झालेला उत्पन्न व खर्चाचा आढावा घेवून वर्ष २००८ —०९ चे अंदाज पुढीलप्रमाणे सुधारित करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| **अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये** | : १४१८२९१३५/— |
| **अंदाजपत्रकीय खर्च रुपये** | : १३५८९००००/— |
| **अखेरची शिल्लक** | : ५९३९१३५/— |

उपरोक्त अंदाजात रक्कम रुपये ७३४४५०००/— महानगरपालिकेकडून अनुदान म्हणून अदा करावयाची आहे. व शासकिय अनुदान म्हणून रक्कम रु. ६२४४५०००/— अपेक्षित करण्यात आले आहे.

<u>सन २००७ — ०८ चे सुधारित अंदाज</u>

वर्ष २००७ — ०८ करिता शिक्षण मंडळातर्फे खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते.

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रु :— १२,६९,१५,५८०/—**

**अंदाजपत्रकीय खर्च रु :— ११,६७,७१,३८४/—**

शिक्षण मंडळाचे वर्ष २००७ — ०८ करिता मुळ अंदाजपत्रकिय तरतुद, जमा व खर्चाच्या प्रत्येक लेखा शिर्षात उपलब्ध करुन देण्यात आलेला प्रत्यक्ष झालेले उत्पन्न व खर्च तसेच महापालिकेची वित्तिय परिस्थिती लक्षात घेता शिक्षण मंडळाचे वर्ष २००८ — ०९ चे अंदाजपत्रक पुढील प्रमाणे सुधारित करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| **अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये** | : १२,८६,९६,१३५ /— |
| **अंदाजपत्रकीय खर्च रुपये** | : १२,४२,५७,०००/— |
| **अखेरची शिल्लक** | : ४४,३९,१३५/— |

**उपरोक्त** अंदाजापोटी रक्कम रु. ५९०२७०००/— महापालिका हिस्सा म्हणून मंजूर करण्याचे प्रस्तावित आहे.

**सबब** शिक्षण मंडळाचे सन २००७ — २००८ व २००८ — २००९ चे अंदाजपत्रक स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्तावित.

शिक्षण मंडळाचे सन २००७ — २००८ चे सुधारित व २००८ — २००९ चे मुळ अंदाजपत्रक , आयुक्तांचे महानगरपालिकेसाठी सन २००७—२००८ चे सुधारीत अंदाजपत्रक, सन २००८—२००९ चे जमा—खर्चाचे अंदाज, कर व दर वाढीचे प्रस्ताव तसेच प्रशासनाकडून तपशिलवार माहिती घेवून अधिनियमाचे कलम ९६ नुसार अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणेस प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १३९ <u>दिनांक:— १२.२.२००८</u>

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

**ही** स्थायी समिती शिक्षण मंडळाचे सन २००७ – २००८ चे सुधारित व २००८ – २००९ चे मुळ अंदाजपत्रक , आयुक्तांचे महानगरपालिकेसाठी सन २००७–२००८ चे सुधारीत अंदाजपत्रक, आयुक्तांकडून विविध करामधील वाढीसंबंधी प्रस्ताव, आयुक्तांचे सन २००८–२००९ चे जमा–खर्चाचे अंदाज तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९६ मधील सर्व तरतूदी व सभेत चर्चेअंती सुचविलेला फेरफार विचारात घेवून विविध कराचे दरात वाढ करणेबाबत खालील प्रमाणे शिफारस करीत आहे.

१) **पाणी टॅंकर भाडे :–**

पाणी टॅंकर भाडयाची प्रस्तावीत आकारणी मान्य करण्यास शिफारस करीत नाही.

२) **मालमत्ता कर :–**

मालमत्ता करात प्रस्तावीत आकारणी मान्य करण्यास शिफारस करीत नाही.

३) **पाणी पट्टी दर** :–

**पाणी पट्टी दरात** प्रस्तावीत आकारणी मान्य करण्यास शिफारस करीत नाही.

४) **अग्निशमन सेवा शुल्क :–**

**अग्निशमन सेवा शुल्क दरात** प्रस्तावीत आकारणी मान्य करण्यास शिफारस करीत नाही.

४) जकात दर :–

शहरात आयात होणा–या जकात पात्र मालाच्या खालील गटात शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहून फेरबदर करण्यास शिफारस करीत आहे

(रुपये ०००)

| वस्तु गट क्र. | वस्तुचे नांव | किमान दर (%) | कमाल दर (%) | प्रचलित दर (%) | प्रशासना मार्फत प्रस्तावित दर (%) | स्थायी समितीने शिफारस केलेले दर | वार्षिक वाढ / घट | अभिकर्त्याच्या कालावधीत वाढ किंवा घट (१/४/०८ ते १८/१/०९) २९३ दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५३ क | लेसस, टेप्स, लकडी व धातूच्या रिंगण ...इ. | ०.५० | ४.०० | ३.५० | ४.०० | ३.०३ | –८८७४.०० | –७१२३.५१ |
| ७१ | लोखंड व पोलाद | ०.५० | ४.०० | ४.०० | ४.०० | ३.६२ | –३८६१.७५ | –३०९९.९८ |
| ४० ब | स्र्व प्रकारचे रसायने, सोडियम सल्फेट ... इ. | ०.५० | ४.०० | ४.०० | ४.०० | ३.७२ | –१९३३.१२ | –१५५१.७९ |
| ७७ | अलोद धातू म्हणजेच पितळ, तांबे टिन इ.... | ०.५० | ४.०० | २.५० | ४.०० | २.०२ | –५४६०.६७ | –४३८३.५० |
| ३० ब | कोल कोक | ०.५० | ४.०० | २.१० | २.१० | ४.०० | +५७४७.०५ | +४६१३.३८ |
| ३८ ब | क्रुड ऑयल | ०.५० | ४.०० | २.०० | २.०० | ४.०० | +७९६७.०० | +६३९५.४२ |
| ४० अ | इन ॲडेबल फॅट | ०.५० | ४.०० | १.७५ | १.७५ | ४.०० | +१५७८.८६ | +१२६७.४१ |
| ४८ | पेन्टस व डिसटंबर | ०.५० | ४.०० | ३.५० | ३.५० | ४ ०० | +७१३.७१ | +५७२.९३ |
| ४९ | ग्लास चायनावेअर | ०.५० | ४.०० | २.५० | २.५० | ४.०० | +१४३९.०० | +११५५.१४ |
| ५१ | टिंबर | ०.५० | ४.०० | ३.५० | ३.५० | ४.०० | +२८९.१४ | +२३२.११ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७० ब | रबर | ०.५० | ४.०० | २.५० | २.५० | ४.०० | +२०४०.६० | +१६३८.०७ |
| ७८ | डाईस व प्रिटिंग | ०.५० | ४.०० | १.७५ | १.७५ | २.५० | +३८०.१४ | +३०५.१६ |
| | एकूण | | | | | | +२५.९६ | +२०.८४ |

**दिनांक** १८ जानेवारी २००८ पासून १ वर्षाच्या कालावधीसाठी जकात वसुलीकरिता खाजगी अभिकर्त्याची नेमणूक करण्यात आली आहे. फेरबदलामूळे होणारे वाढीव उत्पन्न जकात अभिकर्त्याककडून कराराच्या उर्वरीत कालावधीसाठी वसुल करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

**नगर** विकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक एमएमए–१०९४/सीआर३/९४/नवि–३२ दिनांक २३ मार्च, १९९४ नुसार जकात अभिकर्त्याची नेमणूकीची शेवटची तारीख ३१ मार्च असणे आवश्यक आहे . त्यानुषंगाने दिनांक १८/१/२००९ रोजी संपुष्ठात येणारा जकात अभिकर्त्याचा कराराचा कालावधी ३१ मार्च २००९ पर्यंत वाढविणेस शिफारस करण्यात येत आहे . सदर कालावधी वाढीमूळे फरकाची रक्कम जकात अभिकर्त्याकडून वसूल करण्यात यावी व आवश्यक तो पुरक करार जकात अभिकर्त्याबरोबर करण्यात यावा .

**शिक्षण मंडळाचे सन २००७ – ०८ चे सुधारित व २००८ – ०९ चे मुळ अंदाजपत्रक.**

ही स्थायी समिती शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रक पुढीलप्रमाणे मंजुर करण्यास शिफारस करीत आहे.

सन २००७ – ०८ चे सुधारित अंदाज

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये** : १२८६९६१३५/–

**अंदाजपत्रकीय खर्च रुपये** : १२४२५७०००/–

**अखेरची शिल्लक** : ४४३९१३५/–

**उपरोक्त** अंदाजापोटी रक्कम रु. ५९०२७०००/– महापालिका हिस्सा म्हणून मंजूर करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

सन २००८ – ०९ चे मुळ अंदाजपत्रक. :

**मागील ३ वर्षात शिक्षण मंडळाच्या अंदाजपत्रकातील उत्पन्न व खर्चाच्या प्रत्येक लेखा शिर्षात प्रत्यक्ष झालेला उत्पन्न व खर्चाचा आढावा घेवून** वर्ष २००८ –०९ चे अंदाज पुढीलप्रमाणे सुधारित करण्याचे प्रस्तावित आहे.

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये** : १४,१८,२९,१३५/–

**अंदाजपत्रकीय खर्च रुपये** : १३,५८,९०,०००/–

**अखेरची शिल्लक** : ५९,३९,१३५/–

**उपरोक्त अंदाजात** रक्कम रुपये ७३४४५०००/– महानगरपालिकेकडून अनुदान व शासकिय अनुदान म्हणून रक्कम रु. ६२४४५०००/– मंजुर करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

महानगरपालिकेचे सन २००७ – ०८ चे सुधारित अंदाजपत्रक :

आयुक्तांनी २००७–२००८ करिता पुढीलप्रमाणे उत्पन्न व खर्चाचे जे सुधारीत अंदाज सादर केले आहे ते मंजुर करण्यास शिफारस करी आहे. **(आकडे हजारात)**

| पान क्रमांक | उत्पन्न आयुक्तांचे अंदाज | | १४६८८७१ | खर्च आयुक्तांचे अंदाज | | १४६७९३९ | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३६ | निर्मल एमएमआर योजनेअंतर्गत अनुदान | + | १०००० | निर्मल एमएमआर योजने अंतर्गत | + | १०००० | ४८ |
| एकूण | | | १४७८८७१ | | | १४७७९३९ | |

| अखेरची शिल्लक | | | | | | ९ | |
|---|---|---|---|---|---|---|---|

उत्पन्न : १४७.८८ कोटी

खर्च : १४७.७९ कोटी

अखेरची शिल्लक : ९ लाख

महानगरपालिकेचे सन २००८ – २००९ चे मुळ अंदाजपत्रक :

आयुक्तांनी २००८–२००९ करिता उत्पन्न व खर्चाचे जे अंदाज सादर केले आहेत त्यात पुढील प्रमाणे फेरफार करुन अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यात येत आहे. **(आकडे हजारात)**

| पान क्र | उत्पन्न ( आयुक्तांचे अंदाज) | | ३२६७६४२ | खर्च ( आयुक्तांचे अंदाज) | | ४१६६४२६ | पान क्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | सर्व साधारण कर | + | १२८८०० | शिखण कर परतावा | + | ४२००० | ३१ |
| २ | महापालिका शिक्षण कर | + | २५२०० | रोजगार हमी कर परतावा | + | ५६०० | ३१ |
| २ | वृक्ष कर | + | २८०० | वेतन राखीव निधी | + | २००० | १३ |
| २ | पथ कर | + | ३०८०० | भविष्य निर्वाह निधी अंशदान | + | १३२८ | १३ |
| ३ | विकास अधिभार शुल्क | + | २२५०० | नगरसेवक निधीतून विकास कार्य | + | ३८००० | २८ |
| ६ | शिक्षण करावरील सुट | + | ८४० | नवीन रस्ते बनविणे | + | ३५००० | २७ |
| ६ | रोजगार हमी करावरील सुट | + | ११२ | प्र.क्र. ७६ मधिल रस्ते व इ. सुविधा | + | २५०० | २७ |
| ९ | शिक्षण कर | + | ४२००० | उद्याने सौंर्दयीकरण | - | २५०० | १९ |
| ९ | रोजगार हमी कर | + | ५६०० | गोल मै. ,सपना,दशहरा,रोटरी,उमपा मु. उद्याने सो. | + | २५०० | १९ |
| ७ | महापालिका मालमत्ता विनियोग | + | ४०००० | पुतळे बनविणे | + | १००० | २७ |
| | | | | एमआयडीसी पाणी पुरवठा देयके | - | २०२५०९ | ४१ |
| | | | | एमआयडीसी थकबाकी देयके | - | ८५००० | ४१ |
| | | | | निर्मल एमएमआर योजनेतर्गंत नवीन शौचालये बनविणे . | + | ३५०००० | ४८ |
| ४ | रस्ते खोदाई फी | + | ७५०० | निर्मल एमएमआर मनपा अंशदान | + | १००० | ४८ |
| ३४ | पाणी पुरवठा वसुली (कर) | + | १९५००० | न्गरसेवकांना मानधन सभा व इतर भत्ते | + | ५००० | २४ |
| ३४ | पाणी पुरवठा वसुली (पा. पु.) | + | २००००० | श्रीगणेश विसर्जन घाट बनविणे | + | १००० | २७ |
| ३४ | पाणी पुरवठा लाभ कर | + | १४००० | | | | |
| ३४ | मल प्रवाह सुविधा लाभकर | + | ५६०० | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३४ | मलप्रवाह कर | + | २५२०० | | | | |
| ३६ | निर्मल एमएमआर योजनेअंतर्गत अनुदान | + | ३५०००० | | | | |
| | | | | | | | |
| | एकूण | | ४३६३५९४ | | + | ४३६३३४५ | |
| | अखेरची शिल्लक | | | | + | २.४९ | |

**मुंबई प्रांतिक** महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ मध्ये उल्लेखिलेल्या सर्व अनुषगिंक बाबी विचारात घेवून **सन २००८ – ०९ साठी** रुपये २.४९ लाख शिल्लकीच्या अर्थसंकल्पिय अंदाज तयार करण्यात येत आहे. तसेच सन २००७–२००८ च्या सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाजास व सन २००८–२००९ करिता प्रस्तावित करण्यात आलेल्या जकात दरात वर नमूद केल्याप्रमाणे अंतिम मान्यता देण्यासाठी महासभेस शिफारस करित आहे.

अंदाजपत्रक छापून प्रत्येक पालिका सदस्यास त्यांची प्रत पाठविण्याची व्यवस्था मुख्य लेखा अधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानला जाईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**एकमताने**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ५.३० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. राम पारवानी यांनी जाहिर केले.

**(प्रकाश पं. कुकरेजा)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः– २९/२/००८

दि. २९/२/२००८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

१३

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक २९/२/००८ रोजी दुपारी १२.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री पारवानी राम (चार्ली) फुंदुमल | सभापती |
| २ | श्री लुंड गोविंदराम डोलुमल | सदस्य |
| ३ | श्री इदनानी जीवन (राजु) चंद्रभान | ––''–– |
| ४ | श्री जाधव सुरेश मधुकर | ––''–– |
| ५ | श्री ठाकुर नरेंद्र (कुमारी) केवलराम | ––''–– |
| ६ | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल | ––''–– |
| ७ | श्री बठिजा संजय रामचंद्र | ––''–– |
| ८ | श्रीमती रिजवानी सुजाता रमेश | ––''–– |
| ९ | श्रीमती उदासी इंदिरा जमनादास | ––''–– |
| १० | श्रीमती रावत निलम प्रेमसिंग | ––''–– |
| ११ | श्री जग्यासी किशोर | ––''–– |
| १२ | श्री दवणे नरेंद्र (रवीभाऊ) | ––''–– |
| १३ | श्री वानखेडे राजेश देवेंद्र | ––''–– |
| १४ | श्री सुपाळे विजय खंडु | ––''–– |
| १५ | श्रीमती निकम लता शांताराम | ––''–– |

तर,

सदस्य श्री गायकवाड दिलीप दशरथ हे अनुपस्थित होते.

**श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.**

खालील अधिकारी सभेस हजर होते.

२५.श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त
२६.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
२७.श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
२८.श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
२९.श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
३०.श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
३१.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
३२.श्री. एस.टी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
३३.श्री. शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य
३४.श्री. के.एन. म्हात्रे, मुख्य स्वच्छता निरिक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव

दुपारी १२.२५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १ :–</u> मागील सभेचे दिनांक १७/१/२००८ व ८/२/२००८ (त्यात १२/२/२००८) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>महापालिका सचिव :–</u>दिनांक १७/१/२००८ रोजीचे इतिवृत्त आपणांस प्रस्तृत करण्यात आलेले नाही कारण की त्या सभेच्या सभा सूचनेवरील विषय क्र. १२ व १३ हे अनुक्रमे पाणी पुरवठा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधीत असून त्या विभागांच्या विविध लेखा शिर्षांमध्ये वाढ करण्यासाठी इतर लेखाशिर्षातुन रक्कमा समायोजित करावयाच्या असल्याने त्याबाबत संबंधित विभागांना प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देशित करण्यात आले होते. याबाबतचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत परंतु त्यामध्ये अदयापही काही दोष असल्याने त्यामध्ये दुरुस्ती करावयाची असल्याने त्या सभेचे इतिवृत्त आपणांस प्रस्तृत करता येवु शकले नाही.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u> जे इतिवृत्त आम्हांस प्रस्तृत करण्यात आलेले नाही त्या इतिवृत्तात कोणती नोंद आलेली आहे आणि कोणती नोंद आलेली नाही हे आम्हांला कसे माहित पडेल? त्यामुळे आम्ही त्या सभेचे इतिवृत्त असेच कसे कायम करणार?

<u>महापालिका सचिव :–</u>त्या सभेचे इतिवृत्त आता कायम करत नाहीत. त्या सभेचे इतिवृत्त जेव्हा आपणांस पुरविले जाईल तेव्हा त्या पुढील सभेत कायम करण्यासाठी ते ठेवले जाईल.

<u>सदस्य श्रीमती लता निकम:–</u>माझ्या विभागातील काही विकास कामांचे प्रस्ताव तयार करण्यासाठी मी चार पाच वेळा पत्र दिले आहे. परंतु माझ्या विभागातील विकास कामांचा एकसुध्दा प्रस्ताव स्थायी समितीपुढे आलेला नाही त्याचे कारण काय? सर्वांच्या प्रभागात विकास कामे होत आहेत. फक्त माझ्याच प्रभागात विकास कामे का होत नाहीत?

<u>महापालिका सचिव :–</u>विकास कामांसाठी आपण जे काही पत्र दिले असेल त्यानुसार त्या सभेत तात्काळ प्रस्ताव येत नाही. आपण विकास कामा संदर्भात पत्र दिल्यानंतर त्याबाबत पाठ पुरावा करुन प्रशासनाकडुन त्या कामासंदर्भात गोषवारा तयार करुन घेवुन तो सचिव कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर मा. सभापती महोदयांच्या संमतीने तो स्थायी समितीच्या विषय पत्रिकेवर येत असतो.

<u>सदस्या श्रीमती लता निकम :–</u>मी पत्र दिले होते. त्याची इतिवृत्तात नोंद आली असेलच. मग त्या अनुषंगाने विकास कामाचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर का आला नाही?

<u>सभापती, श्री. राम पारवानी :–</u>आपल्या प्रभागातील विकास कामांबाबतचा गोषवारा तयार करुन पाठविण्यात आला असेल तर तो पुढील स्थायी समिती सभेत घेण्यात येईल.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>सर्व सदस्यांच्या प्रभागात विकास कामे होतात त्यानुसार यांच्याही प्रभागात विकास कामे झाली पाहिजेत.

<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:–</u>सर्वांच्या प्रभागात विकास कामे होत असतात त्याप्रमाणे यांच्याही प्रभागात विकास कामे झाली पाहिजेत. त्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे आला पाहिजे. दिनांक २०/२/२००८ रोजीच्या महासभेचे इतिवृत्त पहा, महासभेमध्ये मी म्हटले होते की, स्थायी समितीमध्ये ज्यावेळेस जकातीचा मुद्दा चर्चेस आला होता त्यावेळेस सभापती महोदयांनी एक निवेदन वाचुन दाखविले होते. ते निवेदन प्रत्यक्षात कुणी त्यांना दिलेलेच नव्हते. आता सुध्दा आयत्यावेळचा विषय म्हणुन दोन विषय आलेले आहेत. या प्रस्तावांबाबत आम्हांला

माहिती नसल्यामुळे व गोषवारा आताच वितरीत केला जात असल्यामुळे याबाबतीत आम्ही चर्चा काय करणार आणि निर्णय कसा घेणार यासाठी यानंतर सर्व गोषवारे सभेपुर्वी आम्हांस प्राप्त झाले पाहिजेत.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. राम पारवानी :—</u>मागील सभेचे दिनांक ८/२/२००८ (त्यात १२/२/२००८) रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे. दिनांक १७/१/२००८ रोजीचे इतिवृत्त प्रस्तृत करण्यात आलेले नसल्याने ते प्रस्तृत केल्यानंतर पुढील सभेत कायम केले जाईल.

---

☑

**विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक १७/१/२००८ व ८/२/२००८ (त्यात १२/२/२००८) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नांव : श्री. सुरेश जाधव

<u>स्थायी समिती ठराव क्र. :—</u> १३९ अ <u>दिनांकः— २९/२/२००८</u>

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले मागील सभेचे ८/२/२००८ (त्यात १२/२/२००८) रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ३३ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे. दिनांक १७/१/२००८ रोजीचे इतिवृत्त कायम करण्याचा विषय आजच्या सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यात येत असून सदर सभेचे इतिवृत्त पुढील सभेत कायम करण्यात येईल.

<u>एकमताने</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २ :—** जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी नुतनीकरण अभियानांतर्गत गरीबांकरीता मुलभुत सोयी सुविधा योजनेचा प्रकल्प अहवाल तयार करणेकामी मे. सुभाष पाटील यांची तंज्ञ सल्लागार म्हणून नेमणुक करण्यासाठी त्यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

---

<u>सदस्य श्री. गोविंदराम लुंड:—</u>स्पष्टीकरण कोण करेल?

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:—</u>तज्ञ सल्लागाराची नेमणुक करण्यासाठी निविदा मागविण्यात आली होती.

<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—</u>या अगोदर जी एक निविदा प्राप्त झाली होती ती कुणाची होती त्यांचे दर काय होते? त्याचा येथे उल्लेख करावयास पाहिजे होता.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:—</u> निविदा वगैरे काही नव्हती.

श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :–निविदा नव्हती. थेट संविदा होती.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–पहिल्या ज्या निविदाकारांनी निविदा भरली होती त्याचे दर काय होते? त्यानंतरसुध्दा दुस–यांदा जेव्हा निविदा भरण्यात आली होती तेव्हा सुध्दा मला वाटते, त्यानेच निविदा भरली होती त्याचे दर काय होते ते सांगा, व आताचा जो निविदाकार आहे त्याचे दर काय आहेत ते सांगा. नाहीतर हा प्रस्ताव पुढे ढकला.

सदस्य श्री. जीवन इदनानी:–हा प्रस्ताव पुढे कसा ढकलणार? करोडो रुपयांचा प्रस्ताव आहे.

सदस्य श्री. सुरेश जाधव:–प्रत्येक सभेमध्ये ॲन्थोनीबाबत चर्चा होते. त्यावेळेस सांगितले जाते की पुढील सभेत प्रस्ताव सादर केला जाईल. त्यानंतर दोन तीन सभा झाल्या. त्यांमध्ये ॲन्थोनीचा अहवाल ठेवण्यात आला नाही. मागील सभेत सुध्दा असेच सांगण्यात आले होते की पुढील सभेत अहवाल ठेवण्यात येईल परंतु आजही तो अहवाल सभेपुढे ठेवण्यात आला नाही त्यामागचे कारण काय? यामागे कुणाकडुन काही देणे घेणे झाले आहे काय? ॲन्थोनीचा प्रस्ताव या सभेत आणला जावा नाहीतर या सभेचे कामकाज चालु दिले जाणार नाही. ही सभा रद्द केली जावी. सभेचे कामकाज चालवायचे असेल तर सर्वात प्रथम ॲन्थोनी विषयीचा अहवाल सभेपुढे येवु दया त्यानंतरच सभेपुढचे काम चालवा.

सदस्य श्री. जीवन इदनानी:–ॲन्थोनीबाबतचा अहवाल पुढील सभेत आणला जावा.

सभापती, श्री. राम पारवानी:–पुढील सभेत ॲन्थोनीबाबतचा अहवाल जरुर आणला जाईल.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–पुढील सभेत ॲन्थोनीचा अहवाल आणला जाईल हे मागील दोन तीन सभांपासुन आपण बोलत आहात.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:–हा जो ठेकेदार आहे तो पॅनलवर आहे किंवा नाही? या अगोदर ज्यांनी निविदा भरली होती त्यांचे दर काय होते?

श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :–या अगोदर ज्यांनी निविदा भरली होती त्याची माहिती दिली जाईल.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:–पहिल्यावेळेस निविदा कुणी भरली होती? दुस–या वेळेस, तिस–या वेळेस कुणी निविदा भरली होती?

श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :–तज्ञ सल्लागाराची नेमणुक करण्यासाठी तीन वेळा निविदा मागविल्या होत्या. पहिल्या वेळेस एकच निविदा प्राप्त झाल्याने दुस–यांदा निविदा मागविली असता एकही निविदा प्राप्त झाली नाही. त्यामुळे तिस–यांदा निविदा मागविली त्यावेळेस मेसर्स मोनार्च सर्व्हेअर ॲण्ड कॉन्स्ट्रक्टर यांची फक्त एक निविदा प्राप्त झाली. आणि त्या निविदेमध्ये दिलेला दर हा वाजवी पेक्षा जास्त वाटत होता.

श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):– जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नुतनीकरण अभियानाअंतर्गत गरीबांकरीता मुलभुत सोयी सुविधा (बीएसयुपी) योजने अंतर्गत सर्व्हेक्षणाचे काम करावे लागते त्यानंतर प्रकल्प अहवाल तयार करावा लागतो आणि तो हुडकोस सादर करावा लागतो. त्यासाठी एखादया तज्ञ सल्लागाराची नेमणुक करावी लागते.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:–हा जो ठेकेदार आहे तो म्हाडाच्या पॅनलवर आहे काय? तसेच या अगोदर ज्याने निविदा भरली होती त्यांचे दर काय होते?

श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–सुरुवातीस जेव्हा निविदा भरली होती त्यांनी सरसकट रक्कम लिहिली होती. टक्केवारीनुसार रक्कम लिहिलेली नव्हती. त्यानी एक दोन झोपडपट्टयांची सर्व्हेक्षण केले असते तरी त्यांना चार कोटी ७२ लाख रुपये दयावे लागले असते.

सदस्य श्री. जीवन इदनानी:—झोपडपट्टयांचा विकास झाला नाही तर शहराचा विकास कसा होईल? आणि शहराचा विकास झाला नाही तर नगरसेवक निवडून कसे येतील?

सदस्य श्री. सुरेश जाधव:—व आपला सुध्दा विकास कसा होईल?

सभापती, श्री. राम पारवानी:—ज्या अधिकृत झोपडपट्टया आहेत त्यांचे व अनाधिकृत झोपडपट्टया आहेत त्यांचेही सर्व्हेक्षण केले जावे.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—माझा विरोध आहे. मी या प्रस्तावास विरोध करतो.

महापालिका सचिव:—आपल्या एकटयाचा विरोध आहे की आपल्या पक्षाचा विरोध आहे?

श्री. किशोर जग्यासी:—झोपडपट्टयांच्या विकासासाठी विरोध आहे?

सदस्य श्री. सुरेश जाधव :—झोपडपट्टयांच्या विकासासाठी विरोध आहे?

सभापती, श्री. राम पारवानी:—सचिव साहेब या प्रस्तावाबाबत मतदान घ्या.

महापालिका सचिव :—जे सन्माननिय सदस्य या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

प्रस्तावाच्या बाजुने १० मते

| अ.क्र. | सदस्यांची नावे |
|---|---|
| १ | श्री पारवानी राम (चार्ली) फुंदुमल |
| २ | श्री लुंड गोविंदराम डोलुमल |
| ३ | श्री इदनानी जीवन (राजु) चंद्रभान |
| ४ | श्री जाधव सुरेश मधुकर |
| ५ | श्रीमती उदासी इंदिरा जमनादास |
| ६ | श्रीमती रावत निलम प्रेमसिंग |
| ७ | श्री जग्यासी किशोर |
| ८ | श्री वानखेडे राजेश देवेंद्र |
| ९ | श्री सुपाळे विजय खंडु |
| १० | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल |

प्रस्तावाच्या विरोधात ४ मते

| अ.क्र. | सदस्यांची नावे |
|---|---|
| १ | श्री ठाकुर नरेंद्र (कुमारी) केवलराम |
| २ | श्री बठिजा संजय रामचंद्र |
| ३ | श्रीमती रिजवानी सुजाता रमेश |
| ४ | श्री दवणे नरेंद्र (रवीभाऊ) |

तटस्थ १

| अ.क्र. | सदस्यांचे नावे |
|---|---|
| १ | श्रीमती निकम लता शांताराम |

काही सदस्य:—पास,पास.......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. २ :—** जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी नुतनीकरण अभियानांतर्गत गरीबांकरीता मुलभुत सोयी सुविधा योजनेचा प्रकल्प अहवाल तयार करणेकामी मे. सुभाष पाटील यांची तंज्ञ सल्लागार म्हणून नेमणुक करण्यासाठी त्यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु नागरी नुतनीकरण अभियानांतर्गत गरीबांकरीता मुलभूत सोयी सुविधा या योजनेची उप योजना घरकुल बांधणी व मुलभूत सोयी सुविधा पुरविणे यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकरीता तज्ञ सल्लागारांची नेमणूक होणेसाठी तीन वेळा निविदा मागविल्या होत्या. पहिल्यावेळी एक निविदा प्राप्त झाल्याने दुस—यांदा निविदा मागविल्या असता एकही निविदा प्राप्त झाली नाही. त्यामुळे तिस—यांदा निविदा मागविली असता मे. मोनार्च सर्व्हेयर ॲण्ड कॉन्ट्रक्टर प्रा. लि. यांची फक्त एक निविदा प्राप्त झाली. या निविदेमध्ये या कामाकरीता रुपये ४,१२,००,०००/— इतका दर दिला आहे. हा दर वाजवी पेक्षा जास्त वाटत आहे. तसेच मे. मोनार्च सर्व्हेयर ॲण्ड कॉन्ट्रक्टर प्रा. लि. यांना BSUP योजनेचा सर्वेक्षण सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचा अनुभव असल्याचा दाखला अथवा कागदपत्र जोडलेले नाहीत. म्हाडा या योजनेचे नोडल एजन्सी असून प्रकल्प अहवालांना हुडकाकडून मान्यता घेण्यात येते. या दोन्ही विभागांमध्ये या योजनेचे प्रकल्प अहवाल तयार करणा—या सल्लागारांची माहिती घेतली. हुडकोने अशा सल्लागारांच्या नावांची यादी पाठविली आहे. या यादीमध्ये मे. मोनार्च यांचे नाव नाही. त्यामुळे मोनार्च यांना या कामाचा अनुभव नाही हे निश्चित होते. त्यांची निविदेत दिलेली अवास्तव दर या दोन्ही बाबी पहाता व सदर अहवाल तयार करण्यास आधीच विलंब झालेला असल्यामुळे अनुभव नसलेल्या एजन्सीवर सदर काम सोपवुन त्यांनी वेळेत काम पुर्ण न केल्यास योजनेचा सविस्तर अहवाल शासनाकडे मंजुरी करीता पाठविल्यास अंमलबजावणीस विलंब होवू शकतो.

म्हाडा व हुडको यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार त्यांचे पॅनलवर असलेल्या सल्लागारांपैकी मे. ओंकार असोसिएट्स व सुभाष पाटील यांचेशी संपर्क करुन ते या योजनेचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यास उत्सुक असल्यास त्यांनी त्यांचे दर देणे बाबत सुचविले होते. त्यापैकी मे. ओंकार असोसिएटस व मे. सुभाष पाटील यांनी त्यांचे दर दिले असून त्यांचे दराप्रमाणे जितके काम होईल तितकेच देयक त्यांना अदा करणे आहे. मे. मोनार्च यांच्या निविदेमध्ये तशी तरतूदनाही. त्यामुळे मे. मोनार्च यांना भविष्यात काम व देयक अदा करणेस अडचण आली असती. त्यामुळे सुभाष पाटील यांनी दिलेल्या दरपत्रकांनुसार त्यांचे २.५० टक्के दराने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे जास्त संयुक्तिक राहिल असे वाटते.

त्यामुळे मे. मोनार्च सर्व्हेअर यांची एकमेव असलेली निविदा रद्द करुन या योजनेचे अहवाल तयार करण्याचा अनुभव असलेले व सद्यस्थितीत कल्याण महानगरपालिकेत कार्यरत असलेले मे. सुभाष पाटील यांचेवर शहरी गरीबांकरीता मुलभूत सुविधा ( BSUP ) चे सविस्तर प्रकल्प अहवाल २.५० टक्के दराने तयार करण्यास स्थायी समितीकडून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (६) अंतर्गत मान्यता मिळणेस प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १४० दिनांक:— २९/२/२००८

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी नुतनीकरण अभियानांतर्गत गरीबांकरीता मुलभुत सोयी सुविधा योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल २.५० टक्के दराने तयार करणेकामी मे. सुभाष पाटील यांची तंज्ञ सल्लागार म्हणून नेमणुक करण्यासाठी त्यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>बहुमताने</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३ :—** प्रभाग क.१८, बॅरेक क. ११४, शिवमंदिर जवळ,उल्हासनगर—१ येथील नादुरूस्त जुन्या सार्व. शौचालयाच्या विनियोगास मान्यता देणे.

---

**<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः—</u>**या प्रस्तावास माझा काही विरोध नाही. परंतु शौचालय तोडल्यानंतर सीसी पॅसेज तयार केला जावा नाहीतर तेथे अतिक्रमण होईल.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्री. राम पारवानी :—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ३ :—** प्रभाग क.१८, बॅरेक क. ११४, शिवमंदिर जवळ,उल्हासनगर—१ येथील नादुरूस्त जुन्या सार्व. शौचालयाच्या विनियोगास मान्यता देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

श्री. जमनु पुरस्वानी, नगरसेवक, उल्हासनगर महानगरपालिका यांनी दिनांक १८/१०/२००७ च्या पत्रान्वये प्र.क्र. १८, बॅरेंक नं. ११४, शिवमंदिरच्या जवळ, उल्हासनगर—१ येथे असलेले शौचालय तुटलेले असल्यामुळे सदरील शौचालय निष्कासित करणेबाबत विनंती केलेली आहे.

आरोग्य विभागाकडुन सदर शौचालयाबाबत संबंधीत स्वच्छता निरिक्षक श्री. दिपक भोये तसेच मुख्य स्वच्छता निरिक्षक यांनी सादर केलेला अहवाल/ पंचनामा मालमत्ता विभागास प्राप्त झालेला आहे.

सदर अहवालात प्र.क्र. १८, बॅरेंक नं. ११४, शिवमंदिरच्या जवळ, उल्हासनगर—१ येथिल शौचालय सध्या वापरात आहे. परंतु जवळ नवीन शौचालय बनविले आहे. त्यामुळे वस्तीजवळ असलेले सदरचे शौचालय निष्कासित करुन तेथे सी सी पॅसेज बनविण्यात यावे अशी मागणी तेथिल नागरीकांनी केलेली असल्याचे त्यात नमुद करण्यात आलेले आहे.

तरी उक्त बाबी विचारात घेता प्र.क्र. १८, बॅरेंक नं. ११४, शिवमंदिरच्या जवळ, उल्हासनगर—१येथिल शौचालय निष्कासित करुन सदर ठिकाणी सीसी पॅसेज बनविणेस मंजुरी मिळणेसाठी स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४१ दिनांक:– २९/२/२००८

सुचकाचे नाव :– श्रीमती लता निकम

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती इंदिरा उदासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे प्रभाग क्र. १८, बॅरेक क्र. ११४, शिवमंदिर जवळ,उल्हासनगर–१ येथील जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे निष्कासनास व जागेवरील परिस्थिती पहाता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करणेस मान्यता देत आहे.

परंतु–

सदरची शौचालये तो पर्यंत निष्कासित करु नयेत जोपर्यंत त्याठिकाणी विकास कामे सुरु होत नाहीत.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. ४ :–** कर्तव्य बजावत असतांना दुर्घटना होऊन मृत्युमुखी पडलेल्या श्री. लक्ष्मण बळी भालेराव, सफाई कामगार यांच्या परिवारास रु.५०,०००/– इतकी आर्थिक मदत देणे.

---

सदस्य श्री. किशोर जग्यासी:–श्री. कुमारी साहेब आपला विरोध आहे काय?

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. राम पारवानी :– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ४ :–** कर्तव्य बजावत असतांना दुर्घटना होऊन मृत्युमुखी पडलेल्या श्री. लक्ष्मण बळी भालेराव, सफाई कामगार यांच्या परिवारास रु.५०,०००/– इतकी आर्थिक मदत देणे.

प्रस्तावना

मा. उप महापौर श्री. रमेश म. चव्हाण यांचे अर्जावरुन कळविण्यांत येते की, कै. श्री. लक्ष्मण बळी भालेराव, सफाई कामगार यांचा दिनांक १२/१२/२००७ रोजी त्यांना नेमुण दिलेले काम करीत असतांना दोन भिंतीमध्ये अडकुन गुदमरल्याने दुर्घटना होवून मृत्यु झाला आहे. तरी कै. श्री. लक्ष्मण बळी भालेराव, सफाई कामगार यांच्या पश्चात त्यांची पत्नी व मुले असा परिवार असुन सदर परिवारास महापालिकेतर्फे मदत देण्यात यावी असे कळविले आहे.

मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ६६ मधिल नियम (२५) नुसार शहरातील लोकांच्या दु:ख निवारणासाठी किंवा सार्वजनिक कल्याणासाठी उभारलेल्या कोणत्याही सार्वजनिक निधीस अंशदान देणे आणि मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ६६ मधील नियम (३९) नुसार शहरातील जनतेवर कोसळलेली कोणतीही आपत्ती दुर करण्यासाठी उपाययोजना करणेकरीता महानगरपालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार तरतुद करता येईल असे नमुद आहे.

तरी वर नमुद केल्याप्रमाणे कै. श्री. लक्ष्मण बळी भालेराव, सफाई कामगार यांच्या परिवारास महापालिकेतर्फे रुपये ५०,०००/– इतकी आर्थिक मदत देणेविषयक प्रस्ताव निर्णयास्तव स्थायी समितीच्या पटलावर सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १४२ <u>दिनांक:– २९/२/२००८</u>

सुचकाचे नाव :– श्रीमती निलम रावत

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कर्तव्य बजावत असतांना दुर्घटना होऊन मृत्युमुखी पडलेल्या श्री. लक्ष्मण बळी भालेराव, सफाई कामगार यांच्या कुटुंबियास रुपये ५०,०००/– इतकी आर्थिक मदत देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ५ :–** बॅरेक नं. १०५१, उल्हासनगर–३ व बॅरेक नं. १०५० समोर, सेक्शन–२४, उल्हासनगर–३ येथील नादुरूस्त जुन्या सार्वजनिक शौचालयाच्या विनियोगास मान्यता देणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>सभापती, श्री. राम पारवानी :–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ५ :–** बॅरेक नं. १०५१, उल्हासनगर–३ व बॅरेक नं. १०५० समोर, सेक्शन–२४, उल्हासनगर–३ येथील नादुरूस्त जुन्या सार्वजनिक शौचालयाच्या विनियोगास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

श्रीमती इंदिरा उदासी, महापालिका सदस्या, उल्हासनगर महानगरपालिका प्र. क्र. ३१ यांनी खालील ठिकाणी असलेले शौचालय मोडकळीस आलेले असल्याने निष्कासित करणेबाबत विनंती केलेली आहे.

१. बॅरेक नं. १०५, उल्हासनगर–३.

२. बॅरेक नं. १०५० चे समोर सेक्शन २४, उल्हासनगर–३.

उक्त शौचालयाबाबत आरोग्य विभागाकडुन संबंधीत स्वच्छता निरिक्षक यांनी सादर केलेला अहवाल/ पंचनामा मालमत्ता विभागास प्राप्त झालेला आहे.

सदर अहवालात उक्त ठिकाणी असलेले शौचालय मोडकळी अवस्थेत असुन सध्या वापरात नसुन तेथिल नागरीकांनी सदरचे शौचालय निष्कासित करुन तेथे सीसी पॅसेज बनविण्यात यावे अशी मागणी केलेली असल्याचे नमुद करण्यात आले आहे.

तरी उक्त बाबी विचारात घेता १. बॅरेक नं. १०५, उल्हासनगर—३, २. बॅरेक नं. १०५० चे समोर सेक्शन २४, उल्हासनगर—३ या ठिकाणी असलेले शौचालय निष्कासित करुन सदर ठिकाणी सीसी पॅसेज बनविणेस मंजुरी मिळणेसाठी स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४३ दिनांकः— २९/२/२००८

सुचकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती निलम रावत

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे बॅरेक नं. १०५१, उल्हासनगर—३ व बॅरेक नं. १०५० समोर, सेक्शन—२४, उल्हासनगर—३ येंथील जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे निष्कासनास व जागेवरील परिस्थिती पहाता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करणेस मान्यता देत आहे.

परंतु—

सदरची शौचालये तो पर्यंत निष्कासित करु नयेत जोपर्यंत त्याठिकाणी विकास कामे सुरु होत नाहीत.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :—** प्रभाग क्र. ४६ मधील, बॅरेक नं. ९७४, १०४१, १०५१, सेक्शन—२४, अशोक टॉकीजच्या मागे, उल्हासनगर—३ येथील जुन्या सार्वजनिक शौचालयाच्या विनियोगास मान्यता देणे.

---

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः—हा प्रस्ताव पारीत करा परंतु तेथे समाजमंदिर बांधले पाहिजे.

सदस्या श्रीमती लता निकमः—माझ्या प्रभागातील कामांचा प्रस्ताव येत नाही मी कितीतरी वेळा पत्र दिले आहे.

सदस्य श्री. सुरेश जाधवः—यांच्याही प्रभागात विकास कामे झाली पाहिजेत. या त्यांच्या म्हणण्याचे मी समर्थन करतो.

सदस्या श्रीमती लता निकमः—तुम्ही कुठे सहकार्य करता? माझ्या प्रभागात कोणतेही विकास काम होत नाही.

काही सदस्य :—पास—पास......

<u>सभापती, श्री. राम पारवानी :–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ६** :– प्रभाग क्र. ४६ मधील, बॅरेक नं. ९७४, १०४१, १०५१, सेक्शन–२४, अशोक टॉकीजच्या मागे, उल्हासनगर–३ येथील जुन्या सार्वजनिक शौचालयाच्या विनियोगास मान्यता देणे.

## प्रस्तावना

श्री. सुंदर (बाबु) मंगताणी, नगरसेवक, उल्हासनगर महानगरपालिका यांनी पत्रान्वये प्र.क्र. ४६ मधील बॅरेक नं. ९७४,१०४१,१०४९,१०५१, सेक्शन २४, अशोक टॉकीजच्या मागे, उल्हासनगर–३ येथिल सार्वजनिक शौचालय वापरात नसल्यामुळे ते निष्कासित करणेबाबत विनंती केलेली आहे.
सदर शौचालयाबाबतचा अहवाल/पंचनामा स्वच्छता निरिक्षक श्री. राजू ननावरे यांचेकडुन प्राप्त झालेला असून सदर शौचालय वापरात नसल्याचे तेथिल नागरीकांनी सांगितलेले आहे. सदर पंचनाम्यावर तेथिल पंचांच्या स्वाक्ष–या घेतल्या आहेत. तरी सदर ठिकाणी असलेले सार्वजनिक शौचालय निष्कासन करुन तेथे समाज मंदिर बनविणेबाबत नमुद केले आहे.

उक्त बाबी विचारात घेता प्र.क्र. ४६ मधील बॅरेक नं. ९७४,१०४१,१०४९,१०५१, सेक्शन २४, अशोक टॉकीजच्या मागे, उल्हासनगर–३ येथिल असलेले सार्वजनिक शौचालय निष्कासीत करुन सदर ठिकाणी समाज मंदिर बनविणेबाबत मंजुरी मिळणेसाठी स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १४४ <u>दिनांक:– २९/२/२००८</u>

सुचकाचे नाव :– श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती निलम रावत

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे प्रभाग क्र. ४६ मधील, बॅरेक नं. ९७४, १०४१, १०५१, सेक्शन–२४, अशोक टॉकीजच्या मागे, उल्हासनगर–३ येथील जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे निष्कासनास व जागेवरील परिस्थिती पहाता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करणेस मान्यता देत आहे.

परंतु–

सदरची शौचालये तो पर्यंत निष्कासित करु नयेत जोपर्यंत त्याठिकाणी विकास कामे सुरु होत नाहीत.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७ :—** जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाअंतर्गत भूयारी गटार योजनेच्या कामांची अंदाजपत्रके (आराखडे) (D.P.R.) तयार करणे कामी प्रशासनास मे. मोनार्च सर्व्हेयर ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर पुणे या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

---

<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—</u>विषय क्र. २ मधील तोच मोनार्च सर्व्हेयर वाला ठेकेदार आहे किंवा दुसरा कुणी आहे?

<u>श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—</u>तोच आहे.

<u>श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>या कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदेत पहिल्या वेळेस दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे फेरनिविदा मागविण्यात आली असता दुस—यांदा एकही निविदा प्राप्त झालेली नसल्यामुळे तिस—या वेळेस निविदा मागविण्यात आली. त्यावेळेस दोन निविदा प्राप्त झाल्या. त्यामध्ये लघुत्तम दराचा जो निविदाकार आहे त्याच्याशी संविदा करण्यास मान्यता घ्यायची आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:—</u> पाहिजे तर या प्रस्तावास मतदान घ्या.

<u>महापालिका सचिव:—</u>या प्रस्तावास मतदान घ्यायचे काय?

<u>सभापती, श्री. राम पारवानी:—</u>सचिव साहेब या प्रस्तावावर मतदान घ्या.

<u>महापालिका सचिव :—</u>जे सन्माननिय सदस्य या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या बाजुने ११ मते</u>

| अ.क्र. | सदस्यांची नावे |
|---|---|
| १ | श्री पारवानी राम (चार्ली) फुंदुमल |
| २ | श्री लुंड गोविंदराम डोलुमल |
| ३ | श्री इदनानी जीवन (राजु) चंद्रभान |
| ४ | श्री जाधव सुरेश मधुकर |
| ५ | श्रीमती उदासी इंदिरा जमनादास |
| ६ | श्रीमती रावत निलम प्रेमसिंग |
| ७ | श्री जग्यासी किशोर |
| ८ | श्री दवणे नरेंद्र (रवीभाऊ) |
| ९ | श्री वानखेडे राजेश देवेंद्र |
| १० | श्री सुपाळे विजय खंडु |
| ११ | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल |
| १२ | श्रीमती निकम लता शांताराम |

<u>प्रस्तावाच्या विरोधात ३ मते</u>

| अ.क्र. | सदस्यांची नावे |
|---|---|
| १ | श्री ठाकुर नरेंद्र (कुमारी) केवलराम |
| २ | श्री बठिजा संजय रामचंद्र |
| ३ | श्रीमती रिजवानी सुजाता रमेश |

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ७ :—** जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाअंतर्गत भूयारी गटार योजनेच्या कामांची अंदाजपत्रके (आराखडे) (D.P.R.) तयार करणे कामी प्रशासनास मे. मोनार्च सर्व्हेयर ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर पुणे या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील विविध नागरी सुविधांचा विकास आराखडा ( C. D. P.) तयार करण्यात आला असुन तो मुंबई महानगर विकास प्राधिकरणामार्फत शासनाकडे मंजुरी करीता सादर करण्यात आला आहे. या वालधुनी नाला सुशोभिकरण करणे, घनकचरा निवारण, झोपडपटटी निर्मूलन, रस्ते बाधंणे, नाले बाधंणे इत्यादी कामांचा समावेश करण्यात आला आहे.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानअंतर्गत तयार करण्यात आलेल्या शहरी भागाचा विकास आराखडयात मलनि:सारण योजने अंतर्गत खालील कामांचा समावेश करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| १) अस्तित्वातील भुयारी गटार योजनेचे बळकटीकरण करणे. | — | रु. ३२८.०० कोटी |
| २) मलनि:सारण केंद्र बाधणे | — | रु. १६३.५० कोटी |
| एकुण | | रु. ४९१.५० कोटी |

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत भुयारी गटार योजनेच्या कामाचा ( D. P. R ) बनविण्याच्या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या परंतु भुयारी गटाराच्या कामाच्या पहिल्या मागणीत दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे फेर निविदा मागविण्यात आल्या, दुस—यादा मागणीत एकही निविदा प्राप्त झालेली नसल्यामुळे पुन्हा तिस—यादा सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या.

तिस—यांदा मागवीण्यात आलेल्या निविदा पैकी भुयारी गटार योजनेच्या कामाच्या दोन निविदा खालील निविदा धारकांकडुन प्राप्त झाल्या असुन

१) मे. युनिटी कंन्सल्टंट पुणे. २) मे. मोनार्च सर्व्हेयर कन्सल्टंट पुणे.

निवेदेनुसार लिफाफा क्र १ उघडण्यात आला लिफाफा क्र. १ अंतर्गत असलेल्या कागदपत्राची निविदेतील पृष्ट क्र. ४, ५ व पृष्ट २० वरील अटी नुसार छांननी करण्यात आली असुन त्यानुसार निविदा धारकांनी सादर केलेल्या कागदपत्रानुसार खालील प्रमाणे निविदा धारकांना गुण प्राप्त झाले.

अ) मे. युनिटी कंन्सल्टंट प्रा. लि. पुणे. — ८०.५० :

ब) मे. मोनार्च सर्व्हेयर कन्सल्टंट पुणे — ७९.०० :

सदर निविदेतील अटी व शर्ती नुसार, अभिकर्त्यास लिफाफा क्र. १ मधील कागद पत्रानुसार कमीत कमी ७५.०० % गुण मिळणे गरजेचे आहे. त्या अनुषंघाने दोन्ही निविदा धारक तांत्रिक प्रस्तावा मध्ये ( Techical Proposal ) मध्ये पात्र ठरले.

निविदा धारकांना त्यांच्या पात्रतेबाबत शहर अभियंता यांचे कार्यलयीन पत्र क्र. २१९३ व २१९१ दि. १०/१२/२००७ अन्वये कळविण्यात आले. सदर दोन्ही निविदा धारक तात्रिक प्रस्तावास पात्र ठरल्यामुळे त्यांना शहर अभियंता कार्यालयाचे पत्र क्र. २१९२ दि .१०/१२/२००७ नुसार दि. ११/१२/२००७ रोजी लिफाफा क्रमांक २ ( Finencid Bid ) उघडणेचे वळेस हजर राहण्याचे कळविण्यात आले. या अनुषंगाने दि. ११/१२/०७ रोजी सदर कामाच्या निविदा, निविदा समितीचे सदस्य, शहर अभियंता, मुख्य लेखा अधिकारी,

मुख्यलेखा परिक्षक, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) व निविदा धारकांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत उघडण्यात आले. त्यामध्ये निविदा धारकांनी खालील प्रमाणे दर सादर करण्यात आले.

अ) मे. युनिटी कंन्सल्टंट प्रा. लि. पुणे. – रु. १,८५,००,०००/–

ब) मे. मोर्नार्च सर्व्हेयर कन्सल्टंट पुणे – रु. १,५८,२५,०००/–

निविदेतील लिफाफा क्रमांक २ मधील मुल्याकनाच्या अटी नुसार व दिलेल्या सुत्रानुसार निविदांचे मुल्याकन केले असता निविदा धारकांना खालील प्रमाणे गुण प्राप्त झाले.

अ) मे. युनिटी कंन्सल्टंट प्रा. लि. पुणे. – ८२.५१ %

ब) मे. मोनार्च सर्व्हेयर कन्सल्टंट पुणे – ८७.४० %

सदर निविदेतील अटी व शर्ती नुसार मे. मोनार्च सर्व्हेयर ॲण्ड कॉन्ट्रक्टर प्रा. लि. पुणे यांना जास्त गुण प्राप्त झालेले असल्यामुळे त्यांची निविदा न्यनत्तम असल्याचे दिसुन आले. सदर निविदा धारकाच्या मे. मोनार्च सर्व्हेयर ॲण्ड कॉन्ट्रक्टर प्रा. लि. पुणे यांची निविदा जरी न्यनत्तम असली तरी त्यांनी सादर केलेला दर जास्त वाटत असल्यामुळे त्यांना दिनांक १७/१२/०७. रोजी चर्चेसाठी बोलविण्यात आले. दिनांक १७/१२/०७ रोजी मा. आयुक्त सो. यांचे सोबत झालेल्या चर्चेत सदर कामाच्या निविदा जास्त दराच्या असल्यामुळे त्यांना पुन्हा वाटाघाटी साठी बोलविण्याचे ठरले. त्या अनुषंगाने मे. मोनार्च सर्व्हेयर ॲण्ड कॉन्ट्रक्टर प्रा. लि. पुणे यांना दर कमी करण्याबाबत कळविले असता मे. मोनार्च सर्व्हेयर ॲण्ड कॉन्ट्रक्टर प्रा. लि. पुणे यांनी त्यांचे पत्र क्र. एम. ओ.एन./यु.एम.सी.१, दि. ०९/०१/२००८ अन्वये रु. १,५३,००,०००/– रक्कमेत ( D. P. R )चे काम करण्याची तयारी दर्शविली आहे.

सदर भुयारी गटार योजनेच्या कामाचे ( D. P. R ) तयार करणे गरजेचे असल्यामुळे व निविदा धारकाने, वाटाघाटी अंती सादर केलेले दर रु. १,५३,००,०००/– वाजवी वाटत असल्यामुळे भुयारी गटार योजनेच्या कामाच्या ( D. P. R ) बनविण्याचे निविदेस मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे गरजेचे आहे.

सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या निर्णयासाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४५ दिनांकः– २९/२/२००८

सुचकाचे नाव :– श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. किशोर जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाअंतर्गत भूयारी गटार योजनेच्या कामांची अंदाजपत्रके (आराखडे) (D.P.R.) तयार करणे कामी प्रशासनास मे. मोनार्च सर्व्हेयर ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर पुणे या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस व रु. १,५३,००,०००/– च्या अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**बहुमताने**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८** :– उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत दोन जकात नाके सुरू करणेस परवानगी देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ८ :—** उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत दोन जकात नाके सुरू करणेस परवानगी देणे.

प्रस्तावना

**जकात नाके सुरु करण्याची कारणे:—**

१. आयातीक म्हारळगांव, गावदेवी मंदिर रोड, बौध्द नगर या मार्गाने स्मशान भुमी येथुन जकात न भरता उल्हासनगर येथे प्रवेश करतो.
२. आयातीक कल्याण तालुका वसार गाव येथून मौर्यानगरी मानेरा गाव येथून जकात न भरता उल्हासनगर हद्दीत प्रवेश करतो.

वरील विषयानुसार मे. कोणार्क इ.प्रा.लि.(जकात अभिकर्ता) उल्हासनगर महानगरपालिका यांनी दिनांक ११/६/०७ च्या पत्रानुसार मा. आयुक्त (जकात) यांना दोन नविन जकात नाके सुरु करणेकामी विनंती केली आहे. सदर दोन जकात नाके सुरु करणेस मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली असून मा. स्थायी समितीची अंतिम मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

सबब उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ मधिल नियम ५ नुसार मा. आयुक्तांनी मंजुरी दिल्यानंतर मा. स्थायी समितीने अंतीम मंजुरी देणे आवश्यक आहे. सदरचे दोन जकात नाके सुरु करण्याची ठिकाणे खालीलप्रमाणे आहेत.

१. स्मशान भुमी रोड समोर, उल्हासनगर—२
२. मौर्यानगरी, मानेरा, गाव रोड, सेक्शन—२५, उल्हासनगर—४

उपरोक्त बाबी लक्षात घेता वरील दोन ठिकाणी जकात नाके सुरु केल्यास जकात वळवेगीरीस आला असून जकात वसुली सुरळीत होणेस मदत होवून महापालिकेच्या आर्थिक बाबतीत भर पडेल.

सबब उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ मधिल नियम ५ नुसार दोन नविन जकात नाके उघडण्यास परवानगी मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर प्रस्तावित करीत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४६ दिनांक:— २९/२/२००८

सुचकाचे नाव :— श्री. गोविंदराम लुंड

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत स्मशान भुमी समोर, उल्हासनगर—२ व मौर्यानगरी, मानेरा, गाव रोड, सेक्शन—२५, उल्हासनगर—४ जकात नाके सुरू करणेस परवानगी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९ :—** श्रीम. संगिता व्हि. तलरेजा या अपंग व्यक्तीस उल्हासनगर रेल्वे स्टेशन, जकात नाक्याजवळ फुटपाथवरील महापालिकेच्या जागेवर एस.टी.डी./पी.सी.ओ. बुथ चालविण्याकामी जागा वापर परवाना देणे.

---

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–**शहराच्या हितासाठी हा प्रस्ताव पारीत केला जावा.

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. राम पारवानी :–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ९ :–** श्रीम. संगिता व्हि. तलरेजा या अपंग व्यक्तीस उल्हासनगर रेल्वे स्टेशन, जकात नाक्याजवळ फुटपाथवरील महापालिकेच्या जागेवर एस.टी.डी./पी.सी. ओ. बुथ चालविण्याकामी जागा वापर परवाना देणे.

**प्रस्तावना**

श्रीमती संगिता व्ही. तलरेजा राहणार गणेश गंगा, १०१, पहिला मजला, ओ.टी. सेक्शन, उल्हासनगर–२ यांनी एस.टी.डी./पी.सी.ओ. बुथकरीता खालील ठिकाणी मागणी केलेली आहे.

उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळ, जकात नाका (सुलभ शौचालय) फुटपाथवर उल्हासनगर–३.

पुजा हॉटेल जवळ, स्टेशन रोड, उल्हासनगर–३

सी.एच.एम. कॉलेज जवळ, उल्हासनगर–३

महानगरपालिका महासभा ठराव क्र. १६, दिनांक २०/५/२००५ अन्वये अपंग व्यक्तींना एस.टी.डी./पी.सी.ओ. बुथ चालविणे प्रयोजनार्थ जागा उपलब्ध करुन देणेकामी भाडेपट्टयाची रक्कम, जागा? निश्‍चितीचे निकष, भाडे पट्टयाचा कालावधी, अर्जदाराबाबतचे निकष जागा वितरणांची कार्यपध्दती व जागा वापरासंबंधीच्या अटी व शर्तीस मान्याता देण्यात आलेली आहे.

वरील ठरावाच्या अर्जदाराने श्रीमती संगिता व्ही. तलरेजा यांनी मागणी केलेप्रमाणे एस.टी.डी./पी.सी.ओ. बुथकरीता उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळ, जकात नाका सुलभ शौचालय फुटपाथवर, उल्हासनगर–३ या ठिकाणी अनामत रक्कम रु. १८००/– तसेच प्रतिमाह रक्कम रु. १५०/– याप्रमाणे आगाऊ महिन्याचे भाडे असे एकत्रित रक्कम रुपये २२५०/– चा भरणा करुन घेवुन मान्यता देणेबाबत मंजुरी मिळणेसाठी मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १४७ **दिनांक:–** २९/२/२००८

सुचकाचे नाव :– श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती निलम रावत

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार आयुक्त विनिर्दिष्ट करतील अशा अटी शर्तीवर श्रीम कृ संगिता व्हि. तलरेजा या अपंग व्यक्तीस उल्हासनगर रेल्वे स्टेशन, जकात नाक्याजवळ फुटपाथवरील महापालिकेच्या जागेवर एस.टी.डी./पी.सी.ओ. बुथ चालविण्याकामी जागा वापर परवाना देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨

**विषय क्र. १० :–** बॅरेक नं. ३५१, साई आत्मा बिल्डींगच्या बाजुला डॉ.अमर दवाखान्यासमोर, उल्हासनगर–२ येथिल सार्वजनिक शौचालयाच्या विनियोगास मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—**त्या ठिकाणी कसले बांधकाम केले जाईल? सीसी पॅसेज नाहीतर अन्य काहीना काही बांधकाम केले पाहिजे.

**सदस्य श्री. जीवन इदनानी:—**जी काही मागणी असेल त्याप्रमाणे तेथे बांधकाम केले जाईल.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. राम पारवानी :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १०** :— बॅरेक नं. ३५१, साई आत्मा बिल्डींगच्या बाजुला डॉ.अमर दवाखान्यासमोर, उल्हासनगर—२ येथिल सार्वजनिक शौचालयाच्या विनियोगास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयास अनुसरुन श्रीमती जया प्रकाश माखिजा, महापालिका सदस्या उल्हासनगर महानगरपालिका यांनी दिनांक २८/१/२००८ च्या पत्रान्वये बॅरेक नं. ३५१, साई आत्मा बिल्डींगच्या बाजुला डॉ. अमर दवाखान्यासमोर, उल्हासनगर—२ येथिल परिसरात असलेले शौचालय अतिशय जुने व मोडकळीस आलेले असल्याने सदरील शौचालय निष्कासन करुन त्याजागी सीसी पॅसेज बनविणे बाबत विनंती केलेली आहे.

सदर शौचालयाबाबतचा आरोग्य विभागाकडुन संबंधित स्वच्छता निरिक्षक उज्जैनवाल तसेच मुख्य स्वच्छता निरिक्षक यांनी सादर केलेला अहवाल/पंचनामा मालमत्ता विभागास प्राप्त झालेला आहे.

सदर अहवाल/पंचनाम्या मध्ये उक्त ठिकाणी १८ सिटचे असलेले शौचालय धोकादायक असुन वापरात नाही. तसेच तेथिल नागरीकांनी शौचालय निष्कासन करणेबाबत संमती दर्शविली आहे. त्यामुळे सदरचे शौचालय निष्कासित करणेबाबत नमुद केले आहे.

उक्त बाबी विचारात घेता बॅरेक नं. ३५१, साई आत्मा बिल्डींगच्या बाजुला डॉ.अमर दवाखान्यासमोर, उल्हासनगर—२ या ठिकाणी असलेले शौचालय निष्कासन करुन त्या ठिकाणी सीसी पॅसेज बनविणेकरीता मंजुरी मिळणेबाबत मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. १४८** **दिनांक:— २९/२/२००८**

सुचकाचे नाव :— श्रीमती सुजाता रिजवानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे बॅरेक नं. ३५१, साई आत्मा बिल्डींगच्या बाजुला डॉ.अमर दवाखान्यासमोर, उल्हासनगर—२ जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे निष्कासनास व जागेवरील परिस्थिती पहाता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करणेस मान्यता देत आहे.

परंतु—

सदरची शौचालये तो पर्यंत निष्कासित करु नयेत जोपर्यंत त्याठिकाणी विकास कामे सुरु होत नाहीत.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

**विषय क्र. ११** :—श्री निधी सामाजिक प्रतिष्ठान संस्था, उल्हासनगर —३ यांना १) बॅ. नं. १४९३, सेक्शन ३०, उल्हासनगर—४, २) पारस वाईन्सच्या समोर, इंदिरा गांधी भाजी मार्केटच्या बाजुला, उल्हासनगर—३, ३) कालानी महलच्या व खेमानी बस स्टॉपच्या मागे, उल्हासनगर—२, ४) बॅ. नं. ४९१, शारदा विद्यालय, हिरा मॅरेज हॉल समोर, उल्हासनगर—३ याठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर सुलभ शौचालय बांधणेस परवानगी देणे.

---

सदस्य श्री. किशोर जग्यासी:—याबाबत स्पष्टीकरण करा. शहरात एमएमआरडीएकडुन शौचालय बांधली जाणार आहेत. शौचालय बांधण्याबाबतचा हा प्रस्ताव पारीत करा. परंतु हे जे ठिकाण सुचविण्यात आलेले आहे याठिकाणी अगोदरच शौचालय बांधण्यात आलेले आहे. त्यामुळे दुसरे एखादे ठिकाण सुचविले जावे.

सदस्य श्री. संजय बठिजा:— एमएमआरडीए शहरात सार्वजनिक शौचालय बांधत आहे. दुसरी गोष्ट अशी की ज्या संस्थेना पैसे दया व वापरा तत्वावर शौचालय बांधण्यास परवानगी दिलेली आहे त्यांनी ती कामे अदयाप पुर्ण केलेली नाहीत. त्यांनी ती पुर्ण केली आहेत की नाही याची तपासणी केली जावी.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ११** :—श्री निधी सामाजिक प्रतिष्ठान संस्था, उल्हासनगर —३ यांना १) बॅ. नं. १४९३, सेक्शन ३०, उल्हासनगर—४, २) पारस वाईन्सच्या समोर, इंदिरा गांधी भाजी मार्केटच्या बाजुला, उल्हासनगर—३, ३) कालानी महलच्या व खेमानी बस स्टॉपच्या मागे, उल्हासनगर—२, ४) बॅ. नं. ४९१, शारदा विद्यालय, हिरा मॅरेज हॉल समोर,उल्हासनगर—३ याठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर सुलभ शौचालय बांधणेस परवानगी देणे.

प्रस्तावना

श्री निधी सामाजिक प्रतिष्ठान संस्था, फालवर लाईन बॅ. नं. ११३२, रुम नं. ५, उल्हासनगर —३ यांनी दि. १७/७/२००७ च्या पत्रान्वये खालील ठिकणी पैसे दया व वापरा तत्वावर शौचालय बांधणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

१) बॅ. नं. १४९३, सेक्शन ३०, उल्हासनगर—४,
२) पारस वाईन्सच्या समोर, इंदिरा गांधी भाजी मार्केटच्या बाजुला, उल्हासनगर—३,
३) कालानी महलच्या व खेमानी बस स्ऑपच्या मागे, उल्हासनगर—२,
४) बॅ. नं. ४९१, शारदा विद्यालय, हिरा मॅरेज हॉल समोर,उल्हासनगर—३

सदर ठिकाणी संबंधीत स्वच्छता निरिक्षक तसेच मुख्य स्वच्छता निरिक्षक यांनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केलेले आहेत.

१) बॅ. नं. १४९३, सेक्शन ३०, उल्हासनगर—४,

स्वच्छता निरिक्षक श्री. वळवी तसेच मुख्य स्वच्छता निरिक्षकाचे अहवालात उक्त ठिकाणी स्त्री ५ पुरुष एकुण १० सिटचे महापालिकेचे सार्वजनिक शौचालय आहे. सदर शौचालयाच्या जागेवर पैसे दया व वापरा तत्वावर बनविणेकरीता प्रस्ताव सादर केलेला आहे.

२) पारस वाईन्सच्या समोर, इंदिरा गांधी भाजी मार्केटच्या बाजुला, उल्हासनगर—३,

स्वच्छता निरिक्षक श्री. सोनाने तसेच मुख्य स्वच्छता निरिक्षकाचे अहवालात उक्त ठिकाणी तीन सीटचे सार्वजनिक लेडिज शौचालय आहेत. तरी सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन अभिप्राय घेणेबाबत नमुद केले आहे.

३) कालानी महलच्या व खेमानी बस स्आॅपच्या मागे, उल्हासनगर–२,

स्वच्छता निरिक्षक श्री. खटावकर एस एस तसेच मुख्य स्वच्छता निरिक्षिकाचे अहवालात सदर ठिकाणी हे मुख्य रस्त्यावर असून रस्त्याच्या कडेने नाला आहे. तसेच मुतारीच्या मागील बाजुस खेमानी हायस्कुलची इमारत आहे. सदर ठिकाणी सुलभ शौचालय बांधल्यास रहदारीस अडथळा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच नाल्यावर शौचालय बांधल्यास नाला चोकअप होवून रस्त्यावर पाणी पसरण्याची शक्यता आहे. तरी याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पहाणी होणे संयुक्तीक वाटते.

४) बॅ. नं. ४९१, शारदा विद्यालय, हिरा मॅरेज हॉल समोर,उल्हासनगर–३

स्वच्छता निरिक्षक श्री. दरबार राठोड तसेच मुख्य स्वच्छता निरिक्षकाचे अहवालात सदर ठिकाणी जुने शौचालय असुन सदर ठिकाणी शौचालय बांधणेस हरकत नाही.

प्रस्तावित ठिकाणी २ व ३ करीता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अभिप्राय मागणी केली असता त्यांनी सदर बाब विभागाशी संबधित नसल्याचे मौखिकरित्या कळविले आहे.

उक्त बाबी विचारात घेता प्रस्तावित वरील ४ ठिकाणी श्री. निधी सामाजिक प्रतिष्ठान संस्था, फालवर लाईन बॅ. नं. ११३२, रुम नं. ५, उल्हासनगर–३ यांना पैसे दया व वापरा तत्वावर शौचालय बनविणेस निर्णयार्थ स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १४९ दिनांकः– २९/२/२००८

सुचकाचे नाव :– श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती निलम रावत

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार श्री निधी सामाजिक प्रतिष्ठान संस्था, उल्हासनगर –३ यांना १) बॅ. नं. १४९३, सेक्शन ३०, उल्हासनगर–४, २) पारस वाईन्सच्या समोर, इंदिरा गांधी भाजी मार्केटच्या बाजुला, उल्हासनगर–३, ३) कालानी महलच्या व खेमानी बस स्आॅपच्या मागे, उल्हासनगर–२, ४) बॅ. नं. ४९१, शारदा विद्यालय, हिरा मॅरेज हॉल समोर,उल्हासनगर–३ याठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर सुलभ शौचालय बांधणेस परवानगी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १२ :–** श्री. निधी सामाजिक प्रतिष्ठान संस्था उल्हासनगर यांना बॅरेक नं. ३३२ जवळील, सत्यसाई मार्केट, उल्हासनगर–४ याठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेस परवानगी देणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

**सभापती, श्री. राम पारवानी :–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १२ :–** श्री. निधी सामाजिक प्रतिष्ठान संस्था उल्हासनगर यांना बॅरेक नं. ३३२ जवळील, सत्यसाई मार्केट, उल्हासनगर–४ याठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेस परवानगी देणे.

**प्रस्तावना**

श्री. निधी सामाजिक प्रतिष्ठान संस्था (रजि) उल्हासनगर शहर जिल्हा शाखा यांनी सत्यसाई मार्केट, बॅरेक नं. ३३२, उल्हासनगर–१ मधील ४ सिट्चे जुने मोडकळीस आलेले शौचालय निष्कासित करुन सदर ठिकाणी पैसे दया व वापरा तत्वावर नवीन सुलभ शौचालय बनविणेबाबत परवानगी देणेबाबत विनंती केलेली आहे.

उक्त शौचालयाबाबत आरोग्य विभागाकडुन संबंधित श्री. दरबार राठोड, स्वच्छता निरीक्षक तसेच मुख्य स्वच्छता निरिक्षक यांनी सादर केलेला अहवाल / पंचनामा मालमत्ता विभागास प्राप्त झालेला आहे.

सदर अहवालात उक्त ठिकाणी महानगरपालिकेचे ४ सिटचे मोडकळीस वापरात नसलेले जुने मिलिस्ट्री टाईपचे शौचालय असुन सध्या स्थितीत जवळपास कुठलेही शौचालय नाही. तसेच येथिल नागरीक सदर ठिकाणी सुलभ शाौचालय बांधणेबाबत मागणी करीत असल्याचे नमुद करण्यात आले आहे.

तरी उक्त बाबी विचारात घेता सत्यसाई मार्केट, बॅरेक नं. ३३२, उल्हासनगर–१ मधील ४ सिट्चे जुने शौचालय निष्कासित करुन सदर ठिकाणी पैसे दया व वापरा तत्वावर नवीन सुलभ शौचालय बनविणेकरीता श्री. निधी सामाजिक प्रतिष्ठान (रजि) उल्हासनगर शहर जिल्हा शाखा यांना परवानगी देणेकामी निर्णयार्थ मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १५०    **दिनांक:–** २९/२/२००८

सुचकाचे नाव :– श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार श्री. निधी सामाजिक प्रतिष्ठान संस्था उल्हासनगर यांना बॅरेक नं. ३३२ जवळील, सत्यसाई मार्केट, उल्हासनगर–४ याठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेस परवानगी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी<br>
स्थायी समिती सभा<br>
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

⇨

**विषय क्र. १३ :–** आदर्श नवयुवक सामाजिक सेवा मंडळ या संस्थेस १.) कामगार हॉस्पिटल जवळ, हरीजन कॉलनी, उल्हासनगर–२, २.) बॅ. न. ५२४, डॉ. किंगर डिस्पेंसरी जवळ, जापानी बाजार मागे, उल्हासनगर–२ याठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेस परवानगी देणे.

---

**काही सदस्य :–**पास–पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. १३ :—** आदर्श नवयुवक सामाजिक सेवा मंडळ या संस्थेस १.) कामगार हॉस्पिटल जवळ, हरीजन कॉलनी, उल्हासनगर—२, २.) बॅ. न. ५२४, डॉ. किंगर डिस्पेंसरी जवळ, जापानी बाजार मागे, उल्हासनगर—२ याठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेस परवानगी देणे.

प्रस्तावना

आदर्श नवयुवक सामाजिक सेवा मंडळ सदर संस्था मेहतर समाजाचे बेरोजगारांची संस्था असून त्यांनी पैसे दया व वापरा तत्वावर सुलभ शौचालय बांधणेबाबत खालील ठिकाणी मागणी केलेली आहे.

१.) कामगार हॉस्पिटल जवळ, हरीजन कॉलनी, उल्हासनगर—२,

२.) बॅ. न. ५२४, डॉ. किंगर डिस्पेंसरी जवळ, जापानी बाजार मागे, उल्हासनगर—२

उक्त शौचालयाबाबत आरोग्य विभागाकडुन संबंधित स्वच्छता निरीक्षक श्री. पाटील तसेच मुख्य स्वच्छता निरिक्षक यांनी सादर केलेला अहवाल / पंचनामा मालमत्ता विभागास प्राप्त झालेला आहे.

सदर अहवालात प्रस्तावित दोन्ही नागरीकांस पैसे दया व वापरा तत्वावर सुलभ शौचालय बांधण्यास हरकत असल्याबाबत नमुद केले आहे.

तरी उक्त बाबी विचारात घेता १.) कामगार हॉस्पिटल जवळ, हरीजन कॉलनी, उल्हासनगर—२, २.) बॅ. न. ५२४, डॉ. किंगर डिस्पेंसरी जवळ, जापानी बाजार मागे, उल्हासनगर—२ या ठिकाणी पैसे दया व वापरा तत्वावर सदर ठिकाणी सुलभ शौचालय बनविणेबाबत मंजुरीकरीता मा. स्थायी समिती निर्णयार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १५१ — दिनांकः— २९/२/२००८

सुचकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती निलम रावत

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार आदर्श नवयुवक सामाजिक सेवा मंडळ या संस्थेस १.) कामगार हॉस्पिटल जवळ, हरीजन कॉलनी, उल्हासनगर—२, २.) बॅ. न. ५२४, डॉ. किंगर डिस्पेंसरी जवळ, जापानी बाजार मागे, उल्हासनगर—२ याठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेस परवानगी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १४ :—** टॉयलेट अण्ड टॉयलेट प्रा.लि. यांना आकाश कॉलनी २२/२२ के.व्ही सब स्टेशन जवळ, उल्हासनगर —५याठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेस परवानगी देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १४ :–** टॉयलेट अण्ड टॉयलेट प्रा.लि. यांना आकाश कॉलनी २२/२२ के.व्ही सब स्टेशन जवळ, उल्हासनगर –५याठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेस परवानगी देणे.

**प्रस्तावना**

_श्री. एस.बी.दास प्रादेशिक व्यवस्थापक,_टॉयलेट अण्ड टॉयलेट प्रा.लि. यांना महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रसिटी डिस्ट्रीब्युशन को.लि. २२/२२ के.व्ही सब स्टेशन जवळ,उल्हानगर –५ या ठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर सुलभ शौचालय बनविणेबाबत परवानगी मिळणेकरीता विनंती केलेली आहे.

उक्त शौचालयाबाबत अहवाल / पंचनामा स्वच्छता निरीक्षक श्री. मनिष हिवरे तसेच मुख्य स्वच्छता निरिक्षक यांच्याकडुन प्राप्त झालेला असून सद्यस्थितीत महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रसिटी डिस्ट्रीब्युशन को.लि. २२/२२ के.व्ही सब स्टेशन जवळ,उल्हानगर –५ या ठिकाणी जवळपास एकही सुलभ शौचालय नाही. असा अहवाल सादर केलेला आहे.

उक्त बाबी विचारात घेता महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रसिटी डिस्ट्रीब्युशन को.लि. २२/२२ के.व्ही सब स्टेशन जवळ,उल्हानगर –५ या ठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर सुलभ शौचालय बनविणेबाबत श्री. एस.बी. दास, प्रादेशिक व्यवस्थापक, टॉयलेट ॲण्ड टॉयलेट प्रा.लि. यांना परवानगी देण्यासाठी मंजुरी मिळणेकरीता मा. प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १५२ दिनांक:– २९/२/२००८

सुचकाचे नाव :– श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार टॉयलेट अण्ड टॉयलेट प्रा.लि. यांना आकाश कॉलनी २२/२२ के.व्ही सब स्टेशन जवळ,उल्हानगर –५ याठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेस परवानगी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १५ :–** उल्हासनगर–१ येथिल पिंकू प्लाझा ते डॉल्फिन क्लब पर्यंत एम–३५० ने रस्ता बनविणे कामी प्रशासनास लघुत्तम दराचे निविदाकार मे. जयभारत कन्स्ट्रक्शन यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

सदस्या श्रीमती निलम रावत:– या प्रस्तावास माझा विरोध आहे.

सदस्य श्री. सुरेश जाधव:– हा रस्ता तर अगोदरच तयार केलेला आहे. महासभेमध्ये श्री. भुल्लर महाराज यांनी या रस्त्याच्या कामाबाबत हरकत घेतली होती.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—शहराच्या हितासाठी हा प्रस्ताव पारीत केला पाहिजे.

सदस्य श्री. सुरेश जाधव::—यातील अर्ध्या रस्त्याचे काम अगोदरच झालेले आहे. डॉल्फीन क्लब पासुन साईबाबा मंदिरापर्यंतच्या रस्त्याचे काम झालले यापुढे सेंच्युरी गेट पर्यंत काम झाले पाहिजे.

सदस्य श्री. जीवन इदनानी:—डॉल्फीन क्लब ते साईबाबा मंदिरापर्यंतच्या रस्त्याचे काम झालेले आहे याबाबत महासभेत श्री. भुल्लर महाराज यांनी विरोध केला होता. श्रीमती रावतजी आपणांस या रस्त्याचे काम करुन घ्यायचे असेल तर सांगा. कारण की हे ठिकाण आपल्या प्रभागातील आहे. या रस्त्याचे काम करायचे नसेल तर तसे सांगा.

सदस्य श्री. सुरेश जाधव:— रस्त्याचे जे काम करण्यात आलेले आहे ते कुणी केले आहे? आता हा रस्ता सेंच्युरी गेटपर्यंत झाला पाहिजे.

सदस्य श्री. जीवन इदनानी:—जो रस्ता तयार करण्यात आलेला आहे त्याच्या पुढील काम करावयाचे आहे. जे बांधकाम केलेले आहे त्याच्याशी या प्रस्तावाचा काहीही संबंध नाही.

सभापती, श्री. राम पारवानी:—काम झाले पाहिजे. श्री. शिर्के साहेब आपण सांगा तेथिल स्थिती काय आहे?

सदस्य श्री. किशोर जग्यासी:—अगोदर केलेल्या रस्त्याच्या बिलाचा याच्याशी काही संबंध तर नाही ना?

सदस्य श्री. सुरेश जाधव :—जेथपर्यंत रस्त्याचे काम झालेले आहे तेच ठिकाण या गोषवा—यात दर्शविण्यात आलेले आहे प्रत्यक्षात त्यापुढील रस्त्याचे ठिकाण दर्शविले पाहिजे. सेंच्युरी गेटपर्यंतचे ठिकाण दर्शविले पाहिजे.

सदस्य श्री. गोविंदराम लुंड:—जेथपर्यंत रस्ता झालेला आहे त्यापुढील कामाचे ठिकाण व्यवस्थितपणे लिहिले पाहिजे.

सदस्या श्रीमती निलम रावत:—त्या रस्त्यांचे ठिकाण माझ्या प्रभागात येत आहे. म्हणुन तेथिल संपुर्ण परिस्थिती मला माहित आहे. यासाठी हा प्रस्ताव आजच्या सभेच्या कामकाजातून वगळण्यांत यावा.

महापालिका सचिव:—या प्रस्तावास मतदान घ्यायचे आहे काय?

सदस्य श्री. सुरेश जाधव:—हा विषय वगळा.

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत आजच्या सभेतुन सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव वगळण्यांत येत आहे.

---

**विषय क्र. १५ :—** उल्हासनगर—१ येथिल पिंकू प्लाझा ते डॉल्फिन क्लब पर्यंत एम—३५० ने रस्ता बनविणे कामी प्रशासनास लघुत्तम दराचे निविदाकार मे. जयभारत कन्स्ट्रक्शन यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर—१ येथिल पिंकू प्लाझा ते डॉल्फिन क्लब याठिकाणी एम—३५० ने रस्ता बनविणे कामी प्रशासनास लघुत्तम दराचे निविदाकार मे. जयभारत कन्स्ट्रक्शन यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नांव | • उल्हासनगर—१ येथील पिंकू प्लाझा ते डॉल्फिन क्लब याठिकाणी रस्ता एम—३५० ने बनिवणे. |
| २ | प्राकलनाची किंमत | ६,३४,८००/— |

| | | |
|---|---|---|
| ३ | तांत्रिक मंजुरी देणा–या अधिका–याचे पदनाम | कार्यकारी अभियंता |
| ४ | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | क्र. २००५ दि. १४/६/२००४ |
| ५ | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | क्र. ९८/१ दिनांक २१/८/२००४ |
| ६ | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र. ६१/७ दिनांक २/६/२००७ |
| ८ | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | २ |
| ९ | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | २ |
| १० | निविदा उघडल्याचा दिनांक | दिनांक १९/०६/२००७ |
| ११ | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता | |
| अनु | निविदाधारकाचे नांव | |
| १ | मे.जयभारत कंन्स्ट्रक्शन | ३० टक्के जास्त |
| २ | मे. के.हरेश असोसिएटस | ३२ टक्के जास्त |
| १२ | निविदाधारकाशी वाटाघाटी केल्या असल्याचा त्याचा तपशिल | मे. जयभारत कंन्स्ट्रक्शन यांनी त्यांचे भरलेले दर ३० टक्के जास्त दरामध्ये चालू दरसुचीवरील (२००६–०७) प्राकलनिय किंमती ०.२७ टक्क्ने कमी होत आहे. |
| १७ | लेखा शिर्षाचे नांव | सी–४(iii) पी–२ रस्तें प्रवास व पुल इत्यादी सुधारणे व नवीन बांधणे. |

उक्त नमूद केल्याप्रमाणे मे जयभारत कंन्स्ट्रक्शन यांचे प्राकलनिय दरापेक्षा ३०.०० टककेने जास्त असलेली निविदा वाजवी असल्याने व आर्थिकदृष्टया महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब, निविदाधारक मे जयभारत कंन्स्ट्रक्शन यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकरीता तसेच निविदेस मंजूरी मिळणेकरीता प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** १५२ अ  **दिनांक:–** २९/२/२००८

सुचकाचे नाव :– श्री. किशोर जग्यासी

अनुमोदकाचे नाव :– श्री. जीवन इदनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर–१ येथिल पिंकू प्लाझा ते डॉल्फिन क्लब पर्यंत एम–३५० ने रस्ता बनविणे कामी प्रशासनास लघुत्तम दराचे निविदाकार मे. जयभारत कन्स्ट्र यांच्याशी संविदेस मान्यता देणे बाबतचा विषय सविस्तर माहिती अभावी आजच्या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १६ :–** आरोग्य विभागास सन २००३ करीता कचरा गाडया (व्हीलबरोज) पुरविणे कामी मेसर्स ताहेर इंजिनिअरींग वर्कस् नांदेड यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

---

**सदस्य श्री. गोविंदराम लुंड:–** ज्या कचरा गाडया आपणांस पुरविण्यात आल्या होत्या त्या अतिशय निष्कृष्ठ दर्जाच्या होत्या. त्यांची चाके हलत होती. त्यामुळे त्या परत केल्या होत्या. त्या ठेकेदाराची चौकशी केली जावी. व सभागृहास माहिती दिली जावी. तोपर्यंत हा विषय पुढे ढकलला जावा.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—त्या गाडया मग स्विकारल्या कश्या? कुणी स्विकारल्या? त्यावेळेस संबंधीत अधिकारी कोण होता? त्याची चौकशी केली जावी.

सदस्य श्री. सुरेश जाधवः—नेहमी अशाच प्रकारच्या गाडया पुरविल्या जात असतात.

सदस्य श्री. किशोर जग्यासीः—त्या गाडया एवढया निष्कृष्ट प्रतिच्या होत्या की त्या १५ दिवस सुध्दा व्यवस्थित चालल्या नाहीत. १५ दिवसातच त्यांची तुटफुट होण्यास सुरुवात झाली.

सदस्य श्री. गोविंदराम लुंडः— जुन्या झालेल्या व तुटलेल्या गाडया कुठे जातात?

सदस्य श्री. जीवन इदनानीः—भंगारात जातात. व्हीटीसी येथे भंगाराचा ढिग पडला आहे.

सभापती, श्री. राम पारवानीः—जुन्या व तुटलेल्या गाडया कुठे जातात याचा खुलासा केला जावा.

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, आरोग्य):—प्रभाग अधिका—यांच्या ताब्यात दिलेल्या आहेत.

सदस्य श्री. गोविंदराम लुंड/श्री. जीवन इदनानीः—जुन्या गाडयांचा लिलाव का केला जात नाही?

श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—या ज्या कचरा गाडया आलेल्या आहेत त्या आता खरेदी केलेल्या नाहीत. २००३ मध्ये खरेदी केलेल्या गाडयांचा आता पुरवठा करण्यात आलेला आहे.

सदस्य श्री. गोविंदराम लुंडः—२००३ मध्ये नांदेड येथिल ठेकेदाराने कचरा गाडयांचा जो पुरवठा केला होता तेव्हा त्या गाडया निष्कृष्ट दर्जाच्या असल्याने मी त्या परत पाठविल्या होत्या. त्या पुन्हा कश्या आल्या?

सभापती, श्री. राम पारवानीः—या गाडया आता आपण खरेदी करत नसुन त्या यापुर्वी खरेदी केलेल्या आहेत. सदस्यांच्या माहितीसाठी हा प्रस्ताव येथे आणलेला आहे.

सदस्य श्री. सुरेश जाधवः—परत पाठविलेल्या गाडया परत आल्या आहेत.

सदस्य श्री. गोविंदराम लुंडः—आपण का त्यांना मंजुरी दयायची?

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः—या प्रस्तावास मंजुरी न देता या सर्व गाडया परत करा.

सभापती, श्री. राम पारवानीः—हा प्रस्ताव केवळ माहितीसाठी आहे.

सदस्य श्री. सुरेश जाधवः—गाडयांचा पुरवठा अगोदरच झालेला आहे.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः—बिलामध्ये फक्त २० टक्के कपात केलेली आहे.

सदस्य श्री. किशोर जग्यासीः— २००३ मध्ये तर आपलीच सत्ता होती.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—आज कुणाची सत्ता आहे? महासभेमध्ये अर्थसंकल्प सादर करतांना आपण श्रेय कसे घेता? सत्तेची गोष्ट करु नका, मी बोललो तर तुम्हांला वाईट वाटेल.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १६ :—** आरोग्य विभागास सन २००३ करीता कचरा गाडया (व्हीलबरोज) पुरविणे कामी मेसर्स ताहेर इंजिनिअरींग वर्कस् नांदेड यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

आरोग्य विभागास सन २००३ करिता कचरा गाडया (Wheel barrows) खरेदी साठी भांडार विभागाद्वारा जाहिर निविदा सूचना ही ०२/०४/२००४ रोजीचे नवभारत टाईम्स व आपला वार्ताहर हया वृत्तपत्रामध्ये प्रसारित करण्यात आलेले होते. सदर निविदा सूचनेनुसार १) मुकतोष इजि.वर्क्स, कल्याण २) सुदेश इंटरप्रायजेस, उल्हासनगर ३) सुशांत एंटरप्रायजेस हया पुरवठादारांनी सिलबंद निविदा फॉर्मस् हे दिनांक १५/४/२००४ रोजी मा. उपायुक्त (मु.) यांचे दालनात उघडण्यात आलेले होते. निविदेच्या अटी व शर्तीनुसार उपरोक्त पुरवठादारांनी कागदपत्रांची पुर्तता न केल्यामुळे सदर निविदा ही पुन्हा फेरनिविदा मागविण्याचे दिनांक १६/४/२००४ च्या टिप्पणीनुसार मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे.
फेरनिविदा सूचना ही दिनांक ३०/४/२००४ रोजीच्या नवभारत टाईम्स या वृत्तपत्रामध्ये प्रसारित करण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने दिनांक ३०/४/२००४ ते दिनांक ६/५/२००७ या कालावधीमध्ये खालीलप्रमाणे पुरवठादारांनी निविदा फॉर्मस् हे रक्कम रुपये ५००/— (ना परतावा) अदा केल्यानंतर विकत घेतले निविदेच्या अटी व शर्तीनुसार पुरवठादारांनी आपले सिलबंद निविदा हया दिनांक १०/५/२००७ रोजी दुपारी ४.०० वाजता तत्कालीन उपायुक्त (मु.) यांचे दालनात उघडण्यात आल्या होत्या. निविदेच्या अटी व शर्तीनुसार उपरोक्त पुरवठादारांनी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केल्यामुळे निविदापत्रे ही पुरवठादारां समक्ष उघडण्यात आलेली होती.

तुलनात्मक तक्ता

| अनु.क्र. | पुरवठादाराचे नाव | प्रस्तावित दर |
|---|---|---|
| १. | मे. सुदेश एंटरप्रायजेस, उल्हासनगर | २४८५/— |
| २. | मे. मुकतोष इजि. वर्क्स, नाशिक | २४९०/— |
| ३. | मे. सुदेश स्टिल फर्निचर, उल्हासनगर | २५१०/— |
| ४. | मे. ताहेर इंजि. वर्क्स, नांदेड | २३४८/— |

मे. ताहेर इंजि. वर्क्स, नांदेड यांचे न्युनत्तम दर प्रति कचरागाडी (नमुन्याप्रमाणे) २३४८/— दराने मंजुरी दिली आहे. मे. ताहेर इंजि वर्क्स नांदेड यांनी नमुना कचरागाडी नुसार मालाचा पुरवठा न केल्यामुळे त्यांचेद्वारा अतिरिक्त १०० नग चाकांचा पुरवठा हा घेण्यात आलेला आहे. तसेच मे. ताहेर इंजि. वर्क्स, नांदेड यांनी नमुना कचरागाडी नुसार पुरवठा न केल्यामुळे मूळ देयकातुन २० टक्के रक्कम Reduce Rate कपात करुन मे. ताहेर इंजि. वर्क्स यांना २०० नग हातगाडयांचे एकुण देयक रक्कम रुपये ४,६९,६००/— मधुन २० टक्के Reduce Rate रक्कम प्रमाणे ९३,९२०/— वजावट करुन उर्वरित रक्कम रुपये ३,७५,६८०/— अदा करावी लागेल. सदरचा खर्च हा सन २००७—०८ च्या अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष क्र. १ (९) साफसफाई साहित्य खरेदी व निगा या तरतुदी अंतर्गत करावा लागेल. सदर प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा. स्थायी समितीच्या निर्णयार्थ सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १५३ दिनांकः— २९/२/२००८

सुचकाचे नाव :— श्री. किशोर जग्यासी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार आरोग्य विभागास सन २००३ करीता कचरा गाडया (व्हीलबरोज) पुरविणे कामी मेसर्स ताहेर इंजिनिअरींग वर्कस् नांदेड यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १७ :—** श्री. इंदिरा मजुर कामगार सहकारी सोसायटी लि. कल्याण यांना १) बॅ. नं. २०३० जवळ, उल्हासनगर—५, २) उल्हासनगर—३ येथिल जवाहर हॉटेल शेजारील मुतारीच्या जागेवर, ३) उल्हासनगर—३ येथिल रेड क्रॉस हॉस्पीटल समोर, सेंट्रल हॉस्पीटलच्या फुटपाथवर पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेस परवानगी देणे.

---

सदस्य श्री. नरेंद्र दवणे:—या संस्थेस तीन तीन ठिकाणी शौचालय बांधण्यास परवानगी दिलेली आहे. या संस्थेनी ही कामे पुर्ण केली आहेत किंवा नाही? याची चौकशी केली जावी.

सदस्य श्री. सुरेश जाधव:—या संस्थेस आता चार चार कामे देत आहात. या कामांबाबत संबंधित प्रभागाच्या सदस्याचे संमती पत्र घेतले आहे किंवा नाही?

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—नगरसेवकाने पत्र दिलेले नाही. यासाठी हा प्रस्ताव नाकारला जावा.

सभापती, श्री. राम पारवानी:—या संस्थेने अगोदर काम केलेले आहे.

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, आरोग्य):—दोन कामे चालु आहेत.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—किती दिवसापासुन काम चालु आहे? मध्यंतरी कितीतरी दिवसापासुन काम बंद होते.

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, आरोग्य):—शहाड फाटक येथे शौचालयाचे काम चालु होते त्याबाबत न्यायालयात प्रकरण गेल्यामुळे सध्या काम बंद आहे.

सभापती, श्री. राम पारवानी:—या अगोदर जी कामे घेण्यात आली आहेत ती सर्व कामे पुर्ण झाली पाहिजेत. त्यानंतरच नविन कामे दिली पाहिजेत.

सदस्य श्री. राजेश वानखेडे:—हे काम दुस—या कुठल्या ठेकेदारास दिले जावे.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—जसे की या कामाबाबत संबंधीत नगरसेवकाचे संमती पत्र नसल्यामुळे हा प्रस्ताव नाकारला जावा.

सदस्य श्री. संजय बठिजा:—उल्हासनगर कॅम्प नं. ५ येथिल शौचालयाचे जे काम आहे त्या कामाबाबत संबंधीत नगरसेवकाचे संमती पत्र नाही तसेच त्या नगरसेवकास या कामाबाबत हरकत आहे. म्हणुन हे काम रद्द केले जावे.

सदस्य श्री. सुरेध जाधव:—म्हणुन त्या ठेकेदारास हे काम न देता दुस—या ठेकेदारास दिले जावे.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—तेच तर मी म्हणत आहे हा प्रस्ताव नाकारला जावा कारण की कॅम्प नं. ५ मधील कामाबाबत संबंधीत नगरसेवकाचे संमती पत्र नाही त्याचा या कामास विरोध आहे. आज संबंधीत नगरसेवकाच्या पत्राविना त्याच्या प्रभागात काम सुरु केले तर यापुढे सुध्दा कुण्याही नगरसेवकाच्या प्रभागात त्याच्या संमतीविना विकास काम सुरु होवु शकेल त्यामुळे हे काम यास्तरावरच नाकारले जावे.

सदस्य श्री. नरेंद्र दवणे:—संबंधीत नगरसेवकाचे संमती पत्र घ्या.

**सदस्य श्री. जीवन इदनानी:—**यापुढे संबंधीत नगरसेवकाचे संमती पत्र घेतले जाईल.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—**सर्व नगरसेवकांची बेईज्जत होत आहे त्यांना न विचारता त्यांच्या प्रभागात कामे सुरु केली जात आहेत. आपणातील काही नगरसेवकांच्या प्रभागात विकास कामे होत नाहीत तरी सुध्दा आपण काही प्रस्तावांबाबत पास पास म्हणत आहात.

**सदस्य श्री. संजय बठिजा /श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—**आमचा या प्रस्तावास विरोध आहे.

**सभापती, श्री. राम पारवानी :—** या प्रस्तावामधील अनुक्रमांक ३ वर दर्शविलेले जे काम आहे ते वगळने व उर्वरीत दोन कामांबाबत प्रस्ताव मतदानास टाकत आहे.

**महापालिका सचिव:—** १) बॅरेक नं. बॅ. नं. २०३० जवळ, उल्हासनगर—५, २) उल्हासनगर—३ येथिल जवाहर हॉटेल शेजारील मुतारीच्या जागेवर, ३) उल्हासनगर—३ येथिल रेड क्रॉस हॉस्पीटल समोर, सेंट्रल हॉस्पीटलच्या फुटपाथवर या तीन ठिकाणी शौचालय बांधण्याचा प्रस्ताव आहे. त्यातील उल्हासनगर—३ येथिल रेड क्रॉस हॉस्पीटल समोर, सेंट्रल हॉस्पीटलच्या फुटपाथवर हे काम वगळुन उर्वरित दोन ठिकाणी शौचालय बांधण्याच्या बाजुने जे सन्माननिय सदस्य आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

**प्रस्तावाच्या बाजुने १० मते**

| अ.क्र. | सदस्यांची नावे |
|---|---|
| १ | श्री पारवानी राम (चार्ली) फुंदुमल |
| २ | श्री लुंड गोविंदराम डोलुमल |
| ३ | श्री इदनानी जीवन (राजु) चंद्रभान |
| ४ | श्री जाधव सुरेश मधुकर |
| ५ | श्रीमती उदासी इंदिरा जमनादास |
| ६ | श्रीमती रावत निलम प्रेमसिंग |
| ७ | श्री जग्यासी किशोर |
| ८ | श्री वानखेडे राजेश देवेंद्र |
| ९ | श्री सुपाळे विजय खंडु |
| १० | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल |

**प्रस्तावाच्या विरोधात ५ मते**

| अ.क्र. | सदस्यांची नावे |
|---|---|
| १ | श्री ठाकुर नरेंद्र (कुमारी) केवलराम |
| २ | श्री बठिजा संजय रामचंद्र |
| ३ | श्रीमती रिजवानी सुजाता रमेश |
| ४ | श्रीमती निकम लता शांताराम |
| ५ | श्री दवणे नरेंद्र (रवीभाऊ) |

**सभापती, श्री. राम पारवानी :—**सदरचा विषयाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १७ :—** श्री. इंदिरा मजुर कामगार सहकारी सोसायटी लि. कल्याण यांना १) बॅ. नं. २०३० जवळ, उल्हासनगर—५, २) उल्हासनगर—३ येथिल जवाहर हॉटेल शेजारील मुतारीच्या जागेवर, ३) उल्हासनगर—३ येथिल रेड क्रॉस हॉस्पीटल समोर, सेंट्रल हॉस्पीटलच्या फुटपाथवर पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेस परवानगी देणे.

प्रस्तावना

चेअरमन, श्री. इंदिरा मजुर कामगार सहकारी सोसायटी लि. १/१, सिध्दीविनायक साो. ठाणेकर म्हाडा, कल्याण (प.) जि. ठाणे यांनी खालील ठिकाणी पैसे दया व वापरा तत्वावर सुलभ शौचालय बांधण्याकरीता परवानगी मागणी केलेली आहे.

१) बॅ. नं. २०३० जवळ, उल्हासनगर—५,

२) उल्हासनगर—३ येथिल जवाहर हॉटेल शेजारील मुतारीच्या जागेवर,

३) उल्हासनगर—३ येथिल रेड क्रॉस हॉस्पीटल समोर, सेंट्रल हॉस्पीटलच्या फुटपाथवर

आरोग्य विभागाकडुन सदर शौचालयाबाबत संबंधित स्वच्छता निरिक्षक/मुख्य स्वच्छता निरिक्षक यांनी सादर केलेला अहवाल मालमत्ता विभागात प्राप्त झालेला आहे.

सदर अहवालात त्यांनी पैसे दया व वापरा शौचालय बांधल्यास नागरीकांची सोय होईल असे नमुद केलेले आहे.

उक्त बाबी विचारात घेता चेअरमन, श्री. इंदिरा मजुर कामगार सहकारी सोसायटी लि. सिध्दीविनायक सो. ठाणेकर पाडा कल्याण (प.) जि. ठाणे यांना उक्त प्रस्तावित केलेल्या ठिकाणी सुलभ शौचालय बांधणेकामी परवानगी देणेबाबत मंजुरीकरीता मा. स्थायी समिती पटलावर निर्णयार्थ येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १५४ दिनांकः— २९/२/२००८

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार श्री. इंदिरा मजुर कामगार सहकारी सोसायटी लि. कल्याण यांना १) बॅ. नं. २०३० जवळ, उल्हासनगर—५, २) उल्हासनगर—३ येथिल जवाहर हॉटेल शेजारील मुतारीच्या जागेवर पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेस परवानगी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— प्रशासनाकडुन आयत्या वेळचे दोन विषय आलेले आहेत. आपणामधील बहुसंख्य सदस्यांची संमती असेल तर ते आजच्या सभेच्या कामकाजात सामावून घेता येतील.

काही सदस्य :—सामावुन घ्या.

सभापती, श्री. राम पारवानी:— प्रशासनाच्यावतीने आयत्या वेळच्या विषयान्वये मंजुरीस आणलेले दोन्ही विषय आपल्या सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समावून घेण्यात येत आहेत.

महापालिका सचिव :—विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

⇨ आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १८ :—**भगवान गौतम बुध्द यांची प्रवचन, बैठक मुद्रा व पाठीमागे प्रभावळ सहित रचना शिल्प तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उभे शिल्प बसविण्याबाबत मे. उत्तम पाचारणे यांचेशी थेट संविदा करणेस मान्यता देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. राम पारवानी :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

## ☑ आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १८ :—**भगवान गौतम बुध्द यांची प्रवचन, बैठक मुद्रा व पाठीमागे प्रभावळ सहित रचना शिल्प तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उभे शिल्प बसविण्याबाबत मे. उत्तम पाचारणे यांचेशी थेट संविदा करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

मा. महापौर सो. यांचेकडील दिनांक २४/९/२००७ चे पत्र व त्यासोबत पाठविलेले श्री. उत्तम पाचारणे, नगरपरिषद सभासद, नॅशनल ललित कला अॅकडमी, न्यु. दिल्ली यांचेकडील दिनांक १७/५/२००७ चे पत्र कृपया पहावे.

उक्त पत्राद्वारे मा. महापौर सो. गटनेते तसेच महापालिका सदस्य यांची भगवान गौतम बुध्द यांची प्रवचन, बैठक मुद्रा व पाठीमागे प्रभावळ सहीत रचना शिल्प तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उभे शिल्प उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील वॉटर सप्लाय कंपाउंड, कुर्ला कॅम्प, स्मशान भुमी समोर, उल्हासनगर—४ येथिल महानगरपालिकेच्या ताब्यातील मोकळया भुखंडावर बसविण्याबाबत वारंवार विचारणा होत आहे.

श्री. उत्तम पाचारणे, यांनी त्यांचे दिनांक १७/५/२००७ अन्वये भगवान गौतम बुध्द यांची प्रतिमा प्रभावळ मागे व बसलेली मुद्रा असुन सदर बसलेल्या प्रतिमेची उंची ६ फुट एवढी असुन त्याची ब्रांझ धातूमधील सध्याची एकूण किमान किंमत रुपये ७,२५,०००/— एवढी असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिल्पाची उंची ८ फुट ३' एवढी असून त्याची एकूण किंमत ही ७,००,०००/—एवढी आहे. तसेच दोन्ही शिल्प बसविणेसाठी त्याचा चबुतरा बनविणेकरीता प्रत्येकी २.०० लक्ष प्रमाणे रुपये ४.०० लक्ष अशाप्रकारे या कामाकरीता एकुण रु. १८.२५ लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचे दोन्ही पुतळे हे ब्रांझ धातूमधील असून दोन्ही शिल्पांना कला संचनालयामार्फत शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. असे श्री. उत्तम पाचारणे यांच्या दिनांक १७/५/२००७ च्या पत्रामध्ये नमुद केले आहे.

उपरोक्त दोन्ही शिल्प बसविणेकरीता महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक स्मारक ३१०२/८८४/प्र.क्र. १२२/२००२/२९, दिनांक २/२/२००५ अन्वये १६ मार्गदर्शक तत्वांपैकी खालील मुद्दयांची पुर्तता होणे आवश्यक आहे.

१. पुतळा बसविणा—या समितीने पुतळयाच्या चबुत—यांचे मोजमापे, आराखडा, पुतळयाचा साईट प्लॅन, पुतळा ज्या धातू/साहित्यापासून तयार करण्यात येणार आहे. त्या धातू/साहित्यांचे प्रमाण, पुतळयांचे वनज, उंची व रंग याचा तपशिल पुतळयाच्या रेखाचित्रासोबत मुख्य वास्तू शास्त्रज्ञ महाराष्ट्र राज्य यांना सादर करुन त्यांची मान्यता घेवून प्रस्तावासोबत सादर केली पाहिजे.

२. पुतळा उभारणा—या संस्थेने पुतळयाच्या क्ले मॉडेलला कला संचलनालयाची मान्यता घ्यावी व ती प्रस्तावासोबत जोडावी.

३. पुतळा उभारल्यामुळे भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, स्थानिक वाद किंवा जातीय तणाव वाढणार नाही याबाबत सविस्तर चौकशी करुन संबंधित पोलिस कार्यालय प्रमुखांचे ना हरकत प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच पुतळा उभारण्यासाठी अल्पसंख्यकांची / लोकांची इच्छा लक्षात घेणे आवश्यक असल्याने त्याचा उल्लेख देखील उपरोक्त ना हरकत प्रमाणपत्रात असणे आवश्यक आहे.

४. स्थानिक स्वराज्य संस्था/निम शासकिय संस्था/शासकिय कार्यालय यामध्ये पुतळा उभारावयाचा झाल्यास संबंधित मंत्रालयीन प्रशासकिय विभागाकडून घेतलेले ना हरकत प्रमाणपत्र प्रस्तावासोबत असावे.

५. पुतळयाला मान्यता देतांना जिल्हाधिका—यांच्या अध्यक्षतेखाली समितीने महसूल व वनविभाग,गृहविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व ग्रामविकास जलसंधारण विभाग यांनी निर्गमित केलेल्या शासन

आदेश/परिपत्रक यातील सुचना लक्षात घ्याव्यात व त्या संदर्भातील आपले अभिप्राय स्पष्टपणे व्यक्त करावेत.

६. पुतळा उभारण्यास अनुमती द्यावी किंवा कसे याबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीची शिफारस स्पष्टपणे शासनास कळविण्यात यावी व त्या मागील कारणमिमांसा देण्यात यावी.

सदर कामाची कार्यवाही पुढील आर्थिक वर्षामध्ये होणार असल्याने वर्ष २००८—०९ अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष अ अंदाजपत्रक भाग—२ सार्वजनिक बांधकाम विभाग क—४ (vii) लेखाशिर्षात रुपये ३५.०० लक्ष ठेवण्यात आलेल्या तरतुदीमधुन प्रस्तावित आहे.
तरी मा. महापौर यांच्या दिनांक २४/९/२००७ च्या पत्रानसार श्री. उत्तम पाचारणे यांनी तयार केलेल्या भगवान गौतम बुध्द यांची प्रवचन, बैठक मुद्रा व पाठीमागे प्रभावळ सहीत रचना असलेली ६ फुट उंचीची ब्रांझची प्रतिमा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ८ फुट ३ इंच उंचीच्या ब्रांझच्या पुतळयाच्या दोन्ही चबुत—यांसह उभारणीवरील रु. १८.२५ लक्ष खर्चाचे काम मे. उत्तम पाचारणे यांचेवर सोपविणे असलयास उपरोक्त शासन निर्णयातील मुद्दयांची पूर्तता यांचेमार्फत करुन घेण्यास व श्री. उत्तम प्राचारणे यांचेशी वाटाघाटी करुन सदर जबाबदारी त्यांचेवर सोपविण्याच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीकडून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत प्रशासकिय व वित्तीय मंजुरीसह मा. आयुक्त यांना मे.उत्तम पाचारणे यांचेशी थेट संविदा करणेस प्राधिकृत करण्यास मान्यता मिळण्यासाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १५५ दिनांकः— २९/२/२००८

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे व शासन निर्णयातील मुद्दयाच्या पुर्ततेस अधिन राहुन भगवान गौतम बुध्द यांची प्रवचन, बैठक मुद्रा व पाठीमागे प्रभावळ सहित रचना शिल्प तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उभे शिल्प बसविण्याकामी प्रशासनास मे. उत्तम पाचारणे यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—विषय क्र. १९ वाचुन दाखवितात

——————————————————————————————————————————

⇨ आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १९** :— प्रशासकिय प्रशिक्षण व गुणवत्ता केंद्र व्यवसायिक कौशल्याने चालविण्यासाठी प्रायोगिक तत्वावर मे. इंदिरा रिचर्स ॲन्ड डेव्हलपमेंट सेंटर यांची नेमणूक करणेस व येणा—या खर्चास मान्यता देणे.

——————————————————————————————————————————

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १९** :— प्रशासकिय प्रशिक्षण व गुणवत्ता केंद्र व्यवसायिक कौशल्याने चालविण्यासाठी प्रायोगिक तत्वावर मे. इंदिरा रिचर्स अॅन्ड डेव्हलपमेंट सेंटर यांची नेमणूक करणेस व येणा—या खर्चास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरातील नागरीकांना प्राथमिक सुविधा पुरविण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिका कटीबध्द आहे. विविध सेवा नागरीकांना पुरवणारा कर्मचारीवृंद व अधिकारी हे महानगरपालिकेची प्रतिमा निर्माण करीत असतात. उत्साही कर्मचारी हे महापालिकेला काळाच्या कसोटीवर उतरणसाठी योगदान देत असतात. मुंबई महानगराच्या परिसरातील आपल्या महानगरपालिकेचे महत्व टिकवण्यासाठी व वाढविण्यासाठी या सर्वांनी एक वेगळा दृष्टीकोन अंगीकारणे आवश्यक आहे. व काळाला साजेशी कार्यक्षमता नागरीकांना महानगरपालिकेच्या कामातून प्रतित झाली आहे.

वरील बाबी लक्षात घेता महानगरपालिकेने दिनांक ४.९.२००७ रोजी प्रशासकिय प्रशिक्षण व गुणवत्ता केंद्राची उभारणी केलेली आहे. मात्र या कामासाठी वेगळा कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्यामुळे ही प्रक्रिया सुरळीतपणे चालविणे कठिण होत आहे.

मे. इंदिरा रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट सेंटर हे एक नामवंत प्रशिक्षण देण्याची संस्था आहे व एमएमआरडीए यांनीही त्यांना पुणे मुंबई प्रदेशाच्या महापालिकेच्या टीएनए करण्यासाठी नेमले आहे.

त्या अनुषंगाने मे. इंदिरा रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट सेंटर यांनी उल्हासनगर महानगरपालिकेच्या ट्रेनिंग निड असेसमेंट केलेले आहे. प्रशिक्षणात व्यवसायिक कौशल्ये येवुन त्याची उपयुक्तता वाढविण्यासाठी मे. इंदिरा रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट सेंटर यांच्याशी संपर्क करण्यात आलेला आहे. त्यांना ३ महिन्याकरीता प्रायोगिक तत्वावर महापालिकेच्या प्रशिक्षण संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी व झालेल्या टीएनए नुसार प्रशिक्षण देणेकरीता प्रस्ताव मांडण्यासाठी सुचविले होते.

त्यानुसार मे. इंदिरा रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट सेंटर यांनी रुपये ३,००,०००/— चा प्रस्ताव सादर केलेला आहे. वर्ष २००८—०९ च्या अंदाजपत्रकात कर्मचारी प्रशिक्षणासाठी रुपये २०,००,०००/— ची तरतुदही करण्यात आलेली आहे.

वरील सर्व लक्षात घेवुन प्रशासकिय व गुणवत्ता केंद्र चालविणे व प्रशिक्षण देण्याकरीता ३ महिन्यांकरीता प्रायोगिक तत्वावर मे. इंदिरा रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट सेंटर यांची नेमणुक करुन लागणारा खर्च रुपये ३,००,०००/— आणि लागणारा प्रवास व खानपान भत्ता यास मंजुरीसाठी स्थायी समिती पटलावर प्रस्ताव सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** १५६ **दिनांकः—** २९/२/२००८

सुचकाचे नाव :— श्री. किशोर जग्यासी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे महापालिकेचे प्रशासकिय प्रशिक्षण व गुणवत्ता केंद्र व्यावसायिक कौशल्याने चालविणेसाठी प्रायोगिक तत्वावर देणे कामी प्रशासनास मे. इंदिरा रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट सेंटर यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदेस व लागणारा खर्च रुपये ३,००,०००/— आणि लागणारा प्रवास व खानपान भत्त्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

दुपारी १.०५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. राम पारवानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर
महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— ७/३/२००८

**दि. ७/३/२००८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

(१४)

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक ७/३/२००८ रोजी दुपारी १.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री पारवानी राम (चार्ली) फुंदुमल | सभापती |
| २ | श्री लुंड गोविंदराम डोलुमल | सदस्य |
| ३ | श्री इदनानी जीवन (राजु) चंद्रभान | ——''—— |
| ४ | श्री जाधव सुरेश मधुकर | ——''—— |
| ५ | श्री गायकवाड दिलीप दशरथ | ——''—— |
| ६ | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल | ——''—— |
| ७ | श्रीमती उदासी इंदिरा जमनादास | ——''—— |
| ८ | श्रीमती रावत निलम प्रेमसिंग | ——''—— |
| ९ | श्री जग्यासी किशोर | ——''—— |
| १० | श्री दवणे नरेंद्र (रवीभाऊ) | ——''—— |
| ११ | श्री वानखेडे राजेश देवेंद्र | ——''—— |
| १२ | श्री सुपाळे विजय खंडु | ——''—— |
| १३ | श्रीमती निकम लता शांताराम | ——''—— |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री ठाकुर नरेंद्र (कुमारी) केवलराम, २. श्री बठिजा संजय रामचंद्र, ३. श्रीमती रिजवानी सुजाता रमेश

खालील अधिकारी सभेस हजर होते.
१ श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त
२ श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३ श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
४ श्री. मिलींद सावंत, उप—आयुक्त
५ श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
६ श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
७ श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.
८ श्री. एस.टी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
९. श्री युवराज भदाणे,जनसंपर्क अधिकारी.

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्री. श्याम शिवनानी
२. श्रीमती नर्गीस खान

दुपारी १.३० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

श्री. अशोक बागेश्वर हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

➪ <u>विषय क्र. १</u> :— स्थायी समितीच्या १६ सदस्यां पैकी कोणते ८ सदस्य निवृत्त होतील ते चिठ्ठया टाकुन ठरविणे.

---

<u>महापालिका सचिव:—</u> दि. ५.४.२००७ रोजीच्या सभेत पालिका सदस्यांपैकी १६ सदस्यांची स्थायी समितीचे सदस्य म्हणुन नेमणुक केली होती. या १६ सदस्यांच्या नावांची यादी आपणा सर्वांस प्रस्तृत करण्यात आलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २० प्रमाणे सदर स्थायी समिती सदस्यांपैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक वर्षी महानगरपालिकेची पहिली सभा ज्या महिन्यात भरेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस दुपारी निवृत्त होतील. म्हणजेच महापालिकेच्या २००७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडुन आल्यानंतर एका वर्षाने कोणते सदस्य निवृत्त होतील ते कलम २० पोटकलम ३ मध्ये विर्निदिष्ट केल्याप्रमाणे त्यांचे निवृत्तीचे तारखेपुर्वी मा. स्थायी समिती सभापती ठरवील त्या सभेत अशा रितीने चिठ्ठया टाकुन निर्णय करण्यात येईल.

या १६ चिठ्ठया माझ्या हातात असुन यांवर १६ सदस्यांची नावे लिहिलेली आहेत. त्यातील एकेका चिठ्ठीवरील नाव मी वाचुन दाखवितो. त्यानंतर या सर्व चिठ्ठया प्लास्टीकच्या पारदर्शक बरणीत टाकण्यात येतील. बरणी हलवुन त्यातील एक—एक चिठ्ठी याप्रमाणे आठ चिठ्ठया काढल्या जातील. काढण्यांत आलेल्या चिठ्ठीवर ज्या सदस्याचे नाव लिहिलेले असेल तो सदस्य दिनांक १.४.२००८ पासुन स्थायी समिती सदस्य पदावरुन निवृत्त होईल.

<u>सभापती श्री. राम पारवानी</u> :— स्थायी समितीने ठरविल्या प्रमाणे आता चिठठया काढण्यांत येतील. सर्वात प्रथम स्थायी समितीतील चार महिला सदस्या डोळे बंद करुन प्लास्टीकच्या बरणीतुन चार चिठ्ठया काढतील. त्यानंतर या सभेत उपस्थित असलेले चार अधिकारी डोळे बंद करुन प्लास्टीकच्या बरणीतुन चार चिठ्ठया काढतील. व त्या आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ असलेले प्राधिकृत अधिकारी उपायुक्त श्री. बागेश्वर साहेब यांच्याकडे सुर्पुद करतील. श्री. बागेश्वर साहेब त्या चिठ्ठयांवरील मजकुर वाचुन दाखवतील. आता ही प्रक्रिया सुरु होत असुन चिठ्ठी काढण्यासाठी सर्वात प्रथम मी स्थायी समितीतील महिला सदस्यांना एक—एक करुन निमंत्रित करतो.

| चिठ्ठी काढणा—यांची नावे | निवृत्त होणा—या सदस्यांची नावे |
|---|---|
| १. श्रीमती इंदिरा उदासी | श्री. विजय सुपाळे |
| २. श्रीमती निलम रावत | श्री. जीवन इदनानी |
| ३. श्रीमती लता निकम | श्रीमती लता निकम |
| ४. श्रीमती जयश्री सर्वे | श्री. दिलीप गायकवाड |
| ५. श्री. अनुदिप दिघे | श्रीमती जयश्री सुर्वे |
| ६. श्री. मिलिंद सावंत | श्री. रामचंद्र पारवानी |
| ७. श्री. दिपक सावंत | श्रीमती निलम रावत |
| ८. श्री. एस .टी. खडताळे | श्रीमती इंदिरा उदासी |

<u>सभापती श्री. राम पारवानी :—</u> वर उल्लेख केलेल्या आठ सदस्यांना आपले पद सोडावे लागेल. व खाली नमुद केलेले सदस्य पुढील एक वर्षासाठी स्थायी समितीवर सलगपणे कार्यरत राहतील.

| अ.क्र. | सदस्यांची नावे |
|---|---|
| १ | श्री लुंड गोविंदराम डोलुमल |
| २ | श्री जाधव सुरेश मधुकर |
| ३ | श्री जग्यासी किशोर |
| ४ | श्री दवणे नरेंद्र (रवीभाऊ) |
| ५ | श्री वानखेडे राजेश देवेंद्र |
| ६ | श्री ठाकुर नरेंद्र (कुमारी) केवलराम |
| ७ | श्री बठिजा संजय रामचंद्र |
| ८ | श्रीमती रिजवानी सुजाता रमेश |

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. राम पारवानी :–** चिठ्ठी निकालाचे फलस्वरूपी सदरच्या विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १ :–**स्थायी समितीच्या १६ सदस्यां पैकी कोणते ८ सदस्य निवृत्त होतील ते चिठ्ठया टाकुन ठरविणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका २००७ नंतर महापालिकेच्या दि. ५.४.२००७ रोजीच्या पहिल्या सभेत आपल्या पालिका सदस्यांपैकी १६ व्यक्तीची स्थायी समितीचे १६ सदस्य म्हणुन नेमणुक केली होती. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चे कलम २० अन्वये स्थायी समितीमध्ये निवडून आल्यानंतर एका वर्षाने पोट कलम ३ अन्वये कोणते सदस्य निवृत्त होतील. त्यांच्या नियुक्तीच्या तारखे पुर्वी स्थायी समितीचे सभापती ठरवतील अशा वेळी व रितीने चिठ्ठया टाकुन ठरविण्यांत येते. त्याअर्थी चिठ्ठया काढण्यासाठी दि. ७.३.२००८ रोजी ही सभा बोलविण्यांत आली आहे आणि कोणते ८ (आठ) सदस्य निवृत्त होतील त्यासाठी चिठ्ठया काढण्यास प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. १५७** **दिनांक:– ७.३.२००८**

ही स्थायी समिती चिठ्ठया काढल्या नंतर पुढील ८ स्थायी समिती सदस्य दि. १.४.२००८ पासून निवृत होतील असे ठरवित आहे.

१. श्री. सुपाळे विजय खंडु
२. श्री. इदनानी जीवन (राजु) चंद्रभान
३. श्रीमती निकम लता शांताराम
४. श्री. गायकवाड दिलीप दशरथ
५. श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल
६. श्री. पारवानी राम (चार्ली) फुदुंमल
७. श्रीमती रावत निलम प्रेमसिंग
८. श्रीमती उदासी इंदिरा जमनादास

**चिठ्ठयाव्दारे मंजुर**

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

दुपारी १.५० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे पीठासीन अधिकारी श्री. राम पारवानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१९/३/२००८

**दि. १९/३/२००८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती**

(१५)

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा बुधवार दिनांक १९/३/२००८ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री पारवानी राम (चार्ली) फुंदुमल | सभापती |
| २ | श्री जाधव सुरेश मधुकर | सदस्य |
| ३ | श्री ठाकुर नरेंद्र (कुमारी) केवलराम | ——"—— |
| ४ | श्री गायकवाड दिलीप दशरथ | ——"—— |
| ५ | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल | ——"—— |
| ६ | श्री बठिजा संजय रामचंद्र | ——"—— |
| ७ | श्रीमती रिजवानी सुजाता रमेश | ——"—— |
| ८ | श्रीमती उदासी इंदिरा जमनादास | ——"—— |
| ९ | श्रीमती रावत निलम प्रेमसिंग | ——"—— |
| १० | श्री जग्यासी किशोर | ——"—— |
| ११ | श्री दवणे नरेंद्र (रवीभाऊ) | ——"—— |
| १२ | श्री वानखेडे राजेश देवेंद्र | ——"—— |
| १३ | श्री सुपाळे विजय खंडु | ——"—— |
| १४ | श्रीमती निकम लता शांताराम | ——"—— |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य अनुपस्थित होते.

१. श्री लुंड गोविंदराम डोलुमल, २. श्री इदनानी जीवन (राजु) चंद्रभान

सुरुवातीस डॉ. दिपक सावंत, उप—आयुक्त आरोग्य हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

३५.श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त

३६.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव

३७.श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
३८.श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
३९.श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
४०.श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
४१.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विद्युत
४२.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.
४३.श्री. एस.टी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव

दुपारी ३.२० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

महापालिका सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

विषय क्र. १ :– मागील सभेचे दिनांक २९/२/२००८ व ७/३/२००८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. राम पारवानी :–मागील सभेचे दिनांक दिनांक २९/२/२००८ व ७/३/२००८ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

विषय क्र. १:– मागील सभेचे दिनांक २९/२/२००८ व ७/३/२००८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. गोविंदराम लुंड

अनुमोदकाचे नांव : श्री. सुरेश जाधव

स्थायी समिती ठराव क्र. :– १५७ अ दिनांक : १९/३/२००८

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक २९/२/२००८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ३३ पर्यंतचे व ७/३/२००८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ३ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

एकमताने

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. २ :—** अर्थसंकल्पीय अनुदानात विर्निदिष्ट केलेल्या एका लेखा शिर्षातुन दुस—या लेखा शिर्षात अनुदान समायोजनेस अधिन राहुन उल्हासनगर—५ येथिल नेताजी मार्केट ते राधाकृष्ण निवास व शांती प्रकाश चौका पर्यंत मलवाहिनी टाकणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

**सदस्या श्रीमती लता निकम यांनी सभागृहात प्रवेश केला.**

**सदस्य श्री. किशोर जग्यासी :—**अर्थसंकल्पीय अनुदानात एका लेखाशिर्षातुन दुस—या लेखाशिर्षात अनुदान समायोजित करण्यास आता वेळ शिल्लकच नाही. तसेच स्थायी समितीतील आठ सदस्यही लवकरच निवृत्त होणार आहे त्यामुळे हा विषय नाकारला जावा.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—**हा विषय नाकारला जावा.

**सभापती, श्री. राम पारवानी :—**सदरचा विषय सर्वानुमते नाकारण्यांत येत असून त्याबाबत पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. २:—** अर्थसंकल्पीय अनुदानात विर्निदिष्ट केलेल्या एका लेखा शिर्षातुन दुस—या लेखा शिर्षात अनुदान समायोजनेस अधिन राहुन उल्हासनगर—५ येथिल नेताजी मार्केट ते राधाकृष्ण निवास व शांती प्रकाश चौका पर्यंत मलवाहिनी टाकणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त कामासाठी ४,८९,५९२/— एवढया खर्चाचे अंदाजपत्रक सादर केले आहे.

उल्हासनगर कॅम्प नं. ५ मधील नेताजी मार्केट ते राधाकृष्णा निवास व शांतीप्रकाश चौकापर्यंत या ठिकाणी मल वाहिनी नसल्यामुळे या भागात वारंवार रस्त्यावर सांडपाणी तुबलेले असते या कारणास्तव रोगराई पसरण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही करीता प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. त्यामुळे सदर काम करणे अत्यंत गरजेचे आहे सदर कामाची प्राकलन किंमत ४,८९,५९२/— एवढी होत आहे. हे काम भुयारी गटार व निगा दुरुस्ती शिर्षात निधी शिल्लक नसल्यामुळे सदरचे काम एसटीपी व पंपींग स्टेशन देखभाल व दुरुस्ती (सी)(सी)(९) मधुन वळविण्यासाठी खालीलप्रमाणे माहिति सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | भुयारी गटार व निगा दुरुस्ती(सी)(सी)(४) एकुण तरतुद | ४२,००,०००/— |
| २. | या कामाकरीता शिल्लक असलेली तरतुद | १९४/— |
| ३. | या कामाकरीता लेखा शिर्षातील (सी)(सी)(९) एसटीपी व पंपींग स्टेशन देखभाल व दुरुस्ती शिर्षात रुपये तरतुद केलेले २५,००,०००/— शिल्लक आहे | २५,००,०००/— |
| ४. | या लेखा शिर्षा भाग (सी)(सी)(९) मधुन लेखा शिर्षा भाग (सी)(४) मध्ये वळवायची तरतुद रुपये | ४,८९,५९२/— |
| ५. | लेखा शिर्ष भाग (सी)(४) मध्ये उपलब्ध होणारी तरतुद रुपये | ४,८९,७८६/— |
| ६. | या कामानंतर लेखा शिर्षा भाग (सी)(४) मध्ये शिल्लक राहणारी तरतुद | १९४/— |
| ७. | या कामानंतर उक्त लेखा शिर्षा मध्ये शिल्लक राहणारी तरतुद | २०,१०,४०८/— |

तरी सदर प्रस्ताव खास बाब म्हणुन मा. स्थायी समितीची मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १५८ **दिनांक:— १९/३/२००८**

सुचकाचे नाव :– श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार अर्थसंकल्पीय अनुदानात विर्निदिष्ट केलेल्या एका लेखा शिर्षातुन दुस–या लेखा शिर्षात अनुदान समायोजनेस अधिन राहुन उल्हासनगर–५ येथिल नेताजी मार्केट ते राधाकृष्ण निवास व शांती प्रकाश चौका पर्यंत मलवाहिनी टाकणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत नाही.

**कारण––**

सन २००७–२००८ चा सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज महासभेकडुन अंतिम करण्यांत आलेला आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३ :–** प्रभाग क्र.६३, रामजी आंबेडकर नगर, शिवमंदिर जवळ, उल्हासनगर–४ येथील नादुरूस्त जुन्या सार्व. शौचालयाच्या विनियोगास मान्यता देणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. राम पारवानी :–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ३:–** प्रभाग क्र.६३, रामजी आंबेडकर नगर, शिवमंदिर जवळ, उल्हासनगर–४ येथील नादुरूस्त जुन्या सार्व. शौचालयाच्या विनियोगास मान्यता देणे.

प्रस्तावना

श्रीमती लता शांताराम निकम, मा. नगरसेविका उल्हासनगर महानगरपालिका यांनी दिनांक २०/११/२००७ च्या पत्रान्वये प्र.क्र. ६३ रामजी आंबेडकर नगर, उल्हासनगर–४ येथे असलेले शौचालय तोडणेबाबत विनंती केलेली आहे.

सदर शौचालयाबाबतचा अहवाल/पंचनामा स्वच्छता निरिक्षक श्री. मनिष हिवरे यांचेकडुन प्राप्त झालेला असून प्र.क्र. ६३ रामजी आंबेडकर नगर, उल्हासनगर–४ या ठिकाणी असलेले शौचालय सद्यस्थितीत वापरात नसुन मोडकळीस आलेले आहे. तसेच शौचालयास लागुनच अंदाजे १० फुट अंतरावर १. शिटचे शौचालय उपलब्ध असून तेथिल नागरीक सदर शौचालयाचा वापर करतात. त्यामुळे प्र.क्र. ६३ रामजी आंबेडकर नगर, उल्हासनगर–४ येथे असलेले शौचालय निष्कासन करुन सदर ठिकाणी समाज मंदिर बविणेस शिफारस केलेली आहे.

उक्त बाबी विचारात घेता प्र.क्र. ६३ रामजी आंबेडकर नगर, उल्हासनगर–४ येथिल शौचालय तोडुन सदर ठिकाणी समाज मंदिर बनविणेस मंजुरी मिळणेसाठी स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १५९ दिनांकः— १९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग क्र. ६३, रामजी आंबेडकर नगर, शिवमंदिर जवळ, उल्हासनगर—४ येथील नादुरूस्त जुन्या सार्व. शौचालयाच्या निष्कासनास व जागेवरील परिस्थिती पहाता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करणेस मान्यता देत आहे.

परंतु—

सदरचे शौचालय तो पर्यंत निष्कासित करु नये जोपर्यंत त्याठिकाणी समाजमंदिराचे विकास काम सुरु होत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :—** उल्हासनगर शहरातील टंचाईग्रस्त भागात टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणेकामी मे.गायत्री सप्लायर्स या अतिरिक्त ठेकेदाराची नियुक्ती करणेकामी संविदेस मान्यता देणे.

---

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—नाही, शहरातील पाणी टंचाईग्रस्त भागात टॅकरद्वारे पाणी पुरवठा ठेकेदार पाणी पुरवठयाचे काम करत आहे ते बरोबर आहे. त्यामुळे अतिरिक्त ठेकेदाराची नेमणुक करण्याची आवश्यकता नसल्याने हा विषय नाकारला जावा.

सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—या कामी निविदा मागविली आहे किंवा नाही? जर निविदा मागविली नसेल तर सध्या जो ठेकेदार कार्यरत आहे तो व्यवस्थीत रित्या काम करत असल्याने त्यास सलगपणे कार्यरत ठेवावे.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—निविदा मागविली आहे काय?

सदस्य श्री. किशोर जग्यासीः—या विषयाच्या गोषवा—यामध्ये गायत्री वॉटर सप्लाय या ठेकेदाराचे थेट नाव कसे आले?

सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—प्रती टॅकर पाण्याचा दर काय आहे २५४ आहे ना?

सदस्य श्री. सुरेश जाधव :—पाणी टॅकर पुरविणे कामी पहिल्या ठेकेदाराचा दर काय आहे?

सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—निविदा मागविली तर यापेक्षाही कमी दर येवु शकतो. यासाठी निविदा मागवुन त्यानंतर एखादया ठेकेदाराची नेमणुक केली जावी. तोपर्यंत हा विषय नाकारला जावा.

श्री. मिलिंद सावंत, उप–आयुक्त, शहर यांनी सभागृहात प्रवेश केला आणि ते आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले व डॉ. दिपक सांवत हे अधिका–यांच्या बैठक व्यवस्थेतील आसनावर आसनस्थ झाले.

सदस्य श्री. संजय बठिजा यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सभापती, श्री. राम पारवानी :–</u> सदरचा विषय सर्वानुमते नाकारण्यांत येत असून त्याबाबत पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ४:–** उल्हासनगर शहरातील टंचाईग्रस्त भागात टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणेकामी मे.गायत्री सप्लायर्स या अतिरिक्त ठेकेदाराची नियुक्ती करणेकामी संविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील टंचाईग्रस्त भागात टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणेसाठी ठेकेदार निश्चिती करिता जाहिर निविदा मागविणेत आली होती.या करीता एकुण ४ निविदा प्राप्त झाल्या होत्या प्राप्त निविदापैकी ईगल कंस्ट्रक्शन कंपनी यांचे दर सर्वात कमी होता. परंतु तो वाजवी नसल्याने त्यांना वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. परंतू प्रथम वाटाघाटीद्वारे दर संबंधीतांनी कमी न केल्यामुळे पुन्हा त्या ठेकेदारांकडुन वाटाघाटीद्वारे दर मागविण्यात आले होते. त्यानंतर रुपये २५४.५२ दराने मे. ईगल कंस्ट्रक्शन कंपनी यांनी काम करण्याची तयारी दर्शविली. स्थायी समितीने ठराव क्र. २३, दिनांक १८/५/२००७ अन्वये मे. ईगल कंन्स्ट्रक्शन कंपनी उल्हासनगर यांची निविदा स्विकारुन कॅम्प १ ते ५ मधील टॅकरद्वारे पाणी पुरवठयाचे काम संबंधित ठेकेदारास देण्याची मंजुरी दिली. याप्रमाणे दिनांक ३०/५/२००७ पासुन मे. ईगल कंस्ट्रक्शन कंपनी यांना कामाचा आदेश देण्यात आला असून त्यांचेद्वारे कॅम्प १ ते ५ मध्ये टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

परंतु गेल्या दोन महिन्यांपासुन विद्युत मंडळाकडुन सक्तिचे विद्युत भारनियमन सुरु झाल्यामुळे व म.औ.वि. महामंडळाकडुन पाण्याचा दाब कमी झाल्याने शहरातील ब–याच ठिकाणी अपूरा व अनियीमत पाणी पुरवठा होत असल्यामुळे टॅकरचरी मागणी मोठया प्रमाणात वाढली आहे. सद्यस्थितीत सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराकडुन जवळ जवळ १२ टॅकरद्वारे दक्षिण व उत्तर विभागात टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. सदर टॅकर वाहने अपुरी असल्यामुळे दैनंदिन टॅकर पुरवठा विहित वेळेत होत नाही. त्यामुळे दैनंदिन टॅकरची मागणी पूर्ण होत नाही. व त्यामुळे ठेकेदारामार्फत रात्री उशिरापर्यंत टॅकरद्वारे पाणी पुरवठा करुन मागणी पुर्ण करण्यात येते.

याकरीता या कामाकरीता मागविलेल्या निविदा धारकापैकी एखादया निविदा धारकांकडुन सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराच्या दरानुसार काम करण्यास तयार असतील तर ५ ते ६ टॅकरद्वारे पाणी पुरवठा केल्यास शहरातील टॅकरद्वारे पाणी पुरवठा प्रश्न सुटु शकेल. मे. गायत्री सप्लायर्स उल्हासनगर ४ ही संस्था निविदा धारकांपैकी एक असून सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराच्या दरानुसार काम करण्यास तयार आहे. मे. गायत्री सप्लायर्स उल्हासनगर ४ यांस ६ /७ टॅकरर्सद्वारे पाणी पुरवठा केलयास (आवश्यकतेनुसार ४० ते ५० टॅकर्सच्या फे–या) विहित वेळेत पाणी पुरवठा होवून नागरीकांची मागणी पुर्ण होवु शकेल.

सदर मुळे कामाच्या मे. ईगल कंन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा मा. स्थायी समितीकडुन मंजुर करण्यात आलेली असल्यामुळे सदरचे काम विभागुन देणे बाबत मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे गरजेचे आहे.

सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या निर्णयासाठी सादर करण्यातयेत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १६० <u>दिनांक:– १९/३/२००८</u>

सुचकाचे नाव :– श्रीमती निलम रावत

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती इंदिरा उदासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे उल्हासनगर शहरातील टंचाईग्रस्त भागात टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणेकामी मे.गायत्री सप्लायर्स या अतिरिक्त ठेकेदाराची नियुक्ती करणेकामी संविदेस मान्यता देत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨

**विषय क्र. ५ :—** उल्हासनगर —३ येथील कल्याण अंबरनाथ रस्त्यावर ऑर्डन्स फॅक्टरी फस्ट गेट साई बाबा मंदिर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नावाने प्रवेशद्वार बांधणेकामी कार्यरत ठेकेदार मे.डी.एस कन्स्ट्रक्शन यांच्याशी केलेल्या संविदेनुसार काम पुर्ण केले नसल्याने त्याबाबत निर्णय घेणे.

---

सदस्या श्रीमती लता निकम:—हे काम दुस—या ठेकेदारास दया व कोणत्याही परिस्थितीत ते १४ एप्रिलपर्यंत पुर्ण झाले पाहिजे असे त्या ठेकेदाराला निर्देश दया.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—या विषयाच्या गोषवा—यात काय लिहिले आहे? याबाबतीत स्पष्टीकरण करण्यासाठी शहर अभियंता कुठे आहेत? त्यांना तर काही येत नसतांना फुकट पोसण्यासाठी का ठेवायचे? त्यांना त्यांच्या मुळ विभागात परत पाठविले जावे.

सभापती, श्री. राम पारवानी :—हे काम ज्या ठेकेदारास दिले आहे त्या ठेकेदाराने ते काम पुर्ण केले नसल्याने त्याचे नाव काळया यादीमध्ये टाकण्यात यावे व हे काम पुर्ण करुन घेण्यासाठी दुस—या ठेकेदारास दिले जावे.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—या ठेकेदाराकडील हे काम काढुन घेण्यात यावे व हे काम अन्य कुठल्या ठेकेदारास दिले जावे.

सदस्य श्री. सुरेश जाधव:—या ठेकेदारास काळया यादीमध्ये टाका आणि हे काम दुस—या ठेकेदारास दया.

सदस्य श्री. संजय बठिजा :—तो पर्यंत काम बंद राहता कामा नये. काम चालु राहिले पाहिजे आणि ते लवकर पुर्ण झाले पाहिजे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—ज्या ठेकेदाराने १० वर्षामध्ये काम पुर्ण केले नाही. तो हे काम १४ एप्रिल पर्यंत काय पुर्ण करणार आहे?

सदस्य श्री. सुरेश जाधव:— ज्या ठेकेदाराने १० वर्षामध्ये काम पुर्ण केले नाही. तो हे काम १४ एप्रिल पर्यंत काय पुर्ण करणार आहे?

श्री.शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—आम्ही तीन पर्याय सुचविलेले आहे.

अ) संविदा रद्द करणे व रद्द केलेल्या संविदेतील अनामत रक्कम जप्त करुन महानगरपालिकेने आपल्या पध्दतीने तिचा विनियोग करणे.

ब) उर्वरीत काम विभागीय स्तरावर करणे.

क) उर्वरीत काम अन्य एजन्सी नेमून त्यांचेकडून करुन घेणे. व या कामी जो अतिरिक्त खर्च होणार आहे त्याची भरपाई मे.डी.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेणे.

यातील कोणता पर्याय निवडायचा आपण याचा निर्णय घ्यायचा आहे.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—ठेकेदारास काळया यादीमध्ये टाकले जावे व त्याच्याकडुन नुकसान भरपाईची रक्कम वसुल केली जावी.

सदस्य श्री. राजेश वानखेडे:—हे तिन्ही पर्याय तुम्ही दिले आहेत ना?

सदस्या श्री. सुरेश जाधव:—आपण त्यांना काळया यादीमध्ये टाकु शकत नाही काय?

श्री.शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—मी दिलेले नाहीत. करारातील अटी, शर्तीनुसार हे तिन पर्याय आहेत. व या ठेकेदारास आपण काळया यादीमध्ये टाकु शकत नाही. कारण की तसे आपणांस अधिकार नाहीत. ठेकेदारांना काळया यादीमध्ये टाकण्याचे अधिकार शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागास आहे. आपण फार तर याकामी शिफारस करु शकतो.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—तर मग या ठेकेदारास काळया यादीमध्ये टाकण्यासाठी शिफारस केली जावी.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—जर आपण त्या ठेकेदारास काळया यादीमध्ये टाकु शकत नसल्यास तशी शिफारस तर कमीत कमी करु शकतो ना?

सभापती, श्री. राम पारवानी :—काम तर कसेही पुर्ण करुन घ्यायचे आहे. १४ एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आहे. तोपर्यंत या ठेकेदाराकडुन हे काम पुर्ण करुन घेतले जावे.

श्री.शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—१४ एप्रिल पर्यंत त्या ठेकेदाराकडुन काम होणार नाही.

श्री. मिलिंद सांवत(आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—ते काम १४ एप्रिल पर्यंत दुस—या एखादया ठेकेदाराकडुन पुर्ण करुन घ्या व त्याचा संपुर्ण खर्च या ठेकेदाराकडुन वसुल करुन घ्या.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—प्रशासनाकडुन जे तीन पर्याय सुचविण्यात आलेले आहे. त्यामधील पर्याय 'अ' ठरावमध्ये समाविष्ट करा.

काही सदस्य:—पास,पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ५ :—** उल्हासनगर —३ येथील कल्याण अंबरनाथ रस्त्यावर ऑर्डन्स फॅक्टरी फस्ट गेट साई बाबा मंदिर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नावाने प्रवेशद्वार बांधणेकामी कार्यरत ठेकेदार मे.डी.एस कन्स्ट्रक्शन यांच्याशी केलेल्या संविदेनुसार काम पुर्ण केले नसल्याने त्याबाबत निर्णय घेणे.

## प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेने उल्हासनगर–३ येथील ऑडनस फॅक्टरी फर्स्टगेट साईबाबा मंदीर येथे कल्याण–अंबरनाथ रस्त्यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नावाने प्रवेशद्वार बांधण्याकरीता निविदा कार्यवाही करुन मे.डी.एस.कन्स्ट्रक्शन यांना कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले. वाहतूक विभागाने या कामाकरीता रस्ता बंद करण्यास १ वर्षानंतर परवानगी दिल्यानंतर प्रत्यक्षात कामास सुरवात झाली होती. सदर मे.डी.एस. कन्स्ट्रक्शन यांनी सुरु केल्यानंतर आर्थिक कारणास्तव त्याची प्रगती संथगतीने सुरु ठेवली होती. याबाबत दृष्टीक्षेपामध्ये माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे विवरण | केलेली कार्यवाही |
|---|---|---|
| १ | कार्यारंभ आदेश क्रमांक | उमपा/साबां/काअ/३६१ दिनांक १०/४/२००३ |
| २ | कामाची प्राकलनिय किंमत | रु.२०,५२,८७१/– (दरसूची २०००–०१) |
| ३ | निविदा दर | ३.०९: जास्त दराचे |
| ४ | निविदा दराप्रमाणे कामावरील खर्च | रु.२१,१६,३०५/– |
| ५ | कामाची मुदत (मुळ) | ६ महिने (दि.१०/१०/२००३ पर्यंत) |
| ६ | वाहतूक विभागाकडे रस्ता बंद करण्याकरीता ना हरकत मिळणेकरीता पाठविलेले पत्र | दिनांक ०७/०६/२००३ स्मरण पत्र दिनांक ३/७/२००४. |
| ७ | कामाच्या ठिकाणी असलेला जुन्या प्रवेशद्वाराचा ठाचा निष्कासित करण्याची कार्यवाही | मे,२००३ मध्ये |
| ८ | जुना ठाचा तोडल्यानंतर नवीन काम सुरु करण्यास झालेला विलंब (काम बंद ठेवल्याचा दिनांक ) | जून २००३ ते जून २००४ (एक वर्ष) |
| ९ | काम सुरु करण्याकरीता दिलेली पत्रे | दिनांक २९/९/२००३<br>दिनांक २४/११/२००३<br>दिनांक २५/११/२००३ |
| १० | काम पुन्हा सुरु केले | जून २००४ (डी.एस पत्र ३०/६/२००४) |
| ११ | वाहतूक विभागाने रस्ता बंद करण्याकरीता ना हरकत दिले | पत्र क्र.८४ दिनांक २६/७/२००४ |
| १२ | वाढवून दिलेली मुदत | दिनांक ३०/११/२००४ पर्यंत<br>दिनांक ३१/१२/२००६ |
| १३ | अर्ध्या भागात आर. सी. सी. चे काम पूर्ण झाले | मार्च २००५ |
| १४ | रंगकाम व ग्रॅनाईटचे काम पुर्ण केले | डिसेंबर,२००६ |

परंतू जून २००७ पर्यंत काम केलेल्या भागातील रस्त्यावरील बांधकाम साहित्य वारंवार विनंती करुनही काढून न टाकल्यामुळे या भागातून वाहतूक सुरु करता आली नाही. याचे कारण श्री.कमल यांचेकडून त्यांना जेसीबी मशीन मिळत नसल्याचे सांगण्यात येत होते. जुलै,२००७ मध्ये रस्ता मोकळा केल्यानंतर प्रवेशद्वाराचे उर्वरीत काम करणे शक्य होते. याकरीता दिनांक २०/७/२००७ च्या पत्रान्वये सदर काम तीन महिन्यात पूर्ण करण्यास सूचना दिल्या होत्या. परंतू या कामी फेब्रुवारी २००७ पासून आतापर्यंत कोणतीही प्रगती दिसत नाही.

मे.डी.एस.कंन्स्ट्रक्शन यांनी या संविदेअंतर्गत दिलेल्या पत्रानुसार त्यांना वेळेवर देयक अदा न झाल्यामुळे तसेच हे काम हाती घेतल्यानंतर त्यांचे या महानगरपालिकेत असलेल्या प्रलंबित देयकांची अदायगी या कामाचे देयके अदा करण्यात झालेल्या विलंबामुळे तसेच जागेवर असलेल्या पाइप लाईन स्थलांतरीत करणे, वाहतूक विभागाची परवानगी मिळण्यास उशीर होणे इत्यादी कामांमुळे त्यांना कामात प्रगती राखता आली नाही असे नमुद केले आहे.

या कामांमध्ये तसेच महानगरपालिकेने आतापर्यंत हाती घेतलेल्या एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमातील इतर कामाच्या प्रगतीवर महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीमुळे वेळेवर देयकांचे अदायगी न झाल्यामुळे कामे पूर्ण करण्यात विलंब झालेला आहे. उपरोक्त प्रवेशद्वाराचे कामास मे.डी.एस.कंन्स्ट्रक्शन यांचेकडून विलंब झाला असतानाही महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीमुळे देयक अदा होण्यास होत असलेल्या विलंबामुळे मे. डी. एस. कन्ट्रक्शन यांच्या जुन्या दरांचा महानगरपालिकेस आर्थिक फायदा होत असल्याने काम मे.डी.एस.कंन्स्ट्रक्शन यांचेवर निविदा अटी शर्तीतील परिच्छेद–२ मधील तरतूदीनुसार दंडात्मक कार्यवाही केली नाही. किंबहुना सदर काम स्मारकाचे असून लोकांच्या भावनांचा विचार करता व कामात असलेला अवघडपणा इत्यादी बाबी विचारात घेवून मे.डी.एस.कंन्स्ट्रक्शन सदर काम पूर्ण करतील अशी अपेक्षा ठेवून त्यांचेवर कोणतीही दंडात्मक कार्यवाही

केली नाही. परंतू आता अर्ध्या भागातील काम पूर्ण झाल्यानंतर उर्वरीत अर्ध्या भागातील अपूर्ण काम पुन्हा सुरु करुन पूर्ण करण्यास त्यांना देयक अदा न केल्याचे व या कामामध्ये सेंटरींगचा येणारा खर्च अवाढव्य असून त्यामुळे त्यांना परवडत नसल्याचे कारण दाखवून काम थांबविले आहे. त्यांनी वकीलांकडून दिलेल्या नोटीसलाही महानगरपालिकेने उत्तर दिलेले आहे.

या नोटीसमध्ये तसेच त्यांनी त्यांच्या इतर पत्रात उल्लेखिल्याप्रमाणे त्यांचेकडून थांबविण्यात येणारे काम निविदा अटी शर्ती परिच्छेद १५ नुसार थांबविलेले आहे. हे गृहीत धरणे चुकीचे आहे. कारण या परिच्छेदानुसार शहर अभियंता अथवा कोणीही अधिकारी यांनी हे काम अथवा त्याचा कोणताही भाग प्रलंबित ठेवण्यास सुचना दिलेल्या नाहीत. त्यामुळे या परिच्छेदातील तरतूदीनुसार सदर कामातून त्यांची मुक्तता करणे शक्य नाही.

सद्यस्थितीत वर्ष २००३ मध्ये हाती घेतलेले काम वर्ष २००७ मध्ये पूर्ण न झाल्यामुळे उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभेमध्ये याबाबत चर्चा झाल्यानंतर मा.आयुक्त यांनी याबाबत कार्यवाहीचे आदेश दिलेले आहेत.

या कामी मे डी. एस. कन्स्ट्रक्शन यांचेशी वेळोवेळी समक्ष चर्चा केल्या आहेत. या कामाचे स्थापत्य सल्लागार मे उत्तम इंजिनिअरिंग यांचे समवेत कार्यकारी अभियंता यांच्या दालनात झालेल्या बैठकीत मे डी एस कन्स्ट्रक्शन यांनी सदर कामाचे दर जुने असून बाजारभाव वाढ व सेंटरीग कामावरील खर्चामुळे त्यांना या कामामध्ये प्रचंड तोटा येत असल्याचे दाखवून दिले होते.

मे. डी. एस. कन्स्ट्रक्शन यांना यापुर्वी संथ गतीने काम करीत असल्याबाबत वेळोवेळी पत्रे दिलेली आहेत. परंतु त्यांनी कामात प्रगती राखल्यामुळे त्यांचेवर निविदा अटी शर्ती प्रमाणे करावयाच्या कार्यवाहीबाबत विधी विभागाकडून अभिप्राय घेण्यात आलेले आहेत.

मा.उप–आयुक्त (विधी) यांनी महानगरपालिकेच्या विधी सल्लागार पॅनलवर असलेले श्री.के.टी.जैन यांच्याकडून सल्ला घेणे करीता सूचित केले होते. त्याप्रमाणे श्री.के.टी.जैन यांना या प्रकरणाची संपूर्ण नस्ती त्यांचे कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात आली होती. या नस्तीचे अवलोकन करुन त्यांनी त्यांचेकडील दिनांक २०/११/२००७ च्या पत्राद्वारे सल्ला दिलेला आहे.

या पत्रामध्ये त्यांनी मे.डी.एस.कंन्स्ट्रक्शन हे त्यांचेवर सोपविलेले काम पूर्ण करणे करीता त्यांना वेळोवेळी कामाची मुदत वाढवून सरते शेवटी ३१ डिसेंबर,२००६ पर्यंत काम पूर्ण करण्याकरीता सूचना देऊनही काम पूर्ण करु न शकल्यामुळे करार नाम्यातील अटीशर्तीतील परिच्छेत ३ प्रमाणे त्यांनी हे काम अर्धवट अवस्थेत सोडून दिलेल्या कामामुळे परिच्छेत ३ (अ), ३(ब), ३ (क) प्रमाणे योग्य वाटेल त्याप्रमाणे कारवाई करावी.

परिच्छेत ३ (अ), ३(ब), ३ (क) सोबत जोडलेल्या मे.डी.एस.कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेतील अटी शर्ती पृष्ठ क्र.९४ ते ९६ ध्वज 'अ' प्रमाणे आहेत.

उपरोक्त परिच्छेद ३ प्रमाणे जर कॉन्ट्रॅक्टर गंभीर आजारपणामुळे, मृत्युमुळे अथवा इतर कोणत्याही कारणामुळे काम पूर्ण करु शकत नसल्यास खालील ३ पर्यांयांपैकी एक पर्याय अवलंबून शहर अभियंता कारवाई करु शकतात.

अ) संविदा रद्द करणे व रद्द केलेल्या संविदेतील अनामत रक्कम जप्त करुन महानगरपालिकेने आपल्या पध्दतीने तिचा विनियोग करणे.

ब) उर्वरीत काम विभागीय स्तरावर करणे.

क) उर्वरीत काम अन्य एजन्सी नेमून त्यांचेकडून करुन घेणे. व या कामी जो अतिरिक्त खर्च होणार आहे त्याची भरपाई मे.डी.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेणे.

उपरोक्त तीन पर्यायांपैकी अनुक्रमांक ३ ब वरील पर्याय नुसार सदर काम विभागीय स्तरावर करणे शक्य नाही. त्यामुळे परिच्छेद ३ अ, ३ क प्रमाणे पुढील कार्यवाही म्हणजे मे.डी.एस.कंन्स्ट्रक्शन यांची संविदा रद्द करुन अनामत रक्कम जप्त करणे व महानगरपालिकेने आपल्या पध्दतीने तिचा विनियोग करणे. उर्वरीत काम अन्य एजन्सी नेमून त्यांचेकडून करुन घेणे व या कामी जो अतिरिक्त खर्च होणार आहे त्याची भरपाई मे.डी.एस. कंन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेणे. या प्रस्तावास स्थायी समितीची मान्यता घेणेस प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र.  १६१ 　　　　　　　　　　 दिनांकः— १९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे उल्हासनगर —३ येथील कल्याण अंबरनाथ रस्त्यावर ऑर्डन्स फॅक्टरी फस्ट गेट साई बाबा मंदिर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नावाने प्रवेशद्वार बांधणेकामी कार्यरत ठेकेदार मे.डी.एस कन्स्ट्रक्शन यांच्याशी केलेल्या संविदेनुसार त्यांनी काम पुर्ण केले नसल्याने सदरहु ठेकेदाराशी संविदा रद्द करुन त्याची अनामत रक्कम जप्त करणे व प्रशासनास नविन निविदा मागविण्यास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ६** :— ॲन्टी रेबीज लस खरेदी करणे कामी प्रशासनास मे. लाईफ फार्मा, मुंबई यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

---

काही सदस्यः—पास, पास.....

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ६** :— ॲन्टी रेबीज लस खरेदी करणे कामी प्रशासनास मे. लाईफ फार्मा, मुंबई यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

प्रस्तावना

ॲन्टी रेबीज लस खरेदी निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदा दिनांक १८/१२/२००७ रोजी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचे दालनात मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांचे समोर उघडण्यात आल्या. सदर निविदेतील मे. आर.के. मेहता व मे. भावेश सेल्स कॉर्पोरेशन यांचे निविदेतील अटीप्रमाणे विक्रीकर दाखला अदयावत नसल्यामुळे तसेच अनुभवाचा दाखला नसल्यामुळे सर्व तिन्ही निविदांतील वित्तीय लिफाफा उघडण्यात आलेला नाही.

सदर वरील निविदांतील फक्त एकच निविदा निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे वैध ठरत असल्यामुळे सदर निविदा रद्द करण्यात आली आहे. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील सरकारी रुग्णालयात सध्या ॲन्टी रेबीज लसीचा तुटवडा आहे तसेच मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासगनर—३ यांनी या कार्यालयाकडे ॲन्टी रेबीज लसीची मागणी केलेली आहे व याबाबत मा. महासभेत मोठया प्रमाणात चर्चा होवून लवकरात लवकर ॲन्टी रेबीज लस उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यामुळे ॲन्टी रेबीस लस त्वरीत उपलब्ध करणे आवश्यक आहे. दरम्यानच्या काळात बृहन्मुंबई महानगरपालिका हे खरेदी करत असलेल्या मे. लाईफ फार्मा यांचा दरकरार प्राप्त झाला आहे. सदर दरकरारावर जिल्हा शल्यचिकीत्सक, सामान्य रुग्णालय, जळगांव व जिल्हा आरोग्य अधिकारी, नागपुर यांनी देखील ॲन्टी रेबीज लस खरेदी केली आहे.

तरी मे. लाईफ फार्मा, मुंबई यांचेकडून रुपये २३२.९६ पैसे दराने एकूण १२०० व्हॉयल्स संविदेशिवाय थेट खरेदी करण्यास व होणा—या रुपये २,७९,५५२/७ (रुपये दोन लाख एकोणऐंशी हजार पाचशे बावन्न मात्र) एवढया खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ५ (२) (२) अंतर्गत मा. स्थायी समितीची मान्यता मिळावी.

स्थायी समिती ठराव क्र. १६२ दिनांकः— १९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे ॲन्टी रेबीज लस खरेदी करणे कामी प्रशासनास मे. लाईफ फार्मा, मुंबई यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे व अंतर्भुत खर्च रु. २,७९,५५२/— यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. ७ :— सेंट्रल हॉस्पीटल, एमपी पान हाउस जवळ, उल्हासनगर—३ याठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेकामी एकलव्य सेवाभावी संस्था, उल्हासनगर—३ किंवा महर्षि वाल्मीकी सेवा संस्था, उल्हासनगर—३ यापैकी कोणत्याही एका संस्थेस परवानगी देणेकामी निर्णय घेणे बाबत.

---

सदस्य श्री. किशोर जग्यासी:—हे काम एकलव्य सेवाभावी संस्थेस देण्याबाबतीत संबंधीत प्रभागाच्या नगरसेवकाची विनंती आहे आणि त्यांनी तसे सुध्दा दिलेले आहे.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

विषय क्र. ७ :— सेंट्रल हॉस्पीटल, एमपी पान हाउस जवळ, उल्हासनगर—३ याठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेकामी एकलव्य सेवाभावी संस्था, उल्हासनगर—३ किंवा महर्षि वाल्मीकी सेवा संस्था, उल्हासनगर—३ यापैकी कोणत्याही एका संस्थेस परवानगी देणेकामी निर्णय घेणे बाबत.

प्रस्तावना

एकलव्य सेवाभावी संस्था, सेक्रेटरी इंदिरा गांधी भाजी मार्केट मागे, उलहसनगर–३ तसेच महर्षि वाल्मीकी सेवा संस्था, बॅ. नं. १०९८ च्या बाजुला, ओटी सेक्शन उल्हासनगर–३ यांनी सेंट्रल हॉस्पीटल एमपी पान हाउस जवळ, उल्हासनगर–३ या ठिकाणी पैसे दया व वापरा तत्वावर शौचालय बांधणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

उक्त शौचालयाबाबत आरोग्य विभागाकडुन संबंधित स्वच्छता निरिक्षक तसेच मुख्य स्वच्छता निरिक्षक यांनी सादर केलेला अहवाल /पंचनामा मालमत्ता विभागास प्राप्त झालेला आहे.

सदर अहवालात उक्त ठिकाणावरील जागा ही जुने गेटच्या समोर महानगरपालिकेची जागा असून एमपी पान हाउसच्या बाजुला महानगरपालिकेने फुटपाथ बनविले आहे. सदरील ठिकाणी सार्वजनिक शौचालय व सुलभ शौचालय कुठेच नाही.

उक्त बाबी विचारात घेता दोन्ही संस्थांनी एकाच ठिकाणी (सेंट्रल हॉस्पीटल एमपी पान हाउस जवळ, उल्हासनगर–३) पैसे दया व वापरा तत्वावर सुलभ शौचालय बांधणेकामी परवानगी मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. परंतु सदर कामी एकाच संस्थेस परवानगी देणे योग्य होईल.

तरी सदर कामी निर्णय घेणे करीता मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६३ दिनांकः– १९/३/२००८

सुचकाचे नाव :– श्री. विजय सुपाळे

अनुमोदकाचे नाव :– श्री. नरेंद्र दवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्ताव विचारात घेता, एकलव्य सेवाभावी संस्था यांना सेंट्रल हॉस्पीटल, एमपी पान हाउस जवळ, उल्हासनगर–३ या ठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर सुलभ शौचालय बांधणेस परवानगी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. ८ :– उल्हासनगर पाणी पुरवठा योजना देखभाल दुरुस्ती अंतर्गत उप अभियंता व शाखा अभियंता यांना तातडीच्या कामासाठी आगाऊ उचल मिळण्यास मंजुरी देणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. राम पारवानी :–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

विषय क्र. ८ :– उल्हासनगर पाणी पुरवठा योजना देखभाल दुरुस्ती अंतर्गत उप अभियंता व शाखा अभियंता यांना तातडीच्या कामासाठी आगाऊ उचल मिळण्यास मंजुरी देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा योजनेची देखभाल दुरुस्ती पाणी पुरवठा विभागामार्फत करण्यात येते. योजनेत अस्तित्वातील सुमारे २०० किमी लांबीच्या वितरण व्यवस्था व त्या वरील व्हॉल, पंपगृह यांची देखभाल दुरुस्ती करणे वेळेस ब—याच वेळा काही भागात जलवाहिन्या फुटल्यामुळे गळती होवून एखादा व्हॉल, पंप नादुरुस्त होवुन पाणी पुरवठा खंडीत होतो. त्या वेळेस तातडीने साहित्य व मजुर उपलब्ध करुन घेवुन कामे करावी लागतात.

सदरची तातडीची कामे करुन घेण्यासाठी संबंधीत उप अभियंता व शाखा अभियंता यांना खालील प्रमाणे उचल मंजुर केल्यास तातडीची कामे करुन घेणे शक्य होणार असल्यामुळे संबंधीतांना उचल मंजुर व्हावी ही विनंती.

| | |
|---|---|
| १. उप अभियंता (दक्षिण क्षेत्र) | रु. २०,०००/— |
| २. उप अभियंता (उत्तर क्षेत्र) | रु. २०,०००/— |
| ३. उप अभियंता (यांत्रिकी) | रु. २०,०००/— |
| ४. उप अभियंता (देयक) | रु. २०,०००/— |
| ५. सर्व शाखा अभियंते | रु. १०,०००/— |

सबब सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीची मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६४ दिनांकः— १९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे उल्हासनगर पाणी पुरवठा योजना देखभाल दुरुस्ती अंतर्गत उप अभियंता व शाखा अभियंता यांना तातडीच्या कामासाठी वर उल्लेखल्या प्रमाणे रक्कमा आगाऊ उचल देण्यास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ९ :—** महर्षि वाल्मीकी सेवा संस्था यांना चांदीबाई कॉलेज जवळ, जुने गणेश घाट विर्सजनाच्या ठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेस परवानगी देणे.

---

सदस्य श्री. दिलीप गायकवाड/ सदस्य श्री. किशोर जग्यासी:—हा विषय नाकारला जावा.

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषय सर्वानुमते नाकारण्यांत येत असुन त्याबाबत पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ९ :—** महर्षि वाल्मीकी सेवा संस्था यांना चांदीबाई कॉलेज जवळ, जुने गणेश घाट विर्सजनाच्या ठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेस परवानगी देणे.

प्रस्तावना

श्री. सुनिल रा. करोतिया, सेक्रेटरी, महर्षि वाल्मिकी सेवा संस्था कार्यालय मुरलीधर अपार्टमेंट शाम सुंदर सोसायटीच्या बाजुला ओटी सेक्शन, बॅ. नं. १०९८ च्या जवळ, उल्हासनगर–३ यांनी चांदीबाई कॉलेज जवळ, जुने गणेश घाट विसर्जनाच्या ठिकाणी उल्हासनगर–३ या ठिकाणी पैसे दया व वापरा तत्वावर सुलभ शौचालय बनविणेकामी परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

उक्त ठिकाणाबाबत आरोग्य विभागाकडुन संबंधित स्वच्छता निरिक्षक श्री. राजु ननावरे तसेच मुख्य स्वच्छता निरिक्षक यांनी सादर केलेला अहवाल मालमत्ता विभागास प्राप्त झालेला आहे.

सदर अहवालात प्रस्तावित ठिकाणी जुने घाट असून तेथे गणेश विसर्जन होत होते. पैसे दया व वापरा तत्वावर सुलभ शौचालय देण्यास हरकत नाही असे अहवालात नमुद केले आहे.

तरी उक्त बाबी विचारात घेता चांदीबाई कॉलेज जवळ, जुने गणेश घाट विर्सजनाच्या ठिकाणी उल्हासनगर–३ या ठिकाणी पैसे दया व वापरा तत्वावर सुलभ शौचालय बनविणेकामी मंजुरी मिळणेबाबत निर्णयार्थ मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६५ दिनांकः– १९/३/२००८

सुचकाचे नाव :– श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महर्षि वाल्मीकी सेवा संस्था यांना चांदीबाई कॉलेज जवळ, जुने गणेश घाट विर्सजनाच्या ठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेस मान्यता देत नाही.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १० :–** सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १५ विविध कामाच्या संविदेची माहिती नोंद करणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. राम पारवानी :–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १० :–** सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १५ विविध कामाच्या संविदेची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतुद ठेवलेल्या निधीतून मा. नगरसेवक यांनी कामे करणेसाठी विनंती केलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे ठिकाण | प्राकलनीय किंमत | करारनामा दिनांक | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर– येथील प्रभाग क्र. १४ मधील सेवा निकेतन हॉस्पिटल समोर ते हिमांशु अपार्टमेंटपर्यत सी सी रोड आणि रस्त्यालगतची नाली बनविणे. (नगरसेवक निधी ३२४) | ७५०००/– | ३१/१०/०७ | मे श्री विजय म का सोसा. |
| २ | उल्हासनगर– येथील प्रभाग क्र. ५८ मध्ये बॅ नं १५६३ ते १५७४, बॅ नं १६३९ ते १६४८ पर्यत सी सी आणि नाली बनविणे. (नगरसेवक निधी ३१६) | १५००००/– | ८/१/०८ | मे श्री विजय म का सोसा. |
| ३ | उल्हासनगर– येथील प्रभाग क्र. ५८ मध्ये बॅ नं १५३६, १५३८ जवळ निष्कासीत केलेल्या संडासच्या जागेवर भिंत बांधणे (महानगरपालिका निधी २९७) | १९९८००/– | ११/१/०८ | मे लक्ष्मी क्रिपा म का सांसा. |
| ४ | उल्हासनगर– येथील प्रभाग क्र. २६ मध्ये सपना उद्यान येथे फवारासाठी इंलेक्ट्रीक दुरूस्ती करणे (महापालिका निधी २६५) | ४८३५५०/– | १८/१/०८ | मे साई लक्ष्मी म का सोसा. |
| ५ | उल्हासनगर– येथील प्रभाग क्र. २९ मध्ये हिराघाट जवळ बोट क्लब येथे रिटेंनिंग वॉल बांधणे. (महापालिका निधी २७६) | ३८४१००/– | १८/१/०८ | मे जनता म का सोसा. |
| ६ | उल्हासनगर– येथील प्रभाग क्र. ३२ मध्ये शांतीनगर पुजारी यांचे घर येथे पेवर ब्लॉक बसविणे (महापालिका निधी २८१) | ६००००/– | १८/१/०८ | मे ओम साईराम म का सोसा. |
| ७ | उल्हासनगर– येथील प्रभाग क्र. ५८ मध्ये बॅ नं १६१९, १६३१ जवळ निष्कासित केलेल्या संडाच्या जागेवर भिंत बांधणे. (महापालिका निधी २९८) | १९९८००/– | १८/१/०८ | मे लक्ष्मी क्रिपा म का सांसा. |
| ८ | उल्हासनगर– येथील प्रभाग क्र. ३१ मध्ये बॅ नं ९८३ जवळ नरेंद्र यांचे घरासमोर सी सी एम २५० पॅसेज आणि नाली बनविणे (नगरसेवक निधी ३०२) | १०००००/– | १८/१/०८ | मे श्री सिध्दनाथ म का सोसा. |
| ९ | उल्हासनगर– येथील प्रभाग क्र. ३८ मध्ये हनुमान नगर येथे राशन दुकान ते गुप्ता किराणा दुकान पर्यत सी सी एम २५० पेव्हमेंट आणि नाली बनविणे ( नगरसेवक निधी ३२५) | १०००००/– | १८/१/०८ | मे आदर्श म का सोसा. |
| १० | उल्हासनगर– येथील प्रभाग क्र. ५० मध्ये बॅ नं १५०० पासून ते व्ही टी कंम्पाऊंड पर्यत सी सी एम ३५० पॅसेज आणि नाली बनविणे. (महापालिका निधी ३०५) | १४६५०००/– | २२/१/०८ | मे श्री सत्यसाई म का सोसा. |
| ११ | उल्हासनगर– येथील प्रभाग क्र. २४ मध्ये मोरे नगर येथे बॅ नं ४२७ जवळ १० बैठकीचे शोचालय बांधणे. (दुर्बलघटक निधी ३०८) | ५४९८५३/– | २२/१/०८ | मे ओम साईराम म का सोसा. |
| १२ | उल्हासनगर– येथील प्रभाग क्र. ११ मध्ये शांतीनगर येथे कथारचे यांचे घर ते बवरकर चौक नेवस कारचे यांचे घर ते संगम हाऊस पर्यत सी सी आणि नाली बांधेणे (नगरसेवक निधी ३२३) | १७००००/– | २२/१/०८ | मे शिव म का सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | उल्हासनगर— येथील प्रभाग क्र. ५० मध्ये बॅ नं १४९८ पासून ते १५०३ पर्यत सी सी आणि नाली बांधणे. (नगरसेवक निधी ३२६) | १९९९००/— | २२/१/०८ | मे श्री जय शंकर म का सोसा. |
| १४ | उल्हासनगर— येथील प्रभाग क्र. ५० मध्ये बॅ नं १५०४ पासुन ते १५०७ पर्यत सी सी आणि नाली बनविणे (नगरसेवक निधी ३२८) | १०००००/— | २२/१/०८ | मे श्री जय शंकर म का सोसा. |
| १५ | उल्हासनगर— येथील प्रभाग क्र. ३८ मध्ये हनुमान मंदिर येथे राजीव गांधी इंट्रि बोर्ड पासून ते लहु भोईर यांचे घरापर्यत सी सी ड २५० पेव्हमेंट आणि नाली बनविणे (नगरसेवक निधी ३२७) | १९९७००/— | २९/१/०८ | मे आदर्श म का सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप निबंधक, ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी पस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६६ दिनांक:— १९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :—श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १५ विविध कामाच्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ११ :—** सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १४ विविध कामाच्या संविदेची माहिती नोंद करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ११ :—** सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १४ विविध कामाच्या संविदेची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या निधीतून मा. नगरसेवक यांनी कामे करणेसाठी विनंती केलेली आहे.

| | अ.क्र. | कामाचे ठिकाण | प्राकलनीय किंमत | करारनामा दिनांक | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १८९ | १ | उल्हासनगर–४ येथील प्रभाग क्र.५९ मधील दुलारी पाडा याठिकाणी सी.सी.पॅसेज व नाली बनविणे. (नगरसेवक निधी) | १००००० | १/२/२००८ | मे.श्री गंगा म.का.स. संस्था |
| ३१४ | २ | उल्हासनगर–३ येथील उल्हासनगर रेल्वे स्टेशन जवळील मच्छि मार्केटची दुरुस्ती करणेबाबत (महापालिका निधी) | २६७८०० | २/२/२००८ | मे.श्री सिध्दांत म.का.स. संस्था |
| ३४३ | ३ | वार्ड क्र.९ केणी चाळ येथील नागसेन कॉलनी, भैरवनाथ कॉलनी, शांती नगर याठिकायणी सी. सी. रस्ता व नाली बनविणे. (नगरसेवक निधी) | १९९९०० | २/२/२००८ | मे.शंकर महादेव म. का.स.संस्था |
| ३०६ | ४ | वार्ड क्र.३३ बॅरेक क्र.७१२,७१७ राजू धोबी यांचे घराजवळ शौचालय दुरुस्त करणे. (महापालिका निधी) | १५०००० | ५/२/२००८ | मे.संतोषी म. का.स.संस्था |
| ३९० | ५ | वार्ड क्र.८ आंबेडकर नगर येथील सहादू बागुल यांचे घर ते कैलाश तांबे आणि बनिया ते रंगिला महाले यांचे घर याठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. (नगरसेवक निधी) | ९९८०० | ८/२/२००८ | मे.गणेश म. का.स.संस्था |
| ३९१ | ६ | वार्ड क्र.८ डॉ.आंबेडकर नगर येथील बी.बी. होंडे ते बाले खाडकर यांचे घर, रमेश निकम यांचे घर ते भगवान यांचे घर याठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. (नगरसेवक निधी) | १९९६०० | ८/२/२००८ | मे.शारदा म. का.स.संस्था |
| ३४१ | ७ | वार्ड क्र.६ श्री मिश्रालाल यांचे घर ते विद्या विश्वकर्मा यांचे घर, सुपधुबाबा यांचे घरासमोर, उषा मिश्रा यांचे घर, राजीव गांधी यांचे घर याठिकाणी सी.सी.पॅसेज व नाली बनविणे. (नगरसेवक निधी) | १७५००० | ११/२/२००८ | मे.ज्योती म. का.स.संस्था |
| ३५१ | ८ | वार्ड क्र.१६ येथील बॅरेक क्र.८५ ए आणि बी आनंदपूर दरबार आश्रम, अवतार अपार्टमेंट, ते आनंदपूर आश्रम, सेवादास दरबार समोर याठिकाणी सी.सी.पॅसेज व नाली बनविणे. (नगरसेवक निधी) | १९९९०० | १२/२/२००८ | मे.सुर्यज्योत म.का.स. संस्था |
| ३८९ | ९ | वार्ड क्र.८ डॉ.आंबेडकर नगर येथील सखाराम देशमुख ते बुध्द विहार, समाज मंदीर ते अशोक खरात यांचे घर याठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. (नगरसेवक निधी) | १९९८५० | १३/२/२००८ | मे.श्रीविनायक म.का.स. संस्था |
| २८६ | १० | वार्ड क्र.४४ राधास्वामी सतसंग हॉल ते ओ.टी. पर्यंत फुटपाथची दुरुस्ती करणे. (महापौर निधी) | २००००० | १४/२/२००८ | मे.वडार म. का.स.संस्था |
| ३०७ | ११ | वार्ड क्र.७२ येथील बॅरेक क्र.१९३३ ते नेहरु नगर ते गार्डन येथे एम–३५० ने रस्ता बनविणे. (महापालिका निधी) | ९९९७०० | १४/२/२००८ | मे.वडार म. का.स.संस्था |
| ३३२ | १२ | वार्ड क्र.४६ बॅरेक क्र.९७४,९७५,९७६,९८१ याठिकाणी नाली व सी.सी.पेव्हमेंट बनविणे. (नगरसेवक निधी) | २००००० | १४/२/२००८ | मे.श्री विनायक म. का.स.संस्था |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | (नगरसेवक निधी) | | | का.स.संस्था |
| ३६४ | १३ | वार्ड क्र.४ येथील गुरमुख यांचे घर, शर्मा यांचे घर, अरविंद सिंग, अशोक यांचे घर, केबी सरदार सुधा लक्ष्मण मराठे, माता मंदीर, दुर्गा माता नगर याठिकाणी सी.सी.पॅसेज व नाली बनविणे. (नगरसेवक निधी) | १९९९०० | १६/२/२००८ | मे.वनी म. का.स.संस्था |
| १९० | १४ | वार्ड क्र.५९ येथील बॅरेक क्र.१६८३ याठिकाणी सी.सी.पॅसेज व नाली बनविणे. (नगरसेवक निधी) | १००००० | ५/२/२००७ | मे.गंगा म. का.स.संस्था |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप– निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप–निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६७ दिनांक:– १९/३/२००८

सुचकाचे नाव :– श्रीमती लता निकम

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती इंदिरा उदासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १४ विविध कामाच्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :– विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

**विषय क्र. १२ :–** वाहन विभागातील भंगार वाहनांची विक्री करणेकामी अधिकतम दराचे निविदाकार मे.गरीब नवाज ॲटोमोबाईल्स, उल्हासनगर यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

<u>सभापती, श्री. राम पारवानी :–</u>हा विषय पारीत करु या. या बरोबर व्हीटीसी क्रिडा संकुल येथे जे भंगार सामान पडले आहे त्याबाबत सुध्दा ३१ मार्च पुर्वी निविदा मागवुन विल्हेवाट लावल्यास तेथिल जागा मोकळी होवु शकेल.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>सभापती, श्री. राम पारवानी :–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १२ :–** वाहन विभागातील भंगार वाहनांची विक्री करणेकामी अधिकतम दराचे निविदाकार मे.गरीब नवाज ॲटोमोबाईल्स, उल्हासनगर यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेकडे असलेली खालील वाहने १६ ते २० वर्षापुर्वी खरेदी केली होती. सदर वाहने निरुपयोगी, दुरुस्ती न होण्याजोगी व कालबाहय झाल्यामुळे त्यांना निर्लेखित करुन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेतर्फे वाहनांचे मुल्य निर्धारित करणे व निविदा मागवुन विक्री करण्याचे प्रस्तावित होते. त्या प्रस्तावास दिनांक १४/५/२००७ रोजी मंजुरी मिळाली. त्यानुसार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण यांचेकडुन वाहनांची तपासणी करण्यात आली व त्यांचे पत्र क्र. ४७८७ दिनांक २/६/२००७ नुसार खालीलप्रमाणे वाहनांची मुल्य निर्धारित रक्कम कळविण्यात आली.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | वाहन कंपनी | वापर वर्ष | आरटीओ मुल्य निर्धारीत रक्कम | निविदा अधिकतम दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | एमएच ०५ अे ७१४० | प्रिमियर फियाट कार | १७ वर्ष | रु. ५,००० | रु. ५,०५० |
| २ | एमएच ०५ अे ९९९९ | टाटा सियारा | १६ वर्ष | रु. ७०,००० | रु. २०,५०० |
| ३ | एम सी टी ५५३२ | टाटा टेम्पो ४०७ | २० वर्ष | रु. ४०,००० | रु. ४०,२०० |
| ४ | एमडब्ल्युयू ७४१३ | टाटा टेम्पो ४०७ | २० वर्ष | रु. ४०,००० | रु. ४०,२५० |
| ५ | एमडब्ल्युयु ७४९७ | टाटा टेम्पो ४०७ | २० वर्ष | रु. ३५,००० | रु. ३५,२०० |
| ६ | एम एच–०५ ३८७४ | बजाज रिक्षा | १६ वर्ष | रु. ५,००० | रु.५,१०० |
| ७ | एम एच–०५ ३८७५ | बजाज रिक्षा | १६ वर्ष | रु. ५,००० | रु. ५,१०० |
| ८ | एम डब्ल्यु यु ७४१६ | टाटा टेम्पो ४०७ | २० वर्ष | रु. ५५,००० | रु. ५५,००० |

उपरोक्त वाहनांची विक्री करणेसाठी दिनांक ४/१२/२००७ रोजी निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली व त्यानुसार तीन भंगार खरेदीदारांनी निविदा विकत घेंतल्या व बयाणा रक्कम भरुन निविदा सादर केल्या, त्या निविदा उघडल्या असता, त्यात मेसर्स गरीब नवाज ॲटोमोबाईल्स, उल्हासनगर यांनी सांत वाहनांसाठी नमुद केलेले दर हे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या मुल्य निर्धारित रक्कमेपेक्षा जास्त आहेत. मात्र एक वाहन क्र. एमएम ०५ ए ९९९९ या वाहनाचे दर हे मुल्य निर्धारित रक्कमेपेक्षा कमी आहेत, म्हणुन अधिकतम किंमत

असलेल्या सात वाहनांचे दर स्विकारण्याचे व वाहने विक्री करण्याचे प्रस्तावित करण्यात येत सबब निविदाकार मे. गरीब नवाज ॲटोमोबाईल्स, उल्हासनगर यांचेशी संविदा करण्यासाठी आयुक्त यांना प्राधिकृत करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीच्या पटलावर मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६८ दिनांक:— १९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्रीमती लता निकम

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती निलम रावत

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहन विभागातील भंगार वाहनांची विक्री करणेकामी अधिकतम दराचे निविदाकार मे.गरीब नवाज ॲटोमोबाईल्स, उल्हासनगर यांच्याशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १३** :— उत्कर्ष महिलामंडळ यांना तहसिल कार्यालयाजवळ, दसरा मैदान उल्हासनगर—५ येथे पैसे दया व वापरा या तत्वावर सुलभ शौचालय बांधणेस परवानगी देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १३** :— उत्कर्ष महिलामंडळ यांना तहसिल कार्यालयाजवळ, दसरा मैदान उल्हासनगर—५ येथे पैसे दया व वापरा या तत्वावर सुलभ शौचालय बांधणेस परवानगी देणे.

प्रस्तावना

उत्कर्ष महिला मंडळ यांनी खालील ठिकाणी पैसे दया व वापरा तत्वावर सूलभ शौचालय बांधण्याकरीता परवानगी मागणी केलेली आहे.

१. तहसिल कार्यालया जवळ दसरा मैदान, उल्हासनगर—५

आरोग्य विभागाकडुन सदर शौचालयाबाबत संबंधित स्वच्छता निरिक्षक/मुख्य स्वच्छता निरिक्षक यांचेकडुन अहवाल प्राप्त झालेला असून त्यांनी पैसे दया व वापरा तत्वावर शौचालय बांधल्यास नागरीकांची सोय होईल, असे नमुद केलेले आहे.

उक्त बाबी विचारात घेता उत्कर्ष महिला मंडळ यांना उक्त प्रस्तावित केलेल्या ठिकाणी सुलभ शौचालय बांधणेकामी परवानगी देणेबाबत निर्णयार्थ मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १६९ दिनांकः– १९/३/२००८

सुचकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :– श्री. विजय सुपाळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उत्कर्ष महिलामंडळ यांना तहसिल कार्यालयाजवळ, दसरा मैदान उल्हासनगर–५ येथे पैसे दया व वापरा या तत्वावर सुलभ शौचालय बांधणेस परवानगी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १४ :–** महानगरपालिकेच्या मालकीचे व्हि.टी.सी. मैदान लग्न सोहळयांसाठी भाडयाने देण्यास परवानगी देणे.

---

सदस्य श्री. दिलीप गायकवाडः–या विषयाचा जो गोषवारा दिला आहे तो अस्पष्ट असून वाचता येत नाही. असा कसा गोषवारा देण्यात आला आहे?

महापालिका सचिव :–मालमत्ता विभागाकडुनच तशाप्रकारे गोषवारा प्राप्त झालेला आहे.

सभापती, श्री. राम पारवानी :–व्ही.टी.सी. क्रिडा संकुल येथिल मैदान लग्न सोहळयासाठी दोन दिवसाच्या भाडयाने दयायचे आहे ना?

महापालिका सचिवः–नाही फक्त एक दिवसासाठी दयायचे आहे.

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. राम पारवानी :–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १४ :–** महानगरपालिकेच्या मालकीचे व्हि.टी.सी. मैदान लग्न सोहळयांसाठी भाडयाने देण्यास परवानगी देणे.

प्रस्तावना

_श्री. अनंता कडु, श्रीराम नगर, से. २९, आशेळा पाडा, उल्हासनगर–४ यांनी दिनांक २९/१/२००८ च्या पत्रान्वये लग्न सोहळयाकरीता दिनांक १५/४/२००८ रोजी महानगरपालिका मालकीचे व्ही.टी.सी. मैदान, उल्हासनगर–४ या ठिकाणी परवानगी देणेबाबत विनंती केलेली आहे.

उल्हासनगर महानगरपालिका मालकीची मैदाने/उद्याने विविध प्रयोजनासाठी भाडे तत्वावर देणेकामी महासभा ठराव क्र. ८, दिनांक २४/५/२००२ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर ठरावात महानगरपालिका मालकीची मैदाने/उदयाने लग्न समारंभ किंवा व्यावसायिक कामासाठी किंवा इतर कुठल्याही कार्यक्रमाच्या वापरासाठी ठरावात नमुद स्तंभ क्र. ६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या रक्कमे ऐवजी त्याच्या ५ पट रक्कम भुईभाडे म्हणुन आकारण्यात येईल असे नमुद करण्यात आलेले आहे.

तथापि, उक्त ठरावात व्ही.टी.सी. मैदान, उल्हासनगर–४ भाडयाने देणेबाबत कोणताही उल्लेख नाही. तसेच दसरा मैदान उल्हासनगर–५ या ठिकाणाकरीता स्तंभ क्र. ६ मध्ये रु. १८७५/– एवढी रक्कम निश्चित करण्यात आलेली आहे.

तरी अर्जदार यांनी मागणी केले प्रमाणे महानगरपालिका मालकीचे व्ही.टी.सी. मैदान, उल्हासनगर–४ या ठिकाणी दिनांक १५/४/२००८ रोजी लग्न समारंभाकरीता ५ पट रक्कम म्हणजे रक्कम रु. १८७५ X ५ = ९३७५/– भुईभाडे तसेच एक दिवसाचे भुईभाडे इतकी अनामत रक्कम आकारणी करुन उक्त ठरावाच्या धर्तीवर परवानगी देणेबाबत निर्णयार्थ मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १७० — दिनांकः– १९/३/२००८

सुचकाचे नाव :– श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे उल्हासनगर महानगरपालिका निहित व्हि.टी. सी. मैदान श्री. अनंता कडु या अर्जदारास दिनांक १५/४/२००८ रोजीच्या लग्न सोहळयांसाठी रुपये ९३७५/– या दराने भाडयाने देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १५ :–** विद्युतविभागांतर्गत १२ विविध कामाच्या संविदेची माहिती नोंद करणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. राम पारवानी :–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १५ :–** विद्युतविभागांतर्गत १२ विविध कामाच्या संविदेची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका विद्युत विभागाचे कामास दिलेल्या मंजुरीची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मंजुर निविदा रक्कम | कराराचा दिनांक | एजन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | उल्हासनगर महानगरपालिकेचे प्र.क्र. ५४ मध्ये वर्ष ०७—०८ चे नगरसेवक निधीतून रस्त्यावर विद्युत व्यवस्था करणे | ४६,०००/— | ४/१०/०७ | मे.मारुती मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. कल्याण जि.ठाणे |
| २. | उल्हासनगर महारनगरपालिकेच्या सभागृहात जुने पब्लिक ॲड्रेस सिस्टम (कॉन्फरन्स सिस्टम) बदलुन नविन पब्लिक ॲड्रेस सिस्टम (कॉन्फरन्स सिस्टम) बसविणे | ४,५०,८९०/— | १७/१/०८ | मे.मोटवाने प्रा.लि. मुंबई |
| ३. | उल्हासनगर महानगरपालिकेचे प्र.क्र. ४० मध्ये ०७—०८ चे नगरसेवक निधीतून रस्त्यावर विद्युत व्यवस्था करणे | ४७,५००/— | २५/२/०८ | मे.महालक्ष्मी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उल्हासनगर जि.ठाणे |
| ४. | उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात उभारलेले कारंजे चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे | ३,६९,८७५/— | २५/२/०८ | मे.मारुती मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. कल्याण जि.ठाणे |
| ५. | उल्हासनगर महानगरपालिका कार्यालयात जुने वातानुकुलीत यंत्र बदलुन नविन वातानुकुलीत यंत्र पुरविणे | ६,०३,०००/— | २५/२/०८ | मे.बालाजी कृपा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. अंबरनाथ जि.ठाणे |
| ६. | उल्हासनगर महानगरपालिकेचे प्र.क्र. ३६ मध्ये ०७—०८ चे नगरसेवक निधीतून रस्त्यावर विद्युत व्यवस्था करणे | ७५,०००/— | २७/२/०८ | मे.वनीदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उल्हासनगर जि.ठाणे |
| ७. | उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ०७ मध्ये ०७—०८ चे नगरसेवक निधीतून रस्त्यावर विद्युत व्यवस्था करणे | १,५५,०००/— | २७/२/०८ | मे.वनीदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उल्हासनगर जि.ठाणे |
| ८. | उल्हासनगर महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेता यांचे कार्यालयात विद्युतीकरण करणे | ३७,५००/— | २७/२/०८ | मे.रविंद्र मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उल्हासनगर जि.ठाणे |
| ९. | उल्हासनगर महानगरपालिकेच्या बॅ. नं. १७४० शांतीभवन, उल्हासनगर—५ येथिल समाज मंदिराचे विद्युतीकरण करणे | ३०,०००/— | २७/२/०८ | मे.वनीदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उल्हासनगर जि.ठाणे |
| १०. | उल्हासनगर महानगरपालिकेचे प्र.क्र. ५७ मध्ये ०७—०८ चे नगरसेवक निधीतून रस्त्यावर विद्युत व्यवस्था करणे | ९७,०००/— | २७/२/०८ | मे.अनंत मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उल्हासनगर जि.ठाणे |
| ११. | उल्हासनगर शहरात बसविण्यात आलेले पथदिवे एक वर्षाकरीता चालु / बंद करणे व नाईट पेट्रोलिंग करणे | ९,६७,९८०/— | १२/३/०८ | मे. सप्तश्रुंगी माता मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उल्हासनगर जि. ठाणे |
| १२. | शहरातील खराब व निकामी झालेले पथदिव्यांचे खांब व त्यांची ॲक्सेसरीज बदलणे | ९,५०,०००/— | १२/३/०८ | मे. वनीदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.ता. उल्हासनगर जि.ठाणे |

तरी सदरची माहिती स्थायी समिती अवलोकनार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १७१ — दिनांकः— १९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लता निकम

हीस्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार विद्युतविभागांतर्गत १२ विविध कामाच्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १६ :–** कर आकारणी पुस्तकात दुबार नोंद असलेली मिळकत क्र. ३/१४२९ मध्ये समायोजित करण्यात आलेली व वसुल न होण्याजोगी रक्कम रुपये ३६,०१४/– निर्लेखित करणेस मंजुरी देणे.

---

सदस्य श्री. किशोर जग्यासी:– एकाच व्यक्तीचा मिळकत कर निर्लेखित करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे कसा आणण्यात आला आहे? अशा प्रकारची जेवढी काही प्रकरणे असतील ती सर्व एकत्रित करुन सविस्तर गोषवारा स्थायी समितीपुढे आणला जावा.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–मालमत्ता कर निर्लेखित करण्याचा एकाच व्यक्तीचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे कसा आणला? अशा प्रकारची जेवढी काही प्रकरणे असतील ती सर्व प्रकरणे एकत्रितपणे स्थायी समितीपुढे आणा. हा विषय वगळा नाहीतर हा प्रस्तावच नाकारला जावा.

सभापती, श्री. राम पारवानी :–हा विषय नाकारला जावा.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–मालमत्ता कराबाबतीत ब–याचशा नागरीकांच्या तक्रारी आहेत, मालमत्ता कर आकारणीबाबत मतभेद आहेत अशी सर्व प्रकरणे एकत्रितपणे स्थायी समितीपुढे आली आहेत. यासाठी हा विषय नाकारला जावा.

सभापती, श्री. राम पारवानी :–सदरचा विषय सर्वानुमते नाकारण्यांत येत असून त्याबाबत पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १६ :–** कर आकारणी पुस्तकात दुबार नोंद असलेली मिळकत क्र. ३/१४२९ मध्ये समायोजित करण्यात आलेली व वसुल न होण्याजोगी रक्कम रुपये ३६,०१४/– निर्लेखित करणेस मंजुरी देणे.

प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुचितील प्रकरण ८ मधील नियम २१ (१३ व १५ सह) अन्वये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील इमारती व जमिनी यावरील कर निर्धारणाासाठी सन ०६–०७ वर्षासाठी आकारणी पुस्तकातील नोंदी सन ०७–०८ या अर्थिक वर्षासाठीची आकारणी नोंदी म्हणुन स्विकारण्याचे प्रस्तावित असुन श्री. गौतम एकनाथ गायकवाड, रा. शहाड गावठाण, बौध्दवाडा, सेंच्युरी रेयॉन हॉस्पीटलसमोर, उल्हासनगर–१ यांनी दिनांक ११/१२/२००३ च्या पत्रान्वये महानगरपालिका कर आकारणी

नोंदवहीत आकारणी पात्र मालमत्ता क्र. ३/१४२९ चे आकारणी विरुध्द खालील बाबींबाबत हरकत दाखल केली आहे.

या संदर्भात असे सादर करण्यात येते की, मिळकत क्र. ३/१३५४ ही दुबार नोंद असल्याने ती रद्द करण्यात आल्याने दुबार नोंदीमध्ये समाविष्ट असलेली रक्कम रु. ३६,०१४/– मिळकत क्र. ३/१४२९ मध्ये समायोजित करण्यात आली होती. दाखल केलेल्या अर्जानुसार मिळकत क्र. ३/१४२९ मध्ये समायोजित रक्कम निर्लेखित करण्यासाठी कर निरिक्षक, उप–आयुक्त (शहर) यांच्या निर्देशाप्रमाणे व मुख्य लेखा परिक्षक यांच्याकडे अभिप्रायाकरिता पाठविण्यात आली होती.

मुख्य लेखा परिक्षक यांनी दिलेल्या स्पष्ट आदेशानुसार मिळकत क्र. ३ /१४२९ मध्ये समायोजित करण्यात आलेली रक्कम रु. ३६,०१४/– ही रक्कम दुबार नोंद असल्याने वसुल न होण्याजोगी असल्याने निर्लेखित करण्यासाठी स्थायी समिती पटलावर मंजुरी मिळण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १७२ दिनांकः– १९/३/२००८

सुचकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :– श्री. विजय सुपाळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे कर आकारणी पुस्तकात दुबार नोंद असलेली मिळकत क्र. ३/१४२९ मध्ये समायोजित करण्यात आलेली व वसुल न होण्याजोगी रक्कम रुपये ३६,०१४/– निर्लेखित करणेस मंजुरी देत नाही.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :– विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १७ :–** उल्हासनगर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागास शिलाई यंत्र पुरविणे कामी लघुत्तम दराचे निविदाकार मेसर्स अमरज्योत इन्टरप्रायझेस आणि मेसर्स मोहिनी इन्टरप्रायझेस यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. राम पारवानी :–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १७ :–** उल्हासनगर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागास शिलाई यंत्र पुरविणे कामी लघुत्तम दराचे निविदाकार मेसर्स अमरज्योत इन्टरप्रायझेस आणि मेसर्स मोहिनी इन्टरप्रायझेस यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत महिला व बालकल्याण विभागद्वारे सन २००७–०८ करीता शहरातील गरीब, विधवा व गरजु महिलांना मोफत शिलाई यंत्रे खरेदी करुन वाटपाबाबत जाहिर निविदा सूचना

दिनांक २०/२/२००८ रोजीच्या स्थानिक पातळीवरल ''दै. डेली फ्रि प्रेस जर्नल'' व दै. डेली एशियन ऐज'' व ''नगरन्युज'' या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा सुचनेच्या अनुषंगाने खालील प्रमाणे पुरवठा धारकांनी निविदा फॉर्मस विकत घेतले.

| अ.क्र. | पुरवठाधारकांचे नाव |
|---|---|
| १) | मे. अमरज्योत एंटरप्रायजेस |
| २) | मे. मोहिनी एंटरप्रायजेस |
| ३) | मे. जे.पी. कॉम्प्युटर व एंटरप्रायजेस |

उक्त निविदाधारकांकडून प्राप्त सिलबंद निविदा हया दिनांक ३/३/२००८ रोजी दुपारी १२.०० वाजता उपायुक्त (मु.), मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक व उपस्थित निविदाकारांच्या समक्ष उघडण्यात आल्या होत्या. अ.क्र. १,२, व ३ वरील निविदाकार सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. संबंधितांनी सादर केलेला दरांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशिल | एकुण आवश्यक नग | मे. अमरज्योत एंटरप्रायजेस | मे. मोहिनी एंटरप्रायजेस | मे. जे.पी. कॉम्प्युटर व एंटरप्रायजेस | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिलाई यंत्रे कंपनीचे नाव<br>उषा (Usha co. Delux model) | ८१० | —— | ३३००+ Vat | — | |
| | मोदी (Modi Co.Delux Model) | —— | २९९० + Vat | ३१००+ Vat | २९९०+ Vat | २५,१९,१००/— |
| | सिंगर (Singer Co.Delux Model) | —— | -- | —— | —— | |
| | खेतान (Kheaitan Co.Delux Model) | —— | -- | ३३००+Vat | —— | |

वरील निविदेद्वारे मे. अमरज्योत व मोहिनी यांचेकडुन प्राप्त झालेले दर हे न्युनत्तम आहेत. त्यानुसार सदर पुरवठादार यांचेकडुन दराबाबत वाटाघाटी करणेत येवुन त्यांनी शिलाई मशिन प्रती नग रुपये ४०/— प्रमाणे दरामध्ये कमी करुन पुरवठा करण्यास मान्य केले आहे. वाटाघाटीतील न्युनत्तम दराप्रमाणे मोदी कंपनीचे आयएसआय मार्कचे शिलाई यंत्रासाठी प्रती नग खरेदीस रुपये २९५० + ११८ व्हॅट (४ टक्के)= ३०६८ (रुपये तीन हजार अडुषष्ठ मात्र) खर्च मान्य करणेत आलेला आहे.

| अ.क्र. | तपशिल | एकुण आवश्यक नग | मे. अमरज्योत एंटरप्रायजेस | मे. मोहिनी एंटरप्रायजेस | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिलाई यंत्रे कंपनीचे नाव<br>मोदी (Modi Co.Delux Model) | ८१० | २९५० + ११८ व्हॅट (४ टक्के)= ३०६८ | २९५० + ११८ व्हॅट (४ टक्के)= ३०६८ | २४,८५,०८०/— |

सदर मोदी शिलाई यंत्रे एकुण ८१० नग खरेदी व पुरवठयासाठी एकुण खर्च रुपये २४,८५,०८०/— (रु. चोवीस लाख पंच्याऐशी हजार ऐंशी मात्र) होणार आहे. सदर खर्च महिला व बालकल्याण विभागाच्या लेखाशिर्ष सी—४ (ii) तरतुदीतून करावयाचा आहे. सदरचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ७३ (क) अन्वये स्थायी समितीसमोर मान्यतेकरीता सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** १७३ — दिनांक:— १९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागास शिलाई यंत्र पुरविणे कामी लघुत्तम दराचे निविदाकार मेसर्स अमरज्योत इन्टरप्रायझेस आणि मेसर्स मोहिनी इन्टरप्रायझेस यांच्याशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १८ :—** उल्हासनगर महानगरपालिकेकरिता बजाज जीसी मॅक्स जेटर तिन चाकी वाहन खरेदी करणे कामी प्रशासनास बजाज ऑटो ं कंपनीचे अधिकृत विक्रेता मे. जेम्स ऑटो पुणे यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

---

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचे वाहन लवकरात लवकर मागविण्यात यावेत.

सदस्य श्री. राजेश वानखेडे:—चार प्रभागांसाठी चार वाहने मागविण्यात यावीत.

सभापती, श्री. राम पारवानी :—आता एक तर येवु दया. त्यानंतर मग चार प्रभाग समित्यांसाठी चार वाहने मागवु या.

काही सदस्य :—पास—पास……

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १८ :—** उल्हासनगर महानगरपालिकेकरिता बजाज जीसी मॅक्स जेटर तिन चाकी वाहन खरेदी करणे कामी प्रशासनास बजाज ऑटो ं कंपनीचे अधिकृत विक्रेता मे. जेम्स ऑटो पुणे यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

प्रस्तावना

एमएमआरडीए संकुल, बांद्रा, मुंबई येथे दि. ३१/१/०८ रोजी प्रदर्शन भरविण्यात आले होते. सदर प्रदर्शनात बजाज ॲटो कं. पुणे तर्फे ठेवण्यात आलेल्या बजाज जीसी मॅक्स जेटर या वाहनांची उपयुक्ततेबाबत प्रात्याक्षीक दाखविण्यात आले. त्या अनुषंगाने सदर वाहनाद्वारे पाण्याचा वापर करुन रस्ते व फुटपाथ धुणे, छोटी आग लागल्यास विझविणे, वाहने घुणे, शौचालय सफाईसाठी, अंडरग्राउंड नाली चोकअप काढण्यासाठी असे अनेक उपयोग असल्याचे दिसून आले. सदर वाहनाचे विविध उपयोग बघता कंपनीच्या प्रतिनीधींना प्रात्याक्षीक दाखविण्यासाठी महानगरपालिकेत बोलाविण्यात आले. त्यानुसार कंपनीच्या प्रतिनिधींनी महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचा—यांसमोर वाहनांच्या वापराबाबत प्रात्याक्षीक करुन दाखविले. बजाज ऑटो लिमिटेड कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. जेम्स ऑटो, पुणे यांनी सदर वाहनासाठी खालील प्रमाणे किंमत कळविली आहे.

| अ.क्र. | मशिन/साहित्याचा तपशिल | आवश्यक नग | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| १ | बजाज जीसी मॅक्स जेटर थ्री व्हिलर | १ | ३,९५,०००/— |

वाहनाचे विविध उपयोग बघता एक वाहन प्रायोगिक तत्वावर खरेदी करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) अन्वये निविदा न मागविता मे. बजाज ऑटो लिमिटेड, पुणे यांच्याशी थेट संविदा करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येते. सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र.   १७४                                                    दिनांकः— १९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्रीमती निलम रावत

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे उल्हासनगर महानगरपालिकेकरिता बजाज जीसी मॅक्स जेटर तिन चाकी वाहन खरेदी करणे कामी प्रशासनास बजाज ऑटो कंपनी किंवा त्यांचे अधिकृत विक्रेता मे. जेम्स ऑटो पुणे यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १९ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १९** :—शहाडगावठाण, कोळीवाडा, उल्हासनगर—१ येथील नादुरूस्त जुन्या सार्व. शौचालयाच्या विनियोगास मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १९** :—शहाडगावठाण, कोळीवाडा, उल्हासनगर—१ येथील नादुरूस्त जुन्या सार्व. शौचालयाच्या विनियोगास मान्यता देणे.

प्रस्तावना

श्रीमती नेहा भोईर, मा. नगरसेविका उल्हासनगर महानगरपालिका यांनी दिनांक १९/५/२००७ च्या पत्रान्वये प्र.क्र. १ मधील शहाड गावठाण, कोळीवाडा, उल्हासनगर—१ येथिल ना दुरुस्त शौचालय निष्कासन करुन नविन सार्वजनिक शौचालय बांधणेबाबत विनंती केलेली आहे.
सदर शौचालयाबाबतचा अहवाल/पंचनामा स्वच्छता निरिक्षक श्री. दिपक भोये यांचेकडुन प्राप्त झालेला असून सदर शोचालय शांताराम मढवी यांचे घराजवळ हे एकच शौचालय असुन ते जुने झाल्याने जर्जर, नादुरुस्त मोडकळीस आलेले धोकादायक बनलेली आहे. सदर शौचालयाची स्थिती अत्यंत नाजुक चिंताजनक बनलेली आहे. शौचालय धोकादायक बनल्याने केव्हाही कोसळुन जिवित हानी होण्याची शक्यता असल्यामुळे सदरचे शौचालय पुर्णपणे निष्कासित करुन नविन शौचालय बांधावे असे नमुद केले आहे.
उक्त बाबी विचारात घेता प्र.क्र. १ मधील शहाड गावठाण, कोळीवाडा, उल्हासनगर—१ येथिल ना दुरुस्त शौचालय निष्कासन करुन नविन सार्वजनिक शौचालय बांधणेकरीता मा. स्थायी समितीची मंजुरी मिळणेसाठी स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र.   १७५                                                    दिनांकः— १९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

हीं स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार शहाडगावठाण, कोळीवाडा, उल्हासनगर–१ येथील नादुरूस्त जुन्या सार्व. शौचालयाच्या निष्कासनास व जागेवरील परिस्थिती पहाता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोगास व त्याजागी नविन शौचालय बांधणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. २० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २० :–** चहा कॅटीनकरीता अटी व शर्तीच्या अधिन राहुन जागा भाडयाने देण्याच्या प्रस्तावाची माहिती नोंद करणे.

---

सदस्य श्री. नरेंद्र दवणे:–अडीचशे रुपये तरी कश्याला भाडे घेता आणखी कमी करा. शंभर नाहीतर अगदी ५०–६० करा? कॅटीनसाठी कमीत कमी भाडे २०००/– रुपये असले पाहिजे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–अडीचशे रुपये एवढे कमी भाडे हातगाडीचे सुध्दा नाही. गोल मेदान येथिल भगवंती नावानी स्टेज समोरील जागा जी आपण भाडयाने देत होतो तीचे १९००० रुपये भाडे घेतले जात होते.

श्री. मिलिंद सावंत(आयुक्तांच्या जागेवर प्राधिकृत अधिकारी):–चहा कॅटीन चालविणेकामी ११ महिन्याच्या कालावधीसाठी जागा भाडयाने देण्यात आलेली आहे. व हा विषय आपल्या माहितीसाठी स्थायी समितीपुढें आणण्यात आलेला आहे.

सभापती, श्री. राम पारवानी :–हे भाडे कोणी निश्चित करुन दिले आहे?

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–निविदा मागविली जावी तोपर्यंत हा प्रस्ताव नाकारला जावा.

महापालिका सचिव :–चहा कॅटीन चालविण्यासाठी जागा भाडयाने देण्यात आलेली आहे व हा प्रस्ताव केवळ माहितीसाठी येथे आणण्यात आलेला आहे. आपण त्यास मंजुरी दिली नाही तरीही प्रतिमहा अडीचशे रुपये प्रमाणे चहा कॅटीनसाठी जागा भाडयाने दिली जाईल. तर हा प्रस्ताव आपणांस मंजुर आहे किंवा आपली काही हरकत आहे?

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:– प्रतिमाह अडीचशे रुपये भाडयास आमचा विरोध आहे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :–आमचा विरोध आहे.

सदस्य श्री. नरेंद्र दवणे:–जास्तीत जास्त भाडे आकारले जावे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–जसे गौल मैदानचे भाडे निश्चित केले त्याप्रमाणे चहा कॅटीनसाठी सुध्दा भाडे निश्चित केले जावे.

**यावेळी श्री. अशोक बागेश्वर उप–आयुक्त (मुख्यालय) यांनी सभागृहात प्रवेश केला आणि ते आयुक्त स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले तर श्री. मिलिंद सावंत हे अधिका–यांच्या बैठक व्यवस्थेतील आसनावर आसनस्थ झाले.**

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—**आयुक्तांनी त्यांच्या अधिका—याचा वापर करुन चहा कॅटीनसाठी भाडयाने दिली मग तो विषय आमच्याकडे कश्याला आणला? प्रतिमाह अडीचशे रुपये भाडे आम्हांला मान्य नाही.

**महापालिका सचिव :—**आयुक्तांच्या निर्णयाची अंमलबजावणी झालेली आहे. या पुढील कालावधीमध्ये जेव्हा ही जागा भाडयाने दिली जाईल त्यावेळी आपण भाडे वाढवु शकता.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—**प्रतिमाह अडीचशे रुपये भाडयास आमचा विरोध आहे.

**सदस्या श्री. सुरेश जाधव:—**एवढया अल्पशा दराने जागा भाडयाने दिल्याने महापालिकेचे नुकसान आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. राम पारवानी :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २० :—** चहा कॅटीनकरीता अटी व शर्तीच्या अधिन राहुन जागा भाडयाने देण्याच्या प्रस्तावाची माहिती नोंद करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका प्रशासकिय मुख्य इमारतीच्या आवारातील एकुण २८ चौ.मी. जागेपैकी अध्यक्ष/सचिव उल्हासनगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतपेढी मर्या. उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर—३ यांना १४ चौ.मी. जागा तसेच श्री. जितेंद्र अछयवर उपध्याय, शहाड फाटक रोड, शिवाजी रोड, उपाध्याय चाळ, उल्हासनगर—१ यांना उर्वरीत १४ चौ.मी. जागा प्रतिमाह प्रत्येकी भाडे रक्कम रुपये २५०/— प्रमाणे १२ महिन्याचे चहा कॅटीनकरीता अटी व शर्तीच्या अधिन राहुन देण्यात आलेली आहे.

उक्त बाब मा. स्थायी समिती पुढे माहितीस्तव सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १७६ **दिनांक:— १९/३/२००८**

सुचकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका प्रशासकिय मुख्य इमारतीच्या आवारातील एकुण २८ चौ.मी. जागेपैकी १४ चौ.मी जागा उल्हासनगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादीत यांना व उर्वरीत १४ चौ.मी. जागा श्री. जितेंद्र उपाध्याय यांना प्रत्येकी प्रतीमहा रु. २५०/— याप्रमाणे १२ महिन्यासाठी चहा कॅटीनकरीता भाडयाने देण्यात आल्याची माहिती नोंद करीत आहे.

परंतु——

यामध्ये जे भाडे निश्चित केलेले आहे ते अतिशय कमी आहे त्यामुळे यापुढे स्थायी समितीच्या पुर्ण मंजुरीशिवाय संविदा करु नये.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २१ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २१** :— उल्हासनगर महापालिका क्षेत्रात मोबाईल स्प्रे मशिनद्वारे जंतुनाशक/किटकनाशक फवारणी करणे कामी लघुत्तम दराचे निविदाकार मे. सिटीगार्ड अंबरनाथ यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

---

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—उल्हासनगर महापालिका क्षेत्रात मोबाईल स्प्रे मशिनद्वारे जंतुनाशक/किटकनाशक फवारणी करण्याचे काम तीन महिन्यासाठी सिटी गार्ड या संस्थेस देण्यात आले होते. या तीन महिन्याच्या कालावधीत पंधरा दिवस तर सुट्टी होती. या पंधरा दिवसाचे देयक कमी करुन दयावयास पाहिजे होते.

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, आरोग्य):—पंधरा दिवस सुट्टी होंती परतु सुट्टीच्या वेळेस सुध्दा प्रे मशिनद्वारे किटकनाशक फवारणी करण्याचे काम झाले आहे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—त्या पंधरा दिवसाची रक्कम बिलातुन कपात केली आहे काय? एवढी घाई का करता?

सदस्य श्री. किशोर जग्यासी:—तीन महिन्यामध्ये त्याने नव्वद दिवस काम केले आहे काय?

महापालिका सचिव:—हा विषय सुध्दा माहितीसाठी आहे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—माहितीसाठी जे विषय स्थायी समितीपुढे येतात अशा विषयांमध्येच गडबड असते.

सभापती, श्री. राम पारवानी :—हरकतीची नोंद करुन हा विषय पारीत केला जावा.

सदस्य श्री. सुरेश जाधव:—हा विषय स्थायी समितीपुढे केवळ माहितीसाठी आलेला आहे म्हणजे या विषयाबाबत आयुक्तांनी आपल्या अधिकाराचा वापर करुन निर्णय घेतलेला आहे. जर त्यांनी निर्णय घेतलेला आहे तर मग आमचा पुढे हा विषय का आणलेला आहे? वाटेल ती कामे करुन स्थायी समितीपुढे केवळ माहितीसाठी घेवुन येतात. माहितीसाठी तरी आमच्याकडे कश्याला घेवुन येतात?

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—आमचा या विषयास विरोध आहे. पुढील वेळेस अहवाल सादर करा.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २१** :— उल्हासनगर महापालिका क्षेत्रात मोबाईल स्प्रे मशिनद्वारे जंतुनाशक/किटकनाशक फवारणी करणे कामी लघुत्तम दराचे निविदाकार मे. सिटीगार्ड अंबरनाथ यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने व साथरोगाची लागण होवू नये म्हणून, जंतुनाशक/किटकनाशक फवारणी परिणामकारक होणेसाठी मोबाईल स्प्रे मशिनद्वारे (फिरते वाहन) औषधांची फवारणी करण्यासाठी सदरच्या मशिन भाडेतत्वावर पुरवठा करण्याची निविदा मागविण्यात आली होती. निविदेतील न्युनत्तम दर सादर करणारे मे. सिटीगार्ड, अंबरनाथ यांचा वाटाघाटी अंती रुपये १८००/— प्रतिदिन (आठ तासासाठी) प्रति वाहन इतर निविदाकारांपेक्षा कमी असल्याने स्विकारण्यात आला, व सदर पुरवठादारास २ मशिन तीन महिन्यांच्या कालावधीसाठी पुरविणेबाबत आदेश दिनांक २९/९/२००७ रोजी देण्यात आले आहेत.

तरी सदर एकूण २ मोबाईल स्प्रेईंग मशिनसाठी रुपये ३,२४,०००/—(तीन लाख चोवीस हजार) खर्च होणार असून सदर निविदाकाराशी संविदा करण्यात आली आहे.

तद्नंतर सदरचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा. स्थायी समितीसमोर माहितीकरीता सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १७७ दिनांकः— १९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्रीमती निलम रावत

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महापालिका क्षेत्रात मोबाईल स्प्रे मशिनद्वारे जंतुनाशक/किटकनाशक फवारणी करणे कामी लघुत्तम दराचे निविदाकार मे. सिटीगार्ड अंबरनाथ यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २२ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २२** :— श्री. एस.एस.साळवे यांच्या विधी विभागातील विधी सल्लागार या पदावरील पुढील सहा महिन्याच्या नियुक्तीस मान्यता देणे.

---

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—त्यांनी काय काम केले आहे ते सांगा किंवा त्याबाबतची माहिती दया.

श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—सध्या ते कार्यरत नाहीत. यापुर्वी ते कार्यरत होते. त्यांचे काम होते कायदेशीर मत देण्याचे. आपणाकडे सध्या विधी अधिकारी नसल्याने एखादया प्रकरणाबाबतीत कायदेशीर मत दयायचे झाले तर ते वकिलाकडे पाठवावे लागते तर वकिल अश्या प्रकरणावर

कायदेशीर मत देतो परंतु त्याबाबत शुल्क आकारतो. त्यामुळे अशी किती प्रकरणे आपण वकिलांकडे कायदेशीर सल्ल्यासाठी पाठविणार. प्रत्येक प्रकरणाबाबतीत विधी सल्लागार नेमणे शक्य नाही.

**<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—</u>**कश्याला ठेवतात ही माणसे त्यांनी काय काम केले आहे ते तर सांगा?

**<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे:—</u>**महापालिकेच्या पॅनलवर असलेले श्री. अशोक कदम या वकिलाची फी महापालिकेने अदयाप दिलेली नाही.

**<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>**जर श्री. साळवे हे जर कार्यक्षम असतील तर आमची काही हरकत नाही.

**<u>श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>**विधी सल्लागाराचे काम आहे कायदेशीर मत देण्याचे. ते त्यांनी वेळोवेळी दिलेले आहे.

**<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—</u>**प्लॉट नं. ७०५ बद्दल त्यांनी काय मत दिले होते? काम करत नसतील तर असे अधिकारी नुसते पोसायला ठेवु नका.

**<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—</u>**आपण जर शिफारस करत असाल तर आम्ही या विषयास मंजुरी देतो.

**<u>श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>**आम्ही शिफारस तर केलेली आहेच. आणि विधी अधिकारी हे पद सध्या कार्यरत नसल्यामुळे विधी सल्लागार नेमणे आवश्यक आहे.

**<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>**श्री. बागेश्वर साहेब जर म्हणत असतील की श्री. साळवी हे कार्यक्षम आहेत व त्यांनी त्यांची शिफारसही केली आहे तर मग ठिक आहे आमची काही हरकत नाही.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्री. राम पारवानी :—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २२ :—** श्री. एस.एस.साळवे यांच्या विधी विभागातील विधी सल्लागार या पदावरील पुढील सहा महिन्याच्या नियुक्तीस मान्यता देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या विधी विभागात श्री. एस.एस.साळवे, सेवानिवृत्त सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर याची कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/प्र.क्र./९५५, दिनांक २५ नोव्हेंबर,२००५ च्या आदेशान्वये ''विधी सल्लागार '' म्हणुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५३ अन्वये शासन निर्णय क्र.सीबीई/११९३/प्र.क्र.३०/९३/१३, दिनांक १५.२.१९९५ मधील तरतुदी नुसार सहा महिन्यांच्या कालावधीकरीता नेमणूक करण्यात आली होती.

त्यानंतर श्री. एस.एस.साळवे,यांचे नेमणुकीस मा. स्थायी समिती ठराव क्र. १७, दिनांक १५कृ५.२००६ रोजीच्या मान्यते नुसार तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर नेमणूक दिनांक २५.८.२००६ रोजी संपुष्टात आली आहे. त्यानुसार श्री. एस.एस.साळवे. यांच्या नेमणुकीस पुढील सहा महिन्यांची मुदतवाढ देणेबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५३ (१), ठराव क्रमांक ३७, दिनांक १५/९/२००६ अन्वये नामंजुर करण्यात आला आहे. तथापि, सदर प्रस्तावास नामंजुर करतांना कोणतेही कारण नमुद करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर प्रस्ताव फेरविचारार्थ सादरकरण्यात येत आहे.

सबब, श्री. एस.एस. साळवे, यांच्या नेमणुकीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,१९४९ च्या कलम ५३ (१) अन्वये पुढील सहा महिन्यांची मुदतवाढ देणेबाबत मा. स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिति ठराव क्र. १७८ 	दिनांक:— १९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार श्री. एस.एस.साळवे यांच्या विधी विभागातील विधी सल्लागार या पदावरील पुढील सहा महिन्याच्या नियुक्तीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २३ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. २३ :— महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक—२००७ करीता गॅल्हवनाईज पेटया खरेदी व पुरवठा करणेकामी लघुत्तम दराचे निविदाकार मेसर्स मोहिनी एन्टरप्रायझेस यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

---

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—हा विषय स्थायी समितीसमोर एवढा उशिरा का आला आहे?

महापालिका सचिव :—प्रलंबित ठेवण्यात आला होता.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २३** :— महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक—२००७ करीता गॅल्हवनाईज पेटया खरेदी व पुरवठा करणेकामी लघुत्तम दराचे निविदाकार मेसर्स मोहिनी एन्टरप्रायझेस यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

सार्वत्रिक निवडणूक—२००७ करीता गॅल्हवनाईज पेटया खरेदी व पुरवठा करणे बाबतच्या प्राप्त प्रस्तावास व सादर केलेल्या टिपणीस लेखा शाखा व मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेनुसार जाहिर निविदा सुचना दिनांक २६/१२/२००६ रोजीच्या स्थानिक पातळीवरील '' उल्हास विकास''या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा सुचनेच्या अनुषंगाने दिनांक २६/१२/२००६ ते २८/१२/२००६ या कालावधीमध्ये खालील प्रमाणे पुरवठा धारकांनी निविदा फॉर्मस विकत घेतले आहे.

| अ.क्र. | पुरवठाधारकांचे नाव |
|---|---|
| १) | मे. मोहित एंटरप्रायजेस |
| २) | मे. मोहिनी एंटरप्रायजेस |
| ३) | मे. जे.पी. कॉम्प्युट्रॉनिक्स अॅन्ड एंटरप्रायजेस |
| ४) | मे. उमा एंटरप्राजेस |

अ.क्र. १,२,३,४ यांच्या प्राप्त सिलबंद निविदा हया दिनांक २९/१२/२००६ रोजी उपस्थित निविदाकार, उप–आयुक्त (भांडार), मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक यांचे उपस्थितीमध्ये दुपारी ४.०० वाजता उघडण्यात आल्या होत्या.

अ.क्र. १,२,३,४ यांनी निविदेच्या अटी शर्तीप्रमाणे पाकिट क्र.१ मध्ये आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता केल्याप्रमाणे त्यांचे पाकिट क्र. २ हे उघडण्यात आले होते. प्रस्तृत निविदा कारांचे दरानुसार मे. मोहिनी एंटरप्रायझेस, उल्हासनगर–४ यांनी गॅल्हवनाईज पेटीचा न्युनतम दर १९९९/– प्रती नग सादर केला होता. सदरचे दर प्रस्तृत दर जास्तीचे वाटत असल्यामुळे भांडार विभागाचे पत्रानुसार उप–आयुक्त (मु.) यांचे दालनामध्ये दिनांक ८/१/२००७ रोजी निविदाकार यांचे समवेत झालेल्या दर वाटाघाटीनुसार मे. मोहिनी एंटरप्रायझेस, उल्हासनगर–४ यांनी गॅल्हवनाईज पेटीचा न्युनतम दर १९९९/– रुपये प्रती नग ऐवजी १७९९/– रुपये प्रती नग पुरवठा करावयाचे मान्य केले.

तसेच महापालिका सार्वत्रिक निवडणूक २००७ करीता निविदापत्रामध्ये प्रथम ५० नग गॅल्हवनाईज पेटयांची मागणी केली होती. परंतु उप–आयुक्त (मु.) यांचे आदेशानुसार एकुण ७६ प्रभागासाठी ८० पेटया व मत मोजणीसाठी महत्वाचे कागदपत्र ठेवण्यासाठी २० पेटया व मत मोजणीसाठी महत्वाचे कागदपत्र ठेवण्यासाठी २० पेटया अधिक अशा एकुण १०० नग पेटयांची खरेदी करण्याबाबत भांडार विभागद्वारा दिनांक ९/१/२००७ रोजी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास मा. आयुक्त सो. व लेखा शाखा यांचे द्वारा १०० नग गॅल्हवनाईज पेटया खरेदी करण्यास मान्यता मिळालेली आहे. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

## तुलनात्मक तक्ता

| अ. क्र. | मालाचा प्रकार | अंदाजे मागणी | मोहित एंटरप्रायझेस | उमा एंटरप्रायझेस | जे.पि. कॉम्प्युट्रानिक्स एन्ड एंटरप्रायझेस | मे.मोहिनी एंटरप्रायझेस |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका सार्वनिक निवडणूक –२००७ करीता गॅल्व्हनाईज पेटया नमून्याप्रमाणे खरेदी करणे बाबत. सईज :– लाबी २.८ रुंदी १.६ उंची १.१ | १०० नग | २०९०/– | २१५०/– | २०५०/– | १७९९/– |
| **एकुण** | | | २,०९,०००/– | २,१५,०००/– | २,०५,०००/– | १,७९,९००/– |

महापालिका सार्वत्रिक निवडणूक २००७ करीता मे. मोहिनी एंटरप्रायझेस यांचे कडुन १०० नग गॅल्हवनाईज पेटया खरेदी पुरवठयासाठी होणारा एकुण खर्च रक्कम रुपये १,७९,९००/– (एक लाख एकुणऐंशी हजार नऊशे मात्र) निवडणूक साहित्य खरेदी लेखाशिर्ष AB E-1 Part-1 च्या तरतुदीमधुन करावयाचा आहे. सदरचा प्रस्तावहा ७३ (ड) अन्वये स्थायी समिती समोर माहितीकरीत सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १७९ दिनांकः– १९/३/२००८

सुचकाचे नाव :– श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती निलम रावत

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक–२००७ करीता गॅल्हवनाईज पेटया खरेदी व पुरवठा करणेकामी लघुत्तम दराचे निविदाकार मेसर्स मोहिनी एन्टरप्रायझेस यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. २४ वाचुन दाखवितात

विषय क्र. २४ :— महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २००७ करीता स्टेशनरी व इतर साहित्य खरेदी व पुरवठा करणेकामी बाबनिहाय लघुत्तम दराचे निविदाकाराशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

विषय क्र. २४ :— महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २००७ करीता स्टेशनरी व इतर साहित्य खरेदी व पुरवठा करणेकामी बाबनिहाय लघुत्तम दराचे निविदाकाराशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे.

प्रस्तावना

महानगरपालिका सार्वत्रिक निवडुणक—२००७ करीता स्टेशनरी व इतर साहित्य खरेदी व पुरवठा करणेबाबतच्या प्राप्त प्रस्तावास व सादर केलेल्या टिप्पणीस लेखा शाखा व मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेनुसार जाहिर निविदा सुचना दिनांक १३/११/२००६ रोजीच्या स्थानिक पातळीवरील ''नगरन्युज'' या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा सुचनेच्या अनुषंगाने दिनांक १३/११/२००६ ते २०/११/२००६ या कालावधीमध्ये खालीलप्रमाणे पुरवठा धारकांनी निविदा फॉर्मस विकत घेतले.

| अ.क्र. | पुरवठाधारकांचे नाव |
|---|---|
| १) | मे. महेश एंटरप्रायझेस |
| २) | मे. अमरज्योत एंटरप्रायजेस |
| ३) | मे. मोहिनी एंटरप्रायजेस |
| ४) | मे. मांउट मेरी एंटरप्रायझेस |
| ५) | मे. जकनुश कन्ट्रक्शन |
| ६) | मे. मोहित एंटरप्रायझेस |

अ.क्र. १ ते ६ यांच्या प्राप्त सिलबंद निविदा हया दिनांक २१/११/२००६ रोजी उपस्थित निविदाकार, उप—आयुक्त (भांडार), मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक यांचे उपस्थितीमध्ये दुपारी ३.०० वाजता उघडण्यात आल्या होत्या.

अ.क्र. १,२,३,६ यांनी निविदेच्या अटी शर्तीप्रमाणे पाकिट क्र. १ मध्ये आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केल्याप्रमाणे त्यांचे पाकिट क्र. २ हे उघडण्यात आले. तसेच अ.क्र. ४,५ यांनी निविदेच्या अटी शर्तीप्रमाणे पाकिट क्र.१ मध्ये आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता न केल्यामुळे त्यांचे पाकिट क्र. २ हे उघडण्यात आले नाही. अ.क्र. १,२,३,६ यांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे....

मे. अमर ज्योत एंटरप्रायझेस यांनी अ.क्र. ३,४,८,९,१२,१३,१४,१५,१६,१८,२० मोहिनी एंटरप्रायझेस यांनी अ.क्र. १,२,५,६,७,१०,११,१७,१९ इत्यादी साहित्याचे न्युनत्तम दरानुसार खरेदी करण्याचे प्रशासनाने ठरविले आहे.

अ.क्र. १ ते २० साहित्य खरेदी व पुरवठयासाठी रक्कम रुपये १,०७,१२५/— (एक लाख सात हजार एकशे पंचविस मात्र) हा निवडणूक साहित्य खरेदी लेखा शिर्ष E-1 Part-1 च्या तरतुदीमधुन करावयाचा आहे. सदरचा प्रस्ताव हा ७३ (ड) अन्वये स्थायी समितीसमोर माहितीकरीता सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १८० दिनांक:— १९/३/२००८

सुचकाचे नाव :—श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :—श्रीमती निलम रावत

हा स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २००७ करीता स्टेशनरी व इतर साहित्य खरेदी व पुरवठा करणेकामी बाबनिहाय लघुत्तम दराचे निविदाकाराशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २५ :— साईबाबा मंदिरा समोरील प्रवेशद्वाराच्या वाढीव खर्चास मंजुरी देणे.**

---

सदस्य श्री. राजेश वानखेडे:—त्या ठेकेदारास काळया यादीमध्ये टाकायचे आहे ना? तर मग हा प्रस्ताव मंजुर कसा करणार?

श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):— हा जो प्रस्ताव आहे तो २००७ चा होता.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—शहर अभियंता कुठे आहेत त्यांना बोलवा त्यांना काही कळत नाही. त्यांना त्यांच्या मुळ विभागात परत पाठवा.

श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—हा जो प्रस्ताव आहे तो खुप जुना आहे त्यानंतर त्यात काही फेरबदल केले आहे. या प्रवेशद्वाराच्या स्लॅब सिलींगवर फायबरचे अस्तर लावण्याकरीता मुळ निविदेत तरतूद आहे. परंतु प्रवेशद्वाराची उंची पहाता फायबरच्या शीट लावल्यानंतर त्यांची देखभाल दुरुस्ती करणे अत्यंत गैरसोयीचे होणार आहे. तसेच काही काळानंतर या शीट खाली पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्व बाबींचा विचार होवून मे. उत्तम इंजिनिअरींग यांचेशी सल्लामसलत होवून फायबर शीट न लावता सीलींगवर Acrylic exterior Asian Paint लावावा असे ठरले आहे जे किफायतशीर होणार आहे. विषय क्र. ५ मध्ये ज्या ठेकेदाराचे काम आपण रद्द केले आहे त्याचे अनामत रक्कम आपण जप्त आहोत.

सभापती, श्री. राम पारवानी:—विषय क्र. ५ व २५ हे दोन्ही विषय वेगवेगळे आहेत की एकच आहेत.

श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—एकच आहेत.

सदस्य श्री. संजय बठिजा/श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—आता या विषयाबाबतीत काय करायचे?

सदस्य श्री. किशोर जग्यासी:—या विषयाबाबत सभापती जसे बोलतील तसे करण्यास आम्ही तयार आहोत. बोला काय करायचे?

सदस्य श्री. राजेश वानखेडे:—हे काम तर जुनेच आहे ना?

सभापती, श्री. राम पारवानी :—हे काम जुने आहे व ते अर्धेपुर्ण केले आहे यासाठी त्यास मंजुरी दयावी लागेल. त्या ठेकेदाराने जे अर्धे काम केले आहे त्याचे त्यास जुन्या दराने देयक अदा केले पाहिजे बाकी जे काम आहे ते दुस—यास नव्या दराप्रमाणे दिले जावे.

श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—हा प्रस्ताव जुना आहे.

**<u>सभापती, श्री. राम पारवानी :—</u>**दोन दोन प्रस्ताव सभेपुढे कसे आले? ५ क्रमांकाचा जो विषय आहे त्यातील ठेकेदारास काळया यादीमध्ये टाकण्याचे सांगण्यात आले आणि त्यानंतर हा विषय येथे मंजुरीस आला आहे. असे कसे?

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्री. राम पारवानी :—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २५ :—** साईबाबा मंदिरा समोरील प्रवेशद्वाराच्या वाढीव खर्चास मंजुरी देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

_उल्हासनगर महानगरपालिकेने कल्याण अंबरनाथ रस्त्यावर ऑर्डनस फॅक्टरी फर्स्टगेट समोरील शहराच्या सिमेजवळ प्रवेशद्याराचे काम हाती घेतले आहे. निविदा कार्यवाही करुन इकडील कार्यारंभ आदेश क्र. उमपा/साबांवि/शअ/३६१ दिनांक १०/४/२००३ अन्वये सदर काम मे. डी.एस.कन्सट्रक्शन कं. यांचेवर सोपविण्यात आलेले आहे. सुरुवातीस सदर काम सुरु करण्यास वाहतूक विभागाकडुन रस्ता बंद करण्याकरीता परवानगी मिळण्यास विलंब झाल्याने प्रत्यक्ष काम हाती घेण्यास उशीर झाला होता. सदर ठिकाणी रस्ता दुहेरी असल्याने एका भागामध्ये रस्ता बंद करुन दुस—या भागातून वाहतूक चालू ठेवून प्रवेशद्वाराचे अर्धे बांधकाम हाती घेण्यात आले आहे. सद्यस्थितीत आरसीसी काम पूर्ण होत प्लॅस्टर व ग्रॅनाईटचे काम करण्यात आलेले आहे.

या प्रवेशद्वाराच्या स्लॅब सिलींगवर फायबरचे अस्तर लावण्याकरीता मुळ निविदेत तरतूद आहे. परंतु प्रवेशद्वाराची उंची पहाता फायबरच्या शीट लावल्यानंतर त्यांची देखभाल दुरुस्ती करणे अत्यंत गैरसोयीचे होणार आहे. तसेच काही काळानंतर या शीट खाली पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्व बाबींचा विचार होवून मे. उत्तम इंजिनिअरींग यांचेशी सल्लामसलत होवून फायबर शीट न लावता सीलींगवर Acrylic exterior Asian Paint लावावा असे ठरले आहे जे किफायतशीर होणार आहे.

त्याशिवाय कामामध्ये अन्य काही बाबींच्या परिणामामध्ये प्रत्यक्ष कार्यवाहीच्या वेळेस फरक होणार आहे. त्यामुळे या बाबींपैकी काही बाबींच्या खर्चामध्ये वाढ तर काही मध्ये घट होणार आहे. काम पूर्ण होईल त्यावेळी एकुण रु. २८६.०००/— इतक्या खर्चासह एकुण होणा—या २३,३८,८७१/— इतक्या रक्कमेस सुधारीत मंजुरी मिळणेस प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १८१ <u>दिनांक:— १९/३/२००८</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे साईबाबा मंदिरा समोरील प्रवेशद्वार बनविणे कामी सुधारीत प्राकलनीय रक्कम रुपये २३,३८,८७१/— यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. २६ वाचुन दाखवितात

---

➪ **विषय क्र. २६ :–** उल्हासनगर महानगरपालिका निधी जनरल अरुणकुमार वैद्य (टाउन हॉल) उल्हासनगर–३ चे अभिकर्ता मे कुमार इन्फ्राक्ट्रचर प्रा.लि. यांनी करारातील अटी व शर्ती भंग केल्याने करारा बाबत निर्णय घेणे.

---

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>हे जे काम आहे ते विधी विभागाचे आहे. विधी विभागच याबाबतीत कार्यवाही करु शकत असल्याने हा प्रस्ताव स्थायी समितीकडे कसा आला? हा प्रस्ताव विधी विभागाकडेच पाठविला पाहिजे.

<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–</u>हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. याबाबतीत न्यायालयास निर्णय घेवु दया यासाठी हा विषय नाकारण्याऐवजी पुढे ढकलला जावा.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाडः–</u>न्यायालयाकडुन काही निर्देश आले असतील तर दाखवा.

<u>सभापती, श्री. राम पारवानी :–</u>न्यायालयाकडुन काही निर्देश आलेले नाहीत.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाडः–</u>आता हे जे पत्र येथे वाटप करण्यात आले आहे ती वकिलाची नोटिस आहे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>या विषयाबाबत कुमारी साहेब आपणांस काय माहिती आहे ते सांगा.

<u>सभापती, श्री. राम पारवानी :–</u>हा विषय नाकारला जावा.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे / नरेंद्रकुमार ठाकुरः–</u>हा विषय पुढे ढकलला जावा.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासीः–</u>ज्यावेळेस निविदा काढण्यात आली होती त्यावेळेस काय झाले होते ते आपणांस माहित आहे काय? हे प्रकरण विधी विभागाने हाताळले पाहिजे.

<u>महापालिका सचिवः–</u>आपल्या अधिक माहितीसाठी मी सांगु इच्छितो. या प्रस्तावामध्ये ज्या कमतरता आहेत त्या याप्रकारे.... या प्रस्तावास जर मंजुरी दयायची नसेल तर याबाबतीत ठेकेदाराशी केलेला करार कायम ठेवुन पुर्नतपासणी केली जावी.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडेः–</u>निविदा कायम ठेवली जावी असे आपण का म्हणत आहात?

<u>सभापती, श्री. राम पारवानी :–</u>हा विषय पुढे ढकलला जावा.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणेः–</u>टाउन हॉल कुमार चैनानी यांना ठेकेपध्दतीने देण्यात आला असतांना कुमार इन्फ्राक्ट्रक्चर प्रा. लि. हे नाव कुठून आले? ही काय भानगड आहे?

<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः–</u>हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा. व पुढील सभेत सविस्तर माहिती दिली जावी.

<u>सदस्य श्री. विजय सुपाळे/श्री. दिलीप गायकवाडः–</u>हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा.

<u>महापालिका सचिवः–</u>याबाबतीत आपण काय निर्णय घेत आहात तो जरा स्पष्ट करुन सांगा.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासीः–</u>हे जे प्रकरण आहे ते कायदेशीर प्रकरण आहे. ७०५ नंबरच्या प्लॉटचा जेव्हा मुद्दा निघाला होता तेव्हा ते प्रकरण स्थायी समितीपुढे पाठविण्यात आले होते का?

<u>महापालिका सचिव :–</u>या विषयाबाबत जो ठराव तयार करण्यात येत आहे तो या प्रकारचा असेल, करार कायम राहिल व वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्यासाठी प्रशासनास आदेश दिला जाईल. ठिक आहे?

<u>काही सदस्य :–</u>ठिक आहे. पास–पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. २६** :— उल्हासनगर महानगरपालिका निधी जनरल अरुणकुमार वैद्य (टाउन हॉल) उल्हासनगर—३ चे अभिकर्ता मे कुमार इन्फ्राक्ट्रचर प्रा.लि. यांनी करारातील अटी व शर्ती भंग केल्याने करारा बाबत निर्णय घेणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेत जनरल अरुण कुमार वैद्य नावाचा टाऊन हॉल उल्हासनगर—३ मधील प्लॉट नं. ९६, भाग १ आणि प्लॉट नं. ९७ चा भाग, मध्यवर्ती रुग्णालय शेजारी या ठिकाणी विकास आराखडयाच्या साईट क्र. १९१ या आरक्षणानुसार बांधलेला आहे. हा टाऊन हॉल बीओटी तत्वावर देण्यासाठी निविदा काढुन उल्हासनगर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र. ११४, दिनांक २५/१०/२००० व महासभा ठराव क्र. ९, दिनांक २०/७/२००० नुसार श्री. कुमार पी चैनानी अभिकर्ता यांच्या दिनांक १९/८/२००२ रोजी_सदर टाउन हॉल चालविणे करीता करारही केलेला आहे. सदर करारातील अटी व शर्ती यांचे काटेकोरपणे पालन करुन श्री. कुमार पी चैनानी यांनी हा टाउन हॉल चालवायाचा होता. परंतु श्री. कुमार चैनानी यांनी व त्यांच्या सहका—यांनी करारातील अटी व शर्तीचा तसेच टेंडर फॉर्म मधील शर्ती अटींचा भंग केलेला असल्यामुळे महानगरपालिकेकडुन अभिकर्त्यास जा.क्र. उमपा/मालमत्ता/५२२/०५, दिनांक १/१०/२००५ अन्वये नोटीस बजावण्यात आलेली आहे.

सदर नोटिसीस अनुसरुन अभिकर्ता यांनी केलेल्या खुलासाबाबत महानगरपालिका पॅनलवरील ॲड. श्री. अशोक कदम यांचे अभिप्राय विचार मागणी केले होते. ॲड. श्री. अशोक कदम यांनी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे अभिप्राय सादर केलेले आहेत.

If Mr. Kumar P. Chainani claims to have formed company on the name and style of M/s Kumar infrastructures Pvt.Ltd. and or Kumar auditorium Pvt.Ltd., in that case he failed to submit memorandum of articles of the company which is fatal for any type of agreement to be entered between the parties.

As regared to fixation of name of “Shaheed Arun Kumar Caidya Sabhagruh” (Town Hall). In this respect Mr. Kumar P. Chainani tacitly admitted that name of “M/s Kumar Auditorium PVt. Ltd., As well as “Shaheed Arun Kumar Vaidya Sbhagruh”(Town Hall) has been displayd.

As regard to insurance policy bears no. 23200/11/11/05/3100002459 dt. 4/10/2005 issued on the joint name of Ulhasnagar Municipal Corporation and “M/s Kumar Auditorium PVt. Ltd., Therefore there is contradiction in the version of Mr. Kumar P. Chainani and his legal advisers reply. That “M/s Kumar Auditorium PVt. Ltd., is not yet registered company and as such putting the name of such unregistered company in the policy is fatal for any proceeding. Before completion of all works of Town Hall. Mr. Chainani was bound to give Bank guarantee of Rs. 25 lacs. Whereas previous Bank guarantee was of Rs. 15 lacs exprired on 20/11/2003 and till 31/7/2005 for about 20 monts without bank guarantee carried out work means working capital has been utilized by Mr. Chainani, wich has greatly prejudiced to the Corporation.

That Mr. Kumar P. Chainani has failed to submit memorandum of Articles of anu Pvt. Ltd. company which he is desirous of registering. Therefore correspondence on the name of any company will have no nexus to the agreement between the parties.

As regard to estimated expenses were amounting to Rs. 2,02,85,000/-Whereas Mr. Kumar P. Chainani has submitted letter on the name of “M/s Kumar Auditorium PVt. Ltd., showing the expenses amounting to Rs. 1,49,19,026/- this means there is reduction in expenses amounting to Rs. 53,65,674/- and for this Mr. Kumar P. Chainani has not property explained.

That the contention raised in legar reply dt. 8/8/2006 regarding emtioning date wise expenses i.e. 17/11/2005, 3/1/2006 and 30/1/2006 is nothing but after thought and vague contention. Whereas Mr. Kumar P.Chainani alleged to be directior of “M/s Kumar Auditorium PVt. Ltd., vide his letter dt. 17/8/2005 for completion of work on 31/7/2005 has shown expenses amounting to Rs. 1,49,19,026/-

The above said facts makes it crystal clear that there is violation of condition laid down in the agreement dt. 19/8/2002 by Mr. Kumar P. Chainani.

तरी उक्त बाब विचारात घेता सदर प्रकरणी पुढील कार्यवाहीसाठी स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १८२ दिनांकः— १९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुरेश जाधव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका निहीत जनरल अरुणकुमार वैद्य टाऊन हॉल उल्हासनगर—३ चे अभिकर्ता मे कुमार इन्फ्राक्ट्रचर प्रा.लि. यांच्याशी केलेला करार कायम राखुन प्रशासनास वस्तुनिष्ठ कागदपत्रांसह फेर अहवाल सादर करण्यास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २७ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. २७ :— प्र.क्र. ६७, महाराजा टॉवर मागे, ब्लॉक ५२ च्या बाजुला, उल्हासनगर—५ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे.

---

सदस्या श्रीमती सुजाता रिजवानी:—माझ्या प्रभागात सुध्दा वापरात नसलेले जुने सार्वजनिक शौचालय आहे ते सुध्दा त्याबाबत आयुक्तांना पत्र दयावे लागते. तसे पत्र दिले आहे.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

विषय क्र. २७ :— प्र.क्र. ६७, महाराजा टॉवर मागे, ब्लॉक ५२ च्या बाजुला, उल्हासनगर—५ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे विनियोगास मान्यता देणे.

प्रस्तावना

श्री. भारत आर. राजवानी (गंगोत्री), नगरसेवक, उमपा यांनी वार्ड क्र. ६७ महाराजा टॉवर मागे ब्लॉक ५२च्या बाजुला उल्हासनगर–५ येथिल वापरात नसलेले शौचालय निष्कासन करणे बाबत विनंती केलेली आहे.

सदर शौचालयाबाबतचा स्वच्छता निरिक्षक श्री. मनिष हिवरे/मुख्य स्वच्छता निरिक्षक यांचेकडुन प्राप्त झालेला असून त्यामध्ये सदरचे शौचालय मोडकळीस आलेले असुन तेथिल रहिवाश्यांचे घरात शौचालय असल्यामुळे सदर शौचालय कोणीही वापरात नाही. त्यामुळे सदरील शौचालय निष्कासन करुन त्याजागी आरोग्य विभागाचे सामान ठेवणेकरीता गोदाम बनविणेबाबत नमुद केलेले आहे.

उक्त बाबी विचारात घेता वार्ड क्र. ६७ महाराजा टॉवर मागे, ब्लॉक ५२ च्या बाजुला उल्हासनगर–५ येथिल शौचालय निष्कासन करुन त्या ठिकाणी महानगरपालिकेचे साहित्य ठेवण्यासाठी आरोग्य विभागाकरीता गोडाउन बनविणेबाबत मंजुरी मिळणेसाठी मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १८३ दिनांकः– १९/३/२००८

सुचकाचे नाव :– श्री. सुरेश जाधव

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती निलम रावत

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्र.क्र. ६७, महाराजा टॉवर मागे, ब्लॉक ५२ च्या बाजुला, उल्हासनगर–५ येथिल जुन्या व वापरात नसलेल्या शौचालयांचे निष्कासनास व जागेवरील परिस्थिती पहाता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करणेस मान्यता देत आहे.

परंतु–

सदरची शौचालये तो पर्यंत निष्कासित करु नयेत जोपर्यंत त्याठिकाणी विकास कामे सुरु होत नाहीत.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. २८ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. २८ :– श्री. प्रभाकर नेमचंद महाजन यांची दिनांक ६/११/२००६ ते ५/५/२००७ या कालावधी पर्यंत समन्वय अधिकारी तथा नगररचनाकार प्रभाग तंज्ञ समिती उल्हासनगर म्हणुन रुपये १६,४४५/– दरमहा या मानधना वर केलेल्या नियुक्ती पोटी त्यांचे मानधन महापालिका कोषागारातुन अदा करणेस मान्यता देणे.

---

सदस्य श्री. दिलीप गायकवाडः–हा प्रस्ताव महाजन यांच्याबाबतीतील आहे ना?

श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–उल्हासनगर शहरातील अनाधिकृत विकास कामे नियमित करण्याकामी १४/१/२००६ रोजी महाराष्ट्र शासनाने अध्यादेश जारी केला आहे. त्या अध्यादेशात जिल्हाधिकारी ठाणे यांची या कामी पदनिर्देशीत अधिकारी या स्थानी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी उल्हासनगर शहरातील अनाधिकृत विकास कामे नियमाधीन करण्यासाठी महाजन यांची नगररचनाकार / तज्ञ समिती म्हणुन सहा महिन्याच्या कालावधीसाठी नियुक्ती केली होती. अनाधिकृत बांधकामे नियमाधिन करतांना दंड रुपाने जो निधी जमा होणार आहे त्या निधितुन त्यांना मानधन दयायचे आहे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—त्या लोकांनी ७०५ प्लॉट बाबतीत बेकायदेशीर कामे केली आहेत त्याबद्दल तुम्ही जिल्हाधिका—यांना पत्र पाठविले आहे काय?

श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—शासनाकडे अहवाल सादर केलेला आहे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—जिल्हाधिका—यांना पत्र दिले काय? शासनाकडे अहवाल सादर केला आहे म्हणता शासनाच्या कोणत्या विभागाकडे तो अहवाल सादर केला आहे?

श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—नगरविकास विभागाकडे. त्यांना मानधन अदा करण्यात आलेले आहे.

म्हापालिका सचिव :—अदा करण्यात आलेल्या मानधनाची प्रतिपुर्ती करुन घ्यायची आहे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—त्यांनी केलेल्या बेकायदेशीर कामाबाबत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

महापालिका सचिव :—हा विषय पारीत केला तर त्यांना अदा करण्यात आलेल्या मानधना पोटीची रक्कम आपणांस प्रतिपुर्ती रुपाने मिळु शकेल.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २८ :—** श्री. प्रभाकर नेमचंद महाजन यांची दिनांक ६/११/२००६ ते ५/५/२००७ या कालावधी पर्यंत समन्वय अधिकारी तथा नगररचनाकार प्रभाग तज्ञ समिती उल्हासनगर म्हणुन रुपये १६,४४५/— दरमहा या मानधना वर केलेल्या नियुक्ती पोटी त्यांचे मानधन महापालिका कोषागारातुन अदा करणेस मान्यता देणे.

प्रस्तावना

मा. कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२ यांचे पत्र क्र. टिपीबी—१२०७/२७०२/प्र.क्र.३२७/०५ नवि—१२ दि. ०८ मार्च, २००७ या पत्राद्वारे शासनाचे सेवानिवृत्त उपसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांचा दि. ०६.११.०६ पासून समन्वय अधिकारी तथा नगररचनाकार, प्रभाग तज्ञ समिती, उल्हासनगर म्हणुन नियुक्ती आदेश करून निर्गमित करणेबाबत कळविण्यात आले आहेत. तसेच त्यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय सीबीई/१९९३/प्र.क्र.३०/९३/१३ मंत्रालय, मुंबई दि. १५.०२.१९९५ मधील परिच्छेद ३ नुसार त्यांना मिळणाऱ्या सेवानिवृत्तीच्या अखेरच्या दिवशी मिळणारे वेतन वजा सेवानिवृत्ती वेतन इतके वेतन अनुज्ञेय असुन त्याप्रमाणे त्यांचे मानधन निश्चित करुन दि. ०६.११.०६ पासुन नियुक्ती करून आदेश निर्गमित करणेबाबत उक्त शासन पत्रात नमुद केलेले आहे.

उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकास कामे नियमित करणेकामी अध्यादेश क्र. १/२००६ दि. १४.०१.०६ रोजी महाराष्ट्र शासनाने जारी केला आहे. त्या अध्यादेशान्वये मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांची पदनिर्देशित अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे. मा. पदनिर्देशित अधिकारी तथा जिल्हाधिकारी, ठाणे यांनी उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणेसाठी उक्त अधिनियमाचे कलम ४(ख) (एक) अन्वये श्री. प्र.ने.महाजन यांची नगररचनाकार, तज्ञ समिती म्हणुन त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या आदेशान्वये सहा महिन्यांच्या कालावधीसाठी नियुक्ती केली आहे.

| अ. क्र. | तज्ञ समिती सदस्याचे नांव | पदनिर्देशित केलेले पद | आदेश क्र. व दिनांक |
|---|---|---|---|
| १. | श्री. प्रभाकर नेमचंद महाजन | नगररचनाकार | जा.क्र.उमपा/साप्रवि/मुली/आस्था/०२/०७ दि. ०३.०१.०७ |

मा. पदनिर्देशित अधिकारी तथा जिल्हाधिकारी, ठाणे यांनी श्री. प्र. ने. महाजन यांची नियुक्ती दि. ०३.०१.०७ पासुन केली आहे. तथापि उक्त शासनाचे दि. ०८.०३.०७ च्या पत्रान्वये त्यांची समन्वय अधिकारी तथा नगररचनाकार, प्रभाग तज्ञ समिती, उल्हासनगर म्हणुन नियुक्ती करून आदेश निर्गमित करण्याचे नमुद केले आहे. त्यानुसार श्री. महाजन यांचा सुधारीत नियुक्ती आदेश दि. ०६.११.०६ पासुन निर्गमित करण्यात येत आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय सीबीई/१९९३/प्र.क्र. ३०/९३/१३ मंत्रालय, मुंबई दि. १५.०२.१९९५ मधील परिच्छेद क्र.३ नुसार श्री. प्र.ने.महाजन यांना अंतिम वेतन प्रमाणपत्रानुसार देय असलेले मानधन/पारिश्रमीक पुढिलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | सदर कर्मचारी यांना सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेले मुळ वेतन<br>(दि. ३१.०५.२००० रोजी) | रु. १३,८७५/— |
| २. | देय असलेला महागाई भत्ता | रु. ५,२७२/— |
| ३. | देय असलेला घरभाडे भत्ता | रु. ४,१६२/— |
| ४. | देय असलेला स्थानिक पुरक भत्ता | रु. ३००/— |
| | एकुण | रु. २३,६०९/— दरमहा |
| | निवृत्ती वेतन | रु. ७,१६४/— |
| | एकुण देय वेतन/मानधन | रु. १६,४४५/— दरमहा |

मा. पदनिर्देशित अधिकारी तथा जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील दि. ०३.०१.०७ च्या कार्यालयीन आदेशातील अटी व शर्तीनुसार श्री. महाजन यांचे मानधन महापालिका कोषागारातुन अदा करुन अदा केलेल्या मानधनाची रक्कम अनधिकृत बांधकामे नियमाधीन करण्यापोटी वसुल होणाऱ्या दंडाच्या रकमेतुन महापालिका कोषागारात जमा करण्यात येईल.

वर नमुद केल्याप्रमाणे निश्चित केलेले मानधन रु.१६,४४५/— दरमहा अदा करणेस वित्तीय मान्यतेसाठी व त्यांच्या सहा महिन्याच्या दि. ०६.११.२००६ ते दि. ०५.०५.२००७ या कालावधीस मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव महानगरपालिका प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५३ चे पोटकलम (१) अन्वये स्थायी समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १८४ दिनांकः— १९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे श्री. प्रभाकर नेमचंद महाजन यांची दिनांक ६/११/२००६ ते ५/५/२००७ या कालावधी पर्यंत समन्वय अधिकारी तथा नगररचनाकार प्रभाग तंज्ञ समिती उल्हासनगर म्हणुन रुपये १६,४४५/— दरमहा या मानधना वर केलेल्या नियुक्ती पोटी त्यांचे मानधन महापालिका कोषागारातुन अदा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २९ वाचुन दाखवितात

---

➩ **विषय क्र. २९ :–** नवल वेलफेअर फाउंडेशन कल्याण या संस्थेस मयुर हॉटेल समोर उल्हासनगर–३ याठिकाणची जुनी मुतारी तोडुन पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेकरीता परवानगी देणे.

---

**महापालिका सचिव :–**विषय क्र. २९ आणि ३० हे दुस–यांदा सभा सूचनेवर आलेले आहे. त्यामुळे ते आजच्या सभेच्या कामकाजातुन वगळण्यात यावेत.

**काही सदस्य :–**ठिक आहे. पास–पास......

**सभापती, श्री. राम पारवानी :–**विषय क्र. २९ आजच्या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यांकामी सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

✂ **विषय क्र. २९ :–** नवल वेलफेअर फाउंडेशन कल्याण या संस्थेस मयुर हॉटेल समोर उल्हासनगर–३ याठिकाणची जुनी मुतारी तोडुन पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेकरीता परवानगी देणे.

**प्रस्तावना**

अध्यक्ष, नवल वेलफेअर फाउंडेशन कल्याण यांनी दिनांक ५/१२/००६ च्या अन्वये संस्थेस पैसे दया व वापरा तत्वांवर शौचालय बांधण्याकरीता टिलसन मार्केट जवळ, उल्हासनगर–३ मंजुर झालेल्या जागेऐवजी मयुर हॉटेल, नवजीवन बॅकेच्या समोर, उल्हासनगर–३ या ठिकाणी परवानगी मागणी केलेली आहे.

महानगरपालिका महासभा ठराव क्र. १९, दिनांक १९/५/२००४ अन्वये संस्थेस टिलसन मार्केट जवळ या ठिकाणी पैसे दया व वापरा तत्वावर शौचालय बांधण्याकरीता मंजुरी देण्यात आलेली होती. परंतु सदर ठिकाणी शौचालय बांधणेस जागा उपलब्ध नसल्यामुळे संस्थेने मयुर हॉटेल, नवजीवन बॅकेच्या समोर,उल्हासनगर–३ या ठिकाणी जुनी मुतारी तोडुन पैसे दया व वापरा तत्वावर शौचालय बांधण्याकरीता स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. तसेच सदर ठिकाणी नागरीक व व्यापा–यांना शौचालय नसल्यामुळे त्रास होत आहे.

तरी अध्यक्ष, नवल वेलफेअर फाउंडेशन कल्याण यांना मयुर हॉटल, नवजीवन बॅकेच्या समोर उल्व्हसनगर–३ या ठिकाणी जुनी मुतारी तोडून पैसे दया व वापरा तत्वावर शौचालय बांधण्याकरीता प्रस्ताव मंजुरी मिळणेसाठी स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १८४ अ    **दिनांक:–** १९/३/२००८

सुचकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :– श्री. विजय सुपाळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार नवल वेलफेअर फाउंडेशन कल्याण या संस्थेस मयुर हॉटेल समोर उल्हासनगर–३ याठिकाणची जुनी मुतारी तोडुन पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बांधणेकरीता प्रस्ताव वगळण्यास मान्यता देत आहे.

कारण–

यापुर्वी प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ३० वाचुन दाखवितात

---

➪ **विषय क्र. ३०:–** मेहतर समाज बेरोजगार उत्थान सेवा संस्था यांना १) अमरलाल चौक, आरती ट्रेडर्सच्या जवळ, झुलेलाल बाजार, उल्हासनगर–५, २) डालडा प्रेस बाजार,उल्हासनगर–३ याठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर सुलभ शौचालय बांधणेकरीता परवानगी देणे.

---

**सभापती, श्री. राम पारवानी :–** विषय क्र. ३० आजच्या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यांकामी सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

✂ **विषय क्र. ३० :–** मेहतर समाज बेरोजगार उत्थान सेवा संस्था यांना १) अमरलाल चौक, आरती ट्रेडर्सच्या जवळ, झुलेलाल बाजार, उल्हासनगर–५, २) डालडा प्रेस बाजार, उल्हासनगर–३ याठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर सुलभ शौचालय बांधणेकरीता परवानगी देणे.

प्रस्तावना

श्री. विनोद करोतिया, अध्यक्ष, मेहतर समाज बेरोजगार उत्थान सेवा संस्था यांनी दिनांक १५/१०/२००६ च्या पत्रान्वये खालील ठिकाणी पैसे दया व वापरा तत्वावर सूलभ शौचालय बांधण्याकरीता परवानगी मागणी केलेली आहे.

१) अमरलाल चौक, आरती ट्रेडर्सच्या जवळ, झुलेलाल बाजार, उल्हासनगर–५.

२) डालडा प्रेस बाजार, उल्हासनगर–३

संस्थेमार्फत सुचविण्यात आलेल्या वरील जागेंवर महानगरपालिका महासभा ठराव क्र. ७९, दि. १९/०९/२००३ अन्वये यापुर्वी शांतीसेवा संस्था, मुंबई तसेच महासभा ठराव क्र. १९, दिनांक १९/०५/२००४ अन्वये आश्रय कृषीसेवा प्रतिष्ठान यांना मंजुरी देण्यात आलेली होती. परंतु या संस्थांनी विहीत मुदतीत करारनामा केला नसुन, कामासही प्रारंभ न केल्यामुळे मेहतर समाज बेरोजगार उत्थान सेवा संस्था यांना प्रस्तुत ठिकाणी पैसे दया व वापरा तत्वावर सूलभ शौचालय बांधण्याकरीता मान्यता देणेबाबत प्रस्ताव मंजुरी मिळणेसाठी स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. १८४ ब** दिनांक:– १९/३/२००८

सुचकाचे नाव :– श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मेहतर समाज बेरोजगार उत्थान सेवा संस्था यांना १) अमरलाल चौक, आरती ट्रेडर्सच्या जवळ, झुलेलाल बाजार, उल्हासनगर–५, २) डालडा प्रेस बाजार, उल्हासनगर–३ याठिकाणी पैसे दया व वापरा या तत्वावर सुलभ शौचालय बांधणेकरीता परवानगी देणे कामीचा प्रस्ताव वगळण्यास मान्यता देत आहे.

**कारण––**

अ.क्र. २ वर उल्लेख केलेल्या ठिकाणी पैसे दया व वापरा तत्वावर सुलभ शौचालय बाधण्याकामी यापुर्वीच परवानगी देण्यात आलेली आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ३१ वाचुन दाखवितात

---

➡ **विषय क्र. ३१** :— मेसर्स ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलींग प्रायव्हेट लिमिटेड यांचे कामकाजाबाबत समितीचा अहवाल विचारात घेणे.

---

**सदस्य श्री. सुरेश जाधव :—**स्थायी समिती सभापतींनी स्थायी समिती सभागृहातुन निवृत्त होता होता ॲन्थोनीचा विषय सभासूचनेवर आणला त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. ॲन्थोनीच्या कामकाजातील कमतरतातील चौकशी करण्यासाठी नेमलेल्या अधिका—याच्या चौकशी समितीने जो अहवाल सादर केला आहे त्या अधिका—यांचाही आपण मान ठेवला आहात. हा अहवाल उशिरा का होईना स्थायी समितीपुढे ठेवला त्याबद्दल आपणांस धन्यवाद देतो. ॲन्थोनी ठेकेदारावर कारवाई झाली पाहिजे. त्याचबरोबर हा विषय महासभेपुढे आणला जावा. ॲन्थोनीकडुन दंडाची रक्कम वसुल केली पाहिजे. अहवालात शिफारस केल्याप्रमाणे कारवाई करुन त्यांचा ठेका रद्द केला जावा.

**सदस्य श्री. नरेंद्र दवणे:—**ॲन्थोनीचा ठेका रद्द केला पाहिजे. ॲन्थोनीचा ठेका रद्द केला जावु शकतो काय?

**महापालिका सचिव:—**त्यांचा ठेका थेट रद्द केला जावु शकत नाही. परंतु त्यांना जी जादा रक्कम देण्यात आली आहे ती वसुल केली जावी.

**सदस्य श्री. सुरेश जाधव:—**जास्त पैसे दिले आहे तर त्यास जबाबदार कोण आहे?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. राम पारवानी :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३१** :— मेसर्स ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलींग प्रायव्हेट लिमिटेड यांचे कामकाजाबाबत समितीचा अहवाल विचारात घेणे.

**प्रस्तावना**

कोणत्याही उल्हासनगरवासीयाला उल्हासनगर शहरातील सोलीड वेस्ट मॅनेजमेंट बद्दल विचारल्यास तो काहीतरी कमी शब्दात खुशमतीत सांगेल आणि वरुन पहायला गेलात तर उल्हासनगर ही एक अस्वच्छ शहर आहे अशी प्रतीमा निर्माण झाली आहे. परंतु ही प्रतीमा फार पूर्वी होती दुर्देवाने अदयाप सुध्दा लोकांच्या समोर तशीच आहे.

महानगरपालिका ही जी लोकांच्या मनात संकल्पना आहे ती बदलण्याच्या विचारात आहे. आणि शहराची ही अस्वच्छ प्रतीमेची संकल्पना रुजलेली आहे ती घालविण्यासाठी दिनांक १ ऑक्टोंबर २००३ पासून मेसर्स ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलिंग कंपनी शहर स्वच्छतेसाठी त्यांच्या गळयात माळ घातली आहे. महानगरपालिका शहर स्वच्छ ठेवण्यासाठी मेसर्स ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलिंग सेल्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीस दर रोज जवळ जवळ १.३१ लाख रुपये देते. उल्हासनगर शहरातील म्युनिसिपल सोलिड वेस्टच्या देखभालीकरीता खाजगी कंपनीला एवढी मोठी रक्कम मोजीत आहे. सोलिड वेस्ट मॅनेजमेंट हा एक पूर्ण कार्यक्रम असून त्यांच्या मुख्य भर हा शिकण्यावर दिला आहे जसे मनाचा उपयोग करुन घेणे, ज्ञान, संशोधन, प्लान तयार करणे, प्लानची अंमलबजावणी करणे त्याचप्रमाणे प्रकल्पाचे काम यावर भर दिलेला आहे. सदरहू कार्यक्रम हा सोलिड वेस्ट हॅण्डलिंग विज्ञानाद्वारे कश्याप्रकारे हाताळावा याचे शिक्षण दिले जाते. सदरहू खाजगी ठेकेदाराने प्रकल्पाचा व्हिजन अंमलबजावणीकरीता खालील मुद्दयाच्या आधारे तयार केला आहे :—

१. ओळखण्यात आलेल्या जागांची संख्या
२. जागेचे स्थान
३. जागेचा नकाशा
४. वेस्टचे स्वरुप आणि घटक
५. कामाखाली असलेल्या सदयाच्या जागेचा तपशिल
६. जागा निवड करण्याची योग्य पध्दत
७. कोणत्या प्रकारचे वेस्ट तयार होते ते
८. कामगारांच्या सुरक्षितेसंबंधीचे उपाय
९. बंदी आणि वातावरण दूषित होवू नये म्हणून घालण्यात आलेले निर्बंध व उपाय

सदरहू खाजगी ठेकेदाराचे काम असे होते की त्यांनी म्युनिसिपल सोलिड वेस्टमध्ये विष्ठा टाकण्यास बंदी केली होती आणि त्याची परिपूर्तता व्हावी यासाठी कंपनीने खालील प्रमाणे पावले उचलली होती:—

१. प्रत्येक घरातून कंट्रोलब्रिनमधुन म्युनिसिपल सोलिड वेस्ट जमा करण्याच्या पध्दतीने नियमितपणे एकत्र करणे तसेच अगोदरच त्याबाबतीतवेळ कळविणे आणि गाडी घंटेची वेळ ठरवून देवून तीचा वापर करणे.

२. झोपडपट्टी एरियातून वेस्ट गोळा करणे किंवा होटेलस्, रेस्टॉरंट, कार्यालये, घरसंकुले आणि कमर्शियल एरियामधून वेस्ट गोळा करणे.
३. कंटेनर कार्टस किंवा इतर लहान वहानाद्वारे रहिवास व इतर एरियातून घाण जमा करणे वा त्या कार्टमध्ये हस्तांतर करणे.
४. बागकाम, बांधकाम वा वेस्टचे डिमोलिशन करणे वा ठेवलेल्या घाणीचा साठा जमा करणे. त्याचप्रकारे अश्या प्रमाणे जमा होणा–या वेस्टचे नियंत्रण करता येईल. ठेकेदाराने वेस्ट जमा करण्याचे परिशिष्ट तयार केले आहे आणि शहरात सर्वसाधारण जनतेसाठी या पध्दतीचा अवलंबन केला आहे.
५. ठेकेदाराने सर्वसाधारण जनतेला उत्सफुर्तता मिळावी वेस्ट कसा वेगळा करावा यासाठी जाणीव कार्यक्रम आखला आहे आणि वेळोवेळी प्रमाणात वेस्ट कश्या प्रकारे वेगळा केला जाईल व त्यामध्ये लोक कसे भाग घेतील यासाठी आखला आहे. यासाठी ठेकेदाराने नियमितपणे ठराविक वेळेच्या अंतराने सभा ठेवणे आवश्यक आहे.
६. वेळोवेळी कामगारांच्या शारिरिक परिस्थितीची तपासणी करण्याकरीता नियमितपणे चेक अप वा वैद्यकीय तपासणी ठेवणे आवश्यक आहे.
७. जेथे अधिक कचरा आहे असे ओळखण्यात येणा–या जागेत ठेवलेल्या सोलिड वेस्टवर किटकनाशक फवा–याची फवारणी करावी.
८. जमा केलेल्या ठिकाणाहून सोलिड वेस्ट नेण्यासाठी किंवा इतर ठिकाणाहून नेण्याची जागा ही कामगारांचा संपर्क येईल अश्या ठिकाणी नसावे.
९. तीची वाहतूक खालील मार्फत करण्यात यावी ती अशी :–
   १. ट्रक ट्रिपर
   २. कचरा जमा करणारे
   ३. डंपर प्लेसर
   ४. स्किप लोडर
   ५. बुलडोझर
   ६. कॉम्पॅक्टर्स इत्यादी

---

# नि ष्क र्ष

कमिटीने कचरा जमा करण्याच्या विविध ठिकाणी भेटी दिल्यानंतर आणि ठेकेदाराची काम करण्याची पध्दतीचे निरिक्षण व तपासणी केल्यानंतर असे निष्कर्स काढला आहे की ठेकेदार हा उल्हासनगर शहरातील संपूर्ण १०० टक्के सोलिड वेस्ट हाताळण्यास असमर्थ ठरला आहे. सध्याचा जो ठेकेदार आहे त्याच्याकडे पुरेशी साधनसामुग्री दर दिवशी जमा होणारा कचरा वाहून नेण्याची क्षमता तसेच ठरलेल्या जागेहून जेथे कचरा जमा करण्यात येतो तेथे कचरा नेण्यासाठी वा जमा करण्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग आहे.

तथापि हया ठेकेदाराने कोअर–स्कील विकसीत केलेले नाही. त्याने हा प्रश्न सोडविण्यासाठी व त्याचे संशोधन करण्यासाठी व्यवहारी असणे जरुरी आहे. सोलिड वेस्ट मॅनेजमेंटची अंमलबजावणी करणे हे सर्वात पात्रता निर्माण करण्याचे अव्हान आहे. उल्हासनगर म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या सर्व परिक्षेत्रातून कचरा गोळा करणे, तो वाहनाने वाहून नेणे आणि हा सोलिड वेस्ट म्हणजे घण कचरा डंपिंग ग्राउंडवर एकत्र जमा करणे आणि अश्या प्रकारच्या मुख्य कामाच्या कोणत्या कृती करण्याच्या आवश्यकता आहे त्या सर्व निविदामाध्ये स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत.

कमिटीने अनेक वेळेला ठेकेदारीचे काम कोणत्या प्रकारे चालते आणि त्यामध्ये ठेकेदाराच्या कोणत्या व कश्या प्रकारच्या चूका आहेत हे दर्शविण्यासाठी अनेक ठिकाणचे छायाचित्रे काढली आहेत व ठेकेदाराला दाखविण्यात आली आहेत. कमिटीने काढलेल्या हया छायाचित्रांतून असे दिसते की हया प्रकारात अनेक अनेक सुधारणा करण्याची आवश्यकता आहे त्या खालीलप्रमाणे :–

१. या ठेकेदारीची परिपूर्णता करण्यासाठी नियंत्रण उपाय व चिकित्सा प्रणाली अयोग्य आहे. ठेकेदाराच्या कामाची निगाराणी करण्याचे काम हे मर्यादित स्वरुपाचे असून हया ठेकेदारीचे काम व्यवस्थित चालण्यासाठी योग्य देखरेख करण्याची आवश्यकता आहे.
२. विज्ञान पध्दतीने सोलिड वेस्ट मॅनेजमेंटचा उद्देश हा कोठेतरी नष्ट झालेला दिसतो कारण ठेकेदार हा कचरा हाताने जमा करण्याची पध्दत अवलंबित आहे. मॅन्युअल हॅण्डलिंग ही निषेध गोष्ट आहे. अनेक फोटोग्राफी वरुन हे सिध्द होते की अनेक ठिकाणी कचरा जमा करणारे कामगार हे त्यांचे ड्रेस घातलेलेच नाहीत आणि ते शरीराला पुरेसे नाहीत. अश्या अपूर्ण कपडयांमुळे सदरच्या कर्मचा–याला रोग हल्ला करु शकतो.
३. कामगारांच्या शारीरीक तब्बेतीची सुरक्षा व्हावी यासाठी कोणतेही उपाय करण्यात आलेले नाहीत.

४. सोलिड वेस्ट–घण कचरा विशिष्ट ठिकाणाहून जमा करण्यासाठी आवश्यक असलेले वेळेचे बंधन दर्शविणारा नकाशा दिसण्यात येत नाही.
५. नागरीक आणि नगरसेवक यांनी केलेल्या तक्रारीला वेळेत कोणतेही प्रतिसाद मिळत नसल्याचे दिसते. त्याचप्रमाणे नागरीक व कॉर्पोरेशनने केलेल्या तक्रारीचे व्यवस्थीत निपटा केला की नाही हे चेक करण्यासाठी अदयाप तशी व्यवस्था वेळेत तयार झालेली नाही.
६. ठेकेदाराकडे केवळ सर्व निगाराणी करण्यासाठी दोनच निरिक्षक आहेत व ते पुरेशे नाही. ठेकेदाराकडे योग्यरित्या तक्रारींचा निपटा करण्यासाठी परिणामकारक संशोधन व चिकित्सा करण्याची सिस्टिम नाही.
७. कामगार कायदयाचे पालन करत नसल्याचे कमिटीने निष्कर्स काढला आहे.
८. ठेकेदाराच्या इस्टॅब्लिशमेंट लिस्टवर नियमित कामगारांपेक्षा ठेकेदाराकडे अधिक व जास्तीत जास्त खाडाबदली कामगार आहेत.
९. समर्थता वाढविण्यासाठी कामगारांना कोणतेही प्रशिक्षण देतांना आढळलेले नाही.
१०. मॉनिटर करण्याची पध्दतही पूर्णता जरुरी व आवश्यक आहे.
११. कामाच्या कोणत्याही ठिकाणी कोणत्याही कामगाराला गणवेश दिलेला नाही वा त्यांनी घातलेला नाही.
१२. सोलिड वेस्ट कश्या प्रकारे वेगळा करावयाचा यासंबंधी कोणतेही डेमो नियमितपणे प्रशिक्षण देण्यास ठेकेदार असमर्थ ठरलेला आहे.
१३. उल्हासनगर शहरात सोलिड वेस्ट वेगळा केव्हाच करण्यात येत नाही असे आढळले आहे.
१४. ठराविक ठिकाणाहून सोलिड वेस्ट जमा केल्यानंतर त्याच्यावर कोणत्याही प्रकारची फवारणी केली जात नाही की जे ठेकेदाराच्या अटीचे पूर्णता उल्लंघण आहे व त्यामुळे रोगराई पसरण्याची भिती उत्पन्न झाली आहे.
१५. यावर उपाय म्हणून प्रभागाप्रमाणे निरिक्षक नेमलेला नाही की ज्यामुळे केलेल्या उपायांवर मॉनिटर होईल आणि हाताळण्याच्या पध्दतीने विश्लेषण करता येईल.
१६. ठेकेदारातील अटी प्रमाणे सोप्या पध्दतीने संपर्क करता येईल त्यासाठी वायरलेस पध्दत अवलंबिलेली नाही. म्युनिसिपल अधिका–यांनी अहवालाची पाहणी केल्यावर अनेक चूका आढळतात व त्या ठेकेदारावर मासिक पध्दतीने दंड आकारण्यात येतो. आता पर्यंत ठेकेदाराकडून जानेवारी, २००७ ते जून, २००७ पर्यंत रुपये ३,६९,८४८/– इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. ठेकेदाराच्या प्रत्येक चालू महिन्याच्या बिलातून काही ठराविक रक्कम चूक झाल्यामुळे दंड आकारणी या नावाखाली रक्कम वजावट केली जाते. विविध महापालिका अधिका–यांनी केलेल्या अहवाल निरिक्षण व तपासणी जी केली आहे ती कॅज्युअल स्वरुपाची आहे.
१७. ठेकेदारीच्या कराराप्रमाणे नियमीतपणे डस्टबिनला रंग काम करणे बंधनकारक असतांना त्याला रंग केले जात नाही आणि ठराविक कालावधीनंतर सदरचा डस्टबिन बदलणे व त्याच्याऐवजी दुसरा देणे आवश्यक असतांना तसे केले जात नाही.
१८. सदरची ठेकेदारी ही १ ऑक्टोंबर, २००३ रोजी देण्यात आली असून आतापर्यंत ४ वर्षे पूर्ण झाली आहेत या कालावधी कोअर–स्कील ठेकेदाराला होणे सर्वसाधारणपणे सोपे आहे. तथापि व्यवहारीपणे ही समस्या सोडविण्यासाठी आणि संशोधनाचा विषय असेल.
१९. घणकचरा कश्या प्रकारे वेगळा करावा याचे प्रात्यक्षिक दाखविण्याकरीता ठेकेदाराने अदयाप कोणताही सॉलिड कार्यक्रम राबविला नाही की ज्यामुळे समाज त्यात भाग घेवू शकेल.
२०. कोणत्याही प्रकारे ठेकेदार हा घराघरातून सॉलिड वेस्ट जमा करण्यास अपयशी ठरलेला आहे. प्रत्येक घरामागे कचरा जमा करणे, किंवा पूर्व कल्पना देवून नियममितपणे ठरलेल्या वेळेत आणि घंटागाडीचा उपयोग करुन कचरा जमा करण्यात येवू शकतो.
२१. ठेकेदार हा झोपडपट्टी व पसरलेल्या कॉलनीमधून तसेच हॉटेल, रेस्टॉरंट, कार्यालये, संकुले आणि कमर्शियल क्षेत्रातून घण कचरा जमा करण्यास अयशस्वी ठरलेला आहे.
२२. हाताने कचरा जमा करण्यावर बंदी आहे. परंतु जर का अशक्य असेल तर मात्र योग्य निगाराणीखाली जरुर ती काळजी घेवून व सुरक्षितेचे उपाय योजून असे हाताने काम करता येवू शकेल.
२३. ज्या ठिकाणी ब्रिन्स वा कंटेनर ठेवलेले आहेत ते भरुन वाहू लागल्याशिवाय ते साफ केले जात नाहीत.

तेव्हा ठेकेदाराच्या वरीलप्रमाणे चुका आणि कामगारांची कर्तव्यात कसूर केलेल्या असल्याने असा निष्कर्स काढण्यात येत आहे की उल्हासनगर शहरात सोलिड वेस्ट मॅनेजमेंट कार्यक्रम हा योग्यरित्या अमलात आणण्यात अपयश आले आहे. शहरात साफ सफाई म्हणून हे शहर पूर्ण अपयशी ठरलेले आहे. शहरात साफसफाई म्हणून हे शहर पूर्ण अपयशी ठरलेले आहे. ठेकेदाराला प्रत्येक महिना १.३१ लाख रुपये सोलिड वेस्ट मॅनेजमेंट योग्यरित्या अंमलात आणण्यासाठी खर्च केलेला पैसा हा पूर्णता धुळीला मिळाला असून त्याच्या कामाने समाधान नाही. पूर्वीचे ठेकेदार मेसर्स व्ही.आर.पनवेलकर यांना प्रति महिना रुपये ६४०००/– इतक्या रक्कमेत दिलेला होता. तरी त्याचे काम काही समाधानकारक होते परंतु महानगरपालिकेने सोलिड वेस्ट मॅनेजमेंटचे काम

शास्त्रीयशुध्द त—हेने व्हावे म्हणून काम दिले परंतु त्याची योग्यरित्या अंमलबजावणी झालेली नाही. सध्याची जी सोलिड वेस्ट मॅनेजमेंट काम हाताळण्याची पध्दत अशी दर्शविते की केवळ गाडीतून वेस्ट वाहून नेण्याची पध्दतीव्यतिरिक्त इतर कोणतीही सुधारणा नाही. केवळ वाहनाने झाकलेल्या पध्दतीने सोलिड वेस्ट शास्त्रीय पध्दतीने हाताळणी करण्याचे हे कामकाजाचे स्वरुप म्युन्सिपार्टीच्या मते समाधानकारक होत नाही. वरील वस्तुस्थिती उघडपणे दर्शविते की सोलिड वेस्ट हे हाताने केवळ केले जाते.

जर का सध्याच्या ठेकेदाराला सोलिड वेस्ट हे हाताने हाताळण्याची परवानगी एका भल्यामोठया दर दिवशीच्या १.३१ लाख रुपयास दिली जाते तर सोलिड वेस्ट मॅनजमेट आणि नियम २००० चे उद्देश मातीमोल ठरते. ठेकेदाराला प्रत्येक महिना जे बिल दिले जाते त्याचे परिक्षण म्युनिसिपल अधिका—यांकडून योग्य व जबाबदारीच्या पध्दतीने हाताळण्यात येत नाही. तर दर्शविण्यात आलेल्या ठेकेदारीच्या चूकांकडे कानाडोळा करुन त्याच्या कामाचे मोजमाप कॅज्युअल पध्दतीने करण्यात येते. अहवालाचे मासिक परिक्षण काही ठराविक चूका काढून करण्यात येते आणि ठेकेदाराला त्याचा मासिक मेहनताना मिळत असतो व ते त्याच्या फायदयाचे ठरते. कमिटीने ज्या चूका दाखविल्या आहेत त्याचा विचार करता ठेकेदाराला जे मासिक बिल अदा केले जाते आणि त्याने जे क्लेम केले असते त्याच्या अर्ध्या रक्कमेवर मासिक बिल दिले जावू शकते. म्हणून ठेकेदाराला दिनांक १ ऑक्टोंबर २००३ ते २७ ऑगस्ट २००७ या कालावधीत जी अधिक रक्कम अदा करण्यात आली आहे तीची वसूली करण्यात यावी.

## शि फा र स

म्हणून ही कमिटी अशी शिफारस करते की ज्या ठेकेराला वरील कालावधीत जी अधिक रक्कम देण्यात आली आहे तसेच ठेकेदारांने आपल्या कामात कसूर केलेली आहे त्याबद्दल ही कमिटी वाद निर्माण करते. त्यामुळे या वादासाठी लवाद नेमण्याची आवश्यकता असून त्या लवादाला नुकसान झालेल्या तपशिल सादर करण्यात यावा. सोलिड वेस्ट हॅण्डलिंग नियम २००० मधील नियमाप्रमाणे जो पर्यंत ठेकेदाराला प्रश्न विचारत नाही वा त्याच्यामध्ये सुधारणा विकास करण्याची क्षमता आणि सोलिड वेस्ट हाताळणी शास्त्रीय पध्दतीचा वापर करण्यासंबंधी उभे ठाकत नाही याची अंमलबजावणी करणे शक्य होणार नाही आणि त्याकरीता दर दिवशी देण्यात येणा—या कॉन्ट्रक्ट किंमत ही अर्धा रक्कमेवर आणावी अशी शिफारस ही कमिटी करीत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १८५ **दिनांक:—** १९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्री. सुरेश जाधव

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

ही स्थायी समिती महासभेच्या अंतीम स्विकृतीस अधिन राहुन उल्हासनगर शहरात कचरा वाहतुकी कामी कार्यरत अभिकर्ता मेसर्स ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलींग प्रायव्हेट लिमिटेड यांचे कामकाजाबाबत चौकशी करण्यासाठी नेमलेल्या ५ अधिका—यांच्या समितीपैकी बहुसंख्य सदस्यांचा अहवाल मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३२ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३२ :—** श्री. डी.आर.पाटील यांच्या अतिक्रमण विभागात विशेष कार्य अधिकारी या पदावरील नेमणुकीस मुदतवाढ देणे.

---

**सदस्य श्री. किशोर जग्यासी:—**श्री. डी.आर. पाटील यांचे वय काय आहे? हे सेवानिवृत्त आहेत. सेवानिवृत्त नंतर महापालिकेने त्यांना नियुक्ती कशी दिली?

**श्री. अशोक बागेश्वर (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—**उल्हासनगर शहरतील अनाधिकृत बांधकाम विषयक मा. उच्च न्यायालयात सध्या केसेस सुरु आहेत. याविषयी मा. उच्च न्यायलयास काही अहवाल सादर करावे लागतात. त्यास अनुसरुन अनाधिकृत कामे, विकास कामासंबंधी विकासक व जमिन मालक व

वास्तुविशारद यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचे काम त्यांच्यावर सोपविलेले आहे. या कामाची निकड लक्षात घेता हा विषय पारित केला जावा.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–**तुम्हांला सहकार्य होत असेल तर आमची काही हरकत नाही.

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्री. राम पारवानी :–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३२ :–** श्री. डी.आर.पाटील यांच्या अतिक्रमण विभागात विशेष कार्य अधिकारी या पदावरील नेमणुकीस मुदतवाढ देणे.

**प्रस्तावना**

श्री. डि.आर.पाटिल, विशेष कार्य अधिकारी यांची जा.क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/टे–३/३५/०७, दिनांक १८/६/२००७ रोजीच्या आदेशान्वये ०६ महिन्यांसाठी नियुक्ती करण्यात आली होती.

उपरोक्त आदेशान्वये श्री. डि.आर.पाटिल यांची महापालिका आस्थापनेवरील विशेष कार्य अधिकारी या पदावरील नियुक्ती दिनांक १८/१२/२००७ रोजी संपृष्टात येत आहे. उल्हासनगर शहरातील अनधिकृत बांधकाम विषयक मा. उच्च न्यायालयात सध्या केस सुरु आहे. याविषयी मा. उच्च न्यायालयाने महापालिकेस काही स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यास अनुसरुन अनधिकृत इमारती संबंधीत विकासक, जमिन मालक व वास्तुविशारद यांचेविरुध्द गुन्हे दाखल करण्याचे काम त्यांचेवर सोपविलेले आहे. सदर कामाची पुर्तता करण्यासाठी श्री. डि.आर.पाटील यांचे सेवेची महापालिकेस आवश्यक असलेली निकड लक्षात घेता त्यांना मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

तरी श्री. डि.आर.पाटील यांना विशेष कार्य अधिकारी या पदावरील नियुक्तीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये ०६ महिन्यांची मुदतवाढ देणेबाबतचा गोषवारा मंजुरीसाठी मा. स्थायी समितीपुढे प्रस्तावित करीत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १८६ **दिनांक:–** १९/३/२००८

सुचकाचे नाव :– श्री. किशोर जग्यासी

अनुमोदकाचे नाव :– श्री. विजय सुपाळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे श्री. डी.आर.पाटील यांच्या अतिक्रमण विभागात विशेष कार्य अधिकारी या पदावरील नेमणुकीस मुदतवाढ देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** प्रशासनाकडुन आयत्या वेळचा एक विषय आलेला आहे. आपणामधील बहुसंख्य सदस्यांची संमती असेल तर तो आजच्या सभेच्या कामकाजात सामावून घेता येईल.

**काही सदस्य :–**सामावुन घ्या.

**सभापती, श्री. राम पारवानी:–** प्रशासनाच्यावतीने आयत्या वेळच्या विषयान्वये मंजुरीस आणलेला विषय आपल्या सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समावून घेण्यात येत आहे.

**महापालिका सचिव :–**विषय क्र. ३३ वाचुन दाखवितात

---

⇨ **आयत्यावेळचा विषय**

**विषय क्र. ३३** :—उल्हासनगर महानगरपालिका आरोग्य विभागाद्वारे महिला व बालकल्याण समिती अंतर्गत दारिद्रय रेषेवरील महिलांना प्रशिक्षण देणे कामी वृंदा बहुउद्‌देशीय सामाजिक शिक्षण संस्था यांच्याशी संविदेस मान्यता देणे

---

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—</u>दारिद्र रेषेवरील महिलांना प्रशिक्षण देण्याचा विषय आहे तर पास करा.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. राम पारवानी :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ <u>आयत्यावेळचा विषय</u>

**विषय क्र. ३३** :—उल्हासनगर महानगरपालिका आरोग्य विभागाद्वारे महिला व बालकल्याण समिती अंतर्गत दारिद्रय रेषेवरील महिलांना प्रशिक्षण देणे कामी वृंदा बहुउद्‌देशीय सामाजिक शिक्षण संस्था यांच्याशी संविदेस मान्यता देणे

<u>प्रस्तावना</u>

सार्वजनिक आरोग्य विभागाद्वारे महिला व बाल कल्याण समिती अंतर्गत दारिद्रय रेषेवरील महिलांना प्रशिक्षण देण्यासाठी शासनाच्या मान्यताप्राप्त संस्थेकडून मोहरबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा सुचना दि. २९/०१/२००८ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द करून दिनांक ३०/२/२००८ ते दिनांक ०५/२/२००८ रोजी पर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या. यामध्ये प्राप्त झालेल्या निविदा उप—आयुक्त (आरोग्य) यांचे दालनात दिनांक ११/२/२००८ रोजी दुपारी ५.०० वाजता उप—आयुक्त (आरोग्य), मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधि यांचे समोर उप—आयुक्त (आरोग्य) यांचे कार्यालयात उघडण्यात आल्या. पात्र निविदाधारकांकडून प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्रशिक्षणाचे नांव | निविदा सादर करणा—याचे निविदाधारकाचे नाव व *त्यांचे प्राप्त दर* | | |
|---|---|---|---|---|
| | | मानव विकास सामाजिक सेवा संस्था, उल्हासनगर (रुपये) | सिध्दान्त समाज विकास संस्था, उल्हासनगर (रुपये) | वृंदा बहुउद्‌देशीय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर (रुपये) |
| १ | मेणबत्ती बनविणे | ५४५ | ४३५ | **३६५** |
| २ | ज्वेलरी बनविणे | ५४५ | ४३५ | **३६५** |
| ३ | अगरबत्ती बनविणे | ५४५ | ४३५ | **३६५** |
| ४ | हस्तकला/भरतकाम/ विणकाम | ५४५ | ४३५ | ३६५ |

वरील प्रमाणे तक्त्यानुसार वृंदा बहुउद्‌देशीय सामाजिक शिक्षण संस्था यांनी सादर केलेले दर कमी आहेत. तरी प्राप्त झालेल्या एकूण प्रशिक्षणार्थ्यांच्या अर्जाच्या संख्यानुसार खालील प्रमाणे अंदाजीत खर्च अपेक्षित आहे.

| अ. क्र. | प्रशिक्षणाचे नांव | प्रति प्रशिक्षणार्थी दर | प्रभाग निहाय प्राप्त झालेले प्रशिक्षणार्थ्यांच्य अर्जाची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्र.स.क्र. १ | प्र.स.क्र.२ | प्र.स.क्र.३ | प्र.स.क्र.४ | एकुण रक्कम रुपये |
| १ | मेणबत्ती बनविणे | ३६५ | ७१ | ४६ | ६९ | १४३ | १,२०,०८५ |
| २ | ज्वेलरी बनविणे | ३६५ | ५४ | ४९ | ६९ | १२४ | १,८०,०४० |
| ३ | अगरबत्ती बनविणे | ३६५ | २८ | ५५ | ६९ | १४६ | १,०८,७७० |
| ४ | हस्तकला/भरतकाम/ विणकाम | ३६५ | ३३ | २३ | ६९ | ७१ | ७१,५४० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण प्रशिणार्थीची संख्या | १८६ | १७३ | २७६ | ४८४ | ४,८०,४३५<br>१११९ |

वरील तक्त्यानुसार सर्व प्रशिक्षणार्थ्यांना द्यावयाच्या प्रशिक्षणाचा अंदाजीत खर्च रुपये ४,८०,४३५/– अपेक्षित आहे. अटी व शर्ती नुसार संबंधीत संस्थेस शासनमान्य किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक असल्याचे नमुद केले आहे. परंतु वृंदा बहुउद्देशीय सामाजिक संस्था क्रमांक महा/१०६०/०६ ठाणे येथे संस्थांचे सहायक निबंधक यांचेकडे नोंदणीकृत आहे. सदर संस्था सहायक धर्मादय आयुक्त ठाणे येथे नोंदणीकृत आहे. तसेच वृंदा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेस महाराष्ट्र व्यवसाय प्रशिक्षण मंडळ यांनी प्राधिकृत केले आहे. त्याच प्रमाणे वृंदा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतेच्या अध्यक्षा सन २००१ ते २००६ या कालावधीत महाराष्ट्र व्यवसाय प्रशिक्षण मंडळ यांच्याकडे प्रशिक्षिका म्हणून कार्यरत असल्याचा दाखला दिलेला आहे. तरी वृंदा बहुउद्देशीय सामाजिक शिक्षण संस्था, उल्हासनगर यांच्याशी संविदा करुन त्यांना कामाचे आदेश देण्याबाबत विचारार्थ सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १८७ दिनांक:– १९/३/२००८

सुचकाचे नाव :– श्री. सुरेश जाधव

अनुमोदकाचे नाव :– श्री. विजय सुपाळे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील दारिद्रय रेषेवरील महिलांना प्रशिक्षण देणे कामी लघुत्तम दराचे निविदाकार वृंदा बहुउद्देशीय सामाजिक शिक्षण संस्था उल्हासनगर यांच्याशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ४.२० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. राम पारवानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:– २९/३/२००८

दि. २९/३/२००८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शनिवार दिनांक २९/३/२००८ रोजी दूपारी २.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री पारवानी राम (चार्ली) फुंदुमल | सभापती |
| २ | श्री लुंड गोविंदराम डोलुमल | सदस्य |
| ३ | श्री इदनानी जीवन (राजु) चंद्रभान | ——‘‘—— |
| ४ | श्री जाधव सुरेश मधुकर | ——‘‘—— |
| ५ | श्री गायकवाड दिलीप दशरथ | ——‘‘—— |
| ६ | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल | ——‘‘—— |
| ७ | श्रीमती रिजवानी सुजाता रमेश | ——‘‘—— |
| ८ | श्रीमती उदासी इंदिरा जमनादास | ——‘‘—— |
| ९ | श्रीमती रावत निलम प्रेमसिंग | ——‘‘—— |
| १० | श्री जग्यासी किशोर | ——‘‘—— |
| ११ | श्री दवणे नरेंद्र (रवीभाऊ) | ——‘‘—— |
| १२ | श्री सुपाळे विजय खंडु | ——‘‘—— |
| १३ | श्रीमती निकम लता शांताराम | ——‘‘—— |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य अनुपस्थित होते
१. श्री ठाकुर नरेंद्र (कुमारी) केवलराम, २. श्री बठिजा संजय रामचंद्र, ३. श्री वानखेडे राजेश देवेंद्र

**श्री. मिलिंद सावंत, उप—आयुक्त (शहर) हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन उपस्थित होते.**

खालील अधिकारी सभेस हजर होते.
४४.श्री. मिलिंद सावंत, उप—आयुक्त(शहर)
४५.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४६.श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
४७.श्री. बी. सुंदरेश्वरन, शहर अभियंता
४८.श्री. सु.कु. नाकाडी (मुख्य लेखा परिक्षक)
४९.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
५०.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.
५१.श्री. एस.टी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव

दुपारी २.३० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—</u> दिनांक १७/१/२००८ रोजीच्या सभेतील विषय क्र. १२ व १३ चे संदर्भात. स्थायी समिती ठराव क्र. १३२ व ठराव क्र. १३३ मधील प्रस्तावनेत नोंदविलेल्या कामांची यादी वगळण्यात यावी व या सुधारणांमुळे सचिवांनी सुधारीत ठराव तयार करावा असे आम्हां सर्वांचे मत आहे. याबाबतीत सविस्तर चर्चा करण्यासाठी ही सभा सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यात यावी.

काही सदस्य :—स्थगित करा.

सभापती, श्री. राम पारवानी :—या सभेचे कामकाज सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— २९/३/२००८

दि. २९/३/२००८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

१६— अ

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शनिवार दिनांक २९/३/२००८ रोजी वाजता दूपारी २.०० वाजता आयोजित करण्यांत आली होती त्यावेळी सदरची सभा स्थगित करून सांयकाळी ४.०० वाजता घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री पारवानी राम (चार्ली) फुंदुमल | सभापती |
| २ | श्री लुंड गोविंदराम डोलुमल | सदस्य |
| ३ | श्री इदनानी जीवन (राजु) चंद्रभान | ——''—— |
| ४ | श्री जाधव सुरेश मधुकर | ——''—— |
| ५ | श्री गायकवाड दिलीप दशरथ | ——''—— |
| ६ | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल | ——''—— |
| ७ | श्रीमती रिजवानी सुजाता रमेश | ——''—— |
| ८ | श्रीमती उदासी इंदिरा जमनादास | ——''—— |
| ९ | श्रीमती रावत निलम प्रेमसिंग | ——''—— |
| १० | श्री जग्यासी किशोर | ——''—— |
| ११ | श्री दवणे नरेंद्र (रवीभाऊ) | ——''—— |
| १२ | श्री वानखेडे राजेश देवेंद्र | ——''—— |
| १३ | श्री सुपाळे विजय खंडु | ——''—— |
| १४ | श्रीमती निकम लता शांताराम | ——''—— |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य अनुपस्थित होते .

१. श्री ठाकुर नरेंद्र (कुमारी) केवलराम, २. श्री बठिजा संजय रामचंद्र,

**श्री. मिलिंद सावंत, उप—आयुक्त (शहर) हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन उपस्थित होते.**

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. मिलिंद सावंत, उप—आयुक्त(शहर)
२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३. श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
४. श्री. सु.कु. नाकाडी (मुख्य लेखा परिक्षक)
५. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
६. श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.
७. श्री. एस.टी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव

सांयकाळी ४.५० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १ :—</u> मागील सभेचे दिनांक १७/१/२००८ व १९/३/२००८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:—</u> सन २००७—०८ च्या सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजात सार्वजनिक बांधकाम विभागातील कामांसाठी २,००,००,०००/—रुपये चे अनुदान फेरबदलास मान्यता देण्यात यावी. तसेच पाणी पुरवठा विभागातील कामांसाठी रुपये १,१७,००,०००/—चे अनुदान फेरबदलास मान्यता देण्यात यावी.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—</u> ठराव १३२ व १३३ च्या प्रस्तावनेत कामांची जी यादी देण्यांत आली आहे ती यादी वगळून उर्वरीत इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास आमची काही हरकत नाही.

<u>महापालिका सचिव :—</u>सार्वजनिक बांधकाम विभागाच्या व पाणी पुरवठा विभागाच्या कामांची यादी वगळून उर्वरीत इतिवृत्त कायम समजायचे काय?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. राम पारवानी :—</u>मागील सभेचे दिनांक १७/१/२००८ सुचविलेल्या सुधारणांसह व १९/३/२००८ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक १७/१/२००८ व १९/३/२००८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नांव : श्री. दिलीप गायकवाड

<u>स्थायी समिती ठराव क्र. :—</u> १८७ अ <u>दिनांक:— २९/३/२००८</u>

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक १७/१/२००८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ६१ पर्यंतच्या इतिवृत्तात खालील सुधारणा करुन व १९/३/२००८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ५४ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करीत आहे.

१) दिनांक १७/१/२००८ रोजीच्या स्थायी समिती ठराव क्र. १३२ मधील प्रस्तावनेत नोंदविलेल्या कामांची यादी वगळण्यास व सन २००७—०८ च्या सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजात या कामी केवळ रुपये १,१७,००,०००/—चे अनुदान फेरबदलास मान्यता देत आहे.

२) दिनांक १७/१/२००८ रोजीच्या स्थायी समिती ठराव क्र. १३३ मधील प्रस्तावनेत नोंदविलेल्या कामांची यादी वगळण्यास व सन २००७—०८ च्या सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजात या कामी केवळ रुपये २,००,००,०००/—चे अनुदान फेरबदलास मान्यता देत आहे.

३) वरील सुधारणांमुळे महापालिका सचिवांना सुधारीत ठराव तयार करणेस व इतिवृत्त पुस्तकात सदरहु सुधारणा दाखल करुन पृष्ठ क्र. १ ते ५६ पर्यंतचे इतिवृत्त कायम करण्यास मान्यता देत आहे.

<u>एकमताने</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २ :—** सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १७ विविध कामाच्या संविदेची माहिती नोंद करणे.

---

<u>काही सदस्यः—</u>पास,पास.......

<u>सभापती, श्री. राम पारवानी :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :—** सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १७ विविध कामाच्या संविदेची माहिती नोंद करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या निधीतून मा. नगरसेवक यांनी कामे करणेसाठी विनंती केलेली आहे.

| | अ.क्र. | कामाचे ठिकाण | प्राकलनीय किंमत | करारनामा दिनांक | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| २५३ | १ | वार्ड क्र.५२ श्री.बबन कलब ते शिंदे चाळ, बॅरेक क्र.१४२५ मागे याठिकाणी सी.सी.पायवाटा व नाली बनविणे. (नगरसेवक निधी) | २००००० | १६/२/२००८ | मे.राधेक्रिष्णा म.का.स. संस्था |
| २८२ | २ | वार्ड क्र.५ भिमनगर येथील बॅरेक क्र.३१ समोरील श्री.लोखंडे यांचे घराजवळ शौचालयाची दुरुस्ती करणे. (महापौर निधी) | १५०००० | १६/२/२००८ | मे.अमय म. का.स.संस्था |
| ३२० | ३ | वार्ड क्र.६५ नटराज अपार्टमेंट ते लालसाई बिल्डिंग ते बॅरेक क्र.८०५ याठिकाणी सी.सी.एम—२५० ने रस्ता बनविणे. (नगरसेवक निधी) | ८५००० | १६/२/२००८ | मे.राजदिप म.का.स. संस्था |
| ३२२ | ४ | वार्ड क्र.६५ येथील लाललोई गार्डन ते लाल साई बंगला ते बॅरेक क्र.९०५ याठिकाणी सी.सी. एम—२५० ने रस्ता बनविणे. (नगरसेवक निधी) | १५०००० | १६/२/२००८ | मे.राजदिप म.का.स. संस्था |
| ३४० | ५ | उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.१, २ आणि ३ येथील कार्यालयास थर्मोप्लास्टिक पेंट करणेबाबत. (महापालिका निधी) | ६००००० | १६/२/२००८ | मे.भोलेनाथ म.का.स. संस्था |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३५१ | ६ | वार्ड क्र.१६ मधील बॅरेक क्र.८५ ए आणि बी आनंदपूर दरबार आश्रम, अवतार अपार्टमेंट ते आनंदपूर आश्रम, सेवादास अपार्टमेंट मागे याठिकाणी सि.सि.पॅसेज व नाली बनविणे. (नगरसेवक निधी) | १९९९०० | १६/२/२००८ | मे.अमय म. का.स.संस्था |
| ३५२ | ७ | वार्ड क्र.१६ येथील सम्राट अपार्टमेंट पासून ते केसाबाई अपार्टमेंट, अपना इंडस्ट्रियल जवळ, डॉ. सेवल अहुजा जवळ याठिकाणी सि.सि.एम—२५० ने रस्ता व दुतर्फा नाली बनविणे. (नगरसेवक निधी) | २००००० | १६/२/२००८ | मे.अमय म. का.स.संस्था |
| ३६४ | ८ | वार्ड क्र.४ येथील गुरमुख यांचे घर, शर्मा यांचे घर, अरविंद सिंग, अशोक यांचे घर, के.बी.सरदार, सुधा लक्ष्मण मराठे, माता मंदीर, दत्त वाडी, साई शारदा अपार्टमेंट याठिकाणी सी.सी.पॅसेज व नाली बनविणे. (नगरसेवक निधी) | १९९९०० | १६/२/२००८ | मे.वनीदेवी म.का.स. संस्था |
| ३०१ | ९ | वार्ड क्र.६५ लाल लोई उद्यानात कारंजे बसविणे. (महापालिका निधी) | ६३९५०० | १८/२/२००८ | मे.श्री विजय म.का.स. संस्था |
| १८८ | १० | विर सावरकर नगर, शाळा/क्र.१२ जवळ याठिकाणी सी.सी.पॅसेज व नाली बनविणे. (नगरसेवक निधी) | २००००० | २५/२/२००८ | मे.गंगा म. का.स.संस्था |
| २४६ | ११ | वार्ड क्र.२६ बॅरेक क्र.५०७ जवळील समाजमंदीराची पुर्नबांधणी करणे. (समाजमंदीर निधी) | ५००००० | २६/२/२००८ | मे.बालाजी कृपा म.का. स.संस्था |
| ३११ | १२ | वार्ड क्र.१४ बॅरेक क्र.७७६ जवळील समाजमंदीराचे उर्वरीत काम करणे (महापालिका निधी) | २९२१०० | २७/२/२००८ | मे.रविराज म.का.स. संस्था |
| २२८ | १३ | वार्ड क्र.६८ येथील त्रिलोकदास उद्यानातील वाचनालय बनविणे. (महापालिका निधी) | १५०००० | ३/३/२००८ | मे.वैशाली म.का.स. संस्था |
| ३०३ | १४ | वार्ड क्र.५० येथील बॅरेक क्र. १४९२,१४९४,१५०२, १५०३ येथील उद्यानाकरीता संरक्षण भिंत बांधणे. (महापालिका निधी) | २००००० | ३/३/२००८ | मे.शिवानी म.का.स. संस्था |
| २४७ | १५ | वार्ड क्र.०१ येथील अर्जुन माधवी यांचे घर ते नामदेव धनसोलकर शहाड गावठाण याठिकाणी सि.सि.पॅसेज व नाली बनविणे. (नगरसेवक निधी) | १८४४५० | ५/३/२००८ | मे.अलका म.का.स. संस्था |
| ३१९ | १६ | वार्ड क्र.१८ येथील बॅरेक क्र.१७१, १७२ याठिकाणी सि.सि.पॅसेज व नाली बनविणे. | १००००० | ५/३/२००८ | मे.श्री विजय म.का.स. संस्था |
| ३६१ | १७ | वार्ड क्र.३४ येथील सिंगापूर शौचालय जवळ, शनि मंदीर जवळ, दुनिचंद कालानी हॉल जवळील निष्कासित केलेल्या शौचालयाच्या जागी सि.सि. पेव्हमेंट व नाली बनविणे. (नगरसेवक निधी) | २००००० | ५/३/२००८ | मे.रविंद्र म. का.स.संस्था |

स्थायी समिती ठराव क्र. १८८ दिनांकः– २९/३/२००८

सुचकाचे नाव :– श्रीमती लता निकम

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती इंदिरा उदासी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १७ विविध कामाच्या संविदेची माहिती नोंद करीत आहे.

तसेच इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदर ठरावा अंतर्गतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल व तो अंतिम असेल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३ :–** भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई यांचे प्रधान अनुसंधान वैज्ञानिक डॉ. शिरीश गेडाम यांची सल्लागार/नॉलेज पार्टनर म्हणुन नियुक्ती करण्यास मान्यता देणे.

---

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. राम पारवानी :–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३ :–** भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई यांचे प्रधान अनुसंधान वैज्ञानिक डॉ. शिरीश गेडाम यांची सल्लागार/नॉलेज पार्टनर म्हणुन नियुक्ती करण्यास मान्यता देणे.

## प्रस्तावना

महानगरपालिकेने ई–गवर्नन्स प्रभाविपणे राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. तसेच अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी पार्क यांना जी.आय.एस. चे कामही सोपविण्यात आलेले आहे. तसेच ''थिंक टॅक'' म्हणुन एका फोरमची स्थापना करण्यांत आलेली आहे. त्या करीता भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई यांचेशी संपर्क साधण्यात आला होता. त्यांनी प्रा. गेडाम, प्रधान अनुसंधान वैज्ञानिक संसाधन अभियांत्रिकी अध्ययन केंद्र, मुंबई यांना पुढीलप्रमाणे नियुक्ति देणेस मान्यता दिलेली आहे.

1) Be a member of 'Think Tank' at umc to discuss technical aspects of various issues of development planning.
2) Provide expert advice on quality check of the deliverables give by 'Science Park' Pune.
3) Provide Expert advice on interfacing existing E-governance infrastructure with proposed Geographic information System (GIS) for infrastructure management.
4) Appraising the UMC officials about the role of GIS, GPS and Remote Sensing technologies in civic infrastructure management through their existing training facility.

या कार्यासाठी त्यांनी पुढीलप्रमाणे चार्जेस सांगितलेले आहेत.

| Firm/Organisation on whose behalf of the project work has been undertaken | Brief description of the job | Amount |
|---|---|---|
| Ulhasnagar Municipal Corporation | Request for submission of proposal for appointment of Retainer/Consultant/Knowledge Partner Service Tax @ 12% (a) | (a) Rs. 90000/-<br>(b) Rs. 10800/- |
| | Education cess @ 2% (b) Secendary and Higher Education cess @ 1% (b) | (c) Rs. 216/-<br>(d) Rs. 108/- |
| | **Total (a+b+c+d)** | **Rs. 101124/-** |

भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई ही भारत सरकारची एक नामांकित तांत्रिक प्रशिक्षण संस्था आहे. वरील बाबी लक्षात घेता रु. १,०१,१२४/– यास मान्यता देवुन भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई यांचे प्रा. गेडाम, प्रधान अनुसंधान वैज्ञानिक यांची सल्लागार/नॉलेज पार्टनर म्हणुन तीन महिन्यांकरीता नियुक्ती करण्याची मान्यता मिळावी व भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई यांना सदर राशी अग्रिम देण्याचीही मान्यता मिळावी.
मंजुरीसाठी स्थायी समिती पटलावर प्रस्ताव सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १८९ दिनांकः– २९/३/२००८

सुचकाचे नाव :– श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. गोविंदराम लुंड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई यांचे प्रधान अनुसंधान वैज्ञानिक डॉ. गिरीश गेडाम यांची सल्लागार/ नॉलेज पार्टनर म्हणुन ३ महिन्यांकरीता नियुक्तीस व भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई यांना रुपये १,०१,१२४/– इतकी रक्कम अग्रीम देण्यास मान्य करीत आहे.

तसेच इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदर ठरावा अंतर्गतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल व तो अंतिम असेल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ विषय क्र. ४ :– माध्यमिक (अनुदानीत) शाळांना अभ्यासपुरक पुस्तके व शाळेचे साहित्य व विज्ञान विषयक सीडी पुरविणे कामी बाब निहाय निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :– पास, पास.....

<u>सभापती, श्री. राम पारवानी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. ४ :–** माध्यमिक (अनुदानीत) शाळांना अभ्यासपुरक पुस्तके व शाळेचे साहित्य व विज्ञान विषयक सीडी पुरविणे कामी बाब निहाय निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

माध्यमीक (अनुदानीत) शाळांना अभ्यास पुरक पुस्तके, क्रिडा साहित्य व विज्ञान विषयक साहित्यांचे दर मागविण्यासाठी निविदा सुचना वृत्तपत्रात दि. १३/०३/२००८ रोजी प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या होत्या. यामध्ये प्राप्त झालेल्या निविदा उप–आयुक्त (आरोग्य) यांचे दालनात दिनांक १८/३/२००८ रोजी दुपारी ४.०० वाजता उप–आयुक्त (आरोग्य), मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधि यांचे समोर उघडण्यात आल्या होत्या. पैकी पात्र निविदाधारकांकडून प्राप्त झालेल्या साहित्याचा दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशील | आवश्यक परिमाण एकूण ४७ शाळांसाठी | अपेक्षित अंदाजित दर प्रति नग /किट | निविदा सादर करणा–या निविदाधारकाचे नाव व त्यांचे प्राप्त दर | | | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मे. अमर ज्योत इंटरप्रईझेस | मे.मोहिनी इंटरप्राईझेस | मे.मोहित इंटरप्राईझेस | |
| १ | पुस्तके, | ७१पुस्तकांचा संच | ३११७ | ३३०० | ३२९० | <u>३२००</u> | ३२०० |
| २ | शैक्षणीक सीडी, | २ सीडी | ४००० | <u>४०९०</u> | ४११० | ४२०० | ४०९० |
| ३ | क्रिकेट किट | १ किट | २,५०० | २६५० | <u>२०९०</u> | २५७५ | २०९० |
| ४ | टेबल टेनिस | १ नग | १८,५०० | <u>१८६५०</u> | <u>१८६५०</u> | १९२५० | १८६५० |
| ५ | कॅरम | १ नग | ९९५ | <u>९७५</u> | १००० | १००० | ९७५ |
| ६ | बॅडमिंटन किट | १ नग | ९५० | १०२५ | १०५० | <u>९५०</u> | ९५० |
| ७ | फुटबॉल | २ नग | १,३०० | १७२५ | १४०० | <u>१२५०</u> | १२५० |
| | **प्रति सेट खर्च** | | | | | | ३१,२०५/– |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार अ.क्र. १,६ व ७ या करीता मे. मोहित इंटरप्राईझेस, उल्हासनगर यांनी सर्वात कमी दर सादर केले आहेत. तसेच अ.क्र. २, व ५ या करीता मे. अमर ज्योत ईंटरप्राइझेस, उल्हासनगर व अ. क्र. ३ या करीता मे. मोहिनी ईंटरप्राईझेस, उल्हासनगर यांनी सर्वात कमी दर सादर केले आहेत. तसेच अ.क्र. ४ टेबल टेनिस या साहित्यासाठी मे. अमरज्योत इंटरप्राईझेस व मे. मोहिनी ईंटरप्राईझेस यांनी एकच रुपये १८,६५०/– प्रति नग दर सादर केल्याने सदरचे साहित्य दोन्ही निविदाकारांना समप्रमाणात पुरवठा करण्याचे आदेश देणेचे प्रस्तावित करण्यात येते.

सदर बाबीकरीता सन २००७–२००८ सालातील महापालिका अंदाजपत्रकात पूर्व व माध्यमिक शिक्षण निधी या लेखा शिर्षका खाली खालीलप्रमाणे तरतूद केलेली आहे.

| अ. क्र. | लेखा शिर्षक | केलेली तरतूद रक्कम व शिल्लक रक्कम |
|---|---|---|
| १ | पूर्व व माध्यमिक शिक्षण निधी, 'क–४ (II) | १५,००,०००/– |

वरील साहित्य खरेदीच्या एक सेट साठी रु. ३१,२०५/– खर्च येणार असून प्रत्येक शाळेस एक सेट याप्रमाणे एकूण ४७ शाळांसाठी रू १४,६६,६३५/– (चौदा लाख सासष्ट हजार सहाशे पस्तीस मात्र.) खर्च अपेक्षित आहे. तरी सदर होणा–या खर्चास व न्युनतम दराच्या निविदाकारांशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी

समितीची प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणे आवश्यक असल्याने सदरच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची मान्याता देण्याची शिफारस आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १९० दिनांकः– २९/३/२००८

सुचकाचे नाव :– श्री. सुरेश जाधव

अनुमोदकाचे नाव :– श्री. गोविंदराम लुंड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माध्यमिक (अनुदानीत) शाळांना अभ्यासपुरक पुस्तके व शाळेचे साहित्य व विज्ञान विषयक सीडी पुरविणे कामी प्रस्तावनेत नमुद केलेल्या तुलनात्मक तक्त्यानुसार अ.क्र. १,६ व ७ या करीता मे. मोहित इंटरप्राईझेस, अ.क्र. २, व ५ या करीता मे. अमर ज्योत ईंटरप्राईझेस, अ.क्र. ३ या करीता मे. मोहिनी ईंटरप्राईझेस, तसेच अ.क्र. ४ टेबल टेनिस या साहित्यासाठी मे. अमरज्योत इंटरप्राईझेस व मे. मोहिनी ईंटरप्राईझेस या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

तसेच इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदर ठरावा अंतर्गतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल व तो अंतिम असेल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. ५ :– डपिंग ग्राउंड येथिल कच–याचे सपाटीकरण करण्याकरीता अभिकत्याची नेमणुक करण्याच्या संविदेस मान्यता देणे.

---

सभापती, श्री. राम पारवानी :– श्री सावंत साहेब, हे काम कधी पासुन त्या ठेकेदारास देण्यात आलेले आहे? तो ठेकेदार केव्हापासुन काम करत आहे? त्या कामास कधीपासुन मान्यता देण्यात आली आहे.,?

डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त, आरोग्य):– दिनांक २४/७/२००७ पासून हे काम चालु आहे. स्थायी समिती ठराव क्र. १८ दिनांक १८/५/२००७ अन्वये दि. ३१/३/२००८ पर्यंतच्या अंदाजीत प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे.

सभापती, श्री. राम पारवानी :–एक वर्षासाठी मान्यता दिलेली आहे.

महापालिका सचिव :–गोषवा–यानुसार मंजुरी देत आहात काय?

सदस्य श्री. जीवन इदनानी:–२४/७/२००८ पासुन २००९ पर्यंत एक वर्षासाठी मान्यता दिली जावी.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–आतापर्यंत चार महिन्याचा कालावधी होवून गेलेला आहे आणि आठ महिन्याचा कालावधी बाकी आहे, यापुढे त्या ठेकेदाराकडुन व्यवस्थीत काम करुन घेण्याची जबाबदारी तुमची असेल.

गोषवा–यामध्ये तुम्ही लिहिले आहे की, स्थायी समितीने पाच सदस्यीय चौकशी समिती स्थापन केली असून चौकशी समितीने दिलेला अहवाल मा. स्थायी समितीने महासभेस सादर केलेला आहे. तरी मेसर्स वेस्ट

हॅण्डलींग प्रा.लि. या न्युनत्तम दराच्या निविदाकारास डम्पींग ग्राउंड मेनेजमेंट अंतर्गत कच—याचे सपाटीकरण करण्यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे आवश्यक आहे.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्री. राम पारवानी :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ५ :—** डपिंग ग्राउंड येथिल कच—याचे सपाटीकरण करण्याकरीता अभिकत्याची नेमणुक करण्याच्या संविदेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

मा. स्थायी समितीने ठराव क्र. १८ दिनांक १८/५/२००७ अन्वये उपरोक्त विषयाच्या दि. ३१/३/२००८ पर्यंतच्या अंदाजीत प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या डंम्पिंग ग्राऊंडवरील कच—याचे सपाटीकरण करण्यासाठी अभिकर्त्याची नेमणुक करणेबाबत निविदा सुचना दैनिक विकास व व्हिजन मुंबई या वर्तमानपत्रात दि. ३१/०५/२००७ रोजी प्रसिध्द करण्यात येऊन निविदा मागविण्यात आली होती. परंतु ग्राहय तांत्रिक निविदांची संख्या ३ पेक्षा कमी म्हणजे एकच असल्याने अल्प प्रतिदास मिळाल्याने मा. आयुक्त यांचे आदेशाने पुन्हा दिनांक २५/७/०७ रोजी फेरनिविदा प्रसिध्द करण्यात येवून प्राप्त निविदा दि. १०/८/७ रोजी उघडण्यात आल्या होत्या. परंतु अटी व शर्तीनुसार ग्राहय तांत्रिक निविदांची संख्या दोनच असल्याने व निविदेस अल्प प्रतिसाद असल्याने निविदा समिती सदस्यांनी पुन्हा एकदा फेरनिविदा सुचना प्रसिध्द करण्याबाबत सुचित करुन त्याप्रमाणे मा. आयुक्त यांनी आदेश दिले. सदर प्रकरणी विधी विभागाचेसुध्दा अभिप्राय घेण्यात आले होते. तद्नंतर दिनांक २१/९/२००७ रोजी प्रसिध्द करण्यात येऊन निविदा मागविण्यात आली होती. प्राप्त निविदा दि. ९/१०/२००७ रोजी दुपारी ३.३० वाजता उप — आयुक्त (आरोग्य) यांचे दालनात उप — आयुक्त (आरोग्य), मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांचे उपस्थितीत व निविदाकारांचे प्रतिनिधी यांचे समोर उघडण्यात आल्या.

एकुण ४ को—या निविदा विक्री करण्यात आल्या होत्या. प्राप्त चार निविदाकारांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | शेरा | दर प्रति दिन रुपये |
|---|---|---|---|
| १ | मे. ॲन्टोनी वेस्ट हॅ. सेल प्रा. लि. | अटी व शर्ती नुसार आवश्यक सर्व कागदपत्रे जोडलेली असल्याने <u>पात्र.</u> | १७,५००/— |
| २ | मे. गोवर्धनी कंन्स्ट्रक्शन कंपनी | लिफाफा क्र. ३ मध्येच लिफाफा क्र. १ व लिफाफा क्र. २ चे कागदपत्रे आढळली व अनामत रक्कमेचा डी.डी जोडला नव्हता, <u>अपात्र.</u> | —— |
| ३ | मे. जॉली ॲन्ड कंपनी | पोक्लेन मशिन स्व:मालकीची असल्याचे जोडलेली कागदपत्रे अक्षेपार्ह असल्याने, <u>अपात्र.</u> | —— |
| ४ | मे. एस्. के. कंन्स्ट्रक्शन कंपनी | अटी व शर्ती नुसार आवश्यक सर्व कागदपत्रे जोडलेली असल्याने <u>पात्र.</u> | २०,०००/— |

पात्र निविदाकारांमध्ये उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे मे. ॲन्टोनी वेस्ट हॅ. सेल प्रा. लि. यांचे दर न्युनतम म्हणजेच प्रतिदिन रु.१७,५००/— असल्याने त्यांना जा.क्र. उमपा/आवि/उप—आ/२९० दिनांक ९/१०/२००७ रोजी वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेबाबत पत्र दिले. त्याअनुषंगाने मे. ॲन्टोनी वेस्ट हॅ. सेल प्रा. लि. यांनी रुपये १६,९००/—(सोळा हजार नऊशे मात्र) प्रतिदिन या दराने काम करण्याची तयारी दर्शविली होती. परंतु सदरचे दरही मागील दरानुसार जास्त असल्यामुळे मुलेअ/मुलप व मा. आयुक्त यांचे आदेशावरुन संबंधीत निविदाकार मे. ॲन्टोनी वेस्ट हॅ. सेल प्रा. लि. यांना पुन्हा जा.क्र.उमपा/आवि/उप—आ/३३१ दिनांक ३/११/०७ अन्वये दिनांक ५/११/०७ रोजी दुपारी १२.३० वाजता वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. त्यानुसार संबंधित निविदाकाराने उप—आयुक्त, आरोग्य यांचेशी केलेल्या चर्चेअंती सदरचे काम एका वर्षासाठी दिल्यास रुपये १४,०००/— प्रतिदिन या दराने करण्यास तयार झाले.

परंतु मा. आयुक्तांनी दिलेल्या निर्दिशानुसारर संबंधीतांस पुन्हा वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले त्यानुसार संबंधीत ठेकेदार रु. १२,७६०/— प्रतिदिन या दराने काम करण्यास तयार असल्याचे मान्य केले. सदर पत्रानुसार राणा ट्रेडींग कंपनी जवळील डंपिंग ग्राउंडवरील कच—याचे सपाटीकरणाचे काम पुर्वीच्याच दराने करण्यास तयार आहेत व तसेच सदरच्या कामाचे दर एका वर्षासाठी असल्याचे नमुद केले. तरी संबंधित निविदाकाराने वाटाघाटीअंती निविदाकार पुरवित असलेल्यामशनरी, मनुष्यबळ पाहता सादर केलेले दर हे बाजारभावाशी तुलना केली असता कमी आहेत. प्राप्त झालेल्या दरानुसार एका वर्षासाठी संबंधित निविदाकाराशी संविदा केल्यास अंदाजीत रु. १२,७६० प्रतिदिन ३६५दिवस त्र ४६,५७,४००/— (सेहचाळीस लाख सत्तावन्न हजार चारशे मात्र.) खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च भागविण्यासाठी अंदाजपत्रक सन २००७—०८ लेखाशिर्षक भाग—१ सी—१(ए), कचरा वाहतुक खर्च या लेखाशिर्षकात तरतुद करण्यात आली आहे.

परंतु मे. ॲन्टोनी वेस्ट हॅ. सेल प्रा. लि. यांना उल्हासनगर शहरातील कचरा वाहतुकीचे ठेका देण्यात आला आहे. सदर ठेकेदाराच्या कामाचे मुल्यमापन करण्यासाठी मा. स्थायी समितीने पाच सदस्य चौकशी समिती स्थापण केलेली असून सदर समितीने सादर केलेला अहवाल मा. स्थायी समितीने मा. महासभेपुढे सादर केलेला आहे.

तरी मे. वेस्ट हॅ. सेल प्रा. लि. या न्युनतम दराच्या निविदाकारास डंपिंग ग्राउंड मॅनेजमेंट अंतर्गत कच—याचे सपाटीकरण करण्यासाठी सदरच्या प्राकलनास मा. स्थायी समितीची प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणे आवश्यक असल्याने सदर निविदाकाराचे दर स्विकृत होउन, मे. ॲन्टोनी वेस्ट हॅ. सेल प्रा. लि. यांच्याशी संविदा करण्याबाबत विचारार्थ सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १९१ दिनांकः— २९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लता निकम

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार डपिंग ग्राउंड येथिल कच—याचे सपाटीकरण करण्याकामी प्रशासनास मे. ॲन्टोनी वेस्ट हॅ. सेल प्रा. लि. या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

तसेच इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदर ठरावा अंतर्गतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल व तो अंतिम असेल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६** :— उल्हासनगर—१ येथिल पिंकू प्लाझा ते डॉल्फिन क्लब पर्यंत एम—३५० ने रस्ता बनविणे कामी प्रशासनास लघुत्तम दराचे निविदाकार मे. जयभारत कन्स्ट्रक्शन यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

सभापती, श्री. राम पारवानी :—हा विषय पास करु या.

सदस्या श्रीमती निलम रावत :—पिंकु प्लाझा अपार्टमेन्ट पासुन पुढे रस्त्याचे काम सुरु केले जावे.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—या अगोदर ज्या ठिकाणी काम केले आहे त्याठिकाणचे काम यामध्ये समाविष्ट केले जावू नये. त्यापूढील काम केले जावे.

सदस्या श्रीमती निलम रावत :—या अगोदर जे काम झाले आहे त्याचे देयक या कामातुन दिले जावु नये.

सदस्य श्री. जीवन इदनानी:—डॉल्फीन क्लब पर्यंत एम—३५० ने रस्ता तयार करायचा आहे ना?

सभापती, श्री. राम पारवानी :—पिंकु प्लाझा अपार्टमेन्ट पासुन पुढे रस्त्याचे काम करण्याबाबत लिहिले आहे म्हणजेच डॉल्फीन क्लब पर्यंत रस्त्याचे काम करावयाचे आहे.?

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—पिंकु प्लाझा अपार्टमेन्ट पासुन एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत रस्ता तयार करण्यात आलेला आहे तोच रस्ता सरळ पुढे तयार केला जाईल.

सभापती, श्री. राम पारवानी :—तेथुनच सरळ पुढे हा रस्ता तयार केला जाईल. डॉल्फीन क्लबकडील रस्ता तयार केला जाणार नाही.

सदस्य श्री. जीवन इदनानी:—पिंकु प्लाझा अपार्टमेन्ट पासुन सरळ जो रस्ता आहे तोच तयार केला जाईल.

श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—या अगोदर त्या रस्त्याचे जे काम झालेले आहे ते महापालिकेमार्फत करण्यांत आलेले नाही. तसेच आपण सुचविल्याप्रमाणे त्यापुढील रस्त्याचे काम करायचे झाले तर सुधारीत प्राकलन तयार करावे लागेल.

सदस्य श्री. सुरेश जाधव :— या रस्त्यावर जेथपर्यंत या अगोदर जे काम करण्यात आले आहे, त्यापुढील काम करण्यासाठी सुधारीत प्राकलन तयार करा. तसेच श्री. शिर्के साहेब यांनी सांगितले की या रस्त्यावर आधीचे जे काम झालेले आहे ते आपण केलेले नाही तर मग त्या कामाचे देयक अदा करण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

महापालिका सचिव :—तर मग हा विषय वगळुन सुधारीत प्राकलन मंजुरीस आणावे लागेल.?

सदस्य श्री. किशोर जग्यासी:—संबंधीत विभागाच्या नगरसेविकेशी संपर्क साधुन नेमके कोठुन कोठपर्यंत रस्त्याचे काम करायचे आहे हे समजावुन घेवुन त्याप्रमाणे कामाचा प्रस्ताव मंजुरीस आणावा कारण की रस्त्याचे कोठुन कोठपर्यंत काम करायचे आहे हे त्यांना स्वत:लाच माहित नाही.

महापालिका सचिव:—जेवढया खर्चाच्या कामास मंजुरी असेल तेवढेच काम होवु शकेल.ना? यासाठी हा जो विषय मंजुरीस आला आहे तो मंजुर केला जावा किंवा नाही?

सदस्य श्री. सुरेश जाधव :—जे काम केले आहे ते कोणत्या ठिकाणी केले आहे?

सदस्य श्री. किशोर जग्यासी:—श्री. शिर्के साहेब स्पष्टीकरण करा.

.

श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—कोणत्या ठिकाणी काम झाले आहे हे लेखा विभाग सांगु शकेल. मात्र आपण सांगता त्यापुढे काम करायचे असेल तर सुधारीत प्राकलन तयार करावे लागेल.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—या अगोदर जे काम झालेले आहे व आता त्यापुढील जे काम करावयाचे आहे या कामाची रक्कम यामध्ये समाविष्ट आहे की ती स्वतंत्रपणे वेगळी दयायची आहे? अर्थसंकल्पामध्ये या कामी तरतुद आहे का?

श्री. सु.कु. नाकाडी (मुख्य लेखा परिक्षक):—जुन्या अर्थसंकल्पामध्ये तरतुद आहे.

महापालिका सचिव:—तर मग या प्रस्तावाचे काय करायचे? हा प्रस्ताव सभेच्या कामकाजातुन वगळायचा काय?

सभापती, श्री. राम पारवानी :—ज्या ठिकाणी रस्ता तयार करण्याचे काम राहिले आहे त्याठिकाणी रस्त्याचे काम करुन घ्या, नाहीतर ते काम सुध्दा राहुन जाईल. यासाठी श्रीमती निलम रावत यांना निर्णय घ्यावा की हा विषय पारीत करायचा किंवा नाही? माझे तर असे म्हणणे आहे की हा विषय पारीत केला जावा.

**महापालिका सचिव :–**हा प्रस्ताव सभेच्या कार्यसूचीवरुन वगळायचा ना? आपले काय मत आहे ते सांगा.

**सदस्य श्री. किशोर जग्यासी:–**अर्ध्या रस्त्याचे काम या अगोदरच झालेले आहे.

**सभापती, श्री. राम पारवानी:–** जेथपर्यंत रस्ता तयार केला जावु शकतो तेथ पर्यंत काम करुन घ्या. जो भाग राहील त्या ठिकाणी नंतर आपण आपल्या नगरसेवक निधीतुन काम करुन घ्या. श्री. शिर्के साहेब, रस्त्याचे किती काम बाकी आहे?

**श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–**अर्धे काम झाले आहे, अर्धे बाकी आहे.

**सदस्या श्रीमती निलम रावत:–**मग हे काम कार्यसूचीवरुन वगळा.

**सभापती, श्री. राम पारवानी :–**सदरचा विषय आजच्या सभेच्या कामकाजातुन वगळण्याकामी सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ६ :–** उल्हासनगर–१ येथिल पिंकू प्लाझा ते डॉल्फिन क्लब पर्यंत एम–३५० ने रस्ता बनविणे कामी प्रशासनास लघुत्तम दराचे निविदाकार मे. जयभारत कन्स्ट्रक्शन यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नांव | • पिंकू प्लाझा अपार्टमेंट ते डॉल्फिन क्लब, वार्ड क्र.१ येथे एम–३५० ने रस्ता व नाली बनविणे |
| २ | प्राकलनाची किंमत | ६३४८००/– |
| ३ | तांत्रिक मंजुरी देणा–या अधिका–याचे पदनाम | कार्यकारी अभियंता |
| ४ | तांत्रिक मंजुरी मिळाल्याचा क्र. व दिनांक: | क्र. २००५ दि.१४/६/२००४ |
| ५ | प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळाल्याचा क्र व दिनांक | ९८/१ दिनांक २१/८/२००४ |
| ६ | निविदा सुचना क्रमांक व दिनांक | क्र.१३ दिनांक १८/३/२००६ |
| ८ | विक्री केलेल्या निविदा फॉर्म्सची संख्या | ३ |
| ९ | अंतिम दिवशी प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |
| १० | निविदा उघडल्याचा दिनांक | दिनांक १७/०६/२००६ |
| ११ | निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता | |
| अनु | निविदाधारकाचे नांव | |
| १ | मे.जकनूश कंन्स्ट्रक्शन | ९.९९ टक्के जास्त |
| २ | मे.ज्योती कंन्स्ट्रक्शन | १७.१३ टक्के जास्त |
| ३ | मे. डी.एस. कंन्स्ट्रक्शन | २२.५० टक्के जास्त |
| १२ | निविदाकाराच्या दराबाबत | मे.जकनूश कंन्स्ट्रक्शन यांचे अंतिम दर प्राकलनिय दरापेक्षा ९.९९ टक्के जास्त असले तरी हा दर चालू वर्षातील दरसुचीवरील (२००५–०६) प्राकलनिय किंमती ५.४५ टक्केने कमी होत आहे. |
| १३ | लेखा शिर्षाचे नांव | सी–४(iii) पी–२ रस्तें प्रवास व पुल इत्यादी सुधारणे व नवीन बांधणे. |

उक्त नमूद केल्याप्रमाणे मे जकनूश कंन्स्ट्रक्शन यांचे प्राकलनिय दर ९.९९ टक्के जास्त असलेली निविदा चालू दरसुचीवर आधारीत प्राकलनिय किंमतीच्या तुलनेत ५.४५ टक्के कमी होत असल्याने वाजवी व आर्थिकदृष्ट्या महानगरपालिकेसाठी फायदेशिर असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारसीनुसार दर स्वीकृत करण्यात आले आहेत. सबब प्रस्तावित पिंकू प्लाझा अपार्टमेंट ते डॉल्फिन क्लब, वार्ड क्र.१ येथे एम—३५० ने रस्ता व नाली बनविणे या कामास प्रशासकीय व वित्तीय मंजूरीसह ९.९९ जास्त दराच्या रु.६९२२१६/— किंमतीची मे जकनूश कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकृत करुन त्यांचेशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करणेसाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले होते. परंतू सदर विषय ठराव क्र.४१ अन्वये नामंजूर करण्यात आला. या ठरावांची अंमलबजावणी न केल्यास सद्यस्थितीतील रस्ते मोठया प्रमाणावर खराब होतील. त्यामुळे अपघात, वाहतूकीचा खोळंबा, प्रदुषण, इत्यादी गैरसोयींना सामोरे जावे लागेल. मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३ (१८) नुसार सार्वजनिक रस्ते बांधणे व सुस्थितीत ठेवणे हे महानगरपालिकेचे आवश्यक कर्तव्य नमुद केलेले आहे.

महापालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाजाविषयी नियम या पुस्तिकेतील नियम (र) प्रमाणे महापालिकेने पारित केलेल्या कोणत्याही ठरावात, तो पारित झाल्यानंतर तीन महिन्याच्या आत, फेरबदल करता येणार नाही. किंवा तो रद्द करता येणार नाही मात्र अशा ठरावात एकूण पालिका सदस्यांपैकी कमीत कमी एक द्वितीयांश पालिका सदस्यांनी, किंवा कोणत्याही विवक्षित बाबतीत, या अधिनियमान्वये आवश्यक असेल अशा अधिक संख्येइतक्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या आणि सभेत समंत झालेल्या ठरावात फेरबदल करता येईल असे नमुद आहे. त्यानुसार कामाची तातडी पहाता वरील नियमास अनुसरुन मान्य असल्यास सदरचे ठराव मंजूरीकरीता पुन्हा स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १९२ दिनांकः— २९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्री. सुरेश जाधव

अनुमोदकाचे नाव :— श्री. गोविंदराम लुंड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—१ येथिल पिंकू प्लाझा ते डॉल्फिन क्लब पर्यंत एम—३५० ने रस्ता बनविणे कामीचा प्रस्ताव सविस्तर माहिती अभावी आजच्या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यांस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— प्रशासनाकडुन आयत्या वेळचा विषयान्वये एक विषय आलेला आहे आपणामधील बहुसंख्य सदस्यांची संमती असेल तर तो आजच्या सभेच्या कामकाजात सामावून घेता येईल.

काही सदस्य :— सदरचा विषय आजच्या सभेच्या कामकाजात सामावुन घ्यावा.

सभापती, श्री. राम पारवानीः— आयत्या वेळचा विषय सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समावून घेण्यात येत आहे.

महापालिका सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ आयत्यावेळचा विषय

**विषय क्र.** ७ :—बॅरेक नं. ९८३ जवळ, राज प्रिंटर्स समोर, प्रेम प्रकाश अपार्टमेंटच्या मागे, उल्हासनगर—३ या ठिकाणी असलेले शौचालय निष्कासित करणेस मान्यता देणे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—२४ तारखेस नाला ओवरफ्लो होवून नाल्याचे दुर्गंधीयुक्त पाणी लोकांच्या घरात गेले आहे. त्यामुळे ब—याचशा लोकांचे फर्नीचर व इतर सामानाची नासधुस झाली आहे. त्यासाठी स्थायी समितीने ठराव पारीत करुन या लोकांना नुकसान भरपाई दिली पाहिजे.

महापालिका सचिव :—याबाबतचा गोषवारा तयार नाही. गोषवारा तयार करावा लागेल. त्यासाठी आदेश दिले जावेत.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—नाले तुडुंब भरून सर्वत्र पाणी साचले नसते तर भिंत पडुन नुकसान झाले नसते. याबाबत जनादेशवृत्तवाहीनीवर जे वृत्त दाखविण्यात आले ते पहाता ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना भरपाई मिळाली पाहिजे. तेथिल नाला साफ करण्याबाबत मी पत्र दिलेले आहे त्यानुसार नाला सफाई करण्याबाबत आपण संबंधीतांना सुचना दया. त्याचबरोबर त्याठिकाणी नाला बांधण्यासाठी प्राकलन तयार केले पाहिजे. आणि त्याबाबतचा गोषवारा स्थायी समितीपुढे आला पाहिजे.

सभापती, श्री. राम पारवानी :— नुकसान भरपाई देण्याचा ठराव केला जावा व नाला सफाईचा आदेश याबाबत मी आयुक्त साहेबांना सांगितलेले आहे. त्याचबरोबर श्रीमती लता निकम यांनी त्यांच्या प्रभागातील कामाबाबत पत्रही दिलेले आहे त्याबाबतचा प्रस्ताव पुढील स्थायी समितीपुढे आला पाहिजे.

सदस्या श्रीमती लता निकम:—पुढील सभेत नाही, माझ्या प्रभागातील त्या कामाबाबत आपण काय निर्णय देत आहात ते आताच सांगा.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. राम पारवानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ आयत्यावेळचा विषय

**विषय क्र.** ७ :—बॅरेक नं. ९८३ जवळ, राज प्रिंटर्स समोर, प्रेम प्रकाश अपार्टमेंटच्या मागे, उल्हासनगर—३ या ठिकाणी असलेले शौचालय निष्कासित करणेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

श्रीमती इंदिरा उदासी, महापालिका सदस्या प्रभाग क्र. ३१ यांनी दिनांक ११/१०/२००७ रोजीच्या पत्रान्वये बॅरेक नं. ९८३ जवळ, राज प्रिंटर्स समोर, प्रेम प्रकाश अपार्टमेंटच्या मागे, उल्हासनगर—३ या ठिकाणी असलेले जुने शौचालय मोडकळीस आलेले असून ते वापरात नसल्याने नागरीकांच्या विनंतीनुसार निष्कासित करणेबाबत कळविले आहे.

उक्त शौचालयाबाबत आरोग्य विभागाकडुन संबंधित स्वच्छता निरिक्षक श्री. आर.डी. ननावरे यांनी सादर केलेला अहवाल/पंचनामा मालमत्ता विभागास प्राप्त झालेला आहे.

सदर अहवालात उक्त ठिकाणी असलेले शौचालय मोडकळीस अवस्थेत असुन वापरणे जोगे नाहीत. तसेच परिसरातील नागरीकांना सदरचे शौचालय निष्कासित करणेबाबत विचारणा केली असता त्यांनी शौचालय निष्कासित करुन जागेवर सीसी पॅसेज बनविण्यात यावे अशी मागणी केलेली असल्याचे नमुद करण्यांत आलेले आहे.

तरी उक्त बाबी विचारात घेता बॅरेक नं. ९८३ जवळ, राज प्रिंटर्स समोर, प्रेम प्रकाश अपार्टमेंटच्या मागे, उल्हासनगर—३ या ठिकाणी असलेले शौचालय निष्कासित करुन सदर ठिकाणी सीसी पॅसेज बनविणेकामी निर्णयार्थ मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १९३ — दिनांक:— २९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्री. किशोर जग्यासी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वानखेडे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार बॅरेक नं. ९८३ जवळ, राज प्रिंटर्स समोर, प्रेम प्रकाश अपार्टमेंटच्या मागे, उल्हासनगर—३ या ठिकाणी असलेले शौचालयांचे निष्कासनास व जागेवरील परिस्थिती पहाता प्रशासनास इष्ट वाटेल त्या प्रयोजनासाठी सदर जागेचा उपयोग / विनियोग करणेस मान्यता देत आहे.

परंतु—

सदरची शौचालये तो पर्यंत निष्कासित करु नयेत जोपर्यंत त्याठिकाणी विकास कामे सुरु होत नाहीत.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>श्री. मिलिंद सावंत (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>सन्माननिय स्थायी समिती सभापती श्री. रामचंद्र (चार्ली) पारवानी यांनी वर्षभर खेळीमेळीच्या वातावरणात स्थायी समितीचे काम पाहिले. या वर्षभराच्या कालावधीत प्रशासनाकडुन कधी काही चुका झाल्या असतील परंतु त्या त्यांनी सांभाळुन घेतल्या. त्यांना पुढील आयुष्य उत्कर्षाचे जावो अशी मी प्रशासनाच्या वतीने सदिच्छा व्यक्त करतो.

<u>सभापती, श्री. राम पारवानी :—</u>महापालिकेच्या सर्व अधिका—यांनी वर्षभर मला जे सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.यावर्षभराच्या काळावधीत चुकवुन कुणाचे मन दुखावले गेले असेल तर त्याबद्दल क्षमा असावी स्थायी समितीमधुन आम्ही जे आठ सदस्य निवृत्त होत आहोत या आठ सदस्यांपैकी कुण्या सदस्याचे स्थायी समितीपुढे एखादे काम मंजुरीस आले तर त्यावेळेस स्थायी समिती सभापतींनी सहकार्य करावे अशी येणा—या स्थायी समिती सभापतींना आमची विनंती असेल .

सांयकाळी ५.०५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. राम पारवानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

## <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक:—२३/४/२००८

दि. २३/४/२००८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची विशेष सभा बुधवार दिनांक २३/४/२००८ रोजी वाजता सांयकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. रामरख्यानी मोहन (गारो) नारायणदास | सदस्य |
| २ | श्री लुंड गोविंदराम डोलुमल | ——"—— |
| ३ | श्री इदनानी जीवन (राजु) चंद्रभान | ——"—— |
| ४ | श्री जाधव सुरेश मधुकर | ——"—— |
| ५ | श्री ठाकुर नरेंद्र (कुमारी) केवलराम | ——"—— |
| ६ | श्री बठिजा संजय रामचंद्र | ——"—— |
| ७ | श्रीमती रिजवानी सुजाता रमेश | ——"—— |
| ८ | श्री जग्यासी किशोर | ——"—— |
| ९ | श्री वानखेडे राजेश देवेंद्र | ——"—— |
| १० | श्री. मोहन साधवानी | ——"—— |
| ११ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ——"—— |
| १२ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ——"—— |
| १३ | श्री. प्रधान धर्माजी पाटील | ——"—— |
| १४ | श्री. गणपत गोविंद एडके | ——"—— |
| १५ | श्री. राजु किशनचंद जग्यासी | ——"—— |

तर,

सदस्य श्री दवणे नरेंद्र (रवीभाऊ) अनुपस्थित होते.

**श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त (मुख्यालय) हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.**

खालील अधिकारी सभेस हजर होते.
५२. श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त
५३. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
५४. श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
५५. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
५६. श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
५७. डॉ. रेलवानी, वैद्यकीय अधिकारी
५८. श्री. एस.टी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
५९. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्रीमती नर्गीस खान

सांयकाळी ४.०५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

महापालिका सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :— स्थायी समिती सदस्यांमधुन एका सदस्याची सभापती पदी निवड करणे.

---

श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

महापालिका सचिव:—स्थायी समिती पदासाठी दिनांक १७/४/२००८ रोजी चार नामनिर्देशन पत्र महापालिका सचिवांना प्राप्त झाली होती. त्या उमेदवारांची व त्यांच्या सुचक व अनुमोदकांची नावे मी आपणांस वाचुन दाखवितो ती याप्रमाणे......

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | श्री. राजु किशनचंद जग्यासी | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी |
| २. | श्री. मोहन (गारो) नारायणदास रामरख्यानी | श्री. गोविंदराम लुंड | श्री. मोहन साधवानी |
| ३. | श्री. मोहन (गारो) नारायणदास रामरख्यानी | श्री. हरेश परमानंद जग्यासी | श्री. किशोर जग्यासी |
| ४. | श्री. मोहन (गारो) नारायणदास रामरख्यानी | श्री. प्रधान धर्मा पाटील | श्री. राजु (जीवन) इदनानी |

महापालिका सचिव :—ही सर्व नामनिर्देशन पत्र मी मा. महापौर तथा पीठासीन अधिकारी यांच्याकडे सुपुर्त करत आहे. या नामनिर्देशन पत्राची त्या छाननी करतील. यातील कोणती नामनिर्देशन पत्र वैध व कोणती अवैध याचा निर्णय त्या देतील.

महापौर तथा पीठासीन अधिकारी यांनी सर्व नामनिर्देशन पत्र वैध ठरविली असल्याने खालील उमेदवारांची नामनिर्देशनपत्र वैध घोषित करण्यात येत आहेत.

१. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम

२. श्री. रामरख्यानी मोहन (गारो) नारायणदास

महापौर :—मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम — २००७ मधील तरतुदीनुसार स्थायी समिती सभापती पदाची निवडणूक घेतली जात आहे.

निवडणूक लढविणा—या उमेदवारांची अंतिम यादी तयार करण्यापुर्वी ज्या ज्या उमेदवारांनी आपले नामनिर्देशनपत्र सादर केले आहे अशा उमेदवारांपैकी ज्या कुणाला आपली उमेदवारी मागे घ्यायची असेल त्यासाठी १५ मिनिटांची वेळ दिली जात आहे. आता सायंकाळचे ४ वाजुन १० मिनिटे झाली आहेत. सायंकाळी ४.२५ वाजता या १५ मिनिटांची वेळ पुर्ण होईल..

आता सायंकाळचें ४ वाजुन २५ मिनिटे झाली आहेत. १५ मिनिटांची वेळ पुर्ण झाली आहे. कुणीही उमेदवार आपली उमेदवारी मागे घेवु इच्छित नाही त्यामुळे स्थायी समिती सदस्य पदाच्या एका जागेवारी दोन उमेदवार रिंगणात असल्यामुळे हात उंचावुन मतदान घ्यावे लागेल. स्थायी समिती सभापती पदाचे पहिले उमेदवार श्री. नरेंद्र कुमार ठाकुर यांच्या बाजुने जे सन्माननिय सदस्य मत करु इच्छितात त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

उमेदवार श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी) यांच्या बाजुने ५ मते

१. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

२. श्री. संजय बठिजा
३. श्रीमती रिजवानी सुजाता रमेश
४. श्री. राजु जग्यासी
५. श्री. गणपत एडके

उमेदवार श्री. रामरख्यानी मोहन (गारो) यांच्या बाजुने १० मते

१ श्री. रामरख्यानी मोहन (गारो) नारायणदास

२ श्री लुंड गोविंदराम डोलुमल

३ श्री इदनानी जीवन (राजु) चंद्रभान

४ श्री जाधव सुरेश मधुकर

५ श्री जग्यासी किशोर

६ श्री वानखेडे राजेश देवेंद्र

७ श्री. मोहन साधवानी

८ श्री. हरेश परमानंद जग्यासी

९ श्री. रामसागर जनार्दन यादव

१० श्री. प्रधान धर्माजी पाटील

---

महापौरः— मी श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान, महापौर तथा पीठासीन अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका स्थायी समिती विशेष सभा, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम (स्थायी समिती, प्रभाग समिती, परिवहन समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ चे नियम ५ व ७ अन्वये मला प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारांचा व त्याबाबत समर्थन करणा—या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ व इतर सर्व अधिकारांचा वापर करुन उल्हासनगर महानगरपालिकेच्या दिनांक २३ एप्रिल, २००८ च्या सभेत निवडणूक प्रक्रीया व हात उंचावुन मतदानाअंती उमेदवार श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम यांना ५ मते व उमेदवार श्री. रामरख्यानी मोहन (गारो) नारायणदास यांना १० मते मिळाल्याची नोंद झाली आहे त्या अनुषंगाने उल्हासनगर महापालिकेच्या स्थायी समिती सभापती पदासाठी श्री. रामरख्यानी मोहन (गारो) नारायणदास यांची बहुसंख्येने निवड झाल्याचे जाहिर करीत आहे. व त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

☑

विषय : स्थायी समिती सदस्यांमधुन एका सदस्याची सभापती पदी निवड करणे.

प्रस्तावना :

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सदस्यांमधुन एका सदस्याची सभापती पदी निवड करणेकामी दिनांक २३/४/२००८ रोजी सभा आयोजित करण्यात आली. या सभेमध्ये १६ स्थायी समिती सदस्यांमधुन एका सदस्याची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम (स्थायी समिती, प्रभाग समिती, परिवहन समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ चे नियम ७ नुसार स्थायी समिती सभापती पदाची निवड करावयाची आहे. या पदासाठी दिनांक १७/४/२००८ रोजी महापालिका सचिवांकडे

खालील २ उमेदवारांनी चार नामनिर्देशन पत्रे दाखल केलेली असुन त्यातील श्री. रामरख्यानी मोहन (गारो) नारायणदास यांनी तीन नामनिर्देशन पत्र दाखल केली आहे. पीठासीन अधिकारी यांनी सदरच्या दोन्ही उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे वैध घोषित केलेली आहेत.

**१. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम**

**२. श्री. रामरख्यानी मोहन (गारो) नारायणदास**

उमेदवारी मागे घेण्यासाठी विहीत मुदतीत कुण्याही उमेदवाराने उमेदवारी मागे न घेतल्याने निवडणूक प्रक्रिया व हात उंचावुन मतदानाअंती उमेदवार श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम यांना ५ मते व उमेदवार श्री. रामरख्यानी मोहन (गारो) नारायणदास यांना १० मते मिळाल्याने त्या अनुषंगाने उल्हासनगर महापालिकेच्या स्थायी समिती सभापती पदासाठी श्री. रामरख्यानी मोहन (गारो) नारायणदास यांची बहुसंख्याने निवडुन आल्याचे निकाल जाहिर करण्यासाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्रमांक १</u>  <u>दिनांक : २३/४/२००८</u>

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार श्री. रामरख्यानी मोहन (गारो) नारायणदास हे स्थायी समिती सभापती पदी बहुसंख्येने निवडून आल्याचे जाहिर करीत आहे.

<u>मतदानाद्वारे मंजुर</u>

महापौर तथा पीठासीन अधिकारी<br>स्थायी समिती विशेष सभा<br>उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> स्थायी समिती सभापती पदावर निवडून आलेले श्री. रामरख्यानी मोहन (गारो) नारायणदास यांना पुष्पगुच्छ देवुन महापौर महोदया त्यांचे स्वागत करतील.

यावेळी महापौर श्रीमती लिलाबाई आशान यांनी नवनिर्वाचित सभापती श्री. रामरख्यानी मोहन (गारो) नारायणदास यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे स्वागत केले आणि त्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी नवनिर्वाचीत सभापती श्री. रामरख्यानी मोहन (गारो) नारायणदास हे सभापतीच्या आसनावर आसनस्थ झाले.

त्याच प्रमाणे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ असलेले श्री. अशोक बागेश्वर हे श्री. रामरख्यानी मोहन (गारो) नारायणदास यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे अभिनंदन करतील.

यावेळी आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ असलेल्या श्री. अशोक बागेश्वर यांनी नवनिर्वाचित सभापती श्री. रामरख्यानी मोहन (गारो) नारायणदास यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना शुभेच्छा दिल्या.

त्याच प्रमाणे महापालिका प्रशासनाच्या वतीने महापालिका सचिव श्री. रामरख्यानी मोहन (गारो) नारायणदास यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे अभिनंदन करतो.

यावेळी महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा यांनी नवनिर्वाचित सभापती श्री. रामरख्यानी मोहन (गारो) नारायणदास यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना शुभेच्छा दिल्या.

**सभापती:–** सर्व सन्माननिय सदस्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. त्यासर्वांना मी विनंती करतो की त्यांनी शहराच्या विकासासाठी मला सहकार्य करावे. तसेच आजच्या सभेपुढे दुसरे काही कामकाज नसल्याने सभेचे कामकाज संपल्याचे मी जाहिर करतो.

सांयकाळी ४.२५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. रामरख्यानी मोहन (गारो) नारायणदास यांनी जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:–२८/५/२००८

दि. २८/५/२००८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

२

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा बुधवार दिनांक २८/५/२००८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. रामरख्यानी मोहन (गारो) नारायणदास | सभापती |
| २ | श्री लुंड गोविंदराम डोलुमल | ––''–– |
| ३ | श्री इदनानी जीवन (राजु) चंद्रभान | ––''–– |
| ४ | श्री जाधव सुरेश मधुकर | ––''–– |
| ५ | श्री ठाकुर नरेंद्र (कुमारी) केवलराम | ––''–– |
| ६ | श्रीमती रिजवानी सुजाता रमेश | ––''–– |

| | | |
|---|---|---|
| ७ | श्री. साधवानी मोहन रहंदोमल | ——''—— |
| ८ | श्री. जग्यासी राजु किशनचंद | ——''—— |
| ९ | श्री जग्यासी किशोर | ——''—— |
| १० | श्री दवणे नरेंद्र (रवीभाऊ) | ——''—— |
| ११ | श्री वानखेडे राजेश देवेंद्र | ——''—— |
| १२ | श्री. एडके गणपत गोविंद | ——''—— |
| १३ | श्री. जग्यासी हरेश परमानंद | ——''—— |
| १४ | श्री. पाटील प्रधान धर्माजी | ——''—— |
| १५ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ——''—— |

तर,

सदस्य श्री बठिजा संजय रामचंद्र हे अनुपस्थित होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

६०.श्री. समीर उन्हाळे, आयुक्त
६१.श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त
६२.श्री. हरेश इदनानी, प्र. महापालिका सचिव
६३.श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
६४.श्री. मिलींद सावंत, उप—आयुक्त
६५.श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
६६.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
६७.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.
६८.श्री. एस.टी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
६९.श्री. सेल्वन, उप अभियंता, पाणी पुरवठा

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव

सांयकाळी ४.१० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

प्र. महापालिका सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :— मागील सभेचे दिनांक २३/४/२००८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

सदस्य श्री. सुरेश जाधव :—दिनांक १७/१/२००८ रोजीच्या स्थायी समिती सभेत विषय क्र. १२ आणि १३ संदर्भात ठराव क्र. १३२ आणि १३३ पारीत करुन सार्वजनिक बांधकाम व पाणी पुरवठा विभागाच्या कामासाठी दुस—या लेखा शिर्षांमधुन रक्कमा समायोजित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार पाणी पुरवठा विभागातील कामासंदर्भात जेव्हा आम्ही यादी घेवुन पाणी पुरवठा विभागात जातो तेव्हा आम्हांस सांगितले जाते की या कामांसाठी निधी समायोजीत केला आहे किंवा नाही याची आम्हांला काही माहिती नाही. मग दिनांक १७/१/२००८ रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये जी चर्चा झाली होती आणि ठराव पारीत झाला होता तो काय देखावा होता काय? तसे असेल तर तेही सांगा.

**<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—</u>**श्री. सुरेश जाधव जे म्हणत आहेत ते बरोबर आहे. माझ्या प्रभागातील कामासंदर्भात मी जेव्हा पाणी पुरवठा विभागात गेलो होतो तेव्हा मला सुध्दा असेच उत्तर देण्यात आले होते.

**<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे) :—</u>**ठाणे लोकसभा मतदार संघाच्या पोटनिवडणुकीकामी अधिकारी, कर्मचारी व्यस्त होते. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग व पाणी पुरवठा विभागाच्या कामांमध्ये थोडी शिथीलता आली होती. निवडणूक प्रक्रिया आता पार पाडली असून आदर्श आचारसंहिता ही संपृष्टात आली असल्याने या दोन्ही विभागांमार्फत करावयाची आपल्या प्रभागातील कामे केली जातील.

**<u>सदस्य श्री. सुरेश जाधव:—</u>**सार्वजनिक बांधकाम विभागातील कामासंदर्भात आम्ही विचारच करु शकत नाही. परंतु पाणी पुरवठा विभागाची तरी कामे झाली पाहिजेत अशी आमची अपेक्षा आहे.

**<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे) :—</u>**आपली जी कामे आहेत ती केली जातील. त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करु. आवश्यक त्या उपाययोजना करु. जरुर पडल्यास अर्थसंकल्पीय तरतुद वाढवु. परंतु कामे करुन देवु. आपली कामे होतील.

**<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—</u>**प्राकलने तयार करण्यासाठी कुणी तयार नाहीत.

**<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे) :—</u>**आपणा सर्वांची जी नाराजी आहे ती दुर करु. जी कामे थांबली आहेत ती चालु करु. त्यासाठी अधिका—यांना सूचना देवु.

**<u>सदस्य श्री. सुरेश जाधव:—</u>**केवळ अधिका—यांना सूचना देवु नका, अधिकारी कामे करत नाहीत. म्हणुन तुम्ही स्वत: लक्ष घाला.

**<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—</u>**अधिका—यांना निर्देश दिले जावेत. त्याचबरोबर आयुक्तांनी स्वत: या कामांकडे लक्ष दयावे.

**<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे) :—</u>**मी सुध्दा अधिकारीच आहे ना?

**<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे:—</u>**पाण्याच्या बाबतीत तुम्ही स्वत: लक्ष घाला. आणि जी कामे प्रलंबित आहेत ती पुर्ण केली जावीत.

**<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे) :—</u>**पाण्याच्या बाबतीत मी सांगु इच्छितो की आता निधी उपलब्ध नाही. आज २८ मे रोजी ३१ मार्चचा विषय घेता येणार नाही. पाण्याच्याबाबतीत आता अर्थसंकल्पीय तरतुद वाढविता येणार नाही. तरतुद वाढविण्यासाठी आपणांस महासभेची मंजुरी घ्यावी लागेल. या वर्षीची अर्थसंकल्पीय तरतुद संपली असेल तर दुस—या लेखाशिर्षातुन रक्कमा समायोजित करुन निधी उपलब्ध करुन घेता येईल परंतु मागील वर्षाची अर्थसंकल्पीय तरतुद जर संपली असेल तर आजच्या तारखेला त्या लेखा शिर्षात रक्कम समायोजित करुन निधीत वाढ करता येण्यासारखे नाही.

**<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे:—</u>**जलवाहिनी टाकण्यासाठी निधी उपलब्ध नाही काय?

**<u>सदस्य श्री. प्रधान पाटील:—</u>**माझ्या प्रभागात सुध्दा अनेक वर्षापासुन जलवाहिन्या टाकलेल्या नाहीत.

**<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे) :—</u>**याबाबतीत आढावा घेवुन काम चालु करु.

**<u>सदस्य श्री. गोविंदराम लुंड:—</u>**माझ्या प्रभागातील कामासंदर्भात मी आपणांस सांगितले होते त्या संदर्भात आपण आपल्या अधिका—यांना आदेश सुध्दा दिले होते. परंतु ती कामे अदयाप झालेली नाहीत.

**<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे) :—</u>**जी कामे प्रलंबित आहेत ती लवकरात लवकर पुर्ण केली जातील.

**<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—</u>**शहरात पाण्याची फार मोठी समस्या निर्माण झाली आहे. नळांना पाणी येत नाही. टाकीतुन जेव्हा पाणी सोडले जाते तेव्हा केवळ दोन प्रभागांमध्ये नळाला पाणी येते. टॅकरद्वारे पाणी पुरवठा

करण्यासाठी आम्ही जी विनंती करतो तीची ही दखल घेतली जात नाही. अधिकारी आपल्या मर्जीनुसार पाणी पुरवठा करतात. श्री. जीवन इदनानी आणि माझ्या प्रभागामध्ये दोन दिवसापासुन पाणी येत नाही.

सदस्य श्री. जीवन इदनानी:–या अगोदर दिवसातुन दोन वेळा नळाला पाणी येत होते. त्यावेळेस आम्ही म्हटले होते की, दिवसातुन दोन वेळा पाणी देण्याऐवजी एकच वेळ पाणी पुरवठा करा. पण पुरेश्या दाबाने करा. परंतु आता तर दिवसातुन एक तास सुध्दा पाणी मिळत नाही. टाकीचा काटा खराब झाला आहे. त्यामुळे पाण्याची पातळी नेमकी किती आहे ते कळु शकत नाही. काटयाच्या दुरुस्तीबाबतीत कुणी लक्ष देत नाही. टाकी भरण्यासाठी रात्री दोन वाजेपर्यंत पंपींग होणे आवश्यक आहे. परंतु रात्री साठे आठ वाजताच पंपींग बंद करुन कर्मचारी निघुन जातात. पुरेश्या पंपींग अभावी पाणी पुरवठा योग्य प्रमाणात होत नाही.

सदस्य श्री. मोहन साधवानी:–कुणा कुणाच्या प्रभागामध्ये दिवसातुन तीन तीन वेळा पाणी येते. तर काही ठिकाणी दिवसातुन एक वेळ सुध्दा पाणी येत नाही. यासाठी ज्या ठिकाणी दिवसातुन तीन वेळा पाणी येते त्याठिकाणचा एक वेळचा पाणी पुरवठा कमी करुन ज्या ठिकाणी अजिबातच पाणी येत नाही त्याठिकाणी पाणी पुरवठा केला जावा. माझ्या प्रभागात एक वेळ सुध्दा पाणी येत नाही.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे) :– ज्या सूचना दिल्या आहेत त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यवाही करु. श्री. खडताळे साहेब, याबाबतीत काही अडचणी असतील तर सांगा. पाच मिनिटात टाकी भरली पाहिजे.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :– कोणत्यावेळी पाणी पुरवठा केला जाईल हे काही निश्चित केलेले नसल्याने पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी आपल्या मर्जीनुसार कोणत्याही वेळी पाणी पुरवठा करतात.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे) :–श्री. खडताळे साहेब, आज पाण्याची पातळी किती होती?

श्री. खडताळे (कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा):–एमआयडीसीकडुन पुरेशे पाणी न मिळाल्याने पाण्याची पातळी कमी होती.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–फक्त दोन मिटर चालु केले जातात. त्यामुळे सर्व ठिकाणी पाणी पोहचत नाही. जर आठ मिटर चालु केले तर सर्व ठिकाणी पाणी पोहचेल. माझ्या प्रभागात पाणी येत नाही. मी फोन केला असता मला असे सांगण्यात आले की, आम्हांला काही माहीती नाही.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे) :–उल्हासनगरमध्ये पाणी पुरवठया संदर्भात सर्वात महत्वाची समस्या म्हणजे 'असमान पाणी पुरवठा' असमान पाणी पुरवठा होता कामा नये. पाणी पुरवठयासंदर्भात एमआयडीसी कडून पाणी पुरवठा होतो त्याच्या काही अडचणी सूचना असतात त्या संदर्भात सदस्यांना अवगत करणे आवश्यक असते परंतु अधिकारी आणि सदस्य यांमध्ये कम्युनिकेशन गॅप आहे, एमआयडीसीकडुन पुरेश्या प्रमाणात पाणी पुरवठा झाला किंवा नाही याबाबत सदस्यांना अधिका–यांकडुन अवगत केले जात नाही.

सदस्य श्री. जीवन इदनानी:–टाकी भरली जात नाही. काही ठिकाणी टाकीला गळती आहे ती थांबवली जात नाही.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे) :–टाक्यांची दुरुस्ती करुन घ्या.

सदस्य श्री. गणपत एडके:–टाक्यांमध्ये वर्षानुवर्ष गळती आहे. त्यांची दुरुस्ती होत नाही. त्यासाठी नगरसेवकांना पैसे दयावे लागतात.

सदस्य श्री. जीवन इदनानी:–टाकीचा जो काटा खराब आहे त्याची लवकरात लवकर दुरुस्ती केली जावी.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–दिवसाआड टाक्या भरतात. टाकीची जागा टॅंकर भरण्यासाठीची नसून तेथे टॅंकर भरलेच कसे जातात? पहिल्या फेरीत टॅंकर भरुन दिल्यानंतर दुस–या वेळेस दुर्गंधीयुक्त दुषित पाण्याचा पुरवठा केला जातो. पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी काही विभांगामध्ये आपल्या मर्जीनुसार टॅंकर पाठवितात. व जेव्हा आम्हांस टॅंकरची आवश्यकता असते तेव्हा आम्हांस आमचे काम सोडुन त्यांच्याकडे जावे लागते.

**सदस्य श्री. गोविंदराम लुंड:—**याबाबतीत श्री. सेल्वन साहेबांना जेव्हा आम्ही फोन करतो तर ते ऐकुन घेत नाहीत. तसेच ते आयुक्तांच्या पत्राचा सुध्दा मान ठेवत नाहीत. माझ्या प्रभागात टॅकर पाठविण्यासाठी पत्र दिले आहे. परंतु त्यांनी त्या पत्राचा काही मान ठेवला नाही. आणि कित्येक वेळा सांगुन सुध्दा माझ्या प्रभागात पाण्याचा टॅकर पाठविला जात नाही.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—**माझ्या प्रभागात टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी दुस—या प्रभागाचे नगरसेवक पत्र पाठवितात परंतु तरीही माझ्या प्रभागात पाण्याचा टॅकर येत नाही.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे) :—**श्री. नरेंद्रकुमार ठाकुर हे वरीष्ठ नगरसेवक आहेत. व त्यांनी अधिकारी म्हणुनही येथे काम केलेले आहे. त्यांच्या प्रभागात पाण्याची टॅकर पाठविली पाहिजे. श्री. सेल्वन साहेब, पाण्याच्या बाबतीत राजकारण करु नका. आपणांस काही निवडणूक लढवायची नाही. आणि कुणालाही घाबरु नका.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—**माझ्या प्रभागातील पाणी पुरवठासाठी दुसरा नगरसेवक पत्र देत आहे.

सदस्य श्री. जीवन इदनानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

**सदस्य श्री. राजेश वानखेडे:—**दुसरा नगरसेवक कोण? त्याचे नाव सांगा. श्री. जीवन इदनानी पत्र देतात असे सांगा ना?

 सदस्य श्री. जीवन इदनानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. मोहन रामरख्यानी :—**मागील सभेचे दिनांक २३/४/२००८ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. १** :— मागील सभेचे दिनांक २३/४/२००८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नांव : श्री. मोहन साधवानी

**स्थायी समिती ठराव क्र. :—** १ अ    **दिनांक : २८/५/२००८**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक २३/४/२००८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ६ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

**एकमताने**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**प्र. महापालिका सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २** :— महापालिका कर्मचारी कै. श्री. प्रभाकर भांडारकर यांच्या निधनामुळे

त्यांच्या कुटुंबियास महापालिकेकडुन रुपये ५०,०००/– इतकी
आर्थिक मदत देण्यास मान्यता देणे.

---

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे:–</u>५० हजारापेक्षा जास्त रक्कम दिली पाहिजे.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे) :–</u>यासाठी आपण धोरण ठरविले पाहिजे. या अगोदर आपण दुस–यांना आपण ५०,५० हजारच दिलेले आहेत. इन्स्युरन्स कंपनीकडुन त्यांच्या कुटुंबियांना काही रक्कम मिळु शकेल.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे:–</u>आम्हांस असे माहित पडले आहे की अधिका–यांनी त्यास दिलेल्या कामाच्या अतिरिक्त ताणामुळे त्यांचा मृत्यु झाला आहे?

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>जी आर्थिक मदत दिली जाते ती ठराविक एका मर्यादिपर्यंत दिली जाते. त्यानुसार श्री. भांडारकर यांच्या कुटुंबियांना सुध्दा दिली जात आहे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>काही लोकांना आपण ५, ५ लाख रुपये दिले आहेत.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे:–</u>श्री. भांडारकर हे चांगले कर्मचारी होते.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे) :–</u>या अगोदर ज्या कुणाला आर्थिक मदत दिलेली आहे त्या सर्वांना ५०,५० हजारच रुपये दिले आहेत.

<u>काही सदस्य:–</u>पास,पास.......

<u>सभापती, श्री. मोहन रामरख्यानी :–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. २ :–** महापालिका कर्मचारी कै. श्री. प्रभाकर भांडारकर यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबियास महापालिकेकडुन रुपये ५०,०००/– इतकी आर्थिक मदत देण्यास मान्यता देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेतील नागरी सुविधा केंद्र येथे लिपिक म्हणून कार्यरत असलेले कै. श्री. प्रभाकर भांडारकर यांचे दिनांक २७/३/२००८ रोजी हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले असून भांडारकर कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे.

अशा परिस्थितीत त्यांचे कुटुंबियास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल कलम ६६ मधिल पोटकलम (१८) व (२५) अन्वये आर्थिक मदत देण्याची तरतुद आहे. त्या अन्वये महापालिका अर्थसंकल्प २००७–०८ मधील ई–संर्किर्ण (xvii) मधील तरतुदीनुसार भांडारकर कुटुंबियास उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे रु. ५०,०००/– (रुपये पन्नास हजार) इतकी आर्थिक मदत मिळणेस मान्यतेसाठी मा. स्थायी समितीपुढे प्रस्तावित करीत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. </u> २ <u>दिनांक:– २८/५/२००८</u>

सुचकाचे नाव :– श्री. हरेश जग्यासी

अनुमोदकाचे नाव :– श्री. नरेंद्र दवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महापालिका कर्मचारी श्री. प्रभाकर भांडारकर यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबियास महापालिकेकडुन रुपये ५०,०००/– इतकी आर्थिक मदत देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

प्र. महापालिका सचिव :– विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३ :–** श्री. संतोष रामा चव्हाण या अपंग व्यक्तीस काली माता चौक उल्हासनगर–४ याठिकाणी एस.टी.डी. बुथ चालविण्याकरीता परवानगी देणे.

---

सदस्य श्री. मोहन साधवानी :–या अगोदर ज्या ठिकाणी एसटीडी बुथसाठी परवानगी दिलेली आहे त्याठिकाणी किराणा मालाचे दुकान थाटण्यात आलेले आहे त्याचबरोबर कित्येक ठिकाणे अशी काही आहेत की ज्याठिकाणी दारु विक्री केली जाते.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–एसटीडी बुथसाठी जी परवानगी दिली जाते ती एक वर्षासाठी दिली जाते. त्यानुसार ज्यांची एक वर्षाची मुदत पुर्ण झालेली आहे त्यांचे परवानगीचे एकतर नुतनीकरण करण्यात यावे किंवा त्यांना दिलेली परवानगी रद्द करण्यात यावी.

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. मोहन रामरख्यानी :–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३ :–** श्री. संतोष रामा चव्हाण या अपंग व्यक्तीस काली माता चौक उल्हासनगर–४ याठिकाणी एस.टी.डी. बुथ चालविण्याकरीता परवानगी देणे.

प्रस्तावना

एस.टी.डी./पी.सी.ओ. बुथकरीता श्री. संतोष रामा चव्हाण राहणार बॅ. नं. ९३२, रुम नं. ८ च्या मागे, रविंद्र नगर, कुर्ला कॅम्प, उल्हासनगर–५ यांनी कालीमाता चौक जवळ, उल्हासनगर–४ या ठिकाणी मागणी केलेली आहे.

महानगरपालिका महासभा ठराव क्र. १६, दिनांक २०/०५/२००५ अन्वये अपंग व्यक्तींना एस.टी.डी./पी. सी.ओ. बुथ चालविणे प्रयोजनार्थ जागा उपलब्ध करुन देणेकामी भाडेपट्टयाची रक्कम, जागा निश्चितीचे निकष, भाडे पट्टयाचा कालावधी, अर्जदाराचे पात्रतेचे निकष जागा वितरणांची कार्यपध्दती व जागा वापरासंबंधीच्या अटी व शर्तीस मान्यता देण्यात आलेली आहे.

वरील ठरावाच्या अनुषंगारे श्री. संतोष रामा चव्हाण यांनी मागणी केलेप्रमाणे एस.टी.डी./पी.सी.ओ. बुथकरीता कालीमाता चौक जवळ, उल्हासनगर–४ या ठिकाणी प्रतिमाह रक्कम रु. १५०/– भाडे अनामत रक्कम रुपये १८००/– याप्रमाणे आकारणी करुन मान्यता देणेबाबत निर्णयासाठी मा. स्थायी समिती पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ३ दिनांक:– २८/५/२००८

सुचकाचे नाव :– श्री. राजेश वानखेडे

अनुमोदकाचे नाव :– श्री. सुरेश जाधव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार श्री. संतोष रामा चव्हाण या अपंग व्यक्तीस काली माता चौक उल्हासनगर–४ याठिकाणी एस.टी.डी./पी.सी.ओ. बुथ चालविणेकामी प्रतिमाह भाडे रु. १५०/– व अनामत रक्कम रुपये १८००/– याप्रमाणे आकारणी करुन जागा वापर परवाना देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र. महापालिका सचिव :– विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

काही सदस्य :–पास–पास......

---

**विषय क्र. ४ :–** शहरात विद्युत भारनियमामुळे प्रायोगिक तत्वावर स्वामी शांतीप्रकाश उदयान (नेताजी उदयान) येथे सौर पॉवर पॅक मार्फत दिवाबत्तीचे परीचालन करणे कामी अंदाजीत रक्कम रु. १,८७,५५६/– यांस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे व प्रशासनास मे. टाटा बीपी सोलर इंडिया लिमिटेड यांचे अधिकृत विक्रेते मे. संजय मार्केटींग, कल्याण कंपनी यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

---

सदस्य श्री. मोहन साधवानी :–मी श्री. मुकेश आयलानी यांचे अभिनंदन करतो. आणि त्याचबरोबर असेही सांगु इच्छितो की, नेताजी उदयानात ही जी व्यवस्था करण्यात आलेली आहे याप्रमाणे इतर उदयानांमध्ये सुध्दा व्यवस्था करण्यात यावी.

श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता, विद्युत):–ही व्यवस्था प्रायोगिक तत्वावर केली जात आहे. या ठिकाणी जर आपण यशस्वी ठरलो तर ही व्यवस्था इतर उदयांनामध्ये सुध्दा केली जाईल.

काही सदस्य :–पास, पास.......

सभापती, श्री. मोहन रामरख्यानी :– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ४ :–** शहरात विद्युत भारनियमामुळे प्रायोगिक तत्वावर स्वामी शांतीप्रकाश उदयान (नेताजी उदयान) येथे सौर पॉवर पॅक मार्फत दिवाबत्तीचे परीचालन करणे कामी अंदाजीत रक्कम रु. १,८७,५५६/– यांस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे व प्रशासनास मे. टाटा बीपी सोलर इंडिया लिमिटेड यांचे अधिकृत विक्रेते मे. संजय मार्केटींग, कल्याण कंपनी यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे.

प्रस्तावना

मागील काही वर्षापासून महाराष्ट्रात विज टंचाईमुळे भारनियमन लागू करण्यात आलेले आहे. त्यामुळे सांयकाळच्या भारनियमनाच्या वेळी रस्त्यावरील व उद्यानात दिवाबत्तीही बंद राहते. अंधारामुळे सार्वजनिक सुरक्षिततेला धोका निर्माण झालेला आहे.

महापालिकेने जेथे तांत्रिकरीत्या सोयीस्कर होते तेथे एक्सप्रेस फिडरची विजवाहीनी मधून विजचा पुरवठा केलेला आहे. परंतु प्रत्येक ठिकाणी अशी व्यवस्था करणे शक्य होत नाही.

यासाठी सौरऊर्जा वापरण्याचे विचार करुन अध्ययन करण्यात आले. यासाठी दोन पर्याय आहेत एक उद्यानात पॉवरपॅक बसवून आपल्या लावलेल्या पोलपर्यंत वायर खेचून दिवाबत्ती लावणे, दुसरे नविन सौर पथदिवे उभारणे.

**सौर पथदिव्यांची संरचना १२ तास रोषणाई करण्यानुसार आहे परंतु आपली गरज भार नियमनाच्या वेळी म्हणजे सांयकाळी ६.३० ते १०.३० च्या दरम्यान आहे. हे विचारात घेवून सौर पथदिव्यांच्या तुलनेत सौर पॉवरपॅक बसवून आपल्या लावलेल्या पोलपर्यंत वायर खेचून दिवाबत्ती लावणे फायदेशीर राहील त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.**

१. हे उपकरण आपले आहे त्या संरचनेचा (Set up) भाग म्हणून वापरता येते. यामुळे जेव्हा पाहिजे तेव्हा व जेव्हा पाहिजे तीथे या उर्जेचा उपयोग करता येतो.
२. नविन प्रकारचे कोणतेही बांधकाम करणे व खोदणे हे प्रकार टाळता येतात.
३. सौर पथदिव्यांना असलेल्या पॅनलवर उदयानात असलेल्या झाडांमुळे सुर्यप्रकाश अडतो. मात्र या (सिस्टीम) पॅनलला आपण ज्या ठिकाणी सावली येत नाही अशा ठिकाणी उभे करुन त्याचा वापर करु शकाते.
४. यांचा सफाई व देखभाल करणे अधिक सोपे आहे कारण पॅनल व बॅटरीच्या तुलनेत (सौर पथदिव्यांच्या) कमी उंचीवर असतात.
५. समजा बॅटरी सुर्यप्रकाशाने चार्ज होत नसलयास विद्युत उर्जेवर बॅटरी चार्ज करण्याचीही सुविधा सौरपथदिव्यांमध्ये नसते परंतु ती सुविधा सौर पॉवरपॅक मध्ये लावलेल्या बॅटरीत होवू शकते.
६.

## सौर पॉवरपॅक मार्फत दिवाबत्तीचे परिचालन:—

सुर्याचे किरण सौर पॅनलवर पडल्यावर विज उत्पन्न होते. जी विद्युत घरांमध्ये (बॅटरी) साठवली जाते. ही साठविलेली उर्जा आपण पुनर्वापरासाठी इन्व्हर्टरच्या माध्यमातून दिवाबत्तीला दिली जाते.

सौर पॅनल व बॅटरीमध्ये चार्जर रेग्युलेटर वापरला जातो. जो जास्तीत जास्त उर्जा बॅटरीत साठवतो. तसेच तो बॅटरीत अतिरिक्त भरणे व संपविणे (Charge & Discharge) होण्यापासून देखिल वाचवितो सौर उर्जा मोठयाप्रमाणात मिळत नसल्यास साध्या इन्व्हर्टरप्रमाणे यास चार्जींगची देखील सोय आहे.

## सौर पॉवरपॅक मार्फत चालविण्यात येणा—या दिवाबत्तीचे वैशिष्टे :—

१. स्वच्छ व नैसर्गिक उर्जा स्त्रोत
२. प्रदुषण विरहित
३. अत्यंत खत्रिलायक व सुरळीत उर्जेचा स्त्रोत
४. सौर पॅनलची २५ वर्षापेक्षा जास्त चालविण्याची क्षमता
५. बसविण्यास सोपे, छतावर/मैदानात कोठेही बसविता येवू शकते.
६. फिरते वस्तु (पार्ट) नसल्यास देखभाल अत्यंत कमी
७. जेथे तयार होते तेथेच वापरण्याची सोय
८. मिळणारी विज ही अत्यंत उत्तम प्रकारची असते ज्यात वारंवारता (Frequency) व व्होल्टेजसारखे राहते.
९. पर्यायी उर्जा जी संपत चाललेल्या तेल व कोळसा यांना उत्तम पर्याय
१०. विज दर वाढीचा धोका नाही
११. कमीत कमी देखभालीत जास्तीत जास्त आयुष्य
१२. विज जाण्याच्या समस्येवर उपाय
१३. सर्वात महत्वाचे म्हणजे पर्यावरणाच्या दृष्टीने सर्वात लाभदायक (No. C02, S03)

वरील सर्व बाबींचा विचार करुन प्रायोगिक तत्वावर स्वामी शांतीप्रकार उद्यान (नेताजी उद्यान) येथे सौर पॉवरपॅक मार्फत दिवाबत्तीचे परिचालन करण्याकरीता टाटा बीपी सोलार इंडिया यांचे मार्फत प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे. त्यांनी रुपये १८७५५६/— चे खर्च या कार्यासाठी सुचविले आहे.

मे. टाटा बीपी सोलार इंडिया लिमिटेड ही सौर उर्जाक्षेत्रात नामवंत संस्था आहे त्यांनी सुचविलेल्या त्यांच्या अधिकृत विक्रेते मे. संजय मार्केटींग कंपनी, कल्याण यांच्या मार्फत प्रायोगिक तत्वावर एका उदयान मे. स्वामी शांती प्रकाश उद्यान (नेताजी उद्यान) उल्हासनगर ४/५ येथे त्यांच्याकडुन काम करुन घेणे रास्त राहील.

वरील सर्व बाबी लक्षात घेता प्रायोगिक तत्वावर स्वामी शांती प्रकाश उदयान (नेताजी उदयान), उल्हासनगर ४/५ येथे सौर पॉवरपॅक मार्फत दिवाबत्तीचे परिचालनास लागणारा खर्च रु. १८७५५६/— यांस मान्यता देवुन मे. टाटा बीपी सोलार इंडिया लिमिटेड यांचे अधिकृत विक्रेते मे. संजय मार्केटींग कंपनी, कल्याण यांचेशी निविदा न मागविता थेट संविदेस मान्यतेसाठी स्थायी समिती पटलावर सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ४ दिनांकः— २८/५/२००८

सुचकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार शहरात विद्युत भारनियमामुळे प्रायोगिक तत्वावर स्वामी शांतीप्रकाश उदयान (नेताजी उदयान) येथे सौर पॉवर पॅक मार्फत दिवाबत्तीचे परीचालन करणे कामी रु. १,८७,५५६/— खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे व प्रशासनास मे. टाटा बीपी सोलर इंडिया लिमिटेड यांचे अधिकृत विक्रेते मे. संजय मार्केटींग कंपनी, कल्याण यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र. महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ५** :—जिजामाता उदयान या ठिकाणी कारंजे बसविणे व विदयुत व्यवस्था करणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. मोहन रामरख्यानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ५** :— जिजामाता उदयान या ठिकाणी कारंजे बसविणे व विदयुत व्यवस्था करणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

प्रस्तावना

सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी जिजामाता उद्यान, वार्ड क्र. ५१, उल्हासनगर–४ या ठिकाणी कारंजे व धबधबा उभारणेचे स्थापत्य काम सुरु केलेले आहे. तसेच विद्युतीकरण बाबतचे कार्य करण्यासाठी विद्युत विभागास कळविलेले आहे. जागेची पाहणी केली असता असे निदर्शनास आले की स्थापत्य कामा सोबत विद्युत तारा टाकणे आवश्यक आहे अन्यथा स्थापत्य काम मध्ये मध्ये बंद करावे लागेल किंवा स्थापत्य काम झाल्यानंतर विद्युत कामासाठी तोडफोड करावी लागेल. जेणेकरुन महापालिकेचे नुकसान होण्याची शक्यता आहे. यानुसार रु. १५,६२,०००/– चे अंदाजपत्रक तयार केलेला आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेवुन प्रकालनास मान्यता देवुन निविदा मागविण्यास परवानगी मिळावी. योग्य त्या मान्यतेसाठी स्थायी समितीच्या पटलावर प्रस्ताव सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ५ दिनांक:– २८/५/२००८

सुचकाचे नाव :– श्री. राजेश वानखेडे

अनुमोदकाचे नाव :– श्री. सुरेश जाधव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार जिजामाता उदयान या ठिकाणी कारंजे बसविणे व विदयुत व्यवस्था करणेकामी रू.१५,६२०००/– खर्चाचें प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र. महापालिका सचिव :– विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ६** :– भांडार विभागास सन २००८–०९ करीता स्टेशनरी साहित्य पुरविणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

सदस्य श्री. जीवन इदनानी :–महापालिकेत तर कुठलेही काम होत नाही. तरी सुध्दा स्टेशनरीची आवश्यकता आहे का?

सदस्य श्री. राजेश वानखेडे :–काम होवो अगर न होवो स्टेशनरीची आवश्यकता तर असतेच ना?

काही सदस्य :–पास–पास......

सभापती, श्री. मोहन रामरख्यानी :–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ६** :– भांडार विभागास सन २००८–०९ करीता स्टेशनरी साहित्य पुरविणेकामी प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

प्रस्तावना

भांडार विभागामार्फत महापालिकेतील सर्व विभाग व प्रभाग समिती कार्यालये तसेच मा. महापौर, मा. उप–महापौर, स्थायी समिती व इतर सर्व गटनेता, सभापती, समित्यांची कार्यालये यांना स्टेशनरी व इतर साहित्यांचा पुरवठा करण्यात येतो. त्यानुसार भांडार विभागास सन २००८–०९ या वर्षाकरीता वार्षिक स्टेशनरी व इतर साहित्यांची खरेदी निविदाद्वारे करणे आवश्यक आहे.

तरी सन २००८–०९ या वर्षाकरीता स्टेशनरी व इतर साहित्य निविदेद्वारे खरेदीसाठी अंदाजे रुपये १५,५०,०००/– (अक्षरी रु. पंधरा लाख पन्नास हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चाची तरतुद महापालिका अंदाजपत्रकातील स्टेशनरी A-3(i) या लेखाशिर्षात रक्कम रुपये १८,००,०००/– (अक्षरी रुपये अठरा लाख मात्र) तरतुद करण्यात आलेली आहे.

सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मान्यतेकरीता सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ६ दिनांकः– २८/५/२००८

सुचकाचे नाव :– श्री. रामसागर यादव

अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रधान पाटील

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार भांडार विभागास सन २००८–०९ या वर्षाकरीता स्टेशनरी व इतर साहित्य खरेदी करण्याकामी रुपये १५,५०,०००/– च्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र. महापालिका सचिव :– विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ७ :– किटकनाशक/जंतुनाशक सोल्युशन पावडर पुरविणे कामी न्युनत्तम दरांच्या निविदाकारांशी संविदेस मान्यता देणे.

---

प्र. महापालिका सचिव :–माहितीसाठी आहे.

सदस्य श्री. जनार्दन यादवः–ही किटकनाशके कुठे मिळतात? आमच्या प्रभागात तर मिळतच नाहीत.

सदस्य श्री. राजु जग्यासीः–कोणकोणती किटकनाशके आहेत? फक्त पावडर आहे की आणखी काही किटकनाशके आहेत?

डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त, आरोग्य):– बायोकल्चर पावडर, नॉन इडिबल पावडर, मिनरल पावडर, वेस्ट ट्रिट पावडर, सेप्टो–क्लीअर इत्यादी पावडर्स आहेत.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–या सर्व ज्या पावडर्स आहेत त्या ओरिजनल आहेत की डयुप्लीकेट आहेत?

डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त, आरोग्य):–कंपनीचा माल आहे.

सदस्य श्री. सुरेश जाधवः–साहित्य खरेदीबाबत स्थायी समितीपुढे जेव्हा जेव्हा विषय येतात तेव्हा तेव्हा आम्ही सदर साहित्याच्या नमुन्याची मागणी करत असतो. नमुना दाखविण्याची मागणी करत असतो परंतु आपण तो दाखवतच नाहीत. हे काही साहित्य पुरविले जाते त्याच्या पॅकिंगवर आयएसओ मार्क वगैरे असे काही छापलेले असते. परंतु तो माल प्रत्यक्षात आपल्या उल्हासनगरमध्येच तयार झालेला असतो.

**सदस्य श्री. राजु जग्यासी:**—हे जे काही किटकनाशक, जंतुनाशक पावडर किंवा साहित्य येते, ते पावडर स्वरुपात असते की द्रवस्वरुपात असते व त्याचे वितरण कसे केले जाते?

**डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, आरोग्य):**—तरणतलावाशेजारी असलेल्या आरोग्य विभागाच्या मध्यवर्ती भांडार विभागात हे साहित्य ठेवलेले असते. तेथुन प्रत्येक स्वच्छता निरिक्षकास त्यांचे मुकादमांमार्फत हे साहित्य पाठविले जाते.

**काही सदस्य :**—पास—पास......

**सभापती, श्री. मोहन रामरख्यानी :**—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ७ :**— किटकनाशक/जंतुनाशक सोल्युशन पावडर पुरविणे कामी न्युनत्तम दरांच्या निविदाकारांशी संविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

डंपिंग ग्राउंडवरील परीसरातील नागरीकांच्या वारंवार दुर्गंधी व त्यामुळे निर्माण होणा—या माशांबाबत नियीमत तक्रारी येत असतात. त्यामुळे नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने डंपिंग ग्राउंड वरील नियमीत येणा—या दुर्गंधी व कच—याच्या ढिगा—याबाबत तक्रारींचे निवारण करण्यासाठी व सार्वजनिक शौचालयांच्या सेप्टीक टॅकमध्ये गाळ, मैल जाम होत असल्याने शौचालय सफाईसाठी आवश्यक क्लीनींग पावडर पुरवठा करुन घेण्यासाठी मा. आयुक्त यांनी दिनांक १०/३/०८ रोजी बायोकल्चर व सेप्टीक टॅक क्लीनींग पावडरचे दर मागविण्यासाठी निविदा सुचना प्रसिध्द करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार दि. १३/३/२००८ रोजी प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार नुसार दिनांक २४/३/०८ रोजी प्राप्त झालेल्या निविदाधारकांच्या निविदा दि. २५/३/०८ रोजी दुपारी ३.०० वाजता मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक व उप—आयुक्त (आरोग्य) व निविदा धारक यांच्या प्रतिनीधींसमोर निविदा उघडण्यात आल्या. प्राप्त झालेल्या निविदाधारकांपैकी मे. श्रीजी कृपा इंटरप्राईझेस यांनी आवश्यक कागदपत्रे जोडली नसल्याने त्यांचा लिफाफा क्र. २ उघडण्यात आला नाही. तरी प्राप्त पात्र असलेल्या निविदाधारकांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ. क्र. | किटक/जंतूनाशक, सोल्युशन, पावडरचे नाव | आवश्यक परिमाण | निविदा सादर करणा—या निविदाधारकाचे नाव व त्यांचे प्राप्त दर | | | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे.मित्र हर्बल | मे.रॉयल इंटरप्राईझेस | मे.सुमती इंटरप्राईझेस | |
| १ | बायोकल्चर पावडर, किंवा तत्सम्. (आवश्यक घटक — नॉन इडिबल पावडर, मिनरल पावडर, कल्चर ॲझोटो बॅक्टर—लिगनीग डिग्रेबल बॅक्टेरीया) | ४००० किलो | <u>७२</u> | ९५ | १०५ | २,८८,००० |
| २ | वेस्ट ट्रिट पावडर, किंवा तत्सम् (आवश्यक घटक— सिलीकेट पावडर, झेडबेस पावडर, एन्टीसेप्टीक पावडर, मिनरल पावडर) | ४००० किलो | <u>६५</u> | ९३ | ९५ | २,६०,००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | सेप्टो–क्लीअर–अे,सी,पावडर सेप्टीक टॅंक साठी कंटीन्युअल डीओडराइझर, किंवा तत्सम्.(आवश्यक घटक– Rhodospririlum Rubrum, Emolients) | ३०० किलो | ५७० | ५६२ | ६०० | १,६८,६०० |
| ४ | सेप्टो–क्लीअर–बी, लिक्वीड सेप्टीक टॅंक साठी कंटीन्युअल डीओडराइझर, किंवा तत्सम् (आवश्यक घटक– Aspergilus Niger, Emolients) | ३०० लिटर | ५८२ | ५५२ | ६०५ | १,६५,६०० |
| | **एकूण रक्कम रुपये** | | | | | ८,८२,२००/– |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार अ.क्र. १,२ या करीता मित्र हर्बल, डोंबिवली यांनी सर्वात कमी दर सादर केले आहेत. तसेच अ.क्र. ३,४ या करीता मे. रॉयल इंटरप्राईझेस, मुंबई यांनी सर्वात कमी दर सादर केले आहेत. तरी वरील नमुद सोल्युशन व पावडर खरेदीकरीता अदांजीत एकूण रू ८,८२,२०० /– (आठ लाख ब्याऐंशी हजार दोनशे मात्र.) खर्च होणार असुन न्युनतम दराच्या निविदाकारांशी संविदा करण्यात आलेली आहे.

तद्नंतर सदरचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा. स्थायी समिती समोर माहितीकरिता सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** ७ **दिनांकः– २८/५/२००८**

सुचकाचे नाव :– श्री. प्रधान पाटील

अनुमोदकाचे नाव :– श्री. गणपत एडके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार किटकनाशक/जंतुनाशक सोल्युशन पावडर पुरविणे कामी प्रशासनाने बाबनिहाय न्युनतम दरांच्या निविदाकारांशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**प्र. महापालिका सचिव :–** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :–** उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील एकुण ७६ प्रभागातील लहान–मोठे नाले सफाईकामी प्रभाग क्र. १ ते ७६ साठी प्रत्येकी १० कामगार असे एकुण ७६० हंगामी कामगार नेमणुकीस मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. मोहन साधवानी :–**महागाई वाढत आहे. गोषवा–यामध्ये दर्शविलेल्या १२५ रुपये हा दर अतिशय कमी आहे. १२५ रुपये रोजावर कुणीही काम करण्यास येणार.

**सदस्य श्री. सुरेश जाधव:–**कमीत कमी १५० रुपये रोज करा.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे) :–**किमान वेतन दरा नुसार हा रोज निश्चित करण्यात आलेला आहे. मागील वर्षी तर १०० रुपयेच होता.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**१५० रुपये करा. नाक्यावर जे बिगारी कामगार असतात ते १५० रुपये रोज घेतात. १५० रुपयाच्या खाली काम करण्यास कुणीही कामगार मिळणार नाही.

**सदस्य श्री. गोविंदराम लुंड:—**हंगामी सफाई कामगारांची वर्षातुन दोन वेळेस नियुक्ती केली पाहिजे. पावसाळयापुर्वी ४५ दिवसासाठी व दिवाळीच्या वेळेस १५ दिवसासाठी.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**साहेब, १५० रुपये नाही तर कमीत कमी १४० रुपये तरी करा. १९९७ पासुन आतापर्यंत आपण १०० रुपये देत आलो आहोत.

**सदस्य श्री. जीवन इदनानी:—**या प्रस्तावातच दिवाळीसाठी १५ दिवस हंगामी कामगार नेमण्याचा प्रस्ताव समाविष्ट केला जावा. नाहीतर नंतर दुस—या निवडणूकीची तयारी सुरु होईल, आणि आदर्श आचारसंहिता लागु झाल्यानंतर मंजुरी मिळवुन घेण्याचे राहुन जाईल आणि मग सर्व कामे ठप्प होवुन जातील.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**असे पाहण्यात आले आहे की, या कामगारांना तीन तीन महिन्यापर्यंत पगार मिळत नाही. काम पुर्ण होताच यांना पगार मिळाला पाहिजे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. मोहन रामरख्यानी :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ८ :—** उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील एकुण ७६ प्रभागातील लहान—मोठे नाले सफाईकामी प्रभाग क्र. १ ते ७६ साठी प्रत्येकी १० कामगार असे एकुण ७६० हंगामी कामगार नेमणुकीस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

जून मध्ये सुरु होणा—या मान्सूनपूर्वी शहरामधील मोठे व प्रमुख नाले यांची प्राक्लेन व जेसीबी मशिनमार्फत तसेच इतर नाल्याची सफाई रोजंदारीवर कामगार नेमून दरवर्षी नाला सफाई करणेत येते. यंदाही शहरातील मान्सून पूर्व नाला सफाई काम वेळेवर होणे अत्यावश्यक आहे.

पावसाळयात अतिवृष्टीमुळे पुराचे पाणी शहरातील खोलगट भागात साचु नये, पुरामुळे शहराती नागरीकांची वित्तहानी व प्राण हानी होऊ नये, तसेच पावसाळयात रोगराई होऊ नये म्हणून महानगरपालिकेला दरवर्षी पावसाळयापूर्वी शहरातील लहान—मोठे नाल्यांची सफाईचे कामे चांगल्या प्रकारे करुन घ्यावी लागतात. सदर नाल्यांची सफाईची कामे महानगरपालिकेला जादा कामगार नेमुन अथवा ठेकेदार नेमून नाला सफाईची कामे प्रतिवर्षी पावासाळयापुर्वी करुन घ्यावी लागतात. परंतु यावर्षी ठाणे लोकसभा पोटनिवडणूक असल्याने आदर्श आचार संहिता लागू होती. त्यामुळे सदर हंगामी कामगार नेमणुकीस उशिर झालेला आहे.

मागील सालानुसार यावर्षीही उल्हासनगर महानगरापलिका हद्दीतील एकुण ७६ प्रभागातील लहान, मोठे नाले सफाईसाठी प्रभाग क्र. १ ते ७६ साठी प्रत्येकी १० कामगार असे एकुण ७६० हंगामी कर्मचारी नेमणुक करणे आवश्यक आहे. मागील वर्षी प्रति कामगारांची प्रतिदिन रुपये १००/— या दराने नेमणुक करण्यात आली होती. परंतु सहाय्यक कामगार आयुक्त यांनी दिलेल्या किमान वेतन दरानुसार प्रतिदिन प्रति हंगामी कामगारास रुपये १२५/— वेतन देणे आवश्यक आहे. त्यानुसार वेतन अदा केल्यास ७६० हंगामी कामगार ४५ दिवसांसाठी त्यांच्या वेतनापोटी एकुण रुपये ४२,७५,०००/— (बेचाळीस लाख पंच्चाहत्तर हजार मात्र) खर्च अपेक्षीत आहे. नेमणुक केलेल्या कर्मचा—यांनी सर्व साहित्यासह (उदा. फावडे,घमेला,टिकाव,पहार इत्यादी) घेऊन येणे आवश्यक राहील.

त्यासाठी **लेखाशिर्षक ड (iv) नाला व गटार सफाई खर्च** २००८—२००९ या कामी अंदाज पत्रकात रु. ८०,००,०००/— तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी शहरातील लहान / मोठे नाले सफाई कामासाठी हंगामी सफाई कामगारांच्या नेमणुकीस व हंगामी कामगारांच्या ४५ दिवसांच्या वेतनापोटी एकूण रुपये ४२,७५,०००/— (बेचाळीस लाख पंच्चाहत्तर हजार मात्र) खर्चास मा. स्थायी समितीची वित्तीय व प्रशासकिय मान्यता देण्याची शिफारस आहे.

सभेतील चर्चेअंती वाढती महागाई लक्षात घेता प्रत्येक हंगामी सफाई कामगारास प्रतिदिनी रुपये १४०/— वेतन देण्यात यावे असे निर्देशित करण्यात आले.

स्थायी समिती ठराव क्र. ८ दिनांक:— २८/५/२००८

सुचकाचे नाव :— श्री. प्रधान पाटील

अनुमोदकाचे नाव :— श्री. हरेश जग्यासी

ही स्थायी समिती वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील एकुण ७६ प्रभागातील लहान—मोठे नाले सफाईकामी रुपये १४०/— प्रतिदिन या दराने ४५ दिवसांकरिता प्रभाग क्र. १ ते ७६ साठी प्रत्येकी १० कामगार असे एकुण ७६० हंगामी सफाई कामगार नेमणुकीस व वेतनापोटीचे रू.४७,८८,०००/— खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र. महापालिका सचिव :— विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९** :— उल्हासनगर कॅम्प नं. १ ते ५ मधील रस्त्यांची पावसाळयापुर्वी/ पावसाळयामध्ये व पावसाळयानंतर देखभाल व दुरुस्ती करण्याकामी रुपयें ९९,९३,९५०/— चे प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

---

सदस्य श्री. राजु जग्यासी:—ज्या रस्त्यांवरील खड्डे भरावयाचे आहेत त्या रस्त्यांची क्षेत्र निहाय यादी गोषवा—यासोबत दिलेली नाही. याबाबतीत आपण नगरसेवकांशी सल्लामसलत केलेली आहे काय?

श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—शहरामधील बहुतांश रस्त्यांमधील खड्डे मागील वर्षी भरण्यात आलेली आहेत. त्यामुळे आजच्या तारखेला जे रस्ते चांगल्या स्थितीत आहेत ते सोडुन ज्या रस्त्यांवर खुप खड्डे आहेत. अशा रस्त्यांची प्रभागक्षेत्र निहाय यादी तयार करुन आपणासमोर सादर केलेली आहे.

सदस्य श्री. राजु जग्यासी:—रस्त्यांची जी कामे केली जातात त्या कामाची हमी किती कालावधीची असते. ते रस्ते किती काळ टिकुन राहतील? त्या रस्त्यांची टिकुन राहण्याची हमी किती आहे?

श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—या अगोदर निविदा मागवुन जी कामे केली जात होती त्या कामांची हमी ६ महिन्याच्या कालावधीची असायची. एकात्मिक रस्ते विकास योजनेअंतर्गत ज्या रस्त्यांची कामे केली जातात त्या कामांची हमी दोन वर्षाची असते. ज्या रस्त्यांची कामे करणार आहोत ते रस्ते पुन्हा पुन्हा येणार नाहीत.

सदस्य श्री. गोविंदराम लुंड:—टेलिफोनवाल्यांनी केबल टाकण्यासाठी रस्ता खोदलेला आहे त्याची दुरुस्ती करावी लागेल. त्याबाबत मी पत्र सुध्दा दिलेले आहे.

सदस्य श्री. जीवन इदनानी:—रस्ते खोदाई तीन प्रकारे होत असते. एकतर टेलिफोनवाले रस्ते खोदतात त्याचबरोबर पाणी पुरवठा विभागाचे लोक जलवाहिनी टाकण्यासाठी रस्ता खोदतात. या व्यतिरिक्त परवानगी न घेता रस्ते खोदतात. या विषयाच्या गोषवा—यासोबत जी रस्त्यांची यादी देण्यात आलेली आहे त्या यादीमध्ये ज्या

सदस्यांच्या प्रभागातील रस्त्यांचा उल्लेख आलेला नाही अशा सदस्यांना विचारणा करुन जे काही रस्ते समाविष्ट करावयाचे राहुन गेले असतील ते रस्ते समाविष्ट केले जावेत.

सदस्य श्री. राजेश वानखेडे:—हे जे रस्ते आपण तयार करणार आहोत यामध्ये मुख्य रस्ते समाविष्ट केले आहेत. परंतु कुर्ला कॅम्प येथुन अंबरनाथकडे जो रस्ता जातो त्या रस्त्याचे काम यामध्ये का घेतले नाही? तो मुख्य रस्ता नाही का? तो रस्ता आपण कधी पाहिला आहे काय? तीस वर्षात येथे कधी काम झालेले नाही.

सदस्य श्री. राजु जग्यासी:—ज्या ठेकेदारांनी सहा महिने अगोदर रस्त्यांचे काम केलेले आहे त्यांना पुन्हा रस्त्यांचे काम देता कामा नये. त्या रस्त्यांवर पुन्हा पुन्हा खड्डे पडत आहेत. त्या रस्त्यांचा या यादीमध्ये पुन्हा समावेश केला जावु नये.

श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—पावसाळयापुर्वी रस्त्यातील खड्डे भरले जातात. टेलिफोन विभाग व पाणी पुरवठा विभागाने खोदलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरुन पुर्नपुष्ठांकन करणे आवश्यक आहे. नाहीतर पावसाळयामध्ये या रस्त्यांचा सध्याचा पृष्ठभाग उखडुन रस्त्यांमध्ये मोठ मोठे खड्डे पडतील. पावसाळयानंतर पुर्नपृष्ठांकनाचे काम चालु केले जाते.

सदस्य श्री. रामसागर यादव:—सी ब्लॉक येथिल रस्त्यावर फार खड्डे पडले आहेत त्या रस्त्यासाठी काही तरतुद केली आहे किंवा नाही?

सदस्य श्री. राजेश वानखेडे/ सदस्य श्री. सुरेश जाधव:—कुर्ला कॅम्प पासुन जकात नाक्याकडे रस्ता येतो आणि तेथुन तो अंबरनाथकडे जातो. हा रस्ता अतिशय खराब आहे. हा रस्ता यादीमध्ये समाविष्ट आहे किंवा नाही?

श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—तो संपुर्ण रस्ता नविन तयार करावा लागेल. प्रवेशद्वारापासुनचा जो रस्ता आपण सांगत आहात तो पुर्णच्या पुर्ण रस्ता नव्याने तयार करावा लागेल.

सदस्य श्री. जीवन इदनानी:—याबाबतीत आजच्या सभेतच चर्चा करुन हा मुद्दा निर्णयीत काढा.

श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—रस्त्यांची ही यादी आम्ही प्रस्तावित केली आहे. त्यामध्ये आपणांस काही रस्ते समाविष्ट करायचे असतील तर ते करु शकता. या कामांसाठी एक कोटी रुपयांची तरतुद करण्यात आलेली आहे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी:—यादीतील अनु.क्र. १७ वर जी नोंद आलेली आहे ती जरा वाचुन पहा. तो विभाग उल्हासनगर कॅम्प नं. ३ मध्ये येतो की ४ मध्ये? कॅम्प नं. ३ ऐवजी कॅम्प नं. ४ अशी नोंद आली पाहिजे.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—तो विभाग कॅम्प नं. ४ मध्ये येतो. कॅम्प नं. ३ ऐवजी ४ अशी दुरुस्ती केली जावी.

सदस्य श्री. मोहन साधवानी:—ज्या रस्त्यांची आवश्यकता नाही असे रस्ते वगळुन त्याठिकाणी दुसरे रस्ते समाविष्ट केले जावेत. रस्त्यांच्या यादीतील अनु. क्र. २७ वर दर्शविलेल्या रस्त्याची यापुर्वी दुरुस्ती करण्यात आलेली आहे. त्यामुळे हा रस्ता वगळला जावा.

सदस्य श्री. जीवन इदनानी:—आपण फक्त प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देवु या. जे रस्ते तयार करायचे आहेत ते श्री. शिर्के व आयुक्त साहेब ठरवतील.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—फक्त प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देवु या. कोणते रस्ते बनवायचे ते श्री. शिर्के व आयुक्त साहेब ठरवतील.

श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—आम्ही प्रभाग समिती निहाय रस्त्यांची यादी प्रस्तावित केलेली आहे.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. मोहन रामरख्यानी :—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ९ :—** उल्हासनगर कॅम्प नं. १ ते ५ मधील रस्त्यांची पावसाळयापुर्वी/ पावसाळयामध्ये व पावसाळयानंतर देखभाल व दुरुस्ती करण्याकामी रुपयें ९९,९३,९५०/— चे प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरामध्ये असलेल्या डांबरी रस्त्यांची दरवर्षी पावसाळयापूर्वी, पावसाळयांमध्ये व पावसाळयानंतर दुरुस्ती करण्यात येते. उल्हासनगर शहरामधील बहुतांशी रस्त्यांमधील खड्डे मागील वर्षी भरण्यात आलेले आहेत. व ते टिकून आहेत. काही रस्त्यांमध्ये खड्डे पडलेले नाहीत परंतू त्यांचा पृष्ठभाग खडबडीत झालेला आहे. काही रस्ते यापूर्वी खड्डे भरल्यामुळे पृष्ठभाग समतल न राहिल्यामुळे ओबडधोबड दिसतो. परंतू यापैकी जे रस्ते एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प —I मधील आहेत व इतर काही प्रमुख रस्ते आहेत त्यामधील असलेले तुरळक खड्डे, टेलीफोन विभाग व पाणी विभागाने खोदलेले खंदकभरुन पुर्नपृष्ठांकन करणे आवश्यक आहे. नाही तर पावसाळयामध्ये या रस्त्यांचा सद्याचा पृष्ठभाग उखडून रस्त्यांमध्ये खड्डे पडतील. एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प — I मधील रस्त्यांचे २००१ ते २००२ पर्यंत डांबरीकरण झालेले होते. सद्यस्थितीत त्यांचे पुर्नपृष्ठांकन करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे काही मोजक्याच रस्त्यांमध्ये खडड्‌ भरणे व पुर्नपृष्ठांकन करणे प्रस्तावित आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या क्षेत्रनिहाय अशा रस्त्यांची प्राकलने तयार केलेली आहेत. त्यांची यादी सोबत जोडलेली आहे. त्याप्रमाणे प्रत्येक क्षेत्र निहाय खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

क्षेत्र क्र.१ मध्ये एकूण रु. २३,८३,१००/— खर्चाची कामे प्रस्तावित

क्षेत्र क्र.२ मध्ये एकूण रु. ३०,१३,२००/— खर्चाची कामे प्रस्तावित

क्षेत्र क्र.३ मध्ये एकूण रु. २५,७२,४५०/— खर्चाची कामे प्रस्तावित

क्षेत्र क्र.४ मध्ये एकूण रु. २०,२५,२००/— खर्चाची कामे प्रस्तावित

उपरोक्त खर्चाकरीता उल्हासनगर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातील लेखाशिर्षात 'अ' अंदाजपत्रक भाग—१ क ५ (ii) 'रस्ते दुरुस्ती' या लेखा शिर्षामध्ये एकूण रु. १.०० कोटी इतकी तरदू उपलब्ध आहे.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे क्षेत्र निहाय एजन्सी नेमून कामाची जलद रित्या कार्यवाही करणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे प्रत्येक क्षेत्रनिहाय निविदा काढून निम्न दरावरील निविदाकारासोबत संविदा करण्यास व निविदा दराप्रमाणे कामावरील खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी या दोन्ही बाबींची मान्यता स्थायी समितीकडून मिळणेस प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ९ दिनांक:— २८/५/२००८

-

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. गोविंदराम लुंड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर कॅम्प नं. १ ते ५ मधील रस्त्यांवरील पावसाळयापुर्वी, पावसाळयामध्ये व पावसाळयानंतर खड्डें भरणे व रस्त्यांची देखभाल, दुरुस्ती करण्याकामी रुपयें ९९,९३,९५०/— च्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**प्र. महापालिका सचिव :–** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १० :–** पावसाळयापूर्वी प्रोक्लेन मशिनद्वारे लहान–मोठया नाल्यांची सफाई करणे व निघालेल्या गाळाची डंम्परद्वारे डंपिंग ग्राउंडवर वाहतूक करण्याकामी मेसर्स ईगल कंन्स्ट्रक्शन कंपनी या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. किशोर जग्यासी:–**ही ईगल कंन्स्ट्रक्शन कंपनी तीच आहे जिला टॅंकरद्वारे पाणी पुरवठयाचे काम दिले होते जी संस्था ते काम करण्यास अयशस्वी ठरली आहे. जाणुनबुजुन ईगल कंन्स्ट्रक्शनला काम दिले जाते अधिका–यांना दुसरा कुणी ठेकेदार मिळत नाही काय? अधिकारी लोक त्यांच्याशी मिळाले आहेत.

**सदस्य श्री. सुरेश जाधव/ सदस्य श्री. नरेंद्र दवणे:–**जेसीबी मशिन ब–याच वेळेला बंद राहते तरीही त्यांना पेमेंट अदा केले जाते. प्रोक्लेन मशिन व जेसीबीच्या दरात बराच फरक आहे. प्रोक्लेन मशिनचा दर कमी आहे, जेसीबीचा दर जास्त असल्याने प्रोक्लेन मशिन वापरली जाते व जेसीबीच्या दरानुसार बिल अदा केले जाते. जेसीबीच्या दरात आणि प्रोक्लेनच्या दरात काही फरक आहे की नाही?

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–**त्यांचे पैसे कापुन घेणार आहेत.

**सदस्य श्री. किशोर जग्यासी:–**तसे मी पत्र देखिल दिले आहे.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–**यावेळेस आम्ही व्हिडीओ शुटींग करण्यास सांगितले आहे.

**सदस्य श्री. नरेंद्र दवणे:–**तीन तीन महिने प्रोक्लेन मशिन बंद असते. नगरसेवकांनी जेसीबी व प्रोक्लेन मशिनची मागणी केली असता त्या मिळत नाहीत. जेसीबी मशिन कुठे कुठे वापरली याचा श्री. सावंत साहेब तुमच्याकडे काही पुरवा आहे काय? तुमचे अधिकारी काय करतात? हा जनतेचा पैसा आहे त्याचा दुरुपयोग होता कामा नये. त्याचा योग्य असा उपयोग झाला पाहिजे. जेसीबी आणि प्रोक्लेन या ज्या मशिन वापरल्या जातात त्यांचा डॉ. दिपक सावंत यांच्याकडे रेकॉर्ड आहे किंवा नाही

**डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त, आरोग्य):–**आहे, मुकादमांच्या सहया आहेत.

**सदस्य श्री. नरेंद्र दवणे :–** नागरीकांच्या किंवा नगरसेवकांच्या स्वाक्ष–या घेतल्या जात नाहीत काय?

**डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त, आरोग्य):–**जेथे प्रोक्लेन मशिन व जेसीबी मशिन जाण्यासारखा रस्ता आहे तेथे जेसीबी मशिन लावुन गाळ काढला जातो. वालधुनी नाल्याची प्रोक्लेन मशिनद्वारे सफाई करण्यात आलेली आहे. व तशी व्हिडीओ शुटींगसुध्दा करण्यात आलेली आहे.

**सदस्य श्री. सुरेश जाधव:–**नाला सफाईच्या कामाची एखादया सदस्यांनी व्हिडीओ शुटींग करुन सीडी दिली तर तुम्ही तिचा स्विकार कराल काय?

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–**आम्ही पत्र स्विकारतो मग सीडी का नाही स्विकारणार?

**सदस्य श्री. सुरेश जाधव:–**काम झाल्यानंतर नगरसेवकाचे पत्र घेतले पाहिजे.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–**ठिक आहे. नाला सफाईचे काम झाल्यानंतर त्याची खात्री पटविण्यासाठी संबंधित नगरसेवकाचे पत्र, नागरीकांच्या सहया तसेच व्हिडीओ शुटींग करुन घेतले जाईल.

**सदस्य श्री. नरेंद्र दवणे:–**माझी विनंती आहे की या ठेकेदारास काम देवु नये जनतेचा पैसा फुकट जावु नये. हे काम दुस–या कुण्या ठेकेदारास दिले जावे.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–**याबाबतचा निर्णय मला घ्यायचा नसुन तो स्थायी समितीने घ्यायचा आहे.

**<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:–</u>**पावसाळा डोक्यावर येवुन ठेपला आहे.  नाला सफाईचे काम लवकरात लवकर सुरु झाले पाहिजे.

**<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे:–</u>**याचा अर्थ आपले असे म्हणणे आहे की याच ठेकेदाराला काम दिले पाहिजे? साहेब, २००७ च्या लेखी तक्रारी आहेत.  माझी ही तक्रार मी तुम्हांला देत आहे.

**<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी:–</u>**डॉ. दिपक सावंत तक्रारीची दखल घेत नसल्याने आयुक्त साहेब, आपणाकडे तक्रार घेवुन यावे लागते.

**<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे:–</u>**छोटया छोटया गोष्टींसाठी आयुक्त साहेब, तुमच्याकडे येणे आम्हांस बरोबर वाटत नाही. ठेकेदारास पैसाच कमवायचा असेल तर त्याने चांगले काम केले पाहिजे.  चांगले काम केले तर त्यास पुन्हा पुन्हा काम मिळु शकेल ना?

**<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे:–</u>**पावसाळा जवळ आला आहे.

**<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे:–</u>**मागील वर्षीच्या नाला सफाईबाबत तुम्हांला काही अनुभव आहे किंवा नाही?

**<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे:–</u>**आमच्या प्रभागात चांगले काम केले होते.

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>सभापती, श्री. मोहन रामरख्यानी :–</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १० :–** पावसाळयापूर्वी प्रोक्लेन मशिनद्वारे लहान–मोठया नाल्यांची सफाई करणे व निघालेल्या गाळाची डंम्परद्वारे डंपिंग ग्राउंडवर वाहतूक करण्याकामी मेसर्स ईगल कंन्स्ट्रक्शन कंपनी या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

दरवर्षी प्रमाणे सुरु होणा–या मान्सूनपूर्वी शहरामधील मोठे व प्रमुख नाले यांची प्राक्लेन मशिनमार्फत तसेच इतर नाल्याची सफाई रोजंदारीवर कामगार नेमून नाला सफाई करणेत येते. यंदाही शहरातील मान्सून पूर्व नाला सफाई काम वेळेवर होणे अत्यावश्यक आहे.

पावसाळयात अतिवृष्टीमुळे पुराचे पाणी शहरातील खोलगट भागात साचु नये, पुरामुळे शहरातील नागरीकांची वित्तहानी व प्राण हानी होऊ नये, तसेच पावसाळयात रोगराई होऊ नये म्हणून महानगरपालिकेला दरवर्षी पावसाळयापूर्वी शहरातील लहान–मोठे नाल्यांची सफाईचे कामे चांगल्या प्रकारे करुन घ्यावी लागतात. पावसाळयापूर्वी शहरातील नाला सफाईचे काम हे अत्यंत जरुरीचे व जनहिताचे असल्यामुळे ते करुन घेणे आवश्यक आहे. दरवर्षी अशा प्रकारे नाले सफाईची कामे चांगल्याप्रकारे करुन घेतल्यामुळे शहरात पावसाळयात जलजन्य स्थिती तसेच पुर स्थिती शहरात उद्‌भवत नाही.

पावसाळया पूर्वी पोक्लेन, जेसिबी मशिनद्‌वारे नाले सफाई कामास लोकसभा पोटनिवडणुकीमुळे आदर्श अचार संहिता लागू असल्याने मा. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणुक अधिकारी, ठाणे यांची परवानगी मागण्यात आली होती त्यानुसार मा. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणुक अधिकारी, ठाणे यांनी क्रमांक. सामान्य/कक्ष–२/मेष–२/निवडणुक दि. २ मे २००८ अन्वये मान्यता दिली आहे.

त्यानुसार दिनांक ५/५/०८ रोजी दैनिक सामना व दैनिक उल्हास विकास या वर्तमान पत्रात निविदा सुचना प्रसिद्‌ध करुन दिनांक ५/५/२००८ ते १२/५/२००८ रोजी पर्यंत ५ कोरी निविदा पुस्तिका वेगवेगळया ठेकेदारांनी खरेदी केल्या, व दिनांक १३/५/२००८ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सदर सिलबंद निविदा स्विकारण्यात आल्या व प्राप्त ३ निविदा दि. १५/०५/२००८ रोजी दुपारी १२.०० वाजता उप – आयुक्त (आरोग्य) यांचे दालनात उप – आयुक्त (आरोग्य), मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक यांचे उपस्थितीत

निविदाकारांचे प्रतिनिधी यांचे समोर उघडण्यात आल्या. परंतु प्राप्त निविदाकारांत पात्र तिन निविदा नसल्याने दिनांक १७/५/०८ रोजी वृत्तपत्रात अल्प मुदत फेरनिविदा सुचना प्रसिद्ध करुन दिनांक १७/५/२००८ ते २२/५/२००८ रोजी पर्यंत ७ कोरी निविदा पुस्तिका वेगवेगळया निविदाकारांनी खरेदी केल्या, व दिनांक २३/५/२००८ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत ५ सिलबंद निविदा स्विकारण्यात आल्या व प्राप्त निविदा त्याच दिवशी दुपारी ४.०० वाजता उप – आयुक्त (आरोग्य) यांचे दालनात उप – आयुक्त (आरोग्य), यांचे उपस्थितीत व निविदाकारांचे प्रतिनिधी यांचे समोर उघडण्यात आल्या.

सदर निविदेचा तपशील व प्राप्त झालेले दर खालील प्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | अटी व शर्ती नुसार जोडलेली कागदपत्रे | शेरा | प्राप्त झालेले दर |
|---|---|---|---|---|
| १ | मे. अर्चना कंन्स्ट्रक्शन कंपनी | एकच लिफाफा सादर केला व त्यात फक्त निविदा संचिका होती. डी.डी.व इतर आवश्यक कागदपत्रेजोडली नव्हती. | अपात्र | —— |
| २ | मे. अजित ट्रान्सपोर्ट कंपनी | आवश्यक अटी व शर्ती पुर्ण. | पात्र | अंदाजीत प्राकलना पेक्षा ३१टक्के जास्त म्हणजेच रुपये २१,८७,७००/– |
| ३ | मे. दिपक कंन्स्ट्रक्शन कंपनी | अटी व शर्तीनुसार पोक्लेन मशीन स्व:मालकीची कागदपत्रे नव्हती. | अपात्र | —— |
| ४ | मे. ईगल कंन्स्ट्रक्शन कंपनी | आवश्यक अटी व शर्ती पुर्ण. | पात्र | अंदाजीत प्राकलना पेक्षा २६.१०टक्के जास्त म्हणजेच रुपये २१,०५,५००/– |
| ५ | मे. व्ही. आर. पनवेलकर | आवश्यक अटी व शर्ती पुर्ण. | पात्र | अंदाजीत प्राकलना पेक्षा २९ टक्के जास्त म्हणजेच रुपये २१,५४,३००/– |

एकूण प्राप्त ५ निविदांपैकी मे. अर्चना कंन्स्ट्रक्शन कंपनी व मे. दिपक कंन्स्ट्रक्शन कंपनी हे निविदाकार निविदेतील अटी व शर्ती पुर्ण करत नसल्यामुळे त्यांची निविदा ग्राहय होत नसल्यामुळे लिफाफा क्र २ (वित्तीय लिफाफा) उघडण्यात आलेला नाही.

तरी वरील प्राप्त निविदांत मे. ईंगल कंस्ट्रक्शन कंपनी यांचे दर तुलनात्मक रित्या कमी आहेत. परंतु सदरचे दर/रक्कम अंदाजीत प्राकलनापेक्षा २६.१० टक्के जास्त दर/रक्कम निविदाकाराकडून भरण्यात आलेले आहे. त्यामुळे मे. ईंगल कंस्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर यांच्याशी लगेचच वाटाघाटी करण्यात आल्या, त्यानुसार संबंधीत निविदाकाराने २५.१० टक्के अंदाजीत प्राकलनापेक्षा जास्त रक्कम म्हणजेच रुपये २०,८९,१७०/– (वीस लाख एकोणनव्वद हजार एकशे ऐंशी मात्र) या दराने काम देण्यात आले आहे. परंतु संबंधीत निविदाकाराने सादर केलेले दर हे एम.आय.डी.सी., डी. एस. आर. दरापेक्षा ४ टक्के जास्त आहेत. तरी संबधीत मे. ईगल कंन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर यांनी वाटाघाटी अंती सादर केलेले दर रुपये २०,८९,१७०/–(वीस लाख एकोणऐंशी हजार एकशे सत्तर मात्र.) स्वीकारण्याबाबत सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर निर्णयार्थ सविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १० दिनांक:– २८/५/२००८

सुचकाचे नाव :– श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार पावसाळयापूर्वी प्रोक्लेन मशिनद्वारे लहान–मोठया नाल्यांची सफाई करणे व निघालेल्या गाळाची डंम्परद्वारे डंपिंग ग्राउंडवर वाहतूक करण्याकामी मेसर्स ईगल कंन्स्ट्रक्शन कंपनी या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**प्र. महापालिका सचिव :–** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ११ :–** अर्थसंकल्पीय अनुदानात विर्निदिष्ट केलेल्या एका लेखा शिर्षातुन दुस–या लेखा शिर्षात अनुदान समायोजनेस अधिन राहुन उल्हासनगर रेल्वे स्टेशन येथे पादचारी पुल बांधण्यासाठी ५० लाख रुपयांची तरतुद उपलब्ध करणे.

---

**श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–**उल्हासनगर रेल्वे स्टेशन येथे पादचारी पुल बांधण्यासाठी सुधारीत प्राकलनानुसार अंदाजे २ कोटी ३२ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी ६४.१० लक्ष इतकी रक्कम महापालिकेने रेल्वेस अदा केली असल्याने उर्वरीत रक्कम १.६८ कोटी इतक्या रक्कमेपैकी ७५ लक्ष एवढी रक्कम भरणे आवश्यक आहे.

**सदस्य श्री. मोहन साधवानी:–**प्रकल्पाचा एकुण खर्च किती आहे? आपणांस किती रक्कम दयायची आहे.

**श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–**सुधारीत प्राकलनानुसार सदर कामाचा खर्च २ कोटी ३२ लाख इतका आहे.

**सदस्य श्री. मोहन साधवानी:–**त्यातील किती टक्के रक्कम आपणांस दयायची आहे.

**श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–**पुर्ण १०० टक्के रक्कम आपणांस दयायची आहे.

**सदस्य श्री. मोहन साधवानी:–**व काम सुध्दा आपणच करावयाचे आहे काय? रेल्वे काही पैसे देणार नाही काय? याबाबत रेल्वेस पत्रव्यवहार केला आहे काय?

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–**रेल्वेकडुन काहीही रक्कम मिळणार नसुन पुर्ण खर्च आपणांस करावयाचा आहे. ७५ लाख रुपये महापालिकेने तात्काळ रेल्वेस उपलब्ध करुन देण्याबाबत उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत.

**प्र. महापालिका सचिव:–**पादचारी पुल बांधण्यासाठी अंदाजे २ कोटी ३२ लाख खर्चापैकी ६२.५० लाख रुपये शासनाने व महापालिकेने १.६० लक्ष अशी ६४.१० लक्ष इतकी रक्कम यापुर्वीच रेल्वेस अदा करण्यात आलेली आहे.

**सदस्य श्री. जीवन इदनानी:–**पादचारी पूल बांधणे कामी रेल्वेस देण्यासाठी जेवढी रक्कम कमी पडत आहे तेवढी रक्कम दुस–या लेखाशिर्षातुन समायोजित करण्यात यावी.

**श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–**७० लाख रुपये दुस–या लेख्या शिर्षातुन समायोजित करावे लागतील.

**सदस्य श्री. राजेश वानखेडे:–**दुस–या लेखा शिर्षातून निधी समायोजित करुन घेणार म्हणजे तुम्ही आमचीच कामे कमी करणार? रस्त्यांची जी कामे आहेत त्या यादीमध्ये आमच्या प्रभागातील रस्त्यांचा समावेश नाही. महापालिका मुख्यालय इमारतीवर अतिरिक्त माळा बांधण्यासाठी ज्या निधिची तरतुद करण्यात आलेली आहे त्या निधीतुन या कामासाठी निधी समायोजित करुन घ्या, तेथुन निधी समायोजित का नाही करुन घेत?

**श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—**मुख्यालयाच्या इमारतीवर एका विंगवर एक माळा बांधायचा आहे.

**सदस्य श्री. राजेश वानखेडे:—**कधी बांधणार?

**श्री. शिर्के (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—**कार्यवाही चालु आहे. एमएमआरडीएकडुन १ कोटी रुपये मिळणार आहेत.

**सदस्य श्री. राजेश वानखेडे:—**पादचारी पुलासाठी जेवढे काही पैसे पाहिजे असतील ते आताच घेवुन टाका. पाहिजे तर ५ लाख रुपये जास्त घ्या.

**सदस्य श्री. सुरेश जाधव :—**श्री. शिर्के साहेबांनी म्हटले की, या पादचारी पुलासाठी ७० लाख रुपयाचा निधी समायोजित करावा लागेल. माझे म्हणणे आहे की, त्यापेक्षा थोडा फार जास्त निधी समायोजित करा.

**सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—**७५ लाख रुपयाचा निधी समायोजीत करा.

**सदस्य श्री. राजेश वानखेडे:—**हे काम एकदाचे पुर्ण करा. आयुक्त साहेबांना उच्च न्यायालयात वारंवार जावे लागत आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्री. मोहन रामरख्यानी :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ११ :—** अर्थसंकल्पीय अनुदानात विर्निदिष्ट केलेल्या एका लेखा शिर्षातुन दुस—या लेखा शिर्षात अनुदान समायोजनेस अधिन राहुन उल्हासनगर रेल्वे स्टेशन येथे पादचारी पुल बांधण्यासाठी ५० लाख रुपयांची तरतुद उपलब्ध करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर रेल्वे स्टेशन येथे पादचारी पुल बांधणेसाठी मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. १५०/२००६ सुरु आहे. सदर प्रकरणामध्ये उल्हासनगर महानगरपालिका, राज्य शासन व रेल्वे यांना प्रतिवादी असून मा.उच्च न्यायालयाने या प्रकरणी दिनांक १२ मार्च २००८ रोजी सदर पादचारी पुल बांधण्यासाठी राज्य शासन व उल्हासनगर महानगरपालिकेने आवश्यक तो निधी उभारावा असे आदेश दिले आहेत. त्यास अनुसरुन राज्य शासनाने ६२.५० लक्ष दिनांक २७ मार्च,२००८ च्या शासन निर्णयाद्वारे उल्हासनगर महानगरपालिकेसाठी मंजूर केलेल्या रु.२.०० कोटी तरतूदीपैकी रु.७५.०० लक्ष तरतूद महापालिकेस तात्काळ उपलब्ध करुन द्यावे व उर्वरीत तरतूद उल्हासनगर महानगरपालिकेने रेल्वेस उपलब्ध करुन देणेबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत.

● अशाप्रकारे महाराष्ट्र शासनाने एकूण १३७.५० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिलेले आहे. मा.उच्च न्यायालयाने सदर प्रकरणी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही सुरु आहे. रेल्वेने याबाबत सदर पादचारी पुलाचे नकाशे व सादर करुन रु.२.१२ कोटी इतक्या रक्कमेची प्राकलने महापालिकेस सादर करुन रेल्वे ॲक्ट मधील सेक्शन १९ मधील तरतूदीनुसार १००: रक्कम महापालिकेने रेल्वेस अदा करणेबाबत कळविले होते. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या रु. ६२.५० व महानगरपालिका रु. १.६० लक्ष अशी रु. ६४.१० लक्ष इतकी रक्कम यापूर्वीच रेल्वेस अदा केलेली आहे. त्यानंतर रेल्वेने दिनांक १७/४/२००८ च्या पत्रासोबत सदर पादचारी पूल बांधणेच्या कामाची रु. २.३२ कोटी इतक्या रक्कमेची सुधारीत प्राकलने महापालिकेस सादर केली आहेत. त्यापैकी रु.६४.१० लक्ष इतकी रक्कम यापूर्वीच महानगरपालिकेने रेल्वेस अदा केली असल्याने उर्वरीत रु. १.६८ कोटी इतक्या रक्कमेपैकी रु. ७५.०० लक्ष इतकी रक्कम शासनाचे दिनांक १९ एप्रिल,२००८ च्या आदेशानुसार मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून प्राप्त करणे आवश्यक आहे. व उल्हासनगर महानगरपालिकेचा ५०: सहभाग म्हणून रु. ७५.०० लक्ष एवढी रक्कम भरणे असल्याने उल्हासनगर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पिय उपलब्ध तरतूदीनुसार ब ४ ;पअ द्ध उड्डाणपूल या

लेखाशिर्षांतर्गत २५.०० लक्ष एवढी तरतूद उपलब्ध करण्यात आली असून उर्वरीत रु. ५०.०० लक्ष एवढी तरतूद ब ४ ;पप द्ध नविन रस्ते बनविणे या लेखाशिर्षातून उपलब्ध होणेकरीता स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

सभेतील चर्चेअंती सदर कामी रु. ७५.०० लक्ष एवढी रक्कम ब ४ ;पप द्ध नविन रस्ते बनविणे या लेखाशिर्षातून उपलब्ध करुन देणे बाबत निर्देशित करण्यात आले.

स्थायी समिती ठराव क्र. ११ दिनांकः— २८/५/२००८

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. गोविंदराम लुंड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार अर्थसंकल्पीय अनुदानात विर्निदिष्ट केलेल्या C-4 (ii) या लेखा शिर्षातुन *c4* (iv) या लेखा शिर्षात अनुदान समायोजनेस अधिन राहुन उल्हासनगर रेल्वे स्टेशन येथे पादचारी पुल बांधण्यासाठी ७५ लाख रुपयांची तरतुद उपलब्ध करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र. महापालिका सचिव :— विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १२ :— उल्हासनगर शहरातील टंचाईग्रस्त भागात टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणेकामी ठेकेदारांची नियुक्ती करणे.

---

सदस्य श्री. राजेश वानखेडेः—१९/३/२००८ रोजी हा विषय स्थायी समितीपुढे मंजुरीस आला होता आता पुन्हा हा विषय स्थायी समितीपुढे का आला आहे.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—श्री. खडताळे साहेब, या विषयाची सभागृहाला सविस्तर माहिती दया. डॉ. सावंत साहेब तुम्ही सांगा.

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त):—उल्हासनगर शहरातील टंचाईग्रस्त भागात टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्याकामी सन २००७—०८ मध्ये ईगल कंन्स्ट्रशन कंपनी या संस्थेस निविदा देण्यात आली होती. सदर संस्थेची मुदत दिनांक ३०/५/२००८ रोजी संपृष्टात येत आहे तसेच पुढील कालावधीत काम करण्यास तयार नसल्याबाबत दिनांक ७/५/२००८ व २०/५/२००८ अन्वये त्याने महापालिकेस पत्रान्वये कळविले आहे. त्यामुळे सदरचे काम निविदेतील उर्वरीत तीन निविदाधारकांकडुन निविदा प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत करुन घेणे गरजेचे आहे. दिनांक २७/५/२००८ रोजी मेसर्स गायत्री वॉटर सप्लाय यांनी पत्र दिले आहे की त्यांच्याकडे पाच टॅकर असून ते जुन्या दराने टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्यास तयार आहेत. हरदिप रोडवेज कल्याण हा ठेकदार १५ टक्के जास्त दर दिल्यास पाणी पुरवठा करण्यास तयार आहे. तसेच विजय वॉटर सप्लाय हा ठेकेदार २० टक्के जादा दर दिल्यास पाणी पुरवठा करण्यास तयार आहे.

सदस्य श्री. राजेश वानखेडेः—विजय वॉटर सप्लाय यांनी कुठल्या तारखेस पत्र दिले आहे? त्यांनी २७/५/२००८ रोजी पत्र दिले असून तो काम करण्यास तयार असतांनाही त्यास हे काम का दिले जात नाही?

डॉ. दिपक सावंत (उप-आयुक्त):-**गोषवारा निघाल्यानंतर त्यांनी पत्र दिले आहे.**

सदस्य श्री. राजु जग्यासीः—या महापालिकेत नियम, कायदा कानुन काही आहेत की नाही? मागील वर्षी ज्या चार ठेकेदारांनी निविदा भरली होती त्या वेळेस महापालिकेने त्यांना पत्र दिले होते की आपण निविदेस पात्र नाहीत.

त्याच ठेकेदारांना आपण आता पत्र देत आहात की आपण आमच्या महापालिकेत टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी या.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधवः—</u>दि. १९/३/२००८ रोजीच्या सभेत हा विषय वगळला होता तरी तो विषय या सभेत कसा आला?

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>दिनांक ३०/५/२००८ रोजी निविदा कालावधी संपुष्टात येत असल्यामुळे पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत १५—२० दिवसाचा कालावधी जाईल. तोपर्यंत पर्यायी व्यवस्था केली नाही तर टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे काम बंद ठेवावे लागेल.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी:—</u>पर्यायी व्यवस्था होईपर्यंत जुन्या ठेकेदाराने काम चालु ठेवले पाहिजे अशी निविदेमध्ये अट आहे ना?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>अल्पमुदतीची निविदा सूचना काढली जावी.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे:—</u>२७ तारखेस जयराम वॉटर सप्लाय यांनी पत्र दिले आहे की ते रुपये २३० प्रति टॅकर एवढया कमी दराने काम करण्यास तयार आहेत आणि त्यांना कामाचा अनुभव सुध्दा आहे.

<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—</u>जयराम वॉटर सप्लाय हे कमी दराने काम करण्यास तयार आहेत तर मग त्यांना ते काम का दिले जात नाही? त्यांना या कामासाठी बोलावुन घेतले जावे.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>आता आपल्यासमोर दोन पर्याय आहेत. काही सदस्य म्हणतात त्याप्रमाणे अल्पमुदतीची निविदा सूचना काढता येणार नाही. त्यामुळे निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे काम बंद ठेवावे. दुसरे निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी म्हणजे वीस—एकवीस दिवसासाठी प्रचलित दरानुसार जुन्या ठेकेदारामधील ही जी दोन—तीन नावे पुढे आली आहेत त्यातील कुणी काम करण्यास तयार असतील तर त्यांना हे काम देता येण्यासारखे आहे, मात्र जुन्या दरानेच, दर वाढवुन देण्यास आम्ही तयार नाहीत.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे:—</u>१० टक्के जास्त दराने काम देवु नये असा लेखा विभागाने आक्षेप नोंदविला आहे ना?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>नविन निविदा काढुन काम वाटप करण्यामध्ये किती कालावधी जाईल?

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>नविन निविदा सूचना काढुन काम वाटप करेपर्यंत कमीत कमी तीन आठवडयाचा कालावधी जाईल.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>नविन निविदा कार्यान्वीत होईपर्यंतच्या कालावधीसाठी असा काही मार्ग काढला जावा की ठेकेदारांकडुन काम करुन घेतले जावे व त्यांना रोजच्या रोज कामाचे पैसे वाटप केले जावेत. त्यासाठी आपला एखादा अधिकारी नेमावा.

<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः—</u> जे लोक टॅकर मागविता त्यांच्याकडुन नाममात्र २०० रुपये शुल्क वसुल केले जावे त्यामुळे कोण कोणत्या विभागात टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता आहे ते आपणांस माहित पडेल.

<u>सदस्य श्री. प्रधान पाटील:—</u>माझ्या प्रभागात जलवाहिनी टाकलेली नाही त्यामुळे टॅकरशिवाय पर्याय नाही.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>जसे श्री. नरेंद्रकुमार ठाकुर म्हणतात की, टॅकरवर नाममात्र शुल्क आकारले जावे तसे केले तर काय नागरीक टॅकरचे शुल्क भरण्यास तयार होतील? आता आपणापुढे तीन पर्याय आहेत पहिला पर्याय, ठेकेदारांनी केलेल्या कामाबद्दल त्यांना रोजच्या रोज पैसे देणे, दुसरा पर्याय, निविदा संपल्यानंतर पुढील निविदा कार्यान्वीत होईपर्यंतच्या कालावधीसाठी टॅकरद्वारे पाणी पुरवठा बंद ठेवणे व तिसरा पर्याय, प्रचलीत

दरानुसार जे ठेकेदार काम करण्यास तयार असतील त्यांच्याकडुन पंधरा दिवस किंवा तीन आठवडयापर्यंत काम करुन घेणे.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:—जयराम वॉटर सप्लाय कमी दरामध्ये काम करण्यास तयार असल्याने त्यास हे काम दिले जावे.

सदस्य श्री. जीवन इदनानी:—नविन निविदा सूचना काढुन कार्यान्वीत करण्याची प्रक्रिया तीन आठवडयामध्ये पुर्ण झाली पाहिजे.

सदस्य श्री. सुरेश जाधव:—जयराम वॉटर सप्लायवाला पुर्ण वर्षभर काम करण्यास तयार आहे.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—आहे त्या दराने काम करण्यास तयार असतील तर त्यांचा ठराविक कालावधीसाठी विचार केला जाईल. दोन तीन संस्था काम करण्यास तयार असतील तर समप्रमाणात कामाचे वितरण केले जाईल.

सदस्य श्री. मोहन साधवानी:—तीन आठवडयापर्यंतच्या कालावधीसाठी अल्पमुदतीची निविदा सूचना काढली जावी त्याचबरोबर वर्षभराच्या कालावधीसाठी जी निविदा सूचना काढली जाते ती सुध्दा काढली जावी.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—स्थायी समिती जसे निर्देश देईल तसे करु.

सदस्य श्री. मोहन साधवानी:—तोपर्यंत त्याच ठेकेदाराचे काम चालु ठेवावे.

सदस्य श्री. सुरेश जाधव:—जुन्या दराने काम करण्यास जे तयार असतील त्यास दया.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—याबाबतचा निर्णय स्थायी समितीने घ्यावा.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—हे म्हणतात की, १५ ते २० दिवसात निविदा प्रक्रिया पुर्ण होईल परंतु काही वेळा यासाठी एक ते दिड महिना लागतो. एवढा कालावधी लावता कामा नये.

सदस्य श्री. जीवन इदनानी:—२० दिवसापेक्षा जास्त कालावधी दिला जावु नये.

सदस्य श्री. मोहन साधवानी:—गायत्री वॉटर सप्लायकडे ५ टॅकर आहेत. या ५ टॅकरने संपुर्ण शहरात पाणी पुरवठा करावयाचा झाला तर ते शक्य नाही. त्यामुळे टॅकरसाठी ठिकठिकाणी भांडणे होतील.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—आपण जर मला प्राधिकृत करत असाल तर प्रती टॅकर ५० रुपये नाममात्र शुल्क आकारले जावु शकते.

श्री. खडताळे (कार्यकारी अभियंता, पापु):—निविदा प्रक्रिया पुर्ण होण्यासाठी तीन आठवडयापेक्षा जास्त कालावधी लागेल.

सदस्य श्री. सुरेश जाधव:— श्री. खडताळे साहेब म्हणतात की,. निविदा प्रक्रिया पुर्ण होण्यासाठी जास्त कालावधी लागेल. यासाठी साहेब, टॅकरवर शुल्क आकारण्याबाबतचा विषय स्थायी समितीपुढे आणा. असा विषय आला तर टॅकरचे प्रकरण नेहमीसाठी संपुष्टात येईल.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—निविदा प्रक्रिया पुर्ण होण्यासाठी तीन आठवडयापेक्षा जास्त कालावधी लागणार नाही. तीन आठवडयाच्या आत ती पुर्ण केली जाईल आणि वस्तुस्थिती काय आहे ती स्थायी समितीपुढे ठेवली जाईल.

सदस्य श्री. राजु जग्यासी:—निविदेची प्रक्रिया आजपासुनच चालु केली तर काय हरकत आहे?

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>निविदा सूचना काढल्यानंतर सात दिवसाची वेळ दयावी लागते आणि त्यानंतर संपुर्ण निविदा प्रक्रिया पुर्ण होण्यास २१ दिवसाचा कालावधी लागतो.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधवः–</u>साहेब, आपण तर कायदेशीर भाषा बोलत आहात.

<u>सदस्य श्री. गोविंदराम लुंडः–</u>सर्व प्रभागांमध्ये नविन जलवाहिन्या टाकुन घराघरांमध्ये पाण्याचे मिटर लावले जावेत.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानीः–</u>जलवाहिनीला पाणीच नाही तर मिटर लावुन काय होईल?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधवः–</u>कमी दराने काम करण्यास जे तयार आहेत त्यास काम देण्यास तुम्ही तयार आहात ना?

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>होय. ज्या संस्था तयार असतील त्यांना समप्रमाणात कामाचे वाटप केले जाईल.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानीः–</u>आणि जर अपेक्षित संख्येने टॅकरचा पुरवठा झाला नाही तर काय कराल?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>सभापती, श्री. मोहन रामरख्यानी :–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. १२ :–** उल्हासनगर शहरातील टंचाईग्रस्त भागात टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणेकामी ठेकेदारांची नियुक्ती करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील टंचाईग्रस्त भागात टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणेसाठी ठेकेदार निश्चिती करीता जाहिर निविदा मागविणेत आली होती. या करीता एकुण ४ निविदा प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त निविदापैकी ईगल कंन्सट्रक्शन कंपनी यांचे दर सर्वात कमी होता परंतु तो वाजवी नसल्याने त्यांना वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. परंतु प्रथम वाटाघाटीद्वारे दर संबंधीतांनी कमी न केल्यामुळे पुन्हा त्या ठेकेदारांकडुन वाटाघाटीद्वारे दर मागविण्यात आले होते. त्यानंतर रु. २५४.५२ दराने मे. ईगल कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी काम करण्याची तयारी दर्शविली. स्थायी समितीने ठराव क्र. २३, दिनांक १८/५/२००७ अन्वये मे. ईगल कंन्स्ट्रक्शन कंपनी उल्हासनगर यांची निविदा स्विकारुन कॅम्प नं. १ ते ५ मधील टॅकरद्वारे पाणी पुरवठयाचे काम संबंधीत ठेकेदारास देण्याची मंजुरी दिली. याप्रमाणे दिनांक ३०/५/२००७ पासुन मे. ईगल कंन्स्ट्रक्शन कंपनी यांना कामाचा आदेश देण्यात आला असून त्यांचेद्वारे कॅम्प १ ते ५ मध्ये टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सदर निविदेची मुदत दिनांक ३०/५/२००८ रोजी संपुष्टात येत आहे. सदर ठेकेदाराने त्यांचे दिनांक ७/५/२००८ व दिनांक २०/५/२००८ अन्वये पुढील कालावधीसाठी टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणार नाही असे लेखी कळविले आहे. सन २००८–०९ साठी रक्कम रु. १.०० कोटीची तरतुद आहे. सदर पुढील १ वर्षाच्या कालावधीसाठी रु. १,५७,९३,०००/– एवढा खर्च अपेक्षित आहे. परंतु सन २००८–०९ च्या अर्थसंकल्पातील तरतुद बघता पुढील ६ महिने कालावधीसाठी रक्कम रु. ७९,१८,११८/– चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहे. मंजुरी नंतर निविदा प्रक्रिया पुर्ण होण्यासाठी काही कालावधी लागणार असल्यामुळे व मुळ ठेकेदारामार्फत सदरचे काम पुढे चालु ठेवण्यास नकार दिल्यामुळे सदरचे काम निविदेतील उर्वरीत तीन निविदा धारकांकडुन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत उर्वरीत ठेकेदाराकडुन काम करुन घेणे गरजेचे आहे व प्रशासकिय मान्यता मिळणे गरजेचे आहे.

या कामाकरीता मागविलेल्या निविदा धारकापैकी उर्वरीत तीन निविदा धारक १) मेसर्स गायत्री सप्लायर्स, उल्हासनगर, २) मेसर्स विजय वॉटर सप्लायर्स, उल्हासनगर, ३) मेसर्स हरदीप रोडवेज, कल्याण हया संस्था कार्यरत ठेकेदाराच्या दरानुसार काम करण्यात तयार आहेत. या बाबतचा गोषवारा दिनांक १९/३/२००८ च्या मा. स्थायी समितीपुढे सादर केला होता तथापी स्थायी समितीने ठराव क्र. १६० अन्वये अतिरिक्त ठेकेदाराची नियुक्ती करणेकामी मान्यता दिली नाही. त्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार सदरचे टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे

काम वरील तीन ठेकेदारांना विभागुन दिल्यास शहरातील कॅम्प नं. १ ते ५ मध्ये टॅकरद्वारे विहित वेळेत पाणी पुरवठा होवून नागरीकांची मागणी पूर्ण होवू शकेल.

सदर मुळ कामाच्या मे. ईगल कंन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा दिनांक ३०/५/२००८ रोजी संपृष्टात येत असल्यामुळे व त्यांनी पुढील कालावधीत काम करण्यास नकार दिलेला असल्यामुळे सदर काम १) मेसर्स गायत्री सप्लायर्स, उल्हासनगर, २) मेसर्स विजय वॉटर सप्लायर्स, उल्हासनगर, ३) मेसर्स हरदीप रोडवेज, कल्याण हया संस्था सध्या कार्यरत ठेकेदाराच्या दरानुसार विभागुन देणे बाबत मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे गरजेचे आहे.

सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

सभेतील चर्चेअंती खालील प्रमाणे निर्देश देण्यांत आले.

१) उल्हासनगर शहरातील टंचाईग्रस्त भागात टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणेसाठी निविदा सूचना काढण्यात यावी.

२) निविदेची सर्व प्रक्रिया २१ दिवसात पुर्ण करण्यांत यावी.

३) २१ दिवसात निविदा कार्यान्वित होई पर्यंत प्रचलित दराने ज्या संस्था काम करण्यास संमती दर्शवतील त्यांना कार्यादेश देण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करण्यात यावे.

स्थायी समिती ठराव क्र. १२ दिनांक:— २८/५/२००८

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वानखेडे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील टंचाईग्रस्त भागात टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणेकामी प्रचलित दरावर काम करणेस ज्या संस्था समंती दर्शवतील त्या संस्थांना कार्यदेश देवुन त्यांच्याशी करार करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ५ चे कलम (२) पोटकलम (२) नुसार निविदा शिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे. तसेच नविन निविदा कार्यान्वित होई पर्यंतच्या दिनांकापर्यंत किंवा कमाल २१ दिवसापर्यंत सदरची व्यवस्था करणेस मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र. महापालिका सचिव :— प्रशासनाकडुन आयत्या वेळचा विषयान्वये एक विषय आलेला आहे आपणामधील बहुसंख्य सदस्यांची संमती असेल तर तो आजच्या सभेच्या कामकाजात सामावून घेता येईल.

काही सदस्य :— सदरचा विषय आजच्या सभेच्या कामकाजात सामावुन घ्यावा.

सभापती, श्री. मोहन (गारो) रामरख्यानी:— आयत्या वेळचा विषय सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समावून घेण्यात येत आहे.

प्र. महापालिका सचिव :—विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

⇨ आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १३** :— प्रशासकिय प्रशिक्षण व गुणवत्ता केंद्रासाठी रुपये २०,०००/— स्थायी अग्रिम मंजुर करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

<u>सभापती, श्री. राम पारवानी :–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

<u>आयत्यावेळचा विषय</u>

**विषय क्र. १३ :-** प्रशासकिय गुणवत्ता केंद्रासाठी रुपये २०,०००/– स्थायी अग्रिम मंजुर करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेने प्रशासकिय प्रशिक्षण व गुणवत्ता केंद्र सुरु केले आहे. या केंद्रात विविध प्रकारचे प्रशिक्षण घेण्यात येणार आहे तेव्हा या प्रशिक्षणासाठी पाणी, चहापान, भोजन, पुष्पगुच्छ, व्याख्यात्याचे मानधन, नोटबुक, पेन, फोल्डर व इतर किरकोळ साहित्य इत्यादी वारंवार खरेदी करणे व वाहने इत्यादीसाठी वारंवार लागणारा खर्च करणे तसेच नविन यंत्रणा आवश्यक असल्यास खरेदी करण्यासाठी पि.ए. रुपये २०,०००/– असावे असे वाटते.

तरी वरील बाबींचा योग्य विचार करुन प्रशासकिय प्रशिक्षण व गुणवत्ता केंद्रासाठी पि.ए. रुपये २०,०००/– मंजुरीसाठी स्थायी समिती पटलावर सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १३ <u>दिनांकः– २८/५/२००८</u>

सुचकाचे नाव :– श्री. गोविंदराम लुंड

अनुमोदकाचे नाव :– श्री. गणपत एडके

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रशासकिय गुणवत्ता केंद्रासाठी रुपये २०,०००/– स्थायी अग्रिम रक्कम मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ५.१५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. मोहन (गारो) रामरख्यानी यांनी जाहिर केले.

(हरेश इदनानी)
प्र.महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.